१२५
अ/3/पिट2
९२०४

( शाहूनगरवासी नाटक मंडळीचे विनंतीवरून लिहिलेलें, )

# श्रीज्ञानेश्वरमहाराज

( भक्तिरसपर व ऐतिहासिक नाटक. )

जो ज्ञानराज भगवान् श्रवणीं सुज्ञान दे, वदे वाचा; ।
अवतार गमे अकरावा कां सुज्ञान देवदेवाचा ॥ १ ॥
मोरोपंत.


## विनायक त्रिंबक मोडक

'मौनयौवना' 'श्रीविक्रमादित्य भाग, १।२' 'राणा भीमदेव' इत्यादि पुस्तकांच्या कर्त्यांपैकीं एक व 'प्रणयविवाह' नाटकाचे कर्ते,


यांनीं लिहिलें

तें


पुणें येथें

**आर्यभूषण** छापखान्यांत **हरी नारायण गोखले** यांनीं छापून **विनायक त्रिंबक मोडक** यांनीं प्रसिद्ध केलें.

---

**सोल एजन्ट्स:—**

सत्पुरुषमालिका प्रकाशक मंडळी, पुणें.

---

**सन १९०४.**

---

किंमत १ रुपया.

या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या आक्टाप्रमाणें नोंदून पुस्तक छापविण्याचा, रंगभूमीवर प्रयोग करण्याचा, संगीत व भाषांतर करण्याचा वगैरे सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपल्याकडे ठेविले आहेत.

हें पुस्तक

# प्रोफेसर काशिनाथ विनायक छत्रे

जगत्प्रसिद्ध

## दि न्यू इंडियन् सरकसूचे मालक

**यांस**

त्यांनीं स्वधर्मश्रद्धेच्या व ईश्वरनिष्ठेच्या बलावर, आपल्या अश्रांत परिश्रमानें व दृढ निश्चयानें, हातीं घेतलेल्या महत्कृत्यांत पूर्ण यश संपादून या आर्यावर्तांतच नव्हे तर पौरस्त्य व पाश्चात्य राष्ट्रांतही लोकोत्तर कार्यकर्तृत्वाचा जो थोर लौकिक संपादन केला आहे

## त्याबद्दल

पुस्तककर्त्यास वाटणाऱ्या अभिमानाचें अल्पसें द्योतक म्हणून

त्यांच्या परवानगीनें

**प्रेमपूर्वक**

## अर्पण केलें आहे.

पुस्तककर्ता.

# प्रस्तावना.

तिन्हीदेवजैसेपरब्रह्मीचेठसे ॥ जगींसूर्यजैसेप्रकाशले ॥ १ ॥
धन्यतोनिवृत्तिधन्यतोसोपान ॥ धन्यहानिधानज्ञानदेव ॥ २ ॥
उपजतांचिज्ञानीहेंवर्मजाणोनी ॥ आलेलोटांगणींचांगदेव ॥ ३ ॥
संस्कृताचीगांठीउघडोनीज्ञानदृष्टीं ॥ केलीसेमराठीगीतादेवी ॥४॥
प्रत्यक्षपैठणींभटींकेलावाद ॥ रेड्यामुखींवेदबोलविला ॥ ५ ॥
नामाह्मणेसर्वसुकृतेंलाहिजे ॥ एकवेळांजाईजेआलकापुरां ॥ ६ ॥

नामदेव.

गीतिवरिलटिका ॥ जैसेंओगरिलेंओका ॥ १ ॥ रत्नताटामाजीं ॥ जैशीओपियेलीकांजी ॥ २ ॥ माझ्याज्ञानियावांचूनी ॥ ह्मणेनामयाचीजनी ॥ ३ ॥

जनाबाई.

सर्वसुखाचीलहरी ॥ ज्ञानाबाईअलंकापुरीं ॥ १ ॥ शिवपीठहेंजुनाट ॥ ज्ञानाबाईतेथेंमुगुट ॥ २ ॥ वेदशास्त्रेंदेतीग्वाही ॥ ह्मणतीज्ञानाबाईआई ॥ ३ ॥ ज्ञानाबाईचेचरणीं ॥ शरणएकाजनार्दनीं ॥ ४ ॥
ज्ञानेश्वरापाटीं । जो वोवी करील मऱ्हाटी । तेणें अमृताचे ताटीं । जाण नरोटी ठेविली ॥ १ ॥

एकनाथ.

जयाचियेद्वारींसोन्याचापिंपळ ॥ अंगीऐसेंबळरेडाबोले ॥ १ ॥
करीलतेंकायनव्हेमहाराज ॥ परिपाहेबीजशुद्धअंगीं ॥ २ ॥
जेणेंहेघातलीमुक्तीचीगवांदी ॥ मेळविलीमांदीवैष्णवांची ॥ ३ ॥
तुकाह्मणेतेथेंसुखाकायउणें ॥ राहेसमाधानेंचित्ताचिया ॥ ४ ॥

तुकाराम.

तारावया जन समग्र । पुन्हां अवतरला रमावर । गीतार्थ केला साचार । तो ज्ञानेश्वर जगद्गुरु ॥ १ ॥

श्रीधर.

तिचे पुत्र कन्या एक । ऐसी संतती होतां देख । ऐकतां नामें सकळिक । होती पावन जडमूढ ॥ १ ॥ प्रथम अवतार मृडानीपती । त्याचें नाम ठेविलें निवृत्ति । विष्णु अवतार जन्मला क्षितीं । तया ह्मणती ज्ञानदेव ॥ २ ॥

महीपति.

श्रीविष्णुसा न तारी जन काय ज्ञानदेव वेगानें ?। हा दे तें स्वर्गाच्या जनका यज्ञा न देववे गानें ॥ १ ॥ ज्ञानेशा ! भगवंता ! भगवज्जनवल्लभा ! महासदया ! । कलियुगवर्ती जन जो, देशी स्मरणेंचि, मुक्तिचें पद या ॥ २ ॥ त्वन्नाम महामंत्र ज्ञानप्रद होय; यासि जो भावें । जपतो, ज्ञान तयाचे, त्या जनकाचें तसेंचि शोभावें ॥ ३ ॥ कोणा जडा न होशील सुगतिप्रद जाहलासि भितीतें । श्रीरामाचें तैसें, तव यश सज्जनसमाज चिंती तें ॥ ४ ॥ ज्ञानेशा ! जें जाड्य त्वत्तेजें क्षिप्र तें विरे; डाजो । खळमानसीं प्रताप; श्रुति वदला विप्र तेंवि रेडा जो ॥ ५ ॥ श्रीमद्भगवद्गीता व्याख्या केली जगासि ताराया। सारा या सद्ग्रंथा सेविति संसारताप साराया ॥६ ॥

मोरोपंत.

उभारिलाध्वजातिहींलोकांवरी ॥ ऐसीचराचरींकीर्तिज्याची ॥ १ ॥ तेहेंनिवृत्तिनाथज्ञानेश्वरसोपान ॥ मुक्ताबाईज्ञानदीप्तिकळा ॥ २ ॥ धरुनीसगुणरूपेंकेलीक्रीडा ॥ बोलविलारेडानिगमवाक्यें ॥ ३ ॥ वरीबैसवूनीचालविलीभिंती ॥ चांगदेवाप्रतीभेटीदिली ॥ ४ ॥ मगवासकेलाअलंकापुरासीं ॥ पिंपळद्वारांशींकनकाचा ॥ ५ ॥ निळाह्मणेज्यांच्यानामेंकरितांघोष ॥ नातळतीदोषकळिकाळाचे ॥ ६ ॥

निळोबाराय.

ज्ञानेशोभगवान्विष्णुर्निवृत्तिर्भगवान्हरः ॥ सोपानोभगवान्ब्रह्मा मुक्ताख्याब्रह्मणःकला ॥ १ ॥

निरंजन कवि.

याप्रमाणें भगवान् श्रीविष्णूंनीं सहाशें वर्षांपूर्वी या आर्यावर्त्तांत ज्या रूपानें अवतार धारण केला होता व ज्या श्रीविष्णुस्वरूप श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या महतीचे पोवाडे, श्रीनामदेव व जनाबाई, ह्यांच्यासारख्या तत्कालीन अनेक श्रेष्ठ वैष्णवांनीं, श्रीएकनाथ व श्रीतुकाराम ह्यांच्यासारख्या त्यांच्या मागून, भगवद्भक्तिमार्गाचा प्रसार करण्याकरितां, या आर्यावर्त्तांत अवतीर्ण झालेल्या महान् संतांनीं, श्रीधर, महीपति ह्यांच्यासारख्या प्रासादिक चरित्रकारांनीं, मोरोपंतासारख्या कविवर्यांनीं आणि निळोबाराय, निरंजनमाधव ह्यांच्यासारख्या अगदीं अलीकडील भगवद्भक्तांनीं गाईले आहेत, अशा परात्पर जगद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा धन्यवाद म्यां पामरानें आणि त्यांच्या दासानुदासानें कोठवर गावा ?

अहाहा ! पूर्ण परब्रह्म श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा केवढा अलौकिक महिमा कीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा अवतार होऊन आज सहाशें वर्षे होऊन गेलीं, तरी अद्यापि लक्षावधि वारकरी हातांत टाळ, विणा, मृदंग घेऊन मुखानें ' ज्ञानोबा माउली ' या अत्यंत पवित्र नामाचा गजर करीत, प्रतिमासीं हरिदिनीं पुण्यक्षेत्र आळंदीस लोटत असून, श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधिदर्शनानें संसारउपाधींतून आपली मुक्तता करून घेऊन सुखी होत आहेत ! कोट्यवधि भावीक श्रीज्ञानोबारायांनीं केलेल्या रसाळ, दिव्य आणि भक्तिपर अभंगांचा पाठ गाऊन परलोकचें थोर साधन नित्यशः जोडीत आहेत ! असंख्य मुमुक्षु श्रीज्ञानोबारायांनीं विश्वोद्धारार्थ निर्माण केलेल्या श्रीज्ञानेश्वरीमातेचें दुग्धपान करून आपला भवव्याधिरूपी रोग दिगंतरीं घालवून ज्ञानसंपन्न होत्साते देहत्यागानंतर चिन्मयपदाची जोड मिळवीत आहेत ! कित्येक श्रीज्ञानोबारायांच्या अमृतानुभवरूपी सुधेचें प्राशन करून अजरामरत्वाची जोड मिळवीत आहेत ! आणि प्रपंचाटवी हिंडतां हिंडतां थकून भागून गेलेले असंख्य जीव श्रीज्ञानोबारायांच्या पासष्टी, योगवासिष्ट ह्यांसारख्या ग्रंथरूपी मोक्षवृक्षांच्या घनदाट छायेंत घटकाभर बसून आपला शीणभाग घालवीत आहेत !

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं आपल्या अवताराच्या बावीस वर्षांच्या अल्पकाळांत आपल्या गंभीर आणि रसाळ वाणीनें आह्मां जड भारतीयांचें अज्ञान घालवून व आमच्या अंतःकरणांतील भेदांकुर उपटून टाकून, आमच्या पाखंडबुद्धीचें निरसन केलें ! आणि आम्हांस हा दुस्तर भवसागर तरून जातां यावा म्हणून परमेश्वरभक्तीची नाव आमच्या हातीं दिली ! वैष्णवांना हरिभक्तीच्या नाना कल्पना सांगून वैष्णवमार्गाची स्थापना केली ! श्रीमद्भगवद्गीतेचा गूढार्थ आम्हां प्राकृत जनांकरितां मराठीभाषेंत शोधून आणि श्रीमद्भगवद्गीतेंत वर्णिलेल्या चरित्रासारखें चरित्र स्वतः करून दाखवून, गीतार्थबोधाचा ठसा आमच्या मनावर पूर्णपणें उठवून दिला ! आणि जात्यभिमान, वर्णाभिमान अथवा कुलाभिमान बाळगून अज्ञानानें आचरण केलेला कर्ममार्ग, हें मुक्तीचें खरें साधन नसून, ज्ञानानें भगवंताला ओळखून निस्सीम भक्तियुक्त अंतःकरणानें परमेश्वरास शरण जाणें, हाच मोक्षप्राप्तीचा खरा मार्ग आहे; परमेश्वराच्यापाशीं जाति, वर्ण, कुल ह्यांचा अथवा श्रीमान्, गरीब, थोर, लहान, ज्ञानी, अज्ञानी, पुरुष, स्त्री ह्यांचा भेदाभेद नाहीं; देव सर्वांना भक्तीनें सारखाच वश होणारा आहे; मग तो ब्राम्हण असो, वैश्य असो, शूद्र असो किंवा अंत्यज असो, शास्त्रज्ञ असो अथवा मूढ असो, परमेश्वराची त्यानें एकनिष्ठ

भक्ति केली म्हणजे तो परमेश्वराशीं एकरूप होतो; ह्या ज्ञानाची ओळख श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं आम्हांस करून दिली !

स्वोन्नति व स्वोन्नतीमागून राष्ट्रोन्नतीकरितां ज्या अनेक अंगांनीं आमचे प्रयत्न सांप्रत चालू आहेत, ते सुफल होण्यास आम्ही आपले अंगीं प्रथम धर्मश्रद्धेचें व ईश्वरनिष्ठेचें बळ प्राप्त करून घेतलें पाहिजे. हें बळ आम्हांस कसें प्राप्त करून घेतां येईल याचा यथार्थ बोध सकल विश्वास करून देण्याकरितांच श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं अवतार धारण केला असल्यामुळेंच, श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें जीवनचरित्र नाटकरूपांत गोवून तद्वारें त्यांनीं बोधिलेल्या भगवद्भक्तिसाधनोपायांची जागृति माझ्या देशबंधुभगिनींच्या अंतःकरणांत उत्पन्न केली असतां, राष्ट्रोन्नतीच्या महत्कार्यी माझ्याहातून अल्पस्वल्प तरी सेवा घडेल, अशा बुद्धीनें मी हा प्रस्तुतचा प्रयत्न केला आहे. आतां ही गोष्ट खरी कीं, ज्या श्रीज्ञानेश्वरमहाराज जगद्गुरूंनीं आम्हांस संसारबंधापासून मुक्त करण्याकरितां आपल्या संसाराला जन्मतःच तिलांजलि दिली ! आम्हांस परमार्थाची ओळख करून देण्याकरितां आपल्या स्वार्थाचा होम केला ! अंगाला बालवयांतच असंगाची राख फासून तीव्र वैराग्य धारण केलें आणि आमचें वैभव वृद्धिंगत करण्याकरितां आपल्या तृष्णेचा उच्छेद केला ! आमचे मनोरथ पूर्ण करण्याकरितां आपल्या वासना जाळून दग्ध केल्या ! आह्मांस लौकिकास चढविण्याकरितां आपला स्वतःचा लौकिक पायांखालीं तुडविला ! आणि दुर्जनांनीं कुशब्दांचें व निंदेचें शस्त्र उचलिलें असतां आपल्या शांत सद्बोधानें त्यांना गलितशस्त्र केलें ! अशा पूर्ण परब्रह्म ज्ञानश्रेष्ठांच्या व योगीश्रेष्ठांच्या चरित्रांत नाटक विषयास परिपोषक असे सामान्यजनांच्या चरित्रांतील मनोरंजक व हास्यरसोत्पादक प्रकार, किंवा चित्तास रमविणारे शृंगारादि ग्राम्य विषय, किंवा शरिरांतील रक्त खळबळविणार वीररौद्रादि नानाविध रस, यांचा पूर्ण अभाव असल्यामुळें मनरंजनाच्या मुख्य हेतूस विघातक असा हा प्रस्तुत नाटक विषय आहे. तरी पण भक्ति, ज्ञान, वैराग्य, नैष्कर्म्य, विनय, शांति व क्षमा ह्यांची साक्षात् मूर्तीच जे श्रीज्ञानेश्वरमहाराज, त्यांचें चरित्र नेत्रांनीं पाहून, त्यांचीं भक्तियुक्त व बोधपर वचनें कानांनीं ऐकून, परमेश्वराच्या अगाध प्रभुत्वाची आम्हां सर्वांस साक्ष पटवून देण्याकरितां आपल्या अंगच्या ईश्वरी अंशाचे जे चमत्कार त्यांनीं करून दाखविले त्यांचे साक्षात्कार आमच्या मनास पटून, आह्मी जात्याच भाविक व श्रद्धालु असे जे आर्यांचे वंशज त्या आमचीं मनें शांत, गंभीर व भक्तिपर होतील; आह्मांपैकीं जे

नास्तिक आहेत, ज्यांच्या आंगावरून भगवद्भक्तीचें कधीं वारेंही गेलें नाहीं अशांच्याही अंतःकरणांत श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चरित्रांतील या नाटकांत गोवलेल्या प्रेमळ व हृदयंगम कथा प्रहरभर पाहिल्यानें आस्तिक बुद्धि, धर्मश्रद्धा व भगवत्‌निष्ठा उत्पन्न होऊन त्यांची वृत्ति पालटेल आणि प्रापंचिक दुःखांचा विसर पाडून घेऊन मनास रंजवून घेण्याकरितां नाटकगृहांत घटकाभर काळ घालविणारे जे आह्मी, ते अशा श्रेष्ठ सत्पुरुषचरित्रदर्शनानें "ब्रह्मानंदीं लागली टाळी कोण देहातें सांभाळी" अशा स्थितीप्रत पोंहचूं, इतकेंच नाहीं तर, त्यायोगें या मायिक संसाराच्या आणि या ऐहिक सुखोपभोगाच्या क्षणभंगुरतेचा आम्हांस पूर्ण बोध होऊन, हा प्रपंच रहाटत असतां मनास खरी शांति व समाधान व देहास खरें सुख उत्पन्न करून घेण्याचा श्रेष्ठ मार्ग ह्मणजे एक भगवद्भक्तीच होय, आणि या मार्गानेंच गेलें असतां देहाचें सार्थक होईल हा सद्बोध आमच्या मनावर कायमचा ठसेल, अशी पूर्ण उमेद आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या जीवनचरित्राशीं ज्यांनीं पूर्ण परिचय करून घेतला आहे असे जे विद्याव्यासंगी व इतिहासज्ञ पुरुष या महाराष्ट्रांत आहेत त्यांमध्यें, आमचे येथील लोकमान्य, बहुश्रुत व विद्वान् हरिभक्तिपरायण श्रीपति रघुनाथबोवा भिंगारकर यांच्यासारखा पुरुष आज नाहींच असें ह्मटलें तरी चालेल. मीं आपल्या अल्पबुद्धीनें लिहिलेल्या या नाटकाची हस्तलिखित प्रत रा. रा. भिंगारकरबोवा यांस वाचून पाहण्याविषयीं विनंति केली. ती मान्य करून त्यांनीं आपला अमोल वेळ खर्चून माझें नाटक साद्यंत मनःपूर्वक वाचून पाहिलें. हें नाटक लिहितांना मीं वाचलेल्या ग्रंथांशिवाय, हल्लीं अनुपलब्ध ग्रंथांतील रा. रा. भिंगारकरबोवा यांच्या वाचण्यांत आलेल्या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अवतारासंबंधीं हृदयंगम कथा मला सांगून त्या या नाटकांत गोवण्याविषयीं त्यांनीं मला सूचना केली; तसेंच श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या संबंधानें निरनिराळ्या चरित्रकारांनीं आपापल्या ग्रंथांत नमूद केलेल्या गोष्टींच्या कालासंबंधानें आज बरींच वर्षें ऊहापोह होऊन त्यांचा जो कालनिर्णय सांप्रत निश्चित झाला आहे आणि श्रीविष्णूंनीं ज्ञानदेव व ज्ञानेश्वर या दोन नांवांनीं भिन्नभिन्न काळीं पृथक् पृथक् अवतार धारण केले होते किंवा श्रीविष्णूंच्या एकाच अवताराला हीं भिन्नभिन्न नांवें होतीं, या वादग्रस्त विषयासंबंधानें साधकबाधक प्रमाणांअंतीं जो निर्णय सुज्ञ व विचारी समाजानुमतें अखेर ग्राह्य झाला आहे, त्याचेंही त्यांनीं मला यथार्थ ज्ञान करून दिलें. तसेंच अशा लोकोत्तर महात्म्यांच्या चरित्रनाट-

कांत कोणते प्रसंग वर्ज्य असले पाहिजेत असें वारकरी, वैष्णव व आधुनिक विद्वान् यांचें मत आहे, त्याची फोड त्यांनीं मला करून देऊन अशा महात्म्यांच्या नाटकरचनेची योग्य दिशा त्यांनीं मला दाखवून दिली. तसेंच श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चरित्रांतील निरनिराळे प्रसंग नाटकांत गोवतांना त्यांची जुळणी करून घेण्याकरितां क्वचित् ठिकाणीं त्यांच्या क्रमांत आलटापालट करणें किंवा त्यांत कमीजास्त करणें मला जरूर वाटलें, तसा फरक कोणत्या रितीनें केला असतां, अशा नाटकाचा मुख्य हेतु जो भगवद्भक्तिमार्गाचा प्रसार तो विशेष प्रकारानें साध्य होईल हेंही त्यांनीं मला सुचविलें. तात्पर्य हें नाटक लिहिण्याचे कामीं त्यांचें मला थोर साह्य झालें असून या त्यांच्या साह्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

सुप्रसिद्ध नाट्यकलाभिज्ञ शाहूनगरवासी नाटकमंडळींनीं हें नाटक लिहिण्यास मला मुद्दाम सांगून जें प्रोत्साहन दिलें त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. अशा विस्तृत चरित्रात्मक नाटकाची रंगभूमीच्या सोईकरितां निराळी रंगावृत्ति करणें जरूर असल्यामुळें, ह्या नाटकाचीही तशी निराळी रंगावृत्ति मीं केली असून, ती करण्याचे कामीं शाहूनगरवासी नाटकमंडळीच्या नाट्यशास्त्रज्ञानाचें मला जें साह्य मिळालें त्याबद्दलही मी त्यांचा फार आभारी आहें.

या पुस्तकाच्या छपाईचें काम काळजीपूर्वक व मनासारखें करून दि-ल्याबद्दल आर्यभूषणछापखान्याच्या व्यवस्थापकांचाही मी आभारी आहें.

शेवटीं ज्यांच्या प्रसादामुळेंच मजसारख्या अनधिकारी व अल्पबुद्धि पामराकडून हीं वेडींवाकडीं चार अक्षरें लिहिलीं गेलीं, त्या परात्परजगद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे चरणावर पूर्णभक्तियुक्त अंतःकरणानें त्रिवार मस्तक ठेवून, प्रस्तावनेदाखल लिहिलेले हे दोन शब्द मी पुरे करतों.

मुक्काम पुणें, सदाशिव पेठ,
कार्तिक शुद्ध ११ शके १८२६.

**विनायक त्रिंबक मोडक**
पुस्तककर्ता.

# नाटकांतील पात्रें.

**श्रीज्ञानेश्वरमहाराज** — श्रीअलंकापूर (आळंदी) येथील सुप्रसिद्ध अवतारी पुरुष.

**श्रीनिवृत्तिनाथमहाराज** — श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे गुरु व ज्येष्ठ बंधु.

**सोपानदेव** — श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे कनिष्ठ बंधु.

**मुक्ताबाई** — श्रीज्ञानेश्वरमहाराजांची बहीण.

**सच्चिदानंदबाबा** — ह्माळसापूर (नेवासें) येथील कुळकरणी.

**विसोबाखेचर** — श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा आळंदी येथील प्रमुख निंदक.

**चांगदेव** — तापीतीरस्थ महासिद्ध.

**रामराजा** — कऱ्हाडनगराधिपति.

**सीताबाई** — रामराजाची स्त्री.

**बाळकृष्णा** — राजपुत्र.

**नामदेव** — पंढरपूर येथील श्रीपांडुरंगाचा प्रेमळ भक्त.

**मुद्गलाचार्य** — वाराणसी क्षेत्रीं चालू असलेल्या यज्ञाचे यजमान.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वडील **विठ्ठलपंत**, मातोश्री **रुक्मिणी-बाई** व विठ्ठलपंतांचे गुरु **श्रीपाद रामानंदस्वामी.**

श्रीज्ञानेश्वरमहाराजांस शुद्धिपत्र देण्याकरितां प्रतिष्ठान क्षेत्रीं जमा झालेले **चतुर्धर** पंडित, **बोपदेव** पंडित इत्यादि विद्वान् ब्रह्मश्रेष्ठ.

**प्रतिष्ठान** ( पैठण ), **अलंकापुर** ( आळंदी ), **ह्माळसापुर** ( नेवासें ), **वाराणसी** ( काशी ), **पंढरपूर** वगैरे क्षेत्रांतील व **कऱ्हाड** नगरींतील पुरुष व स्त्रिया.

चांगदेवांचे शिष्य, सच्चिदानंदबाबांची स्त्री **सावित्रीबाई**, सीताबाईच्या दासदासी, रामराजाचे कुलगुरु व सेवकजन.

**मुद्गलाचार्यांच्या** यज्ञाकरितां वाराणसी क्षेत्रीं सप्तपुऱ्यांतून आलेले विद्वान् ब्राह्मण.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे समकालीन **गोराकुंभारादि** संत.

व यांशिवाय भजनीलोक, पालखीवाले, वगैरे इतर पात्रें.

हें पुस्तक तयार करण्यास घेतलेले

# आधारभूत ग्रंथ.

खालीं नमूद केलेल्या ग्रंथांचें मला उत्कृष्ट साह्य झालें, याबद्दल सदर्हू ग्रंथलेखकांचा व प्रकाशकांचा मी फार ऋणी आहें.

**भक्तिलीलामृत** ( महीपतिकृत. )

**भक्तविजय** ( महीपतिकृत. )

**संतलीलामृत** ( महीपतिकृत. )

**श्रीभक्तितत्त्वामृत.**

**भक्तिसारामृत** ( नरहरि मालुकृत. )

**श्रीज्ञानलीलामृत** अथवा **आळंदीमहात्म्य.**

**श्रीज्ञानदेवाची गाथा** ( रा. रा. रा. श्री. गोंधळेकर यांनीं छापलेली. )

**श्रीनामदेवाची गाथा** ( रा. रा. रा. श्री. गोंधळेकर यांनीं छापलेली. )

**श्रीएकनाथाची गाथा** ( रा. रा. रा. श्री. गोंधळेकर यांनीं छापलेली. )

**श्रीतुकारामाच्या अभंगांची गाथा** ( रा. रा. सप्तऋषी व रा. रा. मोतीवाले यांनीं छापलेली. )

**निळोबारायाची गाथा** ( रा. रा. सप्तऋषी व रा. रा. गोडबोले यांनीं छापलेली. )

**श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें चरित्र** ( हरिभक्तिपरायण श्रीपति रघुनाथबोवा भिंगारकरकृत. )

**श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें चरित्र** ( रा. रा. बळवंत खंडोजी पारखकृत. )

**श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें चरित्र** ( इ. स. १८८४ सालीं पुणेवैभव छापखान्यांत छापलेलें. )

**श्रीज्ञानेश्वरविजय** ( निरंजन माधव कविकृत. )

**नामदेवकृत आदि.**

**सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी** ( रा. रा. कृष्णाजी नारायण आठल्ये, एडिटर केरळकोकिळ, यांनीं केलेली. )

**श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचा कालनिर्णय व संक्षिप्त चरित्र** ( हरिभक्तिपरायण श्रीपति रघुनाथबोवा भिंगारकर यांनीं भारद्वाजास दिलेलें उत्तर. )

**श्री नामदेवचरित्र** ( माधवराव आप्पाजी मुळे, वाईकरकृत. )

**वि० त्रिं० मोडक.**

# श्रीज्ञानेश्वरमहाराज.

## अंक १ ला.

### प्रवेश पहिला.

**स्थळ**— प्रतिष्ठान ( पैठण ) क्षेत्र.

( प्रतिष्ठान क्षेत्रांतील श्रीगोदावरीचा घाट. घाटावर लहानसें देऊळ आहे. घाटाच्या पायऱ्यांवर जान्हवी धुणीं धूत आहे व वल्लरी गोदावरींतून पाण्याची घागर भरून घेत आहे असा पडदा उघडतो. )

**वल्लरी**– ( गोदावरींतून पाण्याची घागर भरून घेऊन ती कमरेवर ठेविते व झपझप पावलें टाकीत घराकडे जाऊं लागते. )

**जान्हवी**– ( लुगडें चुबकीत असतां मध्येंच थांबून वल्लरीकडे पाहून ) वल्लरी, अग वल्लरी ! ( वल्लरी थांबून मागें वळून पाहते ) अग, घागर भरून घेऊन अगदीं मुकाट्यानं जी तूं तुरतुर पुढं निघालीस, तें मला इथें घर का बांधून राहायचं आहे ? अग, चार पिळे पिळीपर्यंत देखील का तुला धीर धरवेना ? तुझ्याकारितां मी आजपावतर कैकवेळां धुण्याची मोट डोक्यावर घेऊन नी पाण्याची घागर कमरेवर ठेवून प्रहरान्प्रहर उभी राहिली आहें, तें विसरलीस वाटतं ? ह्मणतात ना 'गरज सरो नी वैद्य मरो', तशांतली गत ! बरं पण वल्लरी, आजच्यानंच कांहीं सरलं नाहीं हो. येईल पुन्हा कधीं तरी वेळ, तेव्हां पाहीन मग ! ( इतक्यांत उत्तरा धुण्याची पाटी कमरेवर घेऊन येते. तिला उद्देशून ) उत्तरे, पाहिलंस का, आज किनई वल्लरीबाईंना आपल्याशीं एक शब्द-देखील बोलायला वेळ नाहींसा झाला आहे हो !

**वल्लरी**– जान्हवी, हें काय मेलं तुझं भलतंच बोलणं ? रिकामपण असल्यावर कुणी उभं का राहणार नाहीं ?

**जान्हवी**– ( लुगड्याचा पिळा पिळतां पिळतां ) हो; खरंच तें ! तुला रिकामपण कुठलं असायला ? कारण कामधाम नी नेम-धर्म कायतो तुझ्याच घरीं ! आम्हीं आपल्या निकाम्या, उठवळ, ना आम्हांला देव ना आम्हांला धर्म ! कां, असंच किनई वल्लरी-बाई ? पण आमच्या घरीं कांहीं पुरुष नाहीं हो चुली फुंकीत बसत ! आमच्या इथें तर, ऐकलंत का वल्लरीबाई, रोज घंगाळभर देवांची पूजा होते आहे ! नी देवांच्यापुढें काडवाती, बोटवाती, नी फुलवाती, बारा महिने जळतात आहेत त्या वेगळ्याच !

**उत्तरा**– ( पाण्यांत बुचकळून दगडावर ठेविलेल्या धुण्यांतील एक लुगडें पाण्यांत आघळतां आघळतां ) अग जान्हवी, या वल्लरीला किनई नको बाई कांहीं वेडंवाकडं बोलूं. अग, हिला वैकुंठास नेण्याकरितां स्वर्गांतून लवकरच विमान उतरायचं आहे हो खालीं ! नी त्याचा आला आहे तिला आतांशीं डौल ! ह्मणून म्हणतें हिच्याशीं गोड बोलत जा; ह्मणजे असलंच तुझ्या प्रारब्धीं तर हिच्याबरोबर तुलाही वैकुंठाची यात्रा घडेल अनायासं !

**वल्लरी**– हं. बोला, तुमच्या मनाला येईल तें खुशाल तुम्ही बोला ! मेली थट्टाच करायची, मग काय ? मन मानेल तें बोलावं !

**जान्हवी**– ( लुगडें दगडावर आपटतां आपटतां ) अस्सं, अस्सं ! अगबाई ! वल्लरीबाई खरंच का हें ? मग आम्हांला न्याल का तुमच्याबरोबर विमानांत बसवून ? आंत नसलं बसूं द्यायचं तर निदान तुमच्या विमानाचे खूर तरी धरूं द्या हो पण आम्हांला ! म्हणजे उत्तरा नी मी, आम्ही दोघीजणी येऊं ह्मणतें सहजीं गोष्टी बोलत तुझ्याबरोबर वैकुंठाला ! पण उत्तरे, विमान येण्यासारखा असा नेमधर्म तरी कोणता चालला आहे आतांशीं वल्लरीबाईचा, हें सांगशील तर खरं ?

**उत्तरा**– ( पिळा पिळतां पिळतां ) इश्श ! जळ्ळं इतकं देखील का नाहीं तुझ्या लक्षांत आलं ? तूं किनई अगदींच वेंधळी हो ! अग, अलंकापुरीहून आलेले वल्लरीचे विठू भाऊजी नी रुक्मिणी जाऊबाई ( जान्हवी नाक मुरडते ) कां ? नाक कां मुरडलंस ? नाहींत का तीं साक्षात् पंढरीचीं विठोबा-रखमाई ? त्यांची सेवा

करते आहे हो वल्लरी आतांशीं रात्रंदिवस मनोभावानं! मग विमान यायला कांहीं वेळ का लागायचा आहे?

**वल्लरी**–जान्हवी, जातें बाई मी आपली.

**उत्तरा**–वल्लरी, जायचंच तर जा; पण मी सांगतें एवढें ऐकून ठेव हो; म्हणजे झालाच तर उपयोगच होईल तुला माझ्या सांगण्याचा! हें बघ, विठू भाऊजींची सेवा नाहींच पुरी पडली, तर त्यांच्याच पोटीं आलेले निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान–साक्षात् शंकर, विष्णु, ब्रह्मदेव–नी त्यांची बहीण मुक्ताबाई–साक्षात् आदिमाया –यांची सेवा कर! म्हणजे तीं प्रसन्न होऊन वैकुंठांतलं विमान आणवितील बरं तुझ्याकरितां खालीं!

(इतक्यांत उर्मिळा तांदुळाची दुरडी घेऊन येते.)

**जान्हवी**–(लुगडें झाडतां झाडतां) असं का? हें नव्हतं बाई मला ठाऊक! उर्मिळे, ऐकलंस का हें तूं? आपेगांवच्या कुळकरण्याचा मुलगा, वेडा विठ्ठलपंत, पंढरीचा विठोबा झाला बरं का! नी त्या विठ्ठलपंताचीं कारटीं हीं शंकर, विष्णु, ब्रह्मदेव नी आदिमाया यांचे अवतार प्रगटले हो या कलियुगीं! (वल्लरीस उद्देशून) फार चांगलं बाई! मग, वल्लरीबाई, देवाला भेटायला आतां कांहीं वैकुंठाला जायची गरज उरली नाहीं तुम्हांला! (वल्लरीपुढें हात ओंवाळून) अहाहा!

**वल्लरी**-(घागर खालीं ठेवून) जान्हवीबाई, अहाहा म्हणून माझ्यापुढं हात नकोत ओंवाळायला. आहेतच ते प्रत्यक्ष देव; नी तुमच्या आमच्यासारख्या पातक्यांचा उद्धार करण्यासाठींच ते आले आहेत बरं का अवतार घेऊन या कलियुगीं, समजलीस?

**उर्मिळा**–(तांदुळाची दुरडी पाण्यांत बुडवून वर उचलून) आम्हांला उद्धरून न्यायला आले आहेत का वर्णसंकर करून सारी पृथिवी बुडवायला आले आहेत, तें अलंकापुरींतल्या शुचिर्भूत ब्राम्हणांना पुसून तरी ये म्हणतें एकदां! म्हणजे तेच देतील तुला याचं चांगलं उत्तर! काय ग जान्हवी, खरं कीं नाहीं?

**जान्हवी**–(लुगडें झाडतां झाडतां मध्येंच थांबून) ब्रम्हचारी-

पणाचं व्रत झेपेनासं झालं, बाईल हवीशी वाटूं लागली नी संसाराची हाव सुटली, तेव्हां संन्यास टाकून पुन्हा प्रपंचांत शिरलेला मेला बोका संन्याशी हा विठ्ठलपंत! नी अशा आचारभ्रष्टाच्या पोटीं जन्मास आलेलीं अवकळीं कारटीं! जळ्ळं नांवदेखील घेऊं नये मेल्यांचं! नी अशा मेल्यांना म्हणे देवाचे अवतार! वल्लरी, देवाची सेवा व्हायची जळ्ळी दूरच राहिली, पण अशानं देवाची निंदा मात्र घडते, दुसरं कांहीं नाहीं!

**वल्लरी**– (घागर पुन्हा कमरेवर घेण्याकरितां पदर सावरीत) माझे विठूभाऊजी संन्यास टाकून पुन्हा संसार करूं लागले, ते का त्यांना बायकोचा लोभ सुटला म्हणून का? तुझ्या नाहीं बाई जिभेला हाड, तेव्हां तूं काय वाटेल तें म्हणशील! अग, वाराणशींतले विठूभाऊजींचे गुरु, श्रीपाद रामानंदस्वामी, यांनीं सांगितलं हो विठूभाऊजींना पुन्हा संसारांत शिरायला! नी गुरूंची आज्ञा मोडायची नाहीं, म्हणूनच ते पुन्हा प्रपंच करूं लागले!

**उत्तरा**– (लुगडें धोंड्यावर आपटून) अग जान्हवी, तुला आहे का ठाऊक? वाराणशींतल्या कबीर मुसलमानाला शिष्य करून त्याला उपदेश याच रामानंदस्वामींनीं केला म्हणतात हो! या मेल्याला म्हणे जातीचा भेदाभेदच नाहीं! मग उजूच आहे, जसे गुरु तसे शिष्य!

**जान्हवी**– (घडी केलेलें लुगडें पायावर आपटतां आपटतां) उत्तरे, परवांच गोष्टींवरून गोष्टी निघाल्या होत्या, तेव्हां आमच्या सासूबाई सांगत होत्या कीं, या विठ्ठलपंताचे वडील गोविंदपंत नी आई निराबाई, हीं बरीक दोघंही देव-माणसं होतीं! नी सारं आपेगांव त्यांना फार नावाजीत असे! पण म्हणतात ना, 'तुळशीच्या पोटीं भांग!' तसा हा विठ्ठलपंत त्यांच्या पोटीं कुलांगार जन्माला आला!

**उर्मिळा**– (तांदूळ आसडतां आसडतां) पण या मेल्या विठ्यानं आदल्या जन्मीं कोणाचा तरी संसार उभा केला होता; म्हणून अलंकापुरींतला गरीब बिचारा कुळकरणी सिदोपंत, याला असल्या धटिंगणाच्या गळ्यांत आपली एकुलतीएक पोर बांधायची

देवानं बुद्धि दिलीन् ! नी भोळ्या उमाबाईला देखील काय भुरळ पडली, तों तिनं या विठ्याला घरजावई करा, असा सिदोपंतापाशीं आग्रह धरिला ! बायकोचा शब्द, सिदोपंतांना खालीं टाकवेना, तेव्हां विठ्ठलपंत झाले घरजावई ! रुक्मिणीबाईसारखी सुशील, चतुर नी निष्ठावंत बायको, लाखांत एक देखिल सांपडायची नाहीं हो ! पण ह्याला काय त्याचं होय ! एक दिवस हा गेला तिला सोडून, नी यानं घेतला संन्यास ! घी देखलं पण बडगा नाहीं देखला, तसं यानं सोन्यासारखी बायको टाकून संन्यास घेतला खरा, पण मागून हे बुवा झाले घाबरे, नी मग आले वाराणशीहून बायको हुडकीत अलंकापुरीला परत !

**जान्हवी**–( धुणीं दुरडींत भरतांना थांबून ) कां वल्लरी, आतां ग कां तुझं तोंड शिवलं ? मेले 'कर्मभ्रष्टी नी सदा कष्टी !' अशांना का तूं देव म्हणणार ?

**उत्तरा**–( लुगडें झाडतां झाडतां ) खरंच पुसशील तर जान्हवी, मला असं वाटतं कीं, या मेल्या पापिष्टांना अलंकापुरींतल्या ब्राम्हणांनीं नुसतं वाळींत टाकलं, हा यांच्या पापाच्या मानानं फारच थोडा दंड झाला ! यांना किनई, भर दोनप्रहरीं तापल्या तव्यावर उभं करून यांच्या अंगाला विंचू डसवायला हवे होते ! नी अशा धर्मभ्रष्टाच्या पोटीं आदल्या जन्मींचे कोण जळ्ळे घोर पापी प्राणी आलेले ! नी यांना म्हणे शुद्ध करून घेऊन यांच्या मुंजी करायच्या ! अग, अशा जातिभ्रष्टांना कांहीं केल म्हणून शुद्धता थोडीच यावयाची आहे ? ह्या गंगेच्या पाण्यानं साता जन्मांचीं पापं धुतलीं जातात, म्हणून यांत अंग धुतलेले महारमांग कधीं पाहिले आहेस का ब्राम्हण झालेले ? ( त्रिवेणी पूजा-साहित्य घेऊन येते. )

**जान्हवी**–( धुण्याची पाटी कमरेवर घेऊन ) उत्तरे, उर्मिळे, वल्लरीची पाठराखीण आली ग बाई ! आतां तोंडाला खीळ घाला हो ! कां म्हणून नाहीं पुसलंत ? हिचे यजमान किनई आतांशीं त्या कारट्यांना ईश्वर म्हणायला लागले आहेत हो ! कां ? तर म्हणे ते दिवशीं त्यांनीं आपले वडील या वल्लरीच्या घरीं आ-

द्धाच्या दिवशीं स्वर्गांतून खालीं उतरून पाटावर जेवायला येऊन बसलेले पाहिले! सगळाच जळ्ळा भुताटकीचा खेळ, नी तो जेव्हां श्रीपतभटांना खरा वाटला, तेव्हां आश्चर्यच !

**त्रिवेणी**–(गंगेची पूजा करीत असतां मध्येंच थांबून) जान्हवी, मेलेलीं माणसं स्वर्गांतून आणलीं ही भुताटकी, नी ज्ञानेश्वर महाराजांनीं रेड्याच्या तोंडून वेद बोलविले, याला ग तूं काय ह्मणणार? अग, देवाशिवाय कोणाच्या हातून बरं होणार आहेत असलीं अघटित कृत्यं!

**उत्तरा**–(धुण्याची पाटी भरीत असतां) इश्श! रेड्याच्या तोंडून वेद बोलविले नी श्राद्धाला मेलेलीं माणसं स्वर्गांतून खालीं आणलीं ह्मणूनच का त्यांना देव ह्मणायचं? अहा ग खुळे! अग, मसणवटांतले वेताळ, खवीस, समंध, ब्रह्मराक्षस, जाखाईजोखाई, यांची आराधना करून वीरमांत्रिक नी चेटकाळ्या थोडे का चमत्कार करून दाखवितात? त्यांतलेच मेले हे! ती राधी चेटकीण नव्हती का मागं इथें? तिचं या क्षेत्रांत केवढं प्रस्थ माजलं होतं, तें पाहिलं होतंसना? तिनं तुझ्याच जावेचं मूल, नव्हतं का पिंपळाच्या झाडावर नेऊन ठेवलं? एक कीं दोन, क्षेत्रांत तिनं सगळ्यांना त्राहि त्राहि करून सोडलं होतं! पण अखेर दादंभटांनीं तिची चांगली मोडशी जिरविली! तसं हवं या मेल्यांना करायला! दादंभट या वेळीं जिवंत असते तर, त्यांनीं बरीक त्या राधीसारखीच यांची कणीक चांगली मऊ केली असती समजलीस!

**जान्हवी**–(धुण्याची पाटी कमरेवरून उतरून ठेवून) मेला ढोपरा एवढा पोर! नी आपला व्यासपिठावर बसून पुराण सांगतो! नी अर्धाअधिक गांव रोज लोटतो आहे, त्याच्या त्या पुराणाला! आमच्या सासूबाईंच्याबरोबर, नाहीं ह्मणायला मी एक दिवस बसलें होतें हो त्याच्या त्या पुराणाला जाऊन. इश्श! चुलींत नेऊन घाला मेल्याचं तें पुराण! नाहीं त्यांत रामरावणाची क[illegible] कौरवपांडवांची लढाई, का कृष्णाची बाळलीला, कीं गो[illegible]रास, कीं द्रौपदीचं का सावित्रीचं आख्यान, कीं

हरिश्चंद्र राजाची कथा, कीं नेमधर्मांच्या का उपासतापासांच्या गोष्टी! देह अमुक आहे, कर्म तमुक आहे, नी जग मिथ्या आहे, याच सगळ्या मेल्या देहाच्या नी कर्मांच्या गोष्टी! मग पुरुषांना त्यांत काय जळ्ळं गोड लागत असेल तें त्यांचं त्यांनाच ठाऊक! अग, आतांशीं देवळांतले पुराणीक नी हरदास, हे देखील देवळांत येईनासे झाले आहेत पुराण सांगायला नी कथा करायला! जो उठला, तो सुटला मेला त्या पुराणाकडे धावत! खरंच, अशी नव्हती बाई कधीं आजवर तऱ्हा पाहिली!!

**उर्मिळा**–( तांदुळाची दुरडी निथळत धरून ) आमच्या घरीं बारा नी बारा चोवीस वर्सं वेंचून चांगलं सहा शास्त्रांचं नी चार वेदांचं अध्ययन केलं आहे! काशीपासून रामेश्वरापर्यंत आहे का दुसरा कोणी यांच्या तोडीचा वैदिक? हजारों कोसांवरून येत आहेत ना आमच्या घरीं कित्येक विद्यार्थी वेदांचं नी शास्त्रांचं पठण करायला? पण मला कालच कळलं हो, कीं यांनीं, तो रेडा जेव्हां वेद ह्मणायला लागला, तेव्हां घरच्या पोथ्या तेथें उरापोटावर घेऊन जाऊन त्या शुद्ध करून घेतल्या ह्मणून! झालं, थोरांनींच असं केलं, मग काय? गणभट, धोंडभट, हरभट, नी क्षेत्रांतले दुसरे अर्धवट ब्राह्मण, काखेंत पोथ्या मारून सुटले धावत पळत यांच्या मागं!

**उत्तरा**–(धुण्याची पाटी भरल्यानंतर पदर सावरीत) इतक्यानंच संपलं असतं, तर मला पतकरलं असतं बाई! पण आमच्या घरीं आतांशीं काय चाललं आहे तें ऐकलंस का? अग, आज चार दिवस, हीं पोरटीं ह्मणजे वैकुंठांतले देवच खालीं उतरले आहेत विश्वाचा उद्धार करायला, अशीच आपली चालली आहे आमच्या घरीं अहोरात्र घोकणी! नी लोकांना देखील तसाच उपदेश करणं चाललं आहे बाई आतांशीं एकसारखं! लोकांनीं म्हटलंच कीं, हे जर देवाचे अवतार आहेत तर मग यांनीं अशा भ्रष्टाच्या पोटीं कां जन्म घेतला? तर त्यांना दुर्वासमुनि, वशिष्ठमुनि, गौतममुनि, व्यास, वाल्मीक, अगस्ति नी पांडव, यांचा दाखला देऊन, यांचीं कुळं चांगलीं

होतीं असं कोणच्या शास्त्रांत सांगितलं आहे ? असं चाललं आहे साऱ्यांना अडवणं ! नी गांवांतले सारे वैदिक, शास्त्री नी पुराणीक गोळा करून या मेल्यांना शुद्धिपत्र द्यायचं आहे ना कायसंसं ? त्याची चालली आहे हो आमच्या घरीं तयारी ! अग, शहाणींच माणसं जर अशीं वेडांत शिरलीं तर त्यांना वेडं तरी कुणीं म्हणायचं आतां ?

**त्रिवेणी**–(पूजा आटपून उठून) उत्तरे, तूं आतां घरच्या यजमानांनासुद्धां वेडे ठरवायला लागलीस, तेव्हां शर्थच झाली ह्मणायची बाई तुझ्या शहाणपणापुढं ! इतके दिवस कथापुराणं ऐकलींस, तीं गेलीं वाटतं सारीं चूलखंडांत ? रामाला पाहून जसं त्या मंथरेच्या अंगांत कलीचं वारं शिरलं होतं, तसं कुठलं शिरलं बाई तुझ्या अंगांत जळ्ळं हें असलं वेडं वारं ? अग तूं त्या सत्पुरुषांची किती निंदा केलीस, त्यांना किती शिव्या दिल्यास, नाहींतर उद्यां एखादा धोंडा उचलून त्यांच्या डोक्यांत घातलास, तरी किनई त्यांना त्याचं कांहीं वाटायचं नाहीं ! उलट तुझं तोंड नी हात मात्र दुखून येतील !

**वल्लरी**–(पाण्याची घागर कमरेवर ठेवून) अग तूं जर आपली या सूर्यनारायणावर थुंकायला लागलीस, तर ‘ तूं माझ्यावर थुंकूं नको ’ असं तुला म्हणायला तो थोडाच येणार आहे आभाळांतून खालतीं ! उलट तुझीच थुंकी तुझ्या तोंडावर पडून लोक तुला हंसतील ! तसेच हे सत्पुरुष असतात बरं ! यांना कोणी निंदा कीं वंदा; ते तुम्हांला ‘ निंदू नका ’ म्हणून म्हणायला यायचे नाहींत, कीं ‘ वंदा ’ म्हणून सांगायला यायचे नाहींत ! तुम्हीं त्यांना निंदलंत तर तुह्मांला पातक लागेल, नी वंदलंत तर तुह्मांला पुण्य लागेल ! पण बाई, हें माझं सागणं, तुम्हांला नाहींच रुचायचं म्हणा ! त्रिवेणी, चल बाई, आपण देवाचं दर्शन घेऊन जाऊं कशा आपल्या घरीं !

**त्रिवेणी**–( निघून जातां जातां ) अहो उत्तराबाई, जान्हवीबाई नी उर्मिळाबाई, आलंच तुमच्या मनाला तर या बाई सोडून ही अशी साधुसंतांची निंदा करणं ! नी त्यांना शरण जाऊन

घ्या करून जन्माला आल्याचं सार्थक ! ( वल्लरी व त्रिवेणी देव ळाकडे जाऊं लागतात. )

**उत्तरा**- ( त्रिवेणीपुढें हात ओवाळून ) अललल ! आज हें एवढं ब्रम्हज्ञान कुठलं फुटलं आहे त्रिवेणीबाई तुम्हांला ? ( धुण्याची पाटी कमरेवर घेऊन व मोकळ्या हातानें उर्मिलेला व जान्हवीला घरकडे जाण्याकरितां ओढून ) आमचं काय मेलं म्हणा, पण तुह्मी बरीक घ्या हो या वाहत्या गंगेंत हात धुवून, (जातां जातां) म्हणजे यजमानांचा अंगरोग नी चार पिढ्यांचं दळिद्र तरी नाहींसं होईल तुमच्या घरचं ! !

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**— प्रतिष्ठान ( पैठण ) क्षेत्रांतील श्रीगोदातटाकाकडे जाणारा रस्ता.

( पार्वतीबाई झांकलेलें ताट हातांत घेऊन प्रवेश करते. इतक्यांत तिच्यामागून तिचा नवरा हरभट धावत येतो. )

**हरभट**– वा रे वा ! माझें घरदार लुटून तें त्या भामट्यांच्या पदरांत ओतायला जी तूं तुरतुर निघालीस, तें मी आजच नाहींसा झालों असें समजून होय ? पण हा हरभट तुला विचारायला अजून जिवंत आहे बरें का ! चल, फीर आल्या वाटेनें माघारी. बेशरम नाहीं तर ! म्हणे, या जन्मीं जर कोणाला कांहीं उचलून दिलें तर पुढच्या जन्मीं देव आपल्याला तसेंच देईल ! लोकांना उचलून द्यायला तुझ्या बापानें कांहीं शेंपन्नास हजार दिलेच असतील या हरभटाला ? आण तें सारें इकडे ! ( पार्वतीबाईच्या हातांतील ताटावर झडप घालण्यास पुढें होतो. )

**पार्वती०**- तर मग काय ? त्या सत्पुरुषांच्या दर्शनाला आज देखील का मी रित्याच हातानं हात हालवीत जाऊं ? इतकी जळी प्रपंचाची हाव धरून, अखेर गांठीं काय बांधून जाणार

आहांत, तें ईश्वराला ठाऊकें ! मेल्यांनो, लोकांच्या बायकांनीं त्या सत्पुरुषांच्यापुढं कितीक प्रकार नेऊन ठेविले ! कितीकींनीं खणांनारळांनीं सुवाष्णींच्या ओट्या भरल्या ! कितीकींनीं हळदकुंकू लुटवलं ! कितीकींनीं कुंवारणींना बांगड्या भरल्या ! कितीकींनीं सौभाग्यवाणं वांटलीं ! कितीकींनीं ब्राह्मणभोजनं घातलीं ! नी कितीकींनीं तर महिनाभर एकभुक्त राहून चांदीपितळेचीं ताटं नी वाट्या, पंचपक्वान्नांनीं भरून ब्राम्हणांना दिल्या !

**हरभट**–हो, हो ! दिल्या तर ! दिल्या तर !

**पार्वती०**– हो ! हो ! म्हणून तोंड नको वेंगाडायला ! दिल्या, दिल्याच वरं ! जिला जें अनुकूल झालं, तें तिनं केलं. पण आपल्या घरीं साऱ्या गोष्टींची अनुकूलता असून आजवेरी दिलं आहां का मला यांतलं एक तरी कधीं करूं ? एकभुक्त राहायचं, यांत तर नव्हतंना कांहीं वेंचत ? पण तें देखील सदा मेहुणाचीं आमंत्रणं घेऊन मला घडूं दिलंत नाहीं ! जळ्ळं, आपल्या हातून कांहीं होईना का कांहीं सुटेना, तर निदान दुसऱ्याला तरी आडकाठी करूं नये !

**हरभट**– आडकाठी करूं नये, तर मेहुणाचीं आमंत्रणें परतवून मी आपलें नुकसान करून घेऊं होय ? आणि तुला दानधर्माला पैका देऊन घरादाराचा उन्हाळा करूं होय ? मोठी शहाणीच कीं नाहीं तूं ! उद्यां हातांत लोटा आला तर मलाच पुढें होऊन 'विश्वेश्वरायनमः' म्हणत दा घरें फिरावें लागेल ! या जन्मीं कण्या भाकरी खाऊन आणि उघडेंनागडें हिंडून पुढच्या जन्माची साठवण करणारे मूर्ख लोक, करोत त्यांना वाटेल तर स्वतःची नागवणूक ! ते तसे नाचले म्हणून मी नाहीं त्यांच्यासारखा नाचायचा ! म्हणे सत्पुरुष ! आणि आम्ही काय कमीच आहों वाटतें ?

**पार्वती०**– कमी का जास्त, तें आपल्याच मनाला विचारायचं होतं ! दुसऱ्याच्या तोंडून कशाला लावता वदवायला ? लौकिकासाठीं सकाळीं उठून एकदां गंगेंत बुचकळी मारली, नी घरीं येऊन देवांच्या बोडक्यांवर पाणी ओतलं, म्हणजे नाहीं कांहीं

सत्पुरुषपणा आंगीं येत! कधीं घटकाभर निवांत बसून देवाचं नांव घेत आहां का? देवाकडे मुळीं लक्ष असेल तर किनई? अहोरात्र जळ्ली प्रपंचाची विवंचना! नी हें मिळव, तें मिळव, यासाठीं सदा जिवाची धडपड! आज कोणाच्या घरचं श्राद्ध-पक्षाचं आमंत्रण येत आहे, नी उद्यां कोणाकडचं येईल, ही अहोरात्र घोकणी!

**हरभट**– हें घर नाहीं; हा रस्ता आहे; याचें आहे का कांहीं तुला भान? लोकांनीं ऐकलें तर काय म्हणतील?

**पार्वती०**– काय म्हणणार आहेत? खरं आहे तेंच बोलतें आहे, असंच म्हणतील. नित्य लोकांकरितां सप्तशतीचे पाठ, नी देवावर रुद्राचीं आवर्तनं! बरं, म्हणतें लोकांकरितांच कां होईना, पण तीं तरी होत आहेत का, सोपस्कर, मनापासून नी भक्तीनं? लोक थोडेच पाहायला येत आहेत आपण काय करतां तें? इक-डून ' झालं सारं ' म्हटलं कीं, यजमानांना काय? ते दक्षिणेचे धनी! ती देऊन ते होतात मोकळे! पण अशा फसवणुकीनं उलट आपल्याच माथीं पाप लागतं, हें जळ्लं शास्त्रंपुराणं वाचून समजूं नये, म्हणजे नवलंच म्हणायचं! देवाची भीति जळ्ली अगदींच कशी नाहींशी झाली ती?

**हरभट**– पण या उठाठेवी करण्याचें तुला काय कारण? चुलीपुढें चालव तुझें काय असेल तें शहाणपण!

**पार्वती०**– कां बरं? कां नकोत उठाठेवी? मी नाहीं का अर्ध्या पातकाची मालकीण? लोकांना शास्त्र आपणच शिकवितां ना? पण मेलीं पुराणांतलीं वांगीं पुराणांत! आजवेरी कानींकपाळीं थोडी का आरडलें? अर्धअधिक आयुष्य गेलं असंच! म्हणून हात जोडून सांगतें कीं, जळ्लं आतां तरी द्यावं हें सारं सोडून, नी ज्ञानेश्वरमहाराजांना शरण जाऊन, करून घ्यावं देहाचं सार्थक!

**हरभट**– आतां जीभ आवरतेस कीं नाहीं? आमचें आह्मांला सारें कळतें आहे! तूं नकोस मला शिकवायला!

**पार्वती०**– आपल्याला कळतंच आहे म्हणा! पण वळत नाहीं

नाहीं असं भलतंच विचारायला! ऐकलं का? हे सत्पुरुष नी माझी मुक्ताबाई उन्हातान्हांत नी पावसांत तापत भिजत असतात, तर ह्मटलं घरांत खंडीभर छत्र्या जमविल्या आहेत, त्यांतल्या चार छत्र्या द्याव्या त्यांना नेऊन! चार छत्र्या घरांतून गेल्या तर त्या कांहीं अनाठायीं नाहीं लागायच्या! चांगल्या सत्कारणींच लागतील! नी तो पागोट्यांचा पर्वत! जळ्ळा तो डोक्यावर बांधायला पाठीं का पोटीं कुण्णी नाहीं! त्यांतल्या तीन घड्या होऊं देत ह्मटलं कमी- हो ह्मणून नाहीं येत तोंडांतून?

**हरभट**- कां? हो ह्मणून कां बरें यावें माझ्या तोंडून?

**पार्वती०**- खरंच तें! दाराशीं भिक्षेकरी आला तर त्याला चिमुटभर भिक्षा मिळेना! कीं उष्टेखळीशीं कुत्रं आलं तर त्याला कधीं उष्टं पान चाटायला मिळेना! तेव्हां इतका धीर नाहींच व्हायचा, हें उघडच दिसतं आहे मला ह्मणा! पण आपला जीव वेडा, वाटलं एकदां जवळ सांगावं, ह्मणून सांगितलं झालं!

**हरभट**- तूं लाख बडबडलीस तरी माझ्याकडून ह्मणून त्यांना एक छदाम देखील पोहोंचायचा नाहीं समजलीस!

**पार्वती०**- कशाला पोंचेल? नाहींच पोंचायचा! हें तरी कर्मांत हवं! कर्मांतच जर नसेल तर बुद्धि तरी कोठून व्हायला? मला पुष्कळ बुद्धि आहे! पण काय उपयोग? ( रडत रडत ) नाहीं माझी घरांतल्या काडीवर देखील सत्ता! घालाल तें गिळावं नी द्याल तें नेसावं! कसला जळ्ळा असला जन्म! दारापुढचीं कुत्रींच आह्मी, नी दुसरं काय!!

**हरभट**- रडून कांगाव करायची विद्या तुला फार चांगली साधली आहे, तें आहे मला ठाऊक! हें बघा, आतां हा शहाणपणा पुरे करून फिरा माघाऱ्या घराकडे आणि घरीं गेल्यावर आमच्या नांवानें बसा पोटभर रडत!

**पार्वती०**- मग काय अर्ध्या वाटेंतूनच का मी परत जाऊं? आपण जरी मान तोडलीत तरी मी ह्मणून त्या संताचं दर्शन घेतल्याखेरीज कध्धीं घरीं परत जाणार नाहीं! येऊन जाऊन काय ती आपळी माझ्या हातांतल्या ह्या ताटावरच ना दृष्टि

( ताट पुढें करून ) हें घ्या आपलं ताट, नी करा मला एकदांची मोकळी ! ( हरभट ताट घेतो. ) माझा आपला हा दोन हातांचा नमस्कार हा तर आहेना माझ्या सत्तेचा ? तेवढाच पुरे माझा मला ! त्या सत्पुरुषांना माझा नुसता नमस्कारच पुरे ! हातांत माती घेतली तर तिचं सोनं करण्याचं त्या सत्पुरुषांचं सामर्थ्य ! तेव्हां ते थोडेच सुजले आहेत तुमच्या या धनद्रव्याला ! देव काय भावाचा भुकेला ! विदुराच्या कण्या नी सुदाम्याचे पोहे, नाहीं का खाल्ले श्रीकृष्णांनीं ? झालं तर, माझा भाव त्या सत्पुरुषांच्या ठिकाणीं आहे, तोच माझं करील काम ! पण ताट हातीं आलं तेव्हां आतां पडला ना आपला जीव एकदांचा खालीं ? इथें काळजी काय ती द्रव्याची ! ह्मणून पुसतें ?

**हरभट**– हो, हो ! पडला जीव खालीं ! आतां तुला दाही दिशा मोकळ्या आहेत ! जा; वाटेल तिकडे जा !

**पार्वती०**– हं, आतां मला दाही दिशा मोकळ्या व्हायच्या, तें होतंच मला ठाऊक ! पण ह्मटलं, एकदां तरी त्या संतांचं दर्शन घ्यायचं होतं हो ! ह्मणजे ( डोळ्याला पदर लावून ) माझ्या बगडीच्या पाठीवर आजपावतर आठ खळींत नेऊन पुरलींत ! तशी, त्यांची कृपा झाली तर, नवव्यानदां तरी पाळी यायची नाहीं ह्मणतें ! बाकी इकडे पोरं नकोत ! बाळं नकोत ! बायको मेली नकोच आहे ह्मणा ! एक पैका मिळाला म्हणजे सारं मिळालं ! ! इश्श ! पाठ वळवून चालूं लागायला जळ्ळं कांहीं तरी वाटतं आहे का मनाला ? आपण मेली बडबड करावी नी स्वस्थ बसावं इतकंच !! ( गंगेकडे निघून जाते. )

**हरभट**–गेली एकदांची ब्याद ! माझ्या मागची ही जिवंत साडेसाती परमेश्वर कधीं सोडवील तो सुदिन ह्मणायचा ! ( हरभट घराकडे जाऊं लागतो, इतक्यांत मोर दिक्षित फुलांच्या माळांनीं भरलेलें तबक हातांत घेऊन येतात. )

**मोर०**–( हरभटास पाहून ) नमोनमः नमोनमः, हरभटजी ! अहो पण तुह्मी माघारे कोठें वळलां ?

**हर०**– अहो दीक्षित, गंगेवरच निघालों होतों. बरोबर तिलाही

घेतली होती. पण येथवर आल्यावर मग तिला झालें खिरापतीचें स्मरण. अजागळ कोठली! खिरापत विसरली या ताटांत घालायची! तेव्हां तिला ह्मटलें तूं हो पुढें; मी घरीं जाऊन खिरापत घेऊन येतों तुझ्या मागोमाग. तिला पुढें पाठविली आणि मी घरीं जाण्याकरितां हा इतक्यांतच मागें वळलों.

**मोर०**—होय ना? जाऊं द्या हो. तेवढ्या खिरापतीकरितांच नका आतां घराकडे परतूं. अहो, या बायकांचें हें असेंच आहे! आमचीनें हा हार करायला तीन प्रहर घेतले! आणि त्यामुळें मला गंगेचे दोन हेलपाटे पडले! हरभटजी, तुह्मांला काय सांगूं? न भूतो न भाविष्यति अशी यात्रा लोटली आहे आज गंगेवर! श्रीज्ञानेश्वर सद्गुरूंचा केवढा हो हा अगाध महिमा!

**हर०**—हें काय विचारतां दीक्षित? अहो, प्रत्यक्ष परमेश्वरच ते! मग यात्रा लोटली यांत आश्चर्य तें कोणतें?

**मोर०**—हरभटजी, जी श्रुति एक तप घालवूनही तुम्हां आम्हांला प्राप्त होण्याची मारामार, तीच श्रुति, हे प्रभु, आपल्या आंगच्या योगसामर्थ्यानें वाचारहित आणि ज्ञानशून्य पशूकडून प्रत्यक्ष वेदोनारायणाप्रमाणें न्यासपूर्वक म्हणवीत आहेत! तेव्हां केवढें या जगद्गुरूंचें अद्भुत सामर्थ्य!! अहो तुम्हीं आम्हीं प्रत्यक्ष आपल्या हातांनीं ज्यांचीं शवें चितेवर रचून तीं यथाविधि अग्निनारायणाच्या मुखांत लोटलीं, आणि त्यांची राख झाल्यावर ज्यांच्या अस्थि गंगार्पण केल्या, त्या गोविंदभटांना, कृष्णंभटांना, दादंभटांना आणि वीरेश्वर दीक्षितांना 'देवाः आगंतव्यं पितरः आगंतव्यं' असें म्हणून स्वर्गांतून आवाहन करून, कृष्णाजीपंताच्या घरीं पितृतिथीला देवस्थानीं आणि पितरस्थानीं पाटावर आणून बसवून, वेदोक्त विधीनें श्राद्धविधि उरकून घेण्याचें अघटित कृत्य, भटजी, अवतारीक पुरुषांवांचून सामान्य मनुष्यांच्या हातून कधीं होईल काय? आणि अशा प्रभूंना आम्हीं आज शुद्धिपत्र देणार; तेव्हां धिक्कार असो आम्हांला! अहो, हे प्रभु बालवयांतच पाहिलेतना कसे शांत, मनोनिग्रही, समाधानी, तृप्त, मायोपाधिविरहित, हर्षशोकदुःखविवर्जित, उत्तम-अधमाबद्दल समबुद्धि, लौकिक,

कीर्ति, लाभ, हानि, यांविषयीं उदासीन आणि सदा हरिभजनीं रत आहेत ते ! ( इतक्यांत ज्यांत शेलापागोटें ठेवलेलें आहे असें ताट हातांत घेऊन रामशास्त्री लगबगीनें येतात. )

**राम०**– नमो नमः दीक्षित ! भटजी नमो नमः ! अहो, तुम्ही अजून मागेंच ? काय म्हणावें तुमच्या चेंगटपणाला ! पाय जरा झरझर उचला ! श्रीजगद्गुरूंच्या दर्शनाचा हा अत्यानंदाचा सुख सोहळा तुमच्या आमच्या नेत्रांना या जन्मीं पुन्हा पाहावयास मिळणार नाहीं ! आज श्रीगंगातटाक प्रतिवैकुंठनगर बनून गेला आहे ! वर्णावर्णाचा अभिमान टाकून आणि उच्चनीच भाव विसरून भक्तियुक्त अंतःकरणानें श्रीजगद्गुरूंची बोळवण करण्याकरितां एकत्र जमलेला हा नरनारीवृंद पाहून, अहाहा ! दीक्षित, हृदय कसें उचंबळून येत आहे !! आणि 'कर्त्तुमकर्त्तुमन्यथाकर्त्तुम्' असें ज्यांचें सामर्थ्य, त्या श्रीजगद्गुरूंना आह्मीं आज प्रतिष्ठानवासी ब्राह्मण कर्मठपणाच्या अभिमानास चढून शुद्धिपत्र देणार ! तेव्हां केवढें हो हें आमचें थोर अज्ञान !!

**मोर०**– शास्त्रीबुवा, हरभटजींना मी हेंच ह्मणत होतों ! अहो ग्रामाधिकाऱ्यांचाच हा आग्रह आणि शिवाय चतुर्धर पंडित, बोपदेव पंडित, अशा सर्वमान्य श्रेष्ठांची त्यांना अनुकूलता ! मग हो आपलें काय चालणार ?

**हर०**– नाहीं पण दीक्षित, असें कां बरें ह्मणतां ! अहो शास्त्रीबुवा, श्रीमद्देवगिरिवराधिप यदुकुलोत्पन्न गोब्राह्मणप्रतिपालक श्रीराजाधिराज रामचंद्रराजे, यांचे श्रीकरणाधिप जगद्वंद्य हेमाद्रिपंडित, ज्यांनीं चतुर्विधचिंतामणीसारखा परमपूज्य ग्रंथ लिहून चारी वर्णांच्या लोकांना व्रतें, दानें, तीर्थें आणि मोक्ष यांची यथासांग फोड करून दिली, त्या हेमाद्रिपंडितांचे बोपदेवपंडित हे आश्रित ! मुक्ताफळ, हरिलीला, मुक्तबोध असे असे ग्रंथ ज्यांनीं लिहिले, ज्यांनीं श्रीरामानंदस्वामींचे शिष्य आणि राघवरहस्य ग्रंथाचे कर्ते वामनपंडित यांना व्याकरणशास्त्राच्या वादांत जिंकिलें, त्या ह्या बोपदेवपंडितांची योग्यता कशी बरें कमी होईल ?

तेव्हां त्यांनीं क्षेत्रांतील यति, वैदिक, शास्त्री, हरदास, पुराणीक या सर्वांच्या मान्यतेनें या जातिहीनांना शुद्धिपत्र देण्याचा जो विचार केला आहे, तो म्हणजे अगदींच मूर्खपणाचा आहे असें मला तरी निदान वाटत नाहीं !

**राम०**– अहो भटजी, हे तपोनिधि आणि अद्वितीय ज्ञानाचें स्थान प्रभु कोणीकडे ? आणि संसारमायाबद्ध अज्ञानाचे केवळ निधिच असे ते पंडित कोणीकडे ! आपपरभाव विसरून जाऊन सदा उल्हासवृत्तीनें राहणारे हे जगाचे आदिगुरू कोणीकडे ? आणि माझें तुझें करून अहंपणानें चढून जाऊन सदा प्रपंचचिंता वाहणारे ते मूढ पंडित कोणीकडे ? कोणीकडे या प्रभूंची फल-भोगाविषयीं निरिच्छा ? आणि कोणीकडे त्या कर्मठपंडितांची उदरभरणाची चिंता ! जे पवित्र तीर्थांनाही पवित्र, पूर्णपरब्रह्म, ज्यांनीं अविवेकरूपी बाल्यावस्थेचा त्याग करून विरक्तीचा परि-ग्रह केला, असे हे संसारश्रांतांची साउली आणि अनाथजीवांची माउली प्रभु कोणीकडे ? आणि जे सदा अपवित्र, विषयसुखांत रममाण होणारे, संशयविकल्पानें ग्रासलेले, भ्रमानें वेडावलेले, संसारजालानें दग्ध झालेले, आणि घोरकर्मास प्रवृत्त होणारे असे हे भ्रष्टबुद्धि पैशुन्यवादी पंडित कोणीकडे ! भटजी, हा कुटिलभाव टाकून त्या परात्पर जगद्गुरूंना आमच्याबरोबर अन-न्यभावानें शरण चला, म्हणजे त्यांच्या कृपादृष्टीनें तुम्ही हा भव तरून जाल !

**मोर०**– शास्त्रीबुवा, आपण आजपर्यंत देहाला कष्ट देऊन, पदें, जटा, क्रम, घनसहित वेद, व्याकरण, न्याय, मीमांसा आणि धर्मशास्त्र आदिकरून वेदशास्त्रांचें अध्ययन केलें ! विद्वत्तेच्या अभिमानानें सभेंत शेंकडों पंडितांचा अपमान केला ! शास्त्रबाह्य आचरण करणारांना बहिष्कार घातले ! परंतु आपली स्वतःची सोय पाहिली नाहीं ! ! ज्या परमेश्वरानें कृपाळू होऊन आपल्याला अगाध शक्ति दिली, त्याचें भजन आणि उपासना केली नाहीं ! त्याला अनन्यभावानें शरण रिघालों ाहीं ! प्रपंच आणि लौकिक यांच्या पाठीस लागून

आपण आपलें स्वहित सांडलें ! ! परंतु आपण जन्मोजन्मीं केलेलें पुण्य फळास आल्यामुळेंच त्रैलोक्याची केवळ ज्ञानसंजीवनी आणि आपले सकल मनोरथ पूर्ण करणारी कामधेनु, श्रीज्ञानेश्वरमहाराज, यांच्या मंगलप्रद दर्शनाचा आणि अर्थप्रद उपदेशाचा आपल्याला अल्प काल तरी लाभ झाला ! ! आणि अशा अत्यंत दुर्लभ सत्समागमाला आपण आज अंतरणार म्हणून शास्त्रीबुवा मनाला अत्यंत हुरहुर लागली आहे ! !

**राम०**– खरें आहे दीक्षित ! तुमचें आमचें भाग्य थोर म्हणूनच अल्पकाल तरी या संतांच्या संगतिसुखाचा अपूर्व लाभ आपल्याला मिळून सर्वत्र ब्रह्मानंदाचा सुकाळ झाला ! आजचा हा पर्वकाळ खरोखरीच अत्यंत थोर होय ! हातांत पंचारत्या घेऊन उभ्या असलेल्या या युवतिजनांकडे पाहून, दीक्षित, मला तर आज या साक्षात् जलदेवताच श्रीजगद्गुरूंना ओवाळण्याकरितां गंगेंतून वर आल्या आहेत कीं काय असा भास होत आहे ! आणि हा जनसमूह, प्रत्यक्ष देवच, आज चतुर्भुज परमात्मा श्रीविष्णु याच्या पूजनाकरितां स्वर्गांतून खालीं उतरला आहे, असें वाटत आहे ! ! अहाहा ! दीक्षित, असा हा अत्यानंदाचा लाभ जर आपल्याला निरंतर घडेल तर सायुज्यपदप्राप्तीचें सुख आपल्याला या भूलोकींच अखंड भोगावयास सांपडेल यांत संशय नाहीं ! ! !

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**-- प्रतिष्ठान ( पैठण ) क्षेत्र. श्रीगोदातटाक.

( पडदा उघडून श्रीज्ञानेश्वरमहाराजांस ओवाळण्याकरितां हातांत पंचारत्या घेतलेल्या स्त्रिया आणि श्रीज्ञानेश्वरमहाराजांस अर्पण करण्याकरितां नानाविध वस्तूंनीं भरलेलीं ताटें हातांत घेतलेले चतुर्धर पंडित, बोपदेव पंडित, आदिकरून श्रेष्ट ब्राह्मण व इतर नागरिकजन उभे आहेत असा श्रीगोदातटाकाचा देखावा दृष्टीस पडतो. रामशास्त्री, हरभट, मोरदीक्षित, हे या जमलेल्या मंडळींत येऊन उभे राहतात. इतक्यांत महिष मुखानें खालील वेदवाक्यें ह्मणत रंगभूमीवर येतो. )

**अयमग्ने जरितात्वेऽअभूदपि सहसः सूनोनह्यं १ न्यदस्त्याप्यं ॥ भद्रं हिशर्मं त्रिवरूथ मस्तितऽआरे हिंसाना मप दिद्युमाकृधि ॥ प्रवतेऽअग्नेजनि मापितूयतः साचीवविश्वाभुवनान्यृंजसे ॥ प्रसत्तयः प्रसनिषंत नो धियः पुरश्चरंति पशुपाऽइवत्मना ॥ उतवाऽउपरिं वृणक्षि बप्संद्बहोरग्नऽउलपस्य स्वधावः ॥ उतखिल्याऽउर्वराणां भवंति माते हे तिंतविषीं चुक्रुधाम ॥**

( सर्व मंडळी 'वेदोनारायण, नमस्तुभ्यं' असें ह्मणत महिषास नमस्कार करतात. महिषाचें वेदपठण चालूं असतां, विठ्ठलपंत, रुक्मिणीबाई, श्रीनिवृत्तिनाथमहाराज, श्रीज्ञानेश्वरमहाराज, सोपानदेव आणि मुक्ताबाई एकामागून एक रंगभूमीवर येतात. त्यांस पाहून सर्व ब्राह्मण मंडळी व इतर लोक अत्यंत सद्गदित अंतःकरणानें अश्रुभरित नेत्रांनीं अहंभाव सोडून साष्टांग नमस्कार घालतात व युवतिजन त्यांस नमस्कार करून पंचारत्यांनीं ओवाळतात. )

**ज्ञानेश्वर**-- भो माहिषा, ( महिष वेदपठण थांबवून श्रीज्ञानेश्वरमहाराजांकडे पाहतो. ) मुंगीपासून तों ब्रम्हदेवापर्यंत अखिल प्राणीमात्रांच्या ठायीं भरून राहिलेलें जगद्रूप चैतन्य एकच आहे

आणि या चैतन्याचे सर्वज्ञत्वादि गुण सर्वत्र सर्वकाळ सारखे भरलेले आहेत; मात्र उपाधिभेदानें त्याचें भिन्नत्व जगाला भासतें, या गोष्टीची आम्हां सर्वत्रांस साक्ष पटविण्याकरितां आपण साक्षात् श्रीवेदोनारायणाप्रमाणें सांग श्रुतीचें पठण करीत आहां; पण हा क्रम आपण असाच अखंड चालू ठेविल्यास, परम पूज्य श्रुतींचा गुप्तार्थ प्रगट होऊन कर्ममार्गाची बुडवणूक होईल! आणि त्यामुळें कर्मठांची भ्रांति नष्ट होऊन इहलोकीं यज्ञयागादिक कर्में बंद पडतील! तरी भो महिषा, आतां हें वेदांचें पठण पुरें करावें!! ( महिष वेदपठण थांबवून स्वस्थ उभा राहतो. )

**विठ्ठल०**–( सर्व ब्राह्मणांस साष्टांग नमस्कार घालून ) अहो भूदेवहो, तुह्मी मूर्तिमंत ब्रह्म आहां! तुमची कांति याज्ञवल्क्यासारखी आहे! तुह्मी वसिष्ठमुनितुल्य शांत आहां! तुम्ही विश्वामित्रप्रतिमा आहां! मनांत धराल तें सिद्धीस नेण्यास तुह्मी समर्थ आहां! तुमचे बोल हे शास्त्राप्रमाणें सर्वांना प्रमाण आहेत! तेव्हां तुमचे चरणावर मस्तक ठेवून माझी हीच विनंती आहे कीं, तुह्मी सदय होऊन आह्मां सर्वांना पावन करून घ्यावें. आणि आह्मांस शुद्धिपत्र देऊन या माझ्या अज्ञ मुलांचें मौंजीबंधन करण्याची मला अनुज्ञा द्यावी. ( रुक्मिणीबाईस उद्देशून ) या श्रेष्ठांना नमस्कार कर. ( रुक्मिणीबाई नमस्कार करते. सर्व ब्राह्मण तिला 'अखंडसौभाग्यवती भव' असा आशीर्वाद देतात. विठ्ठलपंत मुलांस उद्देशून ) आणि बाळांनो, तुह्मीही यांना साष्टांग नमस्कार घालून यांची करुणा भाका. ह्मणजे हे समर्थ दयार्द्र होऊन आपणा सर्वांना शुद्ध करून घेतील!

**ज्ञानेश्वर**–माझ्या श्रीनिवृत्तिनाथ सद्गुरूंस वंदन करून त्यांच्या अनुज्ञेनें, अहो द्विजश्रेष्ठहो, मी तुम्हांस साष्टांग प्रणिपात करतों. तुम्ही ईश्वराचें मुख आहां! तुम्ही धर्माचे रक्षक आहां! तुम्हां समर्थांच्या अंगीं स्वभावतःच अत्यंत पवित्रता आहे! तुम्ही पवित्र तीर्थांचे तीर्थरूप आहां! तुमच्या मुखांत वेदोनारायण सदां तिष्ठत आहे! तुम्ही वेदाचे दृढ कवच आहां! मंत्रविद्येचें माहेर आहां! कोपानें त्रैलोक्याला भस्म करण्याचें व संतोषानें

पुन्हा त्याची उत्पत्ति करण्याचें सामर्थ्य तुमच्या अंगीं आहे! तुम्हीं नहुष सर्पाला स्वर्गाधिपति करून सोडलें! श्रीकृष्ण परमात्म्याला लाथेनें मारलें! तो तुमचा लत्ताप्रहार भगवान् श्रीकृष्ण आपल्या हृदयावर भूषण ह्मणून वागवीत आहेत! तुमचे शब्द तीक्ष्ण खड्ग आहेत! तुम्हांला ब्रह्मादिकही कांपतात! रमादेवी अति चंचल, परंतु तुमच्या आशीर्वादबळानें श्रीविष्णूचें पादकमल ती क्षणभरही सोडीत नाहींशी झाली! तुमच्या आशीर्वादबळानें रुद्र या विश्वाचा संहार करून तत्क्षणींच शुद्ध होतो! तुमच्या आशीर्वादानें वैश्वानर अपार तेजयुक्त होऊन सर्व पदार्थ भक्षण करतो आणि यत्किंचित्ही मलीन न होतां अखेर त्रिभुवनही जाळतो! तुमच्या दर्शनानें अनंत जन्मांचीं पापें जळून जातात! तुह्मांस साष्टांग नमस्कार घातला असतां कल्याणप्राप्ति होते! आणि तुमचें पूजन केलें असतां अच्युतपदाची जोड मिळते! अशा तुह्मां श्रेष्ठांचा मीं एका मुखानें कोठवर स्तव करावा? पतितांवर दया करणें हें तुमचें ब्रीद आहे! आह्मी सर्व पतित, पंगु, दुर्बळ आहों! तरी तुमची चरणधूलि आमच्या मस्तकांवर लोटून, अहो श्रेष्ठहो, तुह्मी आमचे हे अमंगळ देह पावन करावे, हेंच तुमच्यापाशीं या अज्ञ ज्ञानदेवाचें करद्वय जोडून मागणें आहे!

**बोपदेव**– विठ्ठलपंत, रुक्मिणी मातोश्री, श्रीनिवृत्तिनाथमहाराज, श्रीज्ञानराजसमर्था, सोपानदेवा, चित्कला मुक्ताबाई, हा प्रतिष्ठानवासी सकल ब्रम्हवृंद व नागरिकजन पूर्ण पश्चात्तापयुक्त अंतःकरणानें तुम्हांस अनन्यभावानें शरण आला आहे! तरी, अहो कृपानिधि, आपण सदय होऊन आमच्या सर्व अपराधांची क्षमा करावी! दीन अज्ञान जनांचा उद्धार करण्याकरितांच या भूलोकीं अवतार घेतलेले आपण साक्षात् शिव, विष्णु, ब्रह्मा आहां! तेव्हां अशा तुम्हां प्रभूंना आम्हीं यःकश्चित् पामरांनीं काय पावन करावें? आम्ही वेदशास्त्राभिमानानें वेडे झाल्यामुळें तुम्हांस न ओळखून व्यर्थ जातिदोष लावून तुमचा छल केला, याबद्दल आह्मां सर्वांस आपण क्षमा करावी.

**चतुर्धर**– अहो ज्ञानराजा, आह्मा जड जीवांना उपदेशामृत

पाजून आम्हांस संसारबंधापासून मुक्त करण्याकरितां, तुह्मीं आपल्या संसाराला जन्मतःच तिलांजलि दिली! अखिल प्राणीमात्रांना परमार्थाची ओळख करून देण्याकरितां, अहो समर्था, तुम्हीं आपल्या स्वार्थाचा होम केला! आणि अंगाला बालवयांतच असंगाची राख फासून तीव्र वैराग्य धारण केलें! आह्मांतील अज्ञानांधकाराचा नाश करण्याकरितां, तुह्मीं आपल्या ज्ञानसूर्याचा प्रकाश या भूमंडळावर प्रकाशित केला! सकल जगताची मुखश्री प्रसन्न करण्याकरितां ही तेजः-पुंज कांति धारण केली! आमच्या पापाच्या असंख्य राशी जाळून खाक करण्याकरितां आपल्या सुकृताचा अग्नि प्रदीप्त केला! आमची चित्तशुद्धि करण्याकरितां सात्विकगुणसंपत्तीचें भांडार बरोबर घेऊन आलां! त्रैलोक्याचें वैभव वृद्धिंगत करण्याकरितां आपल्या तृष्णेचा उच्छेद केला! लोकांचे मनोरथ पूर्ण करण्याकरितां आपल्या वासना जाळून दग्ध केल्या! आणि आम्हां सर्वांस लौकिकास चढविण्याकरितां आपला स्वतःचा लौकिक पायाखालीं तुडविला! त्या तुह्मां समर्थांचें यश आम्हीं कोठवर वर्णन करावें? आम्ही अत्यंत पातकी, मति-मंद आणि दुष्टबुद्धि असून संसार-उपाधीनें त्रस्त झालों आहों! परंतु ज्या प्रायश्चित्ताच्या योगानें वाल्मीकासारखा वाटपाड्या कोळी त्रैलोक्यवंद्य ऋषि झाला तें सर्व प्रायश्चितांत उत्तम असें जें पश्चात्ताप प्रायश्चित्त तें घेऊन आम्हीं सर्व प्रतिष्ठानवासी जन अत्यंत लीन होऊन सद्गुरुचरणीं शरण रिघालों आहों! तरी अहो ज्ञानराजा, आमच्या हातून घडलेले सहस्र अपराध आपण पोटांत घालावे आणि ज्या आपल्या कृपेनें पशु बोलता झाला ती कृपा आमच्यावर करावी!

**ज्ञानेश्वर**– श्रेष्ठहो, आम्हां पामरांचा आपण व्यर्थ गौरव करीत आहां! अहो, आम्ही सदां तुमच्या अनुग्रहाचे भुकेले आहों! तुमच्या चरणरजाच्या स्पर्शानेंच आम्हांला शुद्धता येणार आहे! आम्ही दुबळीं लेंकरें तुमच्याच आशीर्वादानें ईश-कृपेस पात्र होणार आहों! हा पशु बोलता झाला ही तुमचीच

कृपा होय ! तुमच्या कृपेचा महिमा ब्रह्मदेवालाही चारी मुखानें वर्णन करितां येत नाहीं ! तुम्हां समर्थांच्या अंगचें सामर्थ्य आह्मां दुबळ्या लेकरांच्या अंगीं कोठून येणार ? तुम्ही ब्राह्मण, सर्वांत श्रेष्ठ ! तुम्ही सागराचा घोट केला ! सृष्टीवर सृष्टि केली ! सूर्यासारखी छाटी तापविली ! काठीवर पृथ्वी धरली ! सर्पकुळें जाळलीं ! वसूला आयुष्य दिलें ! शशीला क्षयरोगी केलें ! तुह्मी आपल्या मंत्रानें इंद्राला आपलें पद सोडावयास लावतां ! तुम्ही निर्जिवाला जीव देऊन बोलवितां ! मृत्तिकापाषाणाची प्राणप्रतिष्ठा करून त्याला देवपणा आणतां ! तेव्हां तुम्हां समर्थांच्या कृपाकटाक्षानें ह्या महिषाला वाणी फुटून तो कां वरें बोलणार नाहीं ? ही सर्व तुमचीच अगाध करणी आहे ! नाहीं तर आम्हां जातिहीनांच्या हातून काय होणार ? तरी श्रेष्ठहो आम्हांस शुद्धिपत्र देऊन अलंकापुरीं परत जाण्याची अनुज्ञा द्यावी !

**बोपदेव**– अहो समर्थ ज्ञानराजा, ब्रह्मांडाचा कर्ता जो प्रभु त्याच्यासारखी अघटित घटना करून दाखवून तुम्हीं आपली कीर्ति अखिल भूमंडळांत पसरली आहे ! हेंच शुद्धिपत्र सर्वांत श्रेष्ठ आहे ! अहो हरिप्रिया, आकाशाला मंडप कोण देईल ? हा भूगोल कोण कोठें लपवील ? सरितापतीला रांजणांत कोणाला भरतां येईल ? आणि सूर्याला कोण झांकून ठेवील ? त्याप्रमाणें तुम्हांला शुद्धिपत्र देणें आम्हांस लाजिरवाणें आहे ! तरी पण सद्गुरूंची आज्ञाच होत आहे, म्हणून हें शुद्धिपत्र समर्थचरणीं आम्हीं अर्पण केलें आहे ! ( शुद्धिपत्र देऊन ) तरी याचा अंगीकार करून आणि उपनयनादि शास्त्रप्रणीत संस्कार येथेंच करून समर्थांनीं या प्रतिष्ठानक्षेत्रींच रहावें अशी आमची समर्थचरणीं विज्ञप्ति आहे. तुम्ही महापुरुष, मुक्तीचें द्वार, आमच्या भाग्योदयानें आह्मांला लाभलां आहां ! आपलें परम मंगलदर्शन नित्य घडल्यानें आमच्या पापराशी दग्ध होणार आहेत ! आणि आपलें बोधामृत प्राशन केल्यानें आमचें अनंत जन्मांचें दुःख लयास जाणार आहे ! तरी या प्रतिष्ठानक्षेत्रीं वास करण्याबद्दल आम्हीं समर्थचरणीं केलेली प्रार्थना समर्थांनीं मान्य करावी !

**ज्ञानेश्वर०**– अहो द्विजश्रेष्ठहो ! तुम्ही आज हें शुद्धिपत्र आम्हांस दिल्यामुळें आह्मी कृतार्थ झालों ! आम्ही अर्थहीन आणि भाग्यहीन पडलों, तेव्हां आपल्या या उपकाराची फेड आमच्या हातून कशी होणार ? श्रेष्ठहो, मौंजीबंधनाविषयींची आपली अनुज्ञा वेदशास्त्रनिषिद्ध आहे. आजपर्यंत असें कोणीं कधीं केलें नाहीं. आम्हांस व्रतबंध मुळींच नको आहे. हा मृत्युलोक पाप आणि मरण यांनीं ग्रासलेला असून अज्ञान आणि निद्रा यांनीं परिवेष्टित आहे. आणि या मृत्युलोकांत निर्माण झालेले पंचभूतात्मक आणि कर्मगुणवेष्टित देह सदां जन्ममृत्यूच्या चक्रावर घातलेले आहेत. तेव्हां असे हे आमचे देह परमेश्वरसेवेंत झिजवून आम्ही पुनीत करून घेऊं. आणि सर्वांभूतीं ब्रह्मभावना धरून तीव्र अनुतापयुक्त अंतःकरणानें, अमृतापेक्षांही उदार, आणि सर्व सारांतील मुख्य सार, जें ईश्वराचें नांव, तें मुखानें गाऊन जन्माचें सार्थक करून घेऊं ! कारण,

**देवाविणशून्यसुख ॥ नामनघेतांनाहींसुख ॥ अंतींहोईल रेदुःख ॥ नामनसतांसुखीं ॥ १ ॥ रामकृष्णगोविंद ॥ हरिमाधवपरमानंद ॥ नित्यऐसाजयासिछंद ॥ तोचि सुलभगर्भवासीं ॥ ध्रु० ॥ अनंतनामनिरसून ॥ एकमार्ग तोचिमान्य ॥ जेणेंजोडेनित्यसौजन्य ॥ तोचिरामकृष्ण उच्चारी ॥ २ ॥ ज्ञानदेवेंअनुमानलें ॥ मगभक्तिसुखसाधलें ॥ रामकृष्णउच्चारिलें ॥ जेंतारकतिहींलोकीं ॥ ३ ॥**

आणि शिवाय

**जन्मजगदुःखबाधा ॥ स्मरतांनाहींगोविंदा ॥ ऐसा जयासीनित्यधंदा ॥ तोचिसदासुखरूप ॥ १ ॥ धन्य कुळधन्ययाति ॥ धन्यजन्मपुढतीपुढती ॥ भक्तीविण नाहींगति ॥ मुखींहरिनाम-उच्चार ॥ ध्रु० ॥ विश्वीं विश्वजोव्यापकु ॥ तोचिमाझाहरिएकु ॥ १ ॥ त्यासी भक्तिविणसाधकु ॥ नोळखेपैंदुर्बुद्धि ॥ २ ॥ ज्ञानरंजनीं रंजला ॥ ज्ञानबोधेंउपजला ॥ ज्ञानदेवींहरिसेविला ॥ निरंतरसर्वकाळ ॥ ३ ॥**

**बोपदेव**– अहाहा ! सद्गुरु समर्था, धन्य धन्य आहां तुम्ही !! सिंधुही हातानें तरून जातां येईल ! मेरूलाही माशी उचलून धरील ! परंतु मनुष्यजन्मांत येऊन आपल्यासारख्या ज्ञानश्रेष्ठांची भेट होण्यास गांठीं थोर पुण्यच पाहिजे ! आमचा अनंत जन्मांचा साधनोपाय आज फळाला आल्यामुळें तुह्मां संतवृंदाचे पाय आम्हांस जोडले आहेत ! तेव्हां आतां सद्गुरूंनीं येथें राहून आमच्या हातून सेवा घ्यावी. कारण तुम्हांसारख्या संतांच्या सेवेंत आमचे देह झिजले असतां आह्मांस अपार पुण्य लाभणार आहे! अहो ज्ञानराजा, आह्मी मूर्ख, दुरात्मे, नष्ट आहों ! अज्ञानमोहानें मोहित झाल्यामुळें वृथा पांडित्याची वटवट करून आम्ही कष्टलों आहों ! तापत्रयाग्नीनें संतप्त झालों आहों ! आणि अहंसन्निपातानें मृतप्राय झालों आहों ! आणि ह्मणूनच तुह्मां श्रेष्ठांस अनन्यभावानें शरण रिघालों आहों. तुमच्यासारखे परात्पर सद्गुरू जर आम्हांला सोडून गेले तर या दुस्तर भवनदींतून आह्मांला पैलपार कोण नेईल ? आम्हांला सच्चिदानंद प्रभूची ओळख कोण करून देईल ? आम्हांला प्रवृत्तिमार्गांतून काढून निवृत्तिमार्गास कोण लावील ? आमची अज्ञानमय अहंकृति घालवून ज्ञान जें ब्रह्म त्याची आम्हांला कोण ओळख करून देईल ? आणि वैकुंठाचा सोपान आम्हांकडून चढवून आह्मांला मुक्तिपदाप्रत कोण नेऊन पोहोंचवील ? मग आम्ही कोणाच्या तोंडाकडे पहावें ? कोणाची करुणा भाकावी ? कोणता मार्ग स्वीकारावा ? तरी अहो सद्गुरुनाथा, ज्या योगानें आमच्या जन्माचें सार्थक होईल असा उपाय आम्हांला सांगावा. ह्मणजे आपल्या गुरुवाक्याप्रमाणें वागून आम्ही हा भव तरून जाऊं !

**ज्ञानेश्वर०**– अहो सुजनहो, तुम्ही सर्व जाणतच आहां. तेव्हां मी तें तुम्हांला काय सांगणार ? परंतु माझे श्रीनिवृत्तिनाथ सद्गुरु भ्रूसंकेतानें आज्ञा करीत आहेत, म्हणून त्यांची अनुज्ञा शिरसा वंदून, सद्गुरु बोलवतील ते चार शब्द मी तुम्हांला सांगतों. तिकडे सर्वत्रांनीं अवधान द्यावें. सुजनहो, राजा जनकासारखे प्रपंचांत राहून कर्माचरण करूनच मोक्षाला गेले ! तेव्हां हा

संसारच तुम्हांला पारमार्थिक मोक्षाची वाट दाखविणारा वाटाड्या आहे. प्रपंचांत राहिल्यानें परमार्थप्राप्तीच्या मार्गांत अनेक विघ्नें येतात असें तुम्हांस वाटत असल्यास तो तुमचा भ्रम आहे. मात्र भगवंतानें जातिपरत्वें जो धर्म तुम्हांला लावून दिला आहे, तो तुमचा स्वधर्म, या प्रपंचांतील नित्याचा यज्ञ आणि तुम्हांला सुख देणारा आणि तुमचें हित साधणारा तुमचा खरा मित्र आहे, हें मात्र तुम्ही विसरतां कामा नये. हा स्वधर्मरूप यज्ञ तुम्ही अहेतुक मनानें आणि निष्काम बुद्धीनें आचरण कराल, तर तो तुम्हांला कामधेनूप्रमाणें फलद्रूप होईल आणि हा दुःखमय भासणारा संसार तुह्मांस सुखप्रद होईल. या यज्ञांत तुमच्या हातून घडणाऱ्या पूजेनें सर्व देवता प्रसन्न होऊन त्या तुम्हांला अप्राप्य वस्तूंची प्राप्ति करून देतील. तुमचे पूर्वजन्मांचे दोष नाहींसे होतील. तुमचे सर्व मनोरथ पूर्ण होतील. तुह्मी जें ह्मणाल तें तुमच्या हातून घडेल. शरीरभोग दूर पळतील. अकालीं मृत्यु टळेल. तेज, बल, आणि यश हीं प्राप्त होतील. तुम्ही तोंडांतून जो शब्द काढाल तो खरा होईल. तुमची आज्ञा सर्व प्राणीमात्र पाळतील. तुमची बुद्धि सर्वव्यापक होईल. ऋद्धिसिद्धि तुमच्यापुढें हात जोडून उभ्या राहतील. सुदैव आणि लक्ष्मी तुमचा शोध करीत तुम्हांला हुडकीत येतील. सर्व भोगांची प्राप्ति होऊन तुम्ही सुखी व्हाल. स्वधर्म पुण्याईच्या बळानें, जिला गुणत्रयाचा संपर्क लागत नाहीं, अशा सुबुद्धीचा तुमच्या अंतःकरणांत उदय होऊन संसाराचें भय नाहींसें होईल. सुबुद्धीचा उदय होतांच तुमची चित्तशुद्धि होईल. चित्तशुद्धि झाली ह्मणजे तुह्मी सद्गुरुरुपेनें ज्ञानी व्हाल आणि ज्ञानामागून मुक्त स्वरूप आत्मसिद्धीप्रत पावाल. आणि अशा रीतीनें तुम्ही निश्चलबुद्धि होऊन परमेश्वरस्वरूपीं निमग्न झाला म्हणजे समाधीचें अखंड सुख तुम्ही भोगाल. त्यावेळीं तुमची दृष्टि परमेश्वराचेंच रूप पाहूं लागेल. तुमचें मन परमेश्वराचाच संकल्प वाहूं लागेल. तुमची जिव्हा परमेश्वराचेच गुणानुवाद गाऊं लागेल. तुमचे कर्ण ईश्वरलीलाच ऐकूं लागतील. परमेश्वराची

सेवा हेंच भूषण तुम्ही अंगावर धारण कराल आणि आत्मबोधान्नाचें भोजन जेवून तृप्त व्हाल. आणि अशा रीतीनें तुम्ही ब्रह्मानंदीं निमग्न झालां, म्हणजे हें कर्म आणि मी त्याचा कर्ता, हा मिथ्याभिमान तुमच्या चित्तांत उरणार नाहीं. काम, क्रोध हे तुमच्या पुढें उभे राहणार नाहींत. शुभाशुभाचा भेदाभेद तुमच्या ठिकाणीं उरणार नाहीं. मायेनें तुह्मी बद्ध होणार नाहीं. इंद्रियांचें बंड मोडेल आणि इंद्रियांच्या गतीनें विक्षेप पावणारी तुमची बुद्धि स्थिर होईल. मोह नष्ट होईल. विषयवासनेची गोडी लयास जाईल. साऱ्या चित्तवृत्ति सद्बुद्धीच्या आज्ञेंत वागूं लागतील. संकल्पविकल्पानें तुमचें मन विटाळणार नाहीं. अंगीं वैराग्य उत्पन्न होईल. आणि त्याचे मागून निर्दोष आणि गहन असें आत्मज्ञान प्राप्त होऊन सच्चिदानंद प्रभूची मूर्ति तुमच्या हृदयांत प्रगट होईल. श्रेष्ठहो, तेव्हां तुह्मांला इतकेंच सांगणें आहे कीं, या प्रपंचांत तुह्मी सर्व कर्में निष्काम बुद्धीनें करा; ह्मणजे तुह्मी कर्मबद्ध होणार नाहीं. प्रपंचांत स्वधर्मानेंच धन मिळवा आणि स्वधर्माकडेच त्याचा खर्च करा. देह हाच आत्मा, विषयांचें सुख भोगणें हेंच कार्यातें साफल्य, ही भ्रांति सोडून देऊन ही सर्व संपत्ति हवनद्रव्य आहे असें समजून स्वधर्मयज्ञाच्या द्वारानें आदिपुरुषाला अर्पण करा. तुमचा स्वधर्म आचरण्याला किती जरी कठीण असला, तो पाळतांना तुह्मांला किती जरी दुःख झालें, तुमच्यावर अगणित संकटें आलीं, तुमच्यावर निंदेचें काहूर कोसळलें, किंवा तुह्मांवर जरी प्राणांत संकट ओढवलें, तरी तुम्ही स्वधर्म सोडूं नका; म्हणजे तुम्ही संसारबंधापासून मुक्त व्हाल. परंतु स्वधर्माची कास सोडून जर तुम्ही या प्रपंचीं राहाटाल, तर मात्र इहलोकीं निरंतर दुःख आणि परलोकीं अक्षय नरकवास यांचीच तुम्ही जोड कराल. कारण, स्वधर्म सुटला कीं सुखाचा थारा मोडला. मग तुमच्यांत देहाभिमान वाढेल. इंद्रियांचे लाड पुरविण्याचा तुम्हांला हव्यास सुटेल. विषयांची धुंदी नेत्रावर चढेल. संपत्तीचा मद अंगांत संचरेल. मनाची शांति नष्ट होऊन दुर्बुद्धि तुमच्या हृदयांत साम्राज्य

करूं लागेल. मग मनाची तळमळ सुरू होईल. शोकदुःखाच्या आहळानें शरीर करपून जाईल. आधिव्याधि हात धुवून पाठीस लागतील. परमेश्वराची आठवण बुजेल. तेव्हां त्रिभुवनांतील पातकें आणि संकटें तुम्हांला भूतांप्रमाणें गराडा देतील. तुमचे बापभाऊ, इष्टमित्र, तुम्हांला तोडून खातील. लोक तुम्हांला गांजतील. अन्नान्नदशा तुम्हांला येईल. मृत्यु प्रतिक्षणीं आपलें विक्राळ स्वरूप दाखवून तुम्हांला भिववील. मग तुमची दशा काय विचारतां? असा कठीण काळ आल्यावर तुम्हीं केवढ्या मोठ्यानें जरी आक्रोश केला, तरी त्यांतून तुमची मुक्तता तेव्हां कोण करील? श्रेष्ठहो ज्या प्रभूनें तुम्हांला हें वैभव दिलें आहे त्याला तुम्ही अनन्यभावानें भजा. यज्ञनारायणाला आणि अग्निनारायणाला हवन द्या. देवाचें पूजन करा. सद्गुरूंना शरण जा. दुर्बळांना साहाय्य करा. अतिथींचा सत्कार करा. श्रेष्ठांना वंदन करा. आपल्या ज्ञातीला संतोष द्या. माता, पिता हीं आराध्यदैवतें समजून त्यांना संतुष्ट राखा. कोणाचा घातपात करूं नका. परनिंदेनें जिव्हा विटाळूं नका. हातानें दानधर्म करा. आणि जगामध्यें कीर्ति पसरून स्वधर्माचा मान वाढवा. तुह्मी चारी वर्णांत श्रेष्ठ! सर्व वर्णांचे आदिगुरु! ह्मणून तुम्हांला माझें पुन्हा पुन्हा हेंच सांगणें आहे कीं, तुह्मी कामनारहित होऊन उचित अशा धर्मानें वागा. तुम्ही समर्थ आणि ज्ञानी! तेव्हां तुम्हीच धर्मानें वागूं लागला, म्हणजे सामान्यजनांनाही तोच मार्ग लागून तेही तसेच वागूं लागतील! ( इतक्यांत ' नारायण ' नामाचा उच्चार करीत श्रीमत्परमहंस रामानंद स्वामी येतात ).

**विठ्ठल०** - (श्रीरामानंदस्वामींस ओळखून आतुरतेनें पुढें होऊन) श्रीमत्परमहंस सद्गुरुस्वामीमहाराज, श्रीवाराणसीक्षेत्रीं आपल्या पुण्याश्रमीं राहून, आपल्या उपदेशानें सुबोधित झालेला हा आपला चैतन्य आणि प्रापंचिकांत विठ्ठल या नांवानें वर्तणारा सद्गुरूंचा हा दास सप्रेम अंतःकरणानें सद्गुरुचरणांवर मस्तक ठेवीत आहे. ( विठ्ठलपंत श्रीरामानंदस्वामींचे चरणावर मस्तक ठेवितो. ते ' कल्याणं भवतु ' असा आशीर्वाद देऊन त्याला उठवून आलिंगन

देतात. ) सद्गुरुमहाराज, बहुत वर्षांनीं लाभलेल्या आपल्या या पुण्यकारक दर्शनानें मी आज कृतार्थ झालों !

**रुक्मिणी०**– ( स्वामींस नमस्कार करते, स्वामी तिला ' अखंड सौभाग्यवती भव ' असा आशीर्वाद देतात. )

**रामानंद**– विठ्ठलपंत, रुक्मिणीमातोश्री, तुह्मां उभयतांचे क्षेम आहेना ?

**विठ्ठल०**– स्वामीमहाराज, आपल्यासारखे सद्गुरु आमचें क्षेम चालविणारे असल्यावर आम्हांला काय उणें पडणार ? सद्गुरुकृपेच्या सावलींत आम्ही उदंड सुखांत नांदत आहों ! स्वामींच्या आशीर्वादानें आम्हांला हीं चार मुक्ताफळें लाभलीं आहेत ! ( विठ्ठलपंत चारी मुलांस पुढें करितो. श्रीनिवृत्तिनाथमहाराज, श्रीज्ञानेश्वरमहाराज, सोपानदेव व मुक्ताबाई स्वामींस दंडवत घालितात. ' विजयी भव ' असा आशीर्वाद देऊन स्वामी प्रत्येकास उठवून आलिंगन देतात व श्रीज्ञानेश्वरमहाराज आणि मुक्ताबाई यांस पोटाशीं धरून प्रेमानें त्यांच्या तोंडांवरून हात फिरवितात. ) आणि सद्गुरुकृपेनें आज या प्रतिष्ठानवासी सकल श्रेष्ठ भूदेवांनीं अनुकंपायुक्त अंतःकरणानें ( श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे हातांतील शुद्धिपत्राकडे बोट दाखवून ) हें शुद्धिपत्र देऊन आम्हां सर्वांना आज पावन केलें आहे ! ( सर्व पुरुष व स्त्रिया स्वामींस नमस्कार करितात. स्वामी सर्वांस ' अभीष्टफलप्राप्तिरस्तु ' असा आशीर्वाद देतात. )

**रामानंद**– ( मनाशीं ) अहाहा ! या रामानंदाचें केवढें थोर भाग्य हें, कीं आदिमायेसह प्रत्यक्ष शिव, विष्णु, ब्रह्मा यांच्या परम मंगलदायक प्रेमालिंगनाचा अत्यंत दुर्लभ लाभ मला या युगीं आज होत आहे ! ( उघड ) विठ्ठलपंत, रुक्मिणी मातोश्री, केवढी ही तुमची थोर पुण्याई ! कीं अशीं स्वयंप्रकाशित तेजोराशी देदीप्यमान बालकें तुमच्या उदरीं या युगीं जन्मास आलीं ! आणि अहो प्रतिष्ठानवासी जनहो तुम्हीही धन्य आहां ! कीं अशा त्रिजगतापहारी बालतपोनिधींचें तुह्मांला आज दर्शन झालें !

**ज्ञानेश्वर**– श्रीपादस्वामी, तातांच्याप्रमाणेंच, आम्हां अज्ञ

बालकांवरही स्वामींचें कृपाछत्र सदा असावें, म्हणजे आह्मांला कशाचेंही भय उरणार नाहीं !

**रामानंद**– अहाहा ! बाळा किती रे तुझे हे गोड शब्द ! विठ्ठलपंत या बालकांचीं नांवें काय ठेविलीं आहेस तें सांग बरें ?

**विठ्ठल०**– अहो गुरुराजसमर्था, हा माझा ज्येष्ठपुत्र, याचें नांव निवृत्ति, स्वामींनीं हृदयाशीं धरलेला माझा मध्यमपुत्र, ज्ञानदेव, हा कनिष्ठ, सोपान, आणि ही कन्या, मुक्ताबाई !

**रामानंद**– विठ्ठलपंत, ऐक. श्रीजगदीशानें माझ्या अंतःकरणांत उत्पन्न केलेल्या प्रेरणेवरून मीं तुला संन्यास आश्रम टाकून प्रपंचांत शिरण्याबद्दल अनुज्ञा केली. तरीपण माझ्या हातून या वेदशास्त्रबाह्य कर्मांचा घडलेला संसर्ग धुवून जावा, ह्मणून मीं आजपर्यंत तीर्थयात्रा करून अनेक सिद्ध पुरुषांना वंदन केलें. या यात्रेंत सकलपापविनाशी चंद्रभागेचें स्नान आणि कैवल्यपद प्राप्त करून देणारें श्रीपंढरीनाथाचें दर्शन मला घडलें. विठ्ठलपंत, तुला काय सांगूं ? दानवस्तूंवर तुलसीपत्र ठेवून प्रापंचिक लोक त्या ज्याप्रमाणें ब्राह्मणांना अर्पण करितात, त्याप्रमाणें ज्यांनीं आपल्या देहांवर तुलसीकाष्ठमाळा ठेवून आपले देह श्रीपांडुरंगाला अर्पण केले आहेत, असे आपल्या विवेकरूप खड्गानें कामक्रोधादिक षड्वैऱ्यांवर वार करणारे हजारों वारकरी, उपसनामार्गाचा धर्मध्वज ज्या पताका त्या खांद्यावर टाकून मुखानें श्रीविठ्ठलनामाचा गजर करीत श्रीपांडुरंगाच्या भेटीला लोटत आहेत, अशा त्या सर्व क्षेत्रांतील श्रेष्ठ अशा पंढरीक्षेत्राचें मी कोठवर वर्णन करूं ? जेथें हरिनामाचा गजर अखंड चालू आहे अशा त्या भूवैकुंठक्षेत्रीं, ज्ञानदेवा ऐक, मी श्रीपांडुरंगाच्या चरणीं मस्तक ठेवून हात जोडून पुढें उभा राहिलों असतां, श्रीपांडुरंगांनीं ( आपल्या गळ्यांतून तुलसीकाष्ठमाला काढून ) ही तुलसीकाष्ठमाला आपल्या कंठांतून काढून माझ्या हातांत दिली, आणि मला प्रभूंनीं अशी आज्ञा केली कीं, रामानंदा, तुझा शिष्य विठ्ठलपंत, याला तुझ्या आशीर्वादानें तीन पुत्र झाले आहेत; त्यांपैकीं मध्यम पुत्र ज्ञानदेव माझाच अंश आहे ! यासाठीं

तूं यावेळीं प्रतिष्ठानक्षेत्रीं जाऊन ज्ञानदेवाच्या कंठांत ही तुलसीकाष्ठमाला घाल. आणि त्यानें या युगीं माझ्या भक्तीचा प्रसार करावा अशी माझी आज्ञा आहे, असा माझा निरोप त्याला सांग ! ज्ञानदेवा, ती ही श्रीपांडुरंगप्रसादरूप तुलसीकाष्ठमाळा ( श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे गळ्यांत तुलसीकाष्ठमाळा घालून ) मी तुझ्या गळ्यांत घालीत आहे ! तरी बा ज्ञानदेवा, श्रीविठ्ठलाच्या आज्ञेप्रमाणें तूं श्रीविठ्ठलभक्तीचें माहात्म्य अखिल जगतास सांगून इहपरलोकीं धन्य हो !

**ज्ञानेश्वर**–श्रीमत्परमहंसांनीं स्वतः आपल्या हातांनींच या माझ्या देहावर तुलसीकाष्ठमाला ठेवून तो श्रीपांडुरंगास अर्पण केला आहे ! तेव्हां आतां,

**आह्मींसंन्यासघेतला ॥ देहादिकांचात्यागकेला ॥ १ ॥**
**आह्मींसंन्यासीसंन्यासी ॥ सदाराहोंएकांतेसीं ॥ ध्रु० ॥**
**चित्तचतुष्टयनिरसिलें ॥ अज्ञानातिळोदकदिधलें ॥ २ ॥**
**ज्ञानचिविज्ञानआलेंहाता ॥ आह्मानाहींशरीरममता ।३।**
**ब्रह्माहमस्मिशुद्धज्ञान ॥ तेथीलसांडिलाअभिमान ॥४॥**
**बापरखुमादेविवरुविठ्ठलहृदयीं ॥ तोचिसबाह्यअभ्यंतरीं असेठाईंरया ॥ ५ ॥**

अहो श्रीपांडुरंगा,

**तुझीसेवाकरीनमनोभावेंवो ॥ माझेंमनगोविंदींरंगलेंवो ॥ १ ॥ नवसियेनवसीये ॥ माझेनवसीयेवो ॥ पंढरिचे देवते ॥ विठ्ठलेनवसियेवो ॥ ध्रु० ॥ बापरखुमादेवीवरे विठ्ठलेवो ॥ चित्तींचैतन्यगेलनिलेंवो॥ २ ॥**

अहो श्रीपांडुरंगा, तुम्ही माझ्या हृदयांत असेच निरंतर राहा ! आणि या दीन बालकाच्या हातून आपली अनुज्ञा आपणच पुरी करून घ्या !

**रामानंद**– शाबास ! ज्ञानदेवा, धन्य आहेस तूं ! विठ्ठलपंत आणि अहो मातोश्री, जगच्चालक प्रभूच्या संकेताप्रमाणें प्रपंचांतील तुमची इतिकर्तव्यता आतां समाप्त झाली आहे. या-

साठीं तुम्ही उभयतांनीं हें वृथा संसारओझें वाहणें सोडून आणि हें प्रपंचमायाजाल दूर लोटून बद्रिकाश्रमीं जावें, आणि तेथें परमेश्वराची एकनिष्ठेनें उपासना करून देहसार्थकता करून घ्यावी, अशी माझी तुम्हां उभयतांना आज्ञा आहे.

**विठ्ठल०**– सद्गुरूंची आज्ञा आम्हां उभयतांना वेदाज्ञेप्रमाणें शिरसा वंद्य आहे ! स्वामींच्या आज्ञेप्रमाणें आम्ही आतां असेच बद्रिकाश्रमाकडे निघतों. परंतु श्रीस्वामीचरणीं इतकीच विज्ञप्ति आहे कीं, आम्हां दीनसेवकांवर स्वामींची कृपा अशीच अखंड असावी ! आणि या आमच्या अज्ञ लेंकरांच्या मस्तकांवर स्वामींचा वरदहस्त असावा ! ( सर्व मुलें स्वामींस नमस्कार करतात. त्यांस स्वामी ' सर्वत्र विजयीभव ' असा आशीर्वाद देतात. )

**ज्ञानेश्वर**– ताता, देहसार्थकता ज्याची त्याजपाशींच आहे ! सकळ तीर्थव्रतांचें सार, सच्चिदानंद प्रभु सर्वांच्या हृदयीं नांदत आहे ! मग देशांतरीं हिंडून अधिक तें काय मिळणार ? मृगाच्या नाभींत परिमळ आहे, पण तें न जाणतां तो परिमळाकरितां रानोरान हिंडूं लागला तर त्याला समाधान कोठून मिळणार ? हें मनरूपी लवण ज्या सागरांत निर्माण झालें त्या सागरांत जर तें जाऊन विरालें, तर अनंत जन्मांचा शीण जाऊन आनंदीआनंद होणार आहे ! तरीपण सद्गुरूंच्या मनोदयाप्रमाणें तातांनीं आचरण करून आपलें स्वाहित करून घ्यावें !

**रामानंद**– बाळा ज्ञानदेवा, या तुझ्या ज्ञानी भाषणानें आम्हांला अष्टभाव दाटले आहेत ! मातोश्री, तुम्हीं उदंड तप केलें आणि म्हणूनच शिव, विष्णु, ब्रम्हासारखे पुत्र तुमचे उदरीं जन्मास आले !

**विठ्ठल०**– ( श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानेश्वरमहाराज यांस पोटाशीं धरून व त्यांचें मुख कुरवाळून व शिर हुंगून ) बाळांनो, येतों बरें आतां आम्ही ! तुमची आमची हीच अखेरची भेट ! संभाळा; जपून राहा. नीट वागा आणि श्रीपांडुरंगाची आज्ञा निरंतर ध्यानीं धरून तदनुसार आपलें वर्तन ठेवा. म्हणजे श्रीपांडुरंग तुमच्यावर कृपा करून मातापित्याप्रमाणें तुमचें क्षेम चालवितील !

**रुक्मिणी०**– ( सोपानदेवास व मुक्ताबाईस पोटाशीं धरून व त्यांचें चुंबन घेऊन आणि शिर हुंगून ) सोपाना, बाळे मुक्ते, निवृत्तिदादा आणि ज्ञानदेवदादा सांगतील तसं वागून गुण्यागोविंदानें राहा बरं ! बाळा निवृत्ति, बाळा ज्ञानराजा, हीं तुमचीं भावंडं अजून तुम्हांहून लहान आहेत. यांना अजून चांगलं वाईट कळत नाहीं. तेव्हां यांना नीट जपा. सदा यांना प्रेमानं जवळ घेत जा. यांनीं कधीं हट्ट धरिला तर यांच्यावर रागावत जाऊं नका. गोड बोलून यांची समजूत पाडीत जा. आणि एकमेकांची पाठ धरून आनंदानें राहा. या माझ्या मुक्ताबाईला जीवापलीकडे जपा बरं. पोर अजून लहान आहे. जवळ ये म्हणायला तिला या जगांत आतां तुमच्याशिवाय दुसरं कोणी नाहीं. बाळ मुक्ताबाई, दादांच्या आणि भाऊच्या आज्ञेबाहेर कधीं वागूं नकोस हो. आणि सोपाना, तूं देखील आतां चांगली समजूत धरून दादा वागतील तसाच वागत जा. माझ्या लाडक्या निवृत्तिनाथा, आणि माझ्या राजहंसा ज्ञानराजा, मला एकदां कडकडून भेटा ! तुम्हांला पोटाशीं घट्ट धरून मला तुमचं एकदां चुंबन घेऊं द्या ! आणि तुमचीं हीं गोजिरीं स्वरूपं मला माझ्या हृदयांत सांठवून घेऊं द्या ! म्हणजे माझ्या पोटांतील कालवाकालव अंमळ तरी शांत होईल ! ( श्रीनिवृत्तिनाथ व श्रीज्ञानेश्वरमहाराज आईला भेटतात व रुक्मिणीबाई त्यांचें मुख कुरवाळून चुंबन घेऊन शिर हुंगते. सोपानदेव व मुक्ताबाई विठ्ठलपंतास मिठी मारतात. )

**विठ्ठल०**– ( सोपानदेवाला व मुक्ताबाईला पोटाशीं धरून मुख कुरवाळून त्यांचें चुंबन घेऊन व शिर हुंगून ) बाळा सोपाना, बाळ मुक्ताबाई ! आतां सर्वसाक्षी प्रभुच तुम्हांला सांभाळणार ! तुम्ही आपलें सुखदुःख श्रीपांडुरंगचरणीं घाला, आणि त्याचीच सदा करुणा भाका. श्रीपंढरीनाथा, हीं माझीं सुकुमार बालकें तुझ्याच ओटींत घालून आम्हीं आज विदेशीं जात आहों ! तरी हे अनाथनाथा यांचा प्रतिपाळ आतां तूंच कर ! गुरुमहाराज, या बालकांना आपला आशीर्वादप्रसाद मिळावा !

**रामानंद**– विठ्ठलपंत, श्रीपंढरीनाथाची आज्ञा या बालकांच्या हातून सिद्धीस जाऊन, हे त्रिजगद्वंद्य होतील आणि यांची विमल कीर्ति गगनीं चंद्र सूर्य आहेत तोंपर्यंत अजरामर राहील हा माझा पूर्ण आशीर्वाद आहे. ( श्रीरामानंदस्वामी निघून जातात. त्यांचे मागून विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई निघून जातात. जातां जातां रुक्मिणीबाई वरचेवर मुलांकडे वळून पाहते. )

**ज्ञानेश्वर**–( रुक्मिणीबाईचे तोंडाकडे पाहून तिला उद्देशून ) आई ग, तूं कांहीं काळजी करूं नको ! !

**सर्वहासंसारसुखाचाकरीन ॥ आनंदेंभरीनतिन्हीलोक ॥ १ ॥ जाईनगेमायतयापंढरपूरा ॥ भेटेनमाहेराआपुलिया ॥ २ ॥ सर्वसुकृताचेंफळमीचिघेईन ॥ क्षेमहेंदेईन परब्रह्मीं ॥ ३ ॥ बापरखुमादेवीवरविठ्ठलेशींभेटी ॥ आपुलेसंवसाटीकरूनिठेला ॥ ४ ॥**

( श्रीज्ञानेश्वरमहाराज वरील अभंग ह्मणत असतां रुक्मिणीबाई त्यांचेकडे सजल नेत्रांनीं पहात उभी राहते; व अभंग ह्मणणें संपल्यावर निघून जाते. तेव्हां सर्व नागरिक श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीनिवृत्तिनाथमहाराज, सोपानदेव व मुक्ताबाई यांच्या गळ्यांत फुलांच्या माळा घालितात व स्त्रिया त्यांस पंचारत्यांनीं ओंवाळतात व घरून आणलेल्या नानाविध वस्तु त्यांच्यापुढें ठेवून त्यांस साष्टांग नमस्कार घालतात. )

**ज्ञानेश्वर०**- अहो सुजनहो, तुम्हीं आम्हां चौघांना आजपर्यंत पोटच्या पोरांप्रमाणें ममतेनें वागविलें तशीच तुमची ममता आम्हांवर अखंड असूं द्या ! आमची ओळख ठेवा, आणि आम्हांवरील लोभांत अंतर पडूं देऊं नका ! तुम्ही आज आमच्याकरितां फार शिणलां ! गंगेंतून आह्मांस पैलउतार नेण्यास नावाडी तयार आहेत तरी नावेंत बसण्यापूर्वीं तुम्हांपाशीं माझें हात जोडून इतकेंच मागणें आहे कीं, सर्वांभूतीं समान दृष्टि ठेवून

निरंतर परमेश्वराचें सोज्वळ नाम मुखीं घ्या ! कारण यमराजाचें आपल्या दूतांना असें सांगणें आहे

यमधर्मसांगेदूतां ॥ तुह्मीपारिसावीनिजकथा ॥ जेथेंराम-नामवार्ता ॥ तयादेशानवजावें ॥ १ ॥ नामेंमहादोषां हरण ॥ नामेंपतीतपावन ॥ नामेंकलिमलदहन ॥ भव-बंधनमोचक ॥ ध्रु० ॥ जयेदेशींनामवसे ॥ नामश्रवणीं विश्वासे ॥ गातीनाचतीउल्हासें ॥ झणीपाहालतयाकडे ॥ २ ॥ जयेग्रामींहरिपूजन ॥ जयेनगरींहरिकीर्तन ॥ तेथेंगेलियाबंधन ॥ तुह्मीपावालत्रिशुद्धि ॥ ३ ॥ जये देशींगरुडटका ॥ कुंचेध्वजआणिपताका ॥ जेथेंसंतजन आइका ॥ तयादेशानवजावें ॥ ४ ॥ आणिकएकऐकारे विचारु ॥ जेथेंरामनामाचागजरु ॥ तेथेंबापरखुमादेवि वरु ॥ तयाबळेंनागविती ॥ ५ ॥

( पडदा पडतो. )

# अंक २ रा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**- म्हाळसापूर अथवा निवास ( नेवासें ) क्षेत्र.

( गोपाळपंतांचें घर. गोपाळपंत हातांत वीणा व चिपळ्या घेऊन भजन करीत बसले आहेत, असा पडदा उघडतो. )

**गोपाळपंत**-

**श्रीसद्गुरुज्ञानदेव ॥ माझा तयावरी भाव ॥१॥ त्यास मी देहें विकलों ॥ पीतां बोधामृत धालों ॥ २ ॥ त्यानें दिला मज मंत्र ॥ विठ्ठलनाम पवित्र ॥ ३ ॥ तोचि मी गाईन सदां ॥ मिळवीन हरिपदा ॥ ४ ॥**

( गोपाळपंतांची स्त्री म्हाळसाबाई हातांत फाटकें लुगडें व फाटकी चोळी घेऊन प्रवेश करते. )

**म्हाळसा०**- ( लुगडें पुढें करून ) आतां जळल्या या लकतावळ्या गुंडाळाव्यात तरी कशा ! ( चोळी पुढें करून) नी या चिंध्या अंगांत घालाव्यात तरी कशा ! तें आपणच सांगा ? पुरे-पुरे-पुरे ! पुरे झालं बरं आतां हें भजन ! द्या त्या चिपळ्या टाकून नी अजून तरी घाला प्रपंचांत मन ! बाई आज नाहीं उद्यां बुद्धि पालटेल, उद्यां नाहीं तर परवां तरी कांहीं उमगेल, असं म्हणतां म्हणतां आज एक वरीस गेलं ! ना उद्योग, ना धंदा ! ना कुठें जाणं, कीं कुठें येणं ! एक घर कीं दुसरं पुराण ! आग लागली त्या पुराणाला ! ऐकलं का? प्रपंचाचा झाला एवढा उन्हाळा पुरे झाला बरं ! मेल्यांनो, आज हा डागिना मोड, उद्यां तो मोड, आज हें भांडं वीक, नी उद्यां तें वीक, असं करकरून सारं घर धुवून टाकलं ! आतां बरीक वीख खाईन म्हटलं तर जवळ कांहीं देखील राहिलं नाहीं ! का चार घरं मागून आलें तर तें शिजवायला एक भांडं

देखील घरांत उरलं नाहीं ! येतं आहे का ऐकूं मी काय बडबडतें आहे तें ? का कान फुटले ? जळ्ले ते तरी फुटले असते, तर मेलं पुराण तरी बंद पडलं असतं ! (इतक्यांत बाळ्या येतो त्यास) बाळ्या, कुठें रे गेला होतास इतका वेळ ? तुला शोधून त्रिखंड केलं ! तो तूं कुठें जाऊन बसला होतास गोवऱ्या वळीत ? कारट्या, इतका वेळ हातांत नरोटी घेऊन दहा घरं फिरला असतास तर निदान संध्याकाळीं पोटभर तरी गिळला असतास ! कुठे रे गेला होतास ? खरं सांग; नाहीं तर कोलतीनंच डागतें बघ तुला आतां ! कारट्या तूं तसा नी हे असे ! एक राहु नी एक केतु ! छळा ! एक जन्म गांठ पडली आहे, ती पुरी छळून घ्या एकदां.

**बाळ्या**- आई ग–ए आई– आई, मी किनई नरोबा चाट्यांच्याकडे गेलों होतों. अबब ! त्यांनीं आपल्या भाऊला आणि चिमीला किती किती डागिने केले आहेत ग ! मला करशील ग तसे ? आई, नरोबांनीं पुणतांब्याच्या बाजारांतून भाऊला कशा छान छान जमती आणल्या आहेत ! बाबा, मला आणाल तशा जमती ? अं–अं–अं–अं.

**म्हाळसा०**- बसला मेला डागिने नी जमती ह्मणून रडत ! मेल्या आधीं अंग झाकायला धड वस्त्र तरी मिळूं दे तुला ! मग डागिने नी जमती ! मी किती दिवस ह्मणतें आहे कीं, चांगदेव सिद्धांच्या दर्शनाला चलावं ह्मणून ! पण नशीब पडलं ना धड ! तेव्हां माझं सांगणं कुठलं मनांत भरायला ! नरोबा चाटी पडले दैवाचे धड, म्हणून देवानं त्यांना चांगदेव सिद्धांना शरण जाण्याची बुद्धि दिलीन ! नी आम्हांला आठवली अवदसा ! तेव्हां ज्ञानेश्वर हेच आवडले आम्हांला गुरु ! लहानपणीं मीच आपल्या हातांनीं या नरोबाला कालवण नी तुकडा पोंचवीत होतें ! पण देवानं आतां आम्हांलाच त्याच्या दाराशीं जाण्याची वेळ आणलीन ! याचं जळ्लं कांहींच का वाटत नाहीं आपल्या मनाला ? तसं नव्हेच पण मुळीं. मी नी माझा बाळ्या आम्हीच आपलीं जाऊं पुणतांब्याला नी घेऊन

येऊं त्या सिद्धांचं दर्शन! मग काय, मी जाऊं ना बाळ्याला घेऊन? विटाळूं या नुसतं हो म्हटल्यानं तोंड विटाळलं तर!

**गोपाळ०**– श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरूंच्या मुखांतून निघणाऱ्या ज्ञानरूपीं धनाचा संग्रह मी आपल्या हृदयसंपुटीं नित्यशः करीत आहें; मग मला आतां कशाची वाण आहे?

**म्हाळसा०**–जळ्ळं असलं उफराटं बोलायला कांहीं वाटतं आहे का मनाला? म्हणे मळा आतां कशाची वाण आहे! मग आजपावतर मिळविलेलं धन बाजारांत घेऊन जाऊन, नाहीं कधीं गुंजभर सोनं, का एकादी लुगड्याची घडी, का चिमुटभर दाणे घरांत आणलेत ते?

**बाळ्या**– आणि बाबा! मला हो कां नाहीं तर मग अंगांत घालायला आजपर्यंत एक देखील अंगरखा आणलांत? मी नाहीं अं! या आमच्या जवळ तो तुमचा पैका; म्हणजे काय ग आई, आपण पुणतांब्याच्या बाजारांतून तुला नेसायला एक छानदार लुगडं आणि चोळीला एक जरीकांठी खण, बाबांना एक रेशीमकांठी धोतरजोडा आणि मला एक छानदार अंगरखा आणूं? (आईच्या हातांतून जुनें लुगडें व चोळी हिसकून घेऊन व तीं फाडून) ह्या चिंध्या कशाला हव्यात आतां आपल्या घरांत! आणि (आपल्या अंगांतील फाटका अंगरखा फाडून) हा जाळीदार अंगरखा तरी काय करायचा आहे मला आतां अंगांत ठेवून!!

**म्हाळसा०**–कारट्या, (बाळ्यानें फाडलेलें लुगडें आपल्या हातांत घेऊन त्याजकडे पाहतां पाहतां) जळ्ळे तुझे एकदांचे हात ते! आलटून पालटून गुंडाळण्यासारखं एकच पडदणं घरांत होतं त्याच्या अशा चिंध्या करून वाट लावलीस, तो केला आहेस का आपला कुणी काका मला आतां दुसरं लुगडं घेऊन द्यायला उभा? नी मेल्या आतां अंगांत रे काय घालशील?

**बाळ्या**–माझे बाबा असतांना ग कशाला हवेत तुला काका नी बिका? बाबा, या हो तुमची ती बटवी या आईच्या अंगावर फेकून!

**म्हाळसा०**– मेल्या, कोणीं रे तयार करून ठेवली आहे बटवी

मला द्यायला ! ( गोपाळपंतांस ) असा वेदांत सांगून जळ्ळी ही पोटाची आग शमती तर आजपर्यंत कैक वारा पिऊन वेदांतच घोकीत बसले असते ! तुम्ही अलीकडे तहानभूक, लोकलज्जा, दयामाया, सुखदुःख, सारं कोळून प्यायलां आहां ! पण मी नाहींना अजून तशी वेदांती, निःसंग, निष्ठुर नी धोंडा बनलें ! माझा बाळ्या मोठा होईल. नी मग तो मला सुख देईल, ती लांबची गोष्ट ! पण आपण आहां तिथपावतर नको का मला तुमच्यापासून सुख मिळायला ? पण मी असें विचारतें कीं, आजवेरीं प्रपंचांत मन घातलंत ते कां तर मग ? तुम्हांला जर संसाराची गरज नव्हती तर मग लगीन तरी करून घ्यायचें नव्हतंत अगोदर ! म्हणजे तुमच्या मागं लागायला मीही नसतें आलें घरांत ! ( बाळ्याच्या तोंडावरून हात फिरवून ) नी हें माझं सोन्यासारखं पोर, चांगलं कुणा श्रीमंताच्या पोटीं तरी जन्माला आलं असतं !

**बाळ्या**– आई, चल कीं ग सैंपाकघरांत. मला भूक लागली !

**म्हाळसा०**– भूक लागली तर मी आतां आपलीं हाडं कां देऊं तुला चघळायला ? माग त्यांच्यापाशींच ! त्यांनीं गुरूपासून डबोलं मिळविलं आहेना ? त्यांतलं देतील तुला ते थोडं !

**गोपाळ०**– श्रीज्ञानेश्वरमहाराज, माझ्या मागची ही उपाधि केव्हां बरें दूर होईल ?

**म्हाळसा०**– बसा आतां जन्मवेरीं त्या ज्ञानेश्वराच्या नांवानं रडत ! अगोदर कुठें गेली होती अक्कल मसणांत ? अजून तरी उमगा, नी चला त्या चांगदेव सिद्धांना शरण !

**बाळ्या**– आई, मला कांहीं तरी दे अं !

**म्हाळसा०**– कारट्या, शेजारच्या रमाकाकूंच्याकडे ओ येईस-तवर ओधडून आलास, त्याला घटका देखील लोटली नाहीं अजून ! नी इतक्यांत मला भूक लागली ह्मणतोस, तेव्हां तुझ्या पोटांत आतां-शी इतकी आग तरी कसली पडली आहे जळ्ळी ? आतां रात्रीशि-वाय कांहीं गिळायला मिळायचं नाहीं. मेल्याला कांहीं करमलं नाहीं कीं भूक ! आतां मला खाऊन टाक, ह्मणजे सुटलास एकदांचा !

**गोपाळ०**- ऐकलेंस का मी काय म्हणतों तें ?

**म्हाळसा०**- पुरे! पुरे झालं तुमचं म्हणणं! आजवेरीं पुष्कळ ऐकलं बरं! इश्श! हा कोण पण जळ्ळा दुराग्रह! याच चांगदेव सिद्धांचे वरुणगांवचे दोन ब्राह्मण शिष्य! त्यांची कहाणी ऐकली आहेना लक्ष वेळां लोकांच्या तोंडून? सिद्धांच्या कृपेनं ते भिक्षाधिशांचे लक्षाधीश झाले! तसं तुमच्या गुरूंनीं केलं आहे का कुणाचं दळिद्र दूर? उलट माझ्या मामंजींनीं जें कांहीं मिळवून ठेवलं होतं, तें मात्र यांची संगत झाल्यापासून जवळचं नाहींसं होत होत आतां अखेर हातीं चौपदरी घेण्याची वेळ आली! रेड्याच्या तोंडून वेद बोलवले! मेलेलीं माणसं स्वर्गांतन श्राद्धाला आणलीं! झालं! इतकंच ना सारं? पण चांगदेव सिद्धांच्यापुढं वरुणगांवच्या दोन ब्राह्मणांनीं मृत्तिकालिंगाच्या बदली वाळूवर वाटी ठेवून पार्थिवलिंग म्हणून पूजेला दिली, तों आपले सिद्धांच्या भक्तिस्तव प्रत्यक्ष श्रीशंकर त्या वाटींत प्रगट झाले! तेव्हां चांगदेव सिद्धांनीं तिथें श्रीशंकराचें देऊळ बांधून त्यांचं नांव वटेश्वर ठेवलं! असं सामर्थ्य आहे का तुमच्या गुरूंच्या अंगीं? वटेश्वरासारखं जागृत नी कडकडीत स्थान साऱ्या पृथ्वींत नाहीं, म्हणून चोहों देशांतलीं माणसं येत आहेत त्यांच्या दर्शनाला! चांगदेव सिद्धांचं राहिलं, पण वटेश्वरांचं दर्शन घेतल्यानं तर नाहींना पाप लागायचं? मग तें तरी घडूं द्या एकदां! वटेश्वरांच्यापुढं मूठभर तांदूळ ठेविले तर ताटभर द्रव्य देतात हो ते!

**गोपाळ०**- श्रीज्ञानेश्वर सद्गुरु, साक्षात् श्रीविष्णु मला मिळाल्यावर अन्य देवता मला काय अधिक देणार ?

**म्हाळसा०**- जें आमच्याजवळ नाहीं तें देणार बरं का! नको, नको, नको! जळ्ळा, हा वितंडवाद घालतां घालतां माझा घसा अगदीं कोरडा पडला!

**बाळया**- आई, ए आई, परवां नरोबांनीं आपल्या भाऊला नेला होता बरोबर पुणतांब्याला! आई, तेव्हां भाऊ सांगत होता कीं, बुवांच्या पुढें बरफीचे आणि पेढ्यांचे डोंगराएवढे ढीग पडतात म्हणून! आणि किनई ग आई, त्यांचे चौदाशें शिष्य आहेत!

त्यांना किनई ते बुवा पंचपक्वान्नें खायला देतात ग! आई, चल ग आपण पुणतांब्यालाच जाऊन राहूं. मग काय बरफी आणि पेढे! आणि लाडू! चंगळच चंगळ! पुणतांब्याला गेल्यावर मला हातांत घालायला सोन्याचीं कडीं, आणि गळ्यांत घालायला मोठा आठपदरी गोफ करायचा बरें का आई!

म्हाळसा०– बाळा, जाऊं बरं आपण! राजापासून तों रंकापर्यंत जे सगळे त्या सिद्धांच्या पायांवर लोटांगण घेत आहेत ते का सारेच का वेडे! वैदिक, याज्ञिक, शास्त्री, पंडित, त्यांच्यापाशीं शिकायला लोटले आहेत ते देखील का खुळेच! वाघावर बसून हातांत सापाचा चाबूक घेऊन आकाशांतून अधांतरीं जायचं! आतां इथें गुप्त व्हायचं नी क्षणांत पांचशें कोसांवर भक्तांना दर्शन द्यायचं! हातांत माती घेऊन तिचं सोनं करायचं! मेलेलीं माणसं जिवंत करायचीं! लोकांचे रोग बरे करायचे! जें कुणी मागेल तें त्याला द्यायचं! असे हे चौदा विद्या नी चौसष्ट कळा शिकलेले नी चौदाशें वर्सं वांचलेले सिद्ध, देवादिकांच्या हातून होणार नाहींत असे अघटित चमत्कार करून जगाला दाखवीत आहेत! नी ह्मणूनच वाराणशींतल्या पंडितांनीं यांचं जगद्‌गुरु असं नांव ठेविलं आहे!

बाळ्या–आई ग, चाटर्यांचा भाऊ सांगत होता कीं, त्या बुवांचे शिष्य देखील किनई मोठी गंमत करितात ह्मणून! आई, कोणी किनई झाडालाच टांगून घेतात! कोणी एकाच पायावर आणि एकच हात वर करून उभे राहतात! कोणी गळ्यापर्यंत पुरूनच घेतात! एक शिष्य आपला घार होऊन आभाळांत उडून गेलेलाच भाऊनें पाहिला ग! एक तर डोक्यानेंच चालत होता! एकाला पाण्यावर चालतांना त्यानें पाहिला! आणि एक तर डोंगरावरून आपला उभाच्या उभा खालीं आला! आणि पुन्हा उभाच्या उभाच डोंगरावर चढून गेला! आई, मी होऊं ग त्यांचा शिष्य? मी त्यांचा शिष्य झालों ह्मणजे वाटेल तिकडे जाऊन तूं काय म्हणशील तें तुला आणून देईन! मग तुला काय कमी! साऱ्या पृथ्वींतले जिन्नस आपलेच! आई,

मग खरंच येणारना तूं पुणतांब्याला ? बाबा, आई इतकें म्हणतें आहे तर चलाना बरें आमच्याबरोबर ?

**गोपाळ०**– बाळा, तिला नाहीं ज्ञान, ह्मणून ती आपली कांहीं तरी बडबडते आहे ! तूं नको तिच्या नादीं लागूं !

**म्हाळसा०**– चुलींत नेऊन घाला तें तुमचं ज्ञान ! मी आपली वेडी आहे तीच बरी ! कसलं जळ्ळं ज्ञान ह्मणतां, त्याच्या नादीं लागूनच तर ही आपली अशी दशा करून घेतली आहां ! नी आपल्याबरोबर आम्हांलाही अक्काबाईच्या फेऱ्यांत ओढलीं आहांत ! कोपरापासून हात जोडले आहेत बरं आतां आपल्यापुढं. आतां हा हट्ट टाकून चला त्या सिद्धांच्या दर्शनाला. म्हणजे डोक्यांतलं हें जळ्ळं वेड तरी नाहींसं होईल त्यांच्या कृपादृष्टीनं !

**गोपाळ०**– गुरुमहाराज, सोडवा मला या जाचांतून !

**म्हाळसा०**– म्हणजे काय ? उद्यां अंगाला राख फासून का जायचं आहे गुरूंच्यामागं बैरागी होऊन ? तुह्मी पुष्कळ जाल, पण मी नाहीं हो तुम्हांला जाऊं द्यायची ! माझी नी माझ्या बाळयाची वाट लावा अगोदर, नी मग चला तुम्ही हवं तिकडे! पोर सदां चिडलेलं असतं! त्याच्या अंगावर खरूज नायटे उठतात! त्याची साऱ्यांना चिळस वाटते ! त्यामुळं पोराला कुणी जेवायला खायला बोलावीत नाहींसं झालं आहे ! आमच्या घरांत नाहीं तर लोकांच्या घरीं का होईना, दोन गोड घांस पोराच्या पोटांत जावे असं पुष्कळ वाटतं माझ्या मनाला. पण काय उपयोग ?

**गोपाळ०**– तुमचें पूर्वसंचित पडलें ना धड !

**म्हाळसा०**–पोर का माझं एकट्याचंच का आहे, माझी करणी त्याला नडायला ? आपलं संचित होतं ना चांगलं ! मग कां असं व्हावं ? नी माझी करणी याला नडायला मीं काय केलं आहे असं ? तुम्हांला असे वेडेचार टाकून द्या, रोजगारधंदा करा, दोन पैसे मिळवा, नी प्रपंचसुख साधा असं ह्मणतें, हें जर पाप असलं तर बरीक नकळे बाई! पण हें जर पाप असतं तर मग एक तरी संसारीक दिसला असता का आपल्याला जगांत ? हा कोण मेला उलटा न्याय ! चला, उठा, स्नान करा, नी दोन

आचमनं टाकून एकदां चार घांस पोटांत लोटा ! बाळ्या धर रे त्यांच्या हाताला.

**बाळ्या**–( गोपाळपंतांचे दंडास धरून ) बाबा, उठा, उठा. आणा तो वीणा आणि त्या चिपळ्या इकडे; ह्मणजे मी देतों त्या मागच्या आडांत टाकून !

**म्हाळसा०**–( गोपाळपंतांचे दंडास धरून ) उठा ! उठा ! उठा ! उठा हो उठा आतां ! ( गोपाळपंतांस बळ्या व म्हाळसाबाई दंडाला धरून उठवितात व त्यांना घरांत घेऊन जातात. )

**गोपाळ०**–( घरांत जातां जातां )

**मुखींविठ्ठलबोलतां ॥ गेलीसंसाराचीचिंता ॥ १ ॥**
**सज विठ्ठलसंपत्ति ॥ तोचिसर्वसुखशांति ॥ २ ॥**
**साहाकारी दीनबंधु ॥ पैलनेईभवसिंधु ॥ ३ ॥**

( सर्व निघून जातात. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळ**– ह्माळसापूर अथवा निवास ( नेवासें ) क्षेत्र. क्षेत्रस्थ सच्चिदानंदबाबा यांच्या घरासमोरील अंगण.

( सच्चिदानंदबाबा मृत झाले असून त्यांची स्त्री सावित्रीबाई सती जाण्यास निघाली आहे. तिला बोळविण्याकरितां स्त्रिया व पुरुष जमा झाले आहेत. स्त्रियांनीं हातांत सौभाग्यवायनें घेतलेलीं आहेत. पुरुषांतील एक गृहस्थ कृष्णंभट, यास सती जाणाऱ्या सावित्रीबाईची बहीण राधाबाई ह्मणते. )

**राधा०**–भटजी, तुम्हीच सांगा ? आतां उरली आहे का कांहीं या आमच्या माईपुढं तोंड ? हा तिचा हेकेखोरपणा कांहीं आजचाच नाहीं हो ! लहानपणापासून तिचं आपलं हें असं ! ह्मणेन तें करीन ! आजवेरीं तिच्यापुढं चालली नाहीं कुणाची मात्रा ! ती आज असल्या प्रसंगीं हो कुठली कुणाला भीक घालायला !

पण मायेनें जळ्ळा या आतड्यांना पीळ पडतो, ह्मणून दोन गोष्टी सांगितल्याशिवाय जीव राहात नाहीं भटजी!

**कृष्णंभट**– राधावहिनी, नका अशा डोळ्यांना पाणी आणूं! सावित्रीवहिनींवर आज आकाशाची कुऱ्हाडच कोसळली आहे! तेव्हां त्यांना या वेळीं स्वतःची शुद्ध का आहे? सच्चिदानंदबाबांच्या सारखा योग्य पुरुष या ह्माळसापुरीं पुन्हा आमच्या दृष्टीस पडा-वयाचा नाहीं वहिनी! सावित्रीवहिनी आणि बाबा यांचें परस्प-रांवर केवढें हो अद्वितीय प्रेम! आणि परमेश्वरानें त्याची अखेर अशा रितीनें केली, यामुळें सावित्रीवहिनींना स्वतःचा जीव जड होणें साहजिक आहे, राधावहिनी!

**राधा०**– भटजी, तिचं सर्वस्वच आज बुडालं! तेव्हां तिला जिवाचा वैताग येईल, मी नाहीं का ह्मणतें? पण थोडा विवेक नको का करायला? जगांत रोज थोडक्यांचं का असं होत आहे? पण सगळ्यांनींच कुठें सतीचीं वाणं घेतलीं आहेत? आमच्याच शेजारच्या सीताकाकू नी रामचंद्रपंत! दोन्ही पिकलेलीं पानं! साठीच्या घरांत आलेलीं! तूं आधीं का मी आधीं, असं दोन वर्स चाललं होतं नवराबायकोचं भांडण! पण अखेर होतं तेंच आलं ना सीताकाकूंच्या कपाळीं? पण त्यांनीं नाहीं केला तो असा अघोचरपणा? भटजी, पण जळ्ळा हा वादच आटपला आतां! ती पहा माझी माई पांढरं पातळ नेसून, कपाळाला मळवट भरून, गळ्यांत तुळसीमंजिरीच्या माळा घालून, नि-र्वाणीचीं लेणीं लेवून, नी तळहातावर अग्नि घेऊन, बाबांच्या प्रेतापुढं चालण्याकरितां तयार होऊन ओटीवरून खालीं उतरत आहे!! अग माई, नको ग असा आपला जीव जाळून घेऊं! तूं आतां कांहीं केलंस, तरी एकदां निघून गेलेला प्राण पुन्हा का कुडींत परत येणार आहे? (इतक्यांत पडदा वर होऊन वर वर्णन केल्याप्रमाणें सावित्रीबाई तयार होऊन निघालेली दृष्टीस पडते. ओटीवर घोंगडीवर काढलेलें सच्चिदानंदबाबांचें प्रेतही दृष्टीस पडतें.)

**कृष्णाबाई**– सावित्रीबाई, विचारानं मनाची थोडी समजूत

पाडा ! बाई, ब्रह्मलिखित कधीं कुणाला टळलं आहे का ? दैवांत जसं जसं असेल तसं तसं व्हायचंच ! नाहीं तर बाबांचं आज वय का झालं होतं ? एकाएकींच घाला पडला. त्याला कोण काय करणार ? आतां तुम्हीं पुष्कळ खेद केला, तरी काय उपयोग ? विवेकानं अंवढा गिळलाच पाहिजे !

**सावित्री०**– ( तळहातावरील अग्नि खालीं ठेवून ) कृष्णाबाई, यांच्या आज्ञेखेरीज मी आजवेरीं यांच्यापुढं बसलें नाहीं. कधीं यांची अवज्ञा केली नाहीं. यांच्या निरोपावांचून कुठें गेलें नाहीं. हे जेवल्याखेरीज कधीं तोंडांत घांस घातला नाहीं. हे निजल्यावांचून कधीं अंग टाकलं नाहीं. यांच्या आधीं उठून, अंग धुवून, देवातुळशीची पूजा करून यांचं चरणतीर्थ घ्यायला एक दिवस विसरलें नाहीं. हे कधीं रागावले तर उलट उत्तर केलं नाहीं. उलट यांचे पाय धरून यांच्यापुढं सदां नाक घासलं. हे बाहेरून घरांत आले तर नेहमीं हसतमुखानं यांच्यापुढं जाऊन हात जोडून यांची आज्ञा पुसली. यांच्या मर्जीबाहेर कधीं वागलें नाहीं. यांनीं संतोषानं सांगितल्याखेरीज कधीं व्रतउपास का नेमधर्म का कांहीं केलं नाहीं. कधीं परपुरुषाशीं बोललें नाहीं का डोळा वर उचलून कुणाकडे पाहिलं नाहीं. नवऱ्यांना निंदणाऱ्या बायकांत कधीं बसलें नाहीं का कधीं वाईटाची संगत धरली नाहीं. यांनीं दिलं तें नेसलें नी घातलं तें खाल्लं नी सांगितलं तें केलं. हट्टानं कधीं हें पाहिजे कीं तें पाहिजे असं म्हटलं नाहीं. का यांच्यापुढं कधीं कपाळाला आठ्या घालून दुर्मुखलेली बसलें नाहीं. यांना पुसल्याखेरीज कधीं आपलीच बुद्धि चालवून अविचारपणानं वागलें नाहीं. हे साक्षात् लक्ष्मीनारायण असं समजून यांची एकनिष्ठेनें सेवा केली, नी पतिव्रता धर्मानं वागलें. तेव्हां यांची सेवा मला अशीच निरंतर घडावी म्हणून वैकुंठाहून माझ्या आईबापांनीं, यांना बरोबर घेऊन यायला, मला बोलावणं पाठविलं आहे ! म्हणून किनई यांना बरोबर घेऊन मी आतां माझ्या माहेराला जातें ! माझ्या धर्माच्या मायबहिणींनो माझी ओटी भरा ! मला हळदकुंकूं द्या ! नी माझी माहेराला पाठवणी करा !

**राधा०**– माई ! अखेर तूं जाणार ना, या तुझ्या ताईला मागं टाकून ? माई ! नकोग अशी निष्ठुर होऊं ! ( सावित्रीबाईच्या गळ्यास मिठी मारून व तिचें मुख कुरवाळून ) माई ! तुझं शरीर विस्तवांत पोळतांना आम्हांला कसं ग पाहवेल ? अग, आत्महत्या हा शास्त्रांत मोठा दोष गणला आहे ! तर आपलाच हेका चालवून पातकांच्या राशी कां बरं डोक्यावर घेतेस ? अभिमन्यूची बायको उत्तरा, हिला सहगमन करूं नकोस म्हणून श्रीकृष्णभगवंतांनीं केलेला उपदेश आहेना तुझ्या ध्यानांत ? अग, साधुसंत देखील या सहगमनाला घोरपाप म्हणतात ! म्हणून म्हणतें कीं, इतकीं सगळीं माणसं तुला जीव तोडून सांगत आहेत, त्यांचा शब्द मोडून नको ग असा हट्ट धरून आपलंच खरं करूं ! बाबा गेले, म्हणून आम्ही नाहीं का त्यांच्या मागं तुझीं कुणी ? आई, बाबा, मी, भाऊ, सारींच का तुला परकी झालों ? माई, अग माई, अखेरीला तरी नीट दोन गोड शब्द बोल ग माझ्याशीं !

**सावित्री०**– ताई, यांच्याखेरीज साऱ्या जगांत मला दुसरं कांहीं तरी प्रिय आहे का ? तूंच सांग बरं ? अग, यांच्याखेरीज मला राजाचं राजपद जरी मिळालं तरी त्याचं मला यत्किंचित् देखील सुख नाहीं ! हे माझे धनी, माझे सुखदुःखाचे वाटेकरी, नी हेच माझें मुख्य दैवत, हें खरं ना ? मग हे जिथं जातील तिथं यांच्याबरोबर जाऊन यांची मनोभावानं नको का मला सेवा करायला ? अग यांची सेवा हाच ना माझा धर्म ? मग हे स्वर्गीं गेल्यावर यांच्या मागं मला तूं इथेंच राहा असं कसं बरं सांगतेस ? ताई, क्षणभर ही लटकी माया दूर लोटून, तें बघ, वैकुंठांतलं विमान मला स्वर्गांत न्यायला खालीं उतरत आहे ! त्यांत मला बसवून माझी देवाच्या घरीं बोळवण कर ! हेंच तुझ्यापाशीं माझं अखेरचं मागणं आहे !

**सखुबाई**– राधाबाई, सावित्रीबाईंना माई, माई, म्हणून नका नसत्या मोहांत पाडूं. त्या आपलं सोनं करून घेऊन जात आहेत ! त्यांना कां बरं आडवतां ? सासरचीं बेचाळीस नी माहेरचीं बेचाळीस उद्धरायचीं आहेत कुणाच्या प्रारब्धीं ? नी मेलं कपाळच

कुंकूं पुसल्यावर इथें जगून तरी काय करायचं आहे ? सावित्रीबाई, बसा तुह्मी खालीं. मी तुमची ओटी भरतें. रमाबाई, आणा ती ओटी इकडे. (सावित्रीबाई खालीं बसते. सखुबाई तिची ओटी भरते आणि सखुबाईच्या मागून दुसऱ्या बायका सावित्रीबाईची ओटी भरतात.) राधाबाई, व्हा पुढं नी सावित्रीबाईची तुम्ही शेवटची ओटी भरा.

**राधा०**– (ओटी भरतां भरतां) माई, या तुझ्या ताईच्या हातची ही शेवटची ओटी घे! नी पुन्हा स्वर्गांत जेव्हां तुझी माझी भेट होईल तेव्हां माझ्यावर इथल्यासारखी अशीच माया कर बरं !

**सावित्री०**– ताई, तुला आईनं नी बाबांनीं माई कुठें आहे ह्मणून विचारलं, तर त्यांना ह्मणावं तुमच्या लेकीनं बाळपणीं गौरीची पूजा केली, लगीन झाल्यावर पांच वर्सं मंगळागौरी पुजल्या, सोमव्रत केलं, अनंत पुजला, अश्वत्थाला प्रदक्षिणा घातल्या, चुडेकांकणाच्या आशेनं श्रीकुलस्वामिनी ह्माळसाआईची पूजा केली, जें जें व्रत बायकांनीं सांगितलं तें तें केलं, जो जो धर्म कुणीं सांगितला तो तो आचरला, पण अखेर सारं व्यर्थ झालं ! माझ्या हळदीवर नी गळसरीवर दरोडा पडला ! तेव्हां मीं आपली कांकणचोळी श्रीम्हाळसाआईला अर्पण केली ! नी तिच्या पायापाशीं आतां आह्मी स्वर्गीं सुखानं नांदत आहों ! सखुबाई, रमाबाई, तुह्मी साऱ्याजणीं बसा आतां खालीं ! ताई, त्या ओट्या, तीं वाणं नी त्या हळदीकुंकाच्या वाट्या आण इकडे. म्हणजे मी या माझ्या मायबहिणींच्या ओट्या भरतें. यांना हळदकुंकूं देतें. नी यांना सौभाग्यवायनं वाटतें. (सर्व सामान जवळ आणल्यावर एकएकीची ओटी भरून व तिला कुंकूं लावून व एकएक वायन देऊन) सखुबाई, हें माझ्या हातचं अखेरचंच हळदकुंकूं हो ! रमाबाई, माझी आठवण विसरूं नका ! नी गंगाबाई, रखमाबाई, तुम्ही साऱ्याजणीं माझ्यावर असाच लोभ ठेवा ! ताई ! ही तुझी माई दृष्टीआड झाली ह्मणून हिचा विसर पडूं देऊं नको हो ! ही माझी ठुशी तुला घे ! सखुबाई माझ्या आठवणीची ही सरी तुह्मी ठेवा ! नी बायांनो ही माळ, ही नथ, ह्या बाळ्या, तुह्मी घ्या ! तुह्मी साऱ्याजणीं माझी आठवण ह्मणून

हीं नेहमीं अंगावर घालीत जा हो ! घालालना ? ( त्या मानेनें हो म्हणून सुचवितात. )

**सखु०**– ( मनाशीं ) आई जगदंबे, या पतिव्रतेनं भरलेली ही माझी ओटी, मला शुभशकुनाची होवो ! नी तिकडच्यापूर्वी माझे डोळे मिटीव, हेंच तुझ्यापाशीं माझं पदर पसरून मागणं आहे !

**रमा०**– ( मनाशीं ) म्हाळसाआई, सतीच्या कुंकवानं भरलेल्या या माझ्या मळवटानंच मला आपल्या पायांपाशीं घेऊन जा, हीच माझी तुला प्रार्थना आहे !

**गंगा०**– ( मनाशीं ) देवा, मी आज सतीचं वाण घेतलं आहे, तेव्हां माझ्या अंतकाळीं माझ्या हातून सवाष्णींना असंच वाण वांटलं जावो, हेंच माझं तुझ्या पायांजवळ मागणं आहे !

**रखमा०**– ( मनाशीं ) हे मोहनीराजा, सतीनं भरलेल्या या माझ्या सौभाग्य–ओटीनंच मला आपल्या पायांपाशीं ने ! याहून आणीक तुझ्याजवळ मला कांहीं मागायचं नाहीं !

**सावित्री०**– बायांनो, येतें बरं आतां मी ! मी तुह्मांला कधीं चुकून उणं उत्तर बोललें असलें, तर त्याची तुह्मी मला क्षमा करा नी मजवरच्या लोभांत अंतर पडूं देऊं नका ! ( लांब पाहिलेंसें दाखवून ) ताई, ते पाहा सद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराज नित्य-नेमाप्रमाणं गंगास्नान करून श्रीमोहनीराजांच्या दर्शनाकरितां इकडून जात आहेत ! तर तिथवर जाऊन मी आतां त्यांचं शेवटचं दर्शन घेतें ! ह्मणजे आदल्या जन्मीचं कांहीं पाप माझ्या गांठीं अजून शिल्लक राहिलं असलं, तर तें त्या सत्पुरुषांच्या दर्शनानं जळून जाईल ! नी मला स्वर्गाची वाट सुखानं चढतां येईल ! ( श्रीज्ञानेश्वरमहाराज हरिपाठ ह्मणत प्रवेश करतात. )

**ज्ञानेश्वर०**–

नित्यसत्यामित्यहरिपाठज्यासी ॥ कळिकाळत्यासीन पाहेदृष्टीं ॥ १ ॥ रामकृष्णउच्चारअनंतराशीतप ॥ पापाचे रेकळपपळतीपुढें ॥ २ ॥ हरिहरिहरीहामंत्रशिवाचा ॥ ह्मणतीजेवाचातयांमोक्ष ॥ ३ ॥ ज्ञानदेवह्मणेनारायण नाम ॥ पावीजेउत्तमनिजस्थान ॥ ४ ॥

**सावित्री०**–( पुढें होऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांस नमस्कार करते. ते तिला ' सौभाग्यवती भव ' असा आशीर्वाद देतात. ती पुन्हा नमस्कार करते, तेव्हां ते तिला ' पुत्रवती भव ' असा आशीर्वाद देतात. श्रीसद्गुरुमुखांतून निघालेले हे आशीर्वाद ऐकून ती गहिंवरून कंठ दाटून येऊन, सजलनेत्रांनीं खालीं पाहात उभी राहते. )

**ज्ञानेश्वर**– मातोश्री, साक्षात् अरुंधती, सावित्री, लोपामुद्रासतीसारखी दिसणारी तूं महापतिव्रता कोण आहेस ? आणि माझा आशीर्वाद ऐकून तूं सजल नेत्रांनीं खालीं पाहात कां उभी राहिलीस तें सांग बरें ?

**कृष्णंभट**– ( पुढें होऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांस नमस्कार घालून ) श्रीसद्गुरुनाथा, या बाईचें नांव सावित्रीबाई. ही सतीचें वाण घेऊन आपल्या पतीच्या प्रेताबरोबर सहगमन करण्याकरितां सिद्ध झाली आहे ! आणि आह्मी सर्व प्रवरा तीरापर्यंत हिची बोळवण करण्याकरितां येथें जमलों आहों ! हिचा पति पंचत्व पावून निजधामास गेला असतां सद्गुरू मुखांतून शुभ आशीर्वचनोक्ति निघालेली ऐकून, हिला गहिंवर येऊन, कंठ दाटून आल्यामुळें समर्थांपुढें ही सजल नेत्रांनीं दृष्टि खालीं करून उभी राहिली आहे !

**सोमेश्वर दीक्षित**– अहो श्रीसद्गुरुनाथा, आपण साक्षात् भगवान् आहां ! भूतमात्रांवर दया करणें समर्थांचें ब्रीद आहे ! आणि भक्तजनांचा उद्धार करण्याकरितांच समर्थांनीं अवतार घेतला आहे ! समर्थांनीं या निवासक्षेत्रीं वास्तव्य केल्या दिवसापासून आजपर्यंत श्रीसमर्थदर्शनास दूरदूरचे भावीकजन लोटांगणीं येत आहेत ! आणि त्या सर्वांना समर्थांनीं आपल्या कृपादृष्टीनें भवव्याधीपासून मुक्त केलें आहे ! जगद्गुरूंनीं अंधांस नेत्र दिले आहेत ! पांगळ्यांना पाय दिले आहेत ! थोट्यांना हात दिले आहेत ! मुक्यांना वाचा दिली आहे ! बधिरांना कर्ण दिले आहेत ! वंझेला पुत्र दिले आहेत ! रोग्यांना आरोग्य दिलें आहे ! अज्ञानांना ज्ञान दिलें आहे ! दरिद्र्यांना धन दिलें आहे ! ऐश्वर्यहीनांना ऐश्वर्य दिलें आहे !

अनेकांना वांच्छित वस्तु दिल्या आहेत! आणि दुर्बळांना बळ दिलें आहे! ह्मणून सद्गुरुचरणीं आह्मां सर्वत्रांची अनन्यभावानें हीच प्रार्थना आहे कीं, दीनदयाळ, भक्तवत्सल समर्थांनीं या बाईवर कृपेची पाखर घालून सद्गुरुमुखांतून निघालेल्या मंगल आशीर्वादाप्रमाणें या बाईचें सौभाग्य अखंड कायम राखावें।

**सावित्री०**–सद्गुरुमहाराज! श्रीह्माळसा अंबाबाईनें माझ्या स्वप्नांत येऊन माझी खणानारळांनीं ओटी भरली नी माझ्या कपाळीं कुंकू लावलं, तेव्हां ही शुभशकुनाची गांठ पदराला बांधून मी देवीआईवर विश्वास ठेवून (पतीच्या शवाकडे बोट दाखवून) यांना बरं वाटेल अशी बळकट आशा धरून बसलें होतें! श्रीमोहनीराजांनीं देखील स्वप्नांत येऊन, मुली, तुझं सौभाग्य उदंड राहील, तूं काळजी करूं नको, असं मला अभय दिलं! पण ज्यांच्यावर विश्वास धरून मी बसलें होतें त्यांनींच अखेर या दीन गाईचा गळा कापला! तेव्हां त्यांची कीर्ति घेऊन मी वैकुंठास आपल्या माहेराला जात आहें! तरी सद्गुरुंनीं आपला कृपाहस्त माझ्या मस्तकावर ठेवावा म्हणजे सद्गुरुकृपेनें मी माझ्या आईबापांच्या घरीं सुखरूप जाऊन पोहोंचेन! (श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे चरणांस मिठी मारते.)

**राधा०**– ( पुढें होऊन ) अहो सद्गुरुसमर्था, माझ्या माईचं या जन्मीं कधीं चुकून देखील पापमार्गीं पाऊल पडलं नाहीं! पण तिचं पूर्वकर्म पुढं येऊन उभं राहिलं नी त्यानं साधला हा असा दावा! मागल्या जन्मीं हिनं हरिकीर्तनाचा रंग मोडला. का कुणाचं घर बुडविलं, का धेनुवत्साची ताटातूट केली, का पंक्तिभेद केला, का संतांचा द्वेष केला, का देवाची पूजा लाथेनं झुगारली, का कुणाच्या तोंडचा घांस काढला, का कुणाला पाटावरून जेवतांना उठवलं, का कुणाच्या संसाराचा घातपात केला, का देवपूजा मध्येंच सोडली, का देवांऋषींना निंदलं, का कुळदेवतांची आराधना विसरली, तो देवानं त्याचा हिला या जन्मीं असा दंड केला! सद्गुरुनाथमहाराज, तुह्मी शरणागतांचे आधार आहां ह्मणून माझ्या माईनं अनन्यभावानं सद्गुरुचरण धरले आहेत, तरी सद्गुरूंनीं हिचा उद्धार करावा!

**ज्ञानेश्वर**–( सावित्रीबाईस ) मातोश्री ऊठ. हरिचरणीं चित्त जडलें असतां, भवभय समूळ नष्ट होतें आणि अंतीं चिन्मयपदाची जोड मिळते, असें भगवंतांनीं अर्जुनाला सांगितलें आहे ! संसारीक ज्याप्रमाणें रात्रंदिवस आपलें प्रापंचिक हित साधण्याकरितां झटतात, तशा प्रीतियुक्त अंतःकरणानें जर प्राणी हरिभजनीं रत होतील, तर त्यांना यमाचें बंधन कालत्रयींही होणार नाहीं ! अर्थप्राप्तीकरितां धनहीन लोक भाग्यवंतांची जशी स्तुति करितात, त्याप्रमाणें भक्तियुक्त अंतःकरणानें प्राणी आपलें चित्त हरिचरणीं ठेवतील, तर ते काळालाही दंड करतील ! असें प्रभूंचें सांगणें आहे. श्रीहरीवर भरंवसा ठेवून तूं पतिव्रताधर्मिं वागली आहेस, तेव्हां तो करुणासिंधु दीनवत्सल प्रभु, तुला कसा विसरेल ? ( अंगणांत येऊन ) जनहो, पंचत्व पावलेल्या हिच्या पतीचें नांव काय ?

**गोविंदपंत**– गुरुमहाराज, यांना सच्चिदानंदबाबा ह्मणतात.

**ज्ञानेश्वर**–( ओटीवर चढून सच्चिदानंदबाबांच्या प्रेताजवळ जाऊन ) काय ? सच्चिदानंद ! जनहो, सर्वोपाधिबाह्य जें सत्, चित्, आनंद, त्याला कधीं कोठें मृत्यु ऐकला आहे काय ? हा तर आनंदमय सत्य आत्मा असून तो अविनाशी आहे ! तुम्ही केवळ मायेनें भुलून त्याला मृत्यूची उपाधि लावीत अहां ! शस्त्रादिकांनीं छेद न पावणारा, जलप्रलयानें न बुडणारा, अग्नीनें न जळणारा, असा हा सच्चिदानंद नित्य, अचल, शाश्वत आणि सर्वत्र सर्व-व्यापक असून त्याच्या ठिकाणीं मृत्यु हीं अक्षरें कशीं संभवतील ? आणि अशा सच्चिदानंदाला मृत्यु आला अशी खोटीच कल्पना करून येऊन, तुम्ही आतां याला दोऱ्यांनीं बांधून स्मशानांत ने-णार काय ? आणि तेथें याला अग्नींत लोटून तुम्ही याची राखुंडी करणार काय ? जनहो, केवढा हा तुमचा वेडेपणा ! ( सच्चिदानंद-बाबांचे अंगावरून हात फिरवून ) अहो सच्चिदानंद ! निद्रेचा त्याग करून जागृति धरा ! उठा, आणि आह्मांला प्रेमालिंगन द्या ! ( सच्चिदानंदबाबा झोपेंतून जागे झाल्याप्रमाणें अंगाला अळोके-पिळोके देत उठून बसतात; व श्रीज्ञानेश्वरमहाराजांस पाहून त्यांचे

पाय घट्ट धरितात. हा अद्भुत चमत्कार पाहून सावित्रीबाई देहभान विसरून जाते. सर्व मंडळी श्रीज्ञानेश्वरमहाराजांपुढें लोटांगण घालतात.)

**सच्चिदानंद**- ( श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पायांवर लोळून ) अहो योगीश्रेष्ठा ! यमदूत माझ्या गळ्यांत पाश टाकून मला बांधून नेत होते ! परंतु सद्गुरूंना पाहून ते भिऊन पळाले ! आणि सद्गुरूंच्या कृपाकटाक्षानें माझा मृत्युपाश निमिषार्धांत तुटून गेला ! अहो समर्था ! मी अनंतजन्म अज्ञानरूपीं महासर्पानें ग्रासलों आहें ! आणि दुर्बुद्धीनें वागून पापराशींत बुडालों आहें ! यावेळीं मी सद्गुरुचरणीं अनन्यगति शरण रिघालों आहें, तरी अहो ज्ञानराया, या किंकराला जन्ममरणापासून मुक्त करून याचा उद्धार करावा !

**सावित्री०**- ( देहावर येऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे पायांवर डोकें ठेवून ) श्रीसद्गुरूंनीं काळाच्या तोंडांत मारून ( उठून सच्चिदानंदबाबांस मिठी मारून ) यांना परत घेऊन येऊन या आपल्या लेकीला आज चुडेदान दिलं ! त्यायोगानं मी धन्य झालें ! गुरुमहाराज, मी आपले किती उपकार मानूं ? मी आपल्याला काय देऊं ! आपली ही आनंदमूर्ति मी आपल्या हृदयांत कुठें सांठवूं ? नी सद्गुरुचरणांवर मी आपल्या आनंदाश्रूंनीं किती अभिषेक करूं ? श्रीसद्गुरूंचा महिमा मी आपल्या एका मुखानं कुठवर वर्णन करूं ? सद्गुरूंचा धन्यवाद मी कोणत्या शब्दांनीं गाऊं ? नी सद्गुरूंची मी कोणत्या उपायानं उतराई होऊं ? यावेळीं मी अत्यानंदानं अगदीं वेडी झालें आहें नी त्यामुळं मला कांहींच सुचेनासं झालं आहे !

**ज्ञानेश्वर**- मातोश्री, हें तुझ्याच कडक पातिव्रत्याचें फळ तुला श्रीविठ्ठलानें प्रसन्न होऊन दिलें आहे ! मी यःकश्चित् कोण ! आणि मी तें काय करणार ? श्रीपांडुरंगाचा वरदहस्त तुह्मां उभयतांवर आहे ! प्रभुकृपेनें तुम्ही सदैव अखंड सुखांत नांदाल आणि इहलोकीं धन्य होऊन अंतीं निरंतर ईशचरणीं वास कराल ! हा तुह्मांला माझा पूर्ण आशीर्वाद आहे !

**सच्चिदानंद०**- अहो जगद्गुरु ज्ञानदेवसमर्था, या दीनदासावर अनुग्रह करा ! आणि या मायिक संसारांतून मला मुक्त करून

माझा उद्धार करा ! ही सद्गुरुमूर्ति आज डोळे भरून पाहिल्यानें मी कृतार्थ झालों आहें ! तरी अहो कृपासागरा, तुमचें परम मंगलनाम या माझ्या हृदयफलकावर लिहून ही माझी अमंगल काया पुनीत करावी ! माझें मन सदा सद्गुरुचरणीं जडेल अशी सद्बुद्धि आपल्या सुबोधानें माझ्या अंतःकरणांत उत्पन्न करावी ! आणि अशा रितीनें आपल्या नांवानें मुद्रांकित झालेली ही माझी काया, आणि आपल्या सद्बोधानें शुद्ध झालेली ही माझी बुद्धि निरंतर सद्गुरुसेवेला लावून घ्यावी !

**ज्ञानेश्वर**– सच्चिदानंदबाबा, तुमची अशीच इच्छा आहे तर सांप्रत श्रीमद्भगवद्गीतेवर भावार्थदीपिका नांवाची टीका मी मऱ्हाठी भाषेंत लिहीत आहें; तो ग्रंथ तुह्मी मजजवळ बसून परोपकारार्थ प्रसिद्धीकरितां लिहावा. ह्मणजे भगवंतांच्या अनुग्रहानें तुह्मी साक्षात् ब्रह्मस्वरूप होऊन या भूतलावर चिरं-जीव व्हाल !

**सच्चिदानंद०**– सद्गुरूंची आज्ञा या दासाला प्रमाण आहे !

( सर्व मंडळी ताटांत पंचारती घेऊन ती श्रीज्ञानेश्वरमहाराजांस प्रदक्षिणापूर्वक ओवाळतात व खालील आरती म्हणतात. )

**आरती ज्ञानराया । केली सजीव काया । अगाध तव लीला । तारिं सद्गुरुराया ॥ १ ॥ पशुसी वेदवाणी । दिधली प्रतिष्ठानीं । पितरां श्राद्धदिनीं । आणिले स्वर्गाहूनी ॥ २ ॥ मोक्षाचें भांडागार । जाणती भक्तनर । अवतार श्रीविष्णु । नांव त्या ज्ञानेश्वर ॥ ३ ॥ हो उदित सद्वृत्ति । ईश्वरीं पूर्ण भक्ति । जडो अखंड चित्तीं । चरणीं ही विज्ञप्ति ॥ ४ ॥ अज्ञान अहंकार । हे नाशिती शरीर । अनंत जन्मकोटी । पुरे ही येरझार॥५॥ दुस्तर भवोदधी । जळचर ह्या व्याधी । तोडिती बहु आह्मां । सोडवी कृपानिधी ॥ ६ ॥ श्रमलों ज्ञानदेवा । तूं परब्रह्म ठेवा । सभाग्यें भेटलासी । धरुनी दृढभावा ॥ ७ ॥ तुझ्या चरणीं माथा । ठेविला गुरुनाथा । पाजुनी ज्ञानामृता । उद्धरी दीनानाथा ॥ ८ ॥**

( वरील आरती संपली ह्मणजे पडदा पडतो. )

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**–म्हाळसापूर अथवा निवास ( नेवासें ) क्षेत्र.

( श्री ज्ञानेश्वरमहाराजांची पुराण सांगण्याची जागा. या जागेंत मध्यभागीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांकरितां एक उच्चासन मांडलें आहे व या व्यासपीठाजवळ डावे बाजूस श्रीनिवृत्तिनाथाकरितां दुसरें उच्चासन मांडलें आहे, व्यासपीठाचे उजवे बाजूस एक दगडाचा खांब असून सच्चिदानंदबाबा त्या खांबाशेजारीं बसून त्यावर लिहिलेला ज्ञानेश्वरी ग्रंथ कागदावर उतरून घेत आहेत व व्यासपीठासमोर दोन्हीं बाजूंस स्त्रीपुरुषांकरितां बसावयास घातलें आहे, असा पडदा उघडतो. एका बाजूनें कांहीं पुरुष श्रीमद्भगवद्गीतेंतील श्लोक व ज्ञानेश्वरी ग्रंथांतील ओव्या ह्मणत प्रवेश करतात. दुसरे बाजूनें कांहीं बायकाही येतात व पुरुष व स्त्रिया पुराण ऐकण्याकरितां आपापल्या जागीं बसतात. इतक्यांत श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानेश्वरमहाराज, सोपानदेव व मुक्ताबाई प्रवेश करतात. श्रीनिवृत्तिनाथ आपल्या आसनावर बसल्यावर श्रीज्ञानेश्वरमहाराज त्यांस नमस्कार घालून व्यासपीठावर बसतात सोपानदेव व मुक्ताबाई हीं त्या उभयतांस वंदन करून श्रीनिवृत्तिनाथ व श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या मागें उभीं राहतात. सर्व मंडळी श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानेश्वरमहाराज, सोपानदेव व मुक्ताबाई या सर्वांस नमस्कार करून पुन्हा आपापले जागीं येऊन बसतात तेव्हां श्रीज्ञानेश्वरमहाराज पुराण सांगण्यास आरंभ करितात )

**ज्ञानेश्वर**–

**जन्माद्यस्य यतोऽन्वयादितरश्चार्थेष्वभिज्ञः स्वराट् तेने ब्रह्महृदाय आदिकवये मुह्यन्ति यत्सूरयः । तेजो वारि मृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गो मृषा धाम्ना स्वेन सदा निरस्त कुहकं सत्यं परं धीमहि ॥ १ ॥ योऽतः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्तां संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना । अन्यांश्च हस्तचरणश्रवणत्वगादी**

न्प्राणोन्नमो भगवते पुरुषाय तुभ्यम् ॥ २ ॥ ॐ नमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या । जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ १ ॥ नमो संसारतमसूर्या । अपरिमितपरमवीर्या । तरुणतरतूर्या । लालनलीला ॥ २ ॥ नमो जगदखिलपालना । मंगळमणिनिधाना । सज्जनवनचंदना । आराध्यलिंगा ॥ ३ ॥ जयजय देव निर्मळ ॥ निजजनाखिलमंगळ । जन्मजराजलदजाळ । प्रभंजन ॥ ४ ॥ जयजय देव प्रबळ । विदळितामंगळकुळ । निगमागमद्रुमफळ । फलप्रद ॥ ५ ॥ जयांचें केलिया स्मरण । होय सकळ विद्यांचें अधिकरण । तेचि वंदूं चरण । श्रीगुरूचे ॥ ६ ॥ जयांचेनि आठवें । शब्दसृष्टी आंगवे । सारस्वत आघवें । जिव्हेसि ये ॥ ७ ॥ वक्तृत्व गोडपणें । अमृतातें पारुष ह्मणे । रस होती वोळगणें । अक्षरांसी ॥ ८ ॥

बापहो, श्रीहरीचें अत्युद्भूत आणि अदृष्टपूर्व असें जें विश्वरूप त्या विश्वरूपाचें संजयाला स्मरण होऊन त्याला आनंद आवरेनासा झाला; आणि तो सद्गदित अंतःकरण होत्साता, मुखानें वारंवार श्रीकृष्ण श्रीकृष्ण असें ह्मणूं लागला. परंतु प्रभूंचें महत्व पुत्रप्रेमानें मोहित झालेल्या राजा धृतराष्ट्राला कोंठलें कळणार ! संजयाची ही स्थिति राजा धृतराष्ट्राला चमत्कारिक वाटली आणि तो ह्मणूं लागला कीं, हे संजया, ही तुझी तऱ्हा कोंठली ? तुला येथें श्रीव्यासांनीं कोणत्या उद्देशानें बसविलें आहे ? आणि तूं ही अप्रासंगिक भलतीच काय बडबड चालविली आहेस ? तर संजया, मला हें सांग कीं, कुरुक्षेत्रीं माझे आणि पंडूचे पुत्र यांच्यामध्यें जें युद्ध सुरू झालें आहे, त्यांत अखेर विजयश्री कोणाला माळ घालणार ? माझ्या दुर्योधनालाच विजय प्राप्त होणार असा माझा तर्क होत आहे; तर तुझें ज्योतिष कसें काय आहे तें मला कथन कर. असा प्रश्न काल राजा धृतराष्ट्रानें संजयाला केला. त्या प्रश्नाचें जें उत्तर संजयांनीं राजा धृतराष्ट्राला दिलें त्याचेंच महाराज मी आज निरूपण करणार आहें. महाराज,

अनंत जे वेद, त्या वेदांपासून सव्वा लक्ष भारत निर्माण झालें. सातशें श्लोकांची गीता या सव्वालक्ष भारताचें सर्वस्व होय. आणि संजयांचा पूर्णोद्धार हा जो आजचा शेवटचा श्लोक हा सातशें श्लोक गीतेचा इत्यर्थ होय. संजयांच्या या एका वचनाचाच आश्रय केला असतां सकल अज्ञान नष्ट होईल. परंतु संजयाच्या अशा या सर्वश्रेष्ठ वचनाचें आज अखेरचें निरूपण करण्यापूर्वीं, महाराज, भगवंतांनीं आपल्या प्राणप्रिय अशा अर्जुन भक्ताला सर्व गुह्यांतील अत्यंत श्रेष्ठ असें जें गुह्य सांगितलें आहे तें भगवंतांचें गुह्यवचन तात्पर्यार्थानें, महाराज, मी पुन्हा तुमचे कानांवर घालीत आहें; तर भगवंतांच्या या वचनाकडे तुह्मी सर्वांनीं अवधान द्यावें आणि भगवंतांचें हें वचन निरंतर ध्यानीं धरून तदनुरूप तुह्मी सर्वदा वर्तावें हेंच तुह्मांजवळ माझें पुन्हा पुन्हा मागणें आहे. कारण भगवंतांच्या या वचनाप्रमाणें तुह्मी वागलां असतां तुह्मी ज्ञानसंपन्न होत्साते अभंग आणि नित्य असें जें मोक्षपद त्या मोक्षपदाप्रत जाल. भगवंत ह्मणतात, अर्जुना, तुला माझें हेंच सांगणें आहे कीं,—

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।**
**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥**

देव म्हणतात, बा अर्जुना, तूं माझा फार लाडका, म्हणून सागतों- **तरि बाह्य आणि अंतरा । आपुलिया सर्व व्यापारा । मज व्यापकातें वीरा । विषय करीं ॥** कीं सर्व व्यापक जो मी, त्या मला तूं आपल्या सर्व व्यापारांचा विषय कर. ब्रह्मदेवापासून तों मुंगीपर्यंत माझ्यावांचून दुसरी गोष्टच नाहीं, असें निःशंक ज्ञानानें जाणून आणि माझी श्रीकृष्णमूर्ति चराचर भगवद्रूपच आहे असें अभेद दृष्टीनें ओळखून अव्यक्तोपासक चित्तानें माझी भक्ति कर.. **जो मजचि एकालागीं । कर्में वाहतसे आंगीं । जया मजवांचोनि जगीं । गोमटें नाहीं ॥ दृष्टादृष्ट सकळ । जयाचें मीचि केवळ । जेणें जिणयाचें फळ । मजचि नाम ठेविलें ॥** ज्याला जगामध्यें मजव्यतिरिक्त दुसरा पदार्थच नाहीं; ज्याचें शुभ अथवा अशुभ हें सारें

मीच; आणि जो आपल्या जन्माचें सार्थक काय तें एक मी भगवानच असें समजतो आणि अशा रितीनें ज्यांचे कायेचे, मनाचे आणि बुद्धीचे सर्व व्यापार ईश्वरार्पण झालेले आहेत, जे वाणीनें ईशगुणानुवाद वर्णन करितात, कानांनीं ईश्वरकीर्तन श्रवण करितात, नेत्रांनीं ईश्वराला पाहतात आणि मुखानें ईशनाम गातात, जे सदैव परमेश्वरप्राप्तीचा संकल्प मनांत बाळगितात, असे जे माझे भक्त ते अधमाहूनही अधम अशा पापयोनींत जरी जन्मलेले असले किंवा मूढ असले, तरी त्यांना मी माझें कलत्र समजतों; आणि त्यांना ह्या भवसागरांतून पैलपार नेऊन जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतून मुक्त करतों. **ह्मणोनि गा पांडवा । मूर्तीचा मेळावा । करूनि त्यांचिया गांवा । धांवत आलों ॥ नामाचेया सहस्त्रावरी । नावा इया अवधारीं । सजूनियां संसारीं । तारूं जाहलों ॥** आणि अर्जुना, अशा भक्तांकरितां मी सगुणरूप घेऊन त्यांच्या गांवाला धांवत आलों आहें; आणि माझ्या नामाच्या सहस्त्रावधि नावा करून त्यांना या संसारसागरांत तारू झालों आहें. म्हणून देव सांगतात, अर्जुना, माझी भक्ति कर आणि मद्याजी, माझें यजन कर; गंधपुष्पादिक द्रव्यांनीं माझी पूजा कर. मां नमस्कुरु आणि माझ्याठायीं नम्रबुद्धि धरून सर्वत्र मीच आहें, अशा भावनेनें मला नमस्कार कर. म्हणजे शेवटीं तूं मला पावशील; आणि इतकें सांगितल्यावर देव अखेर सांगतात, अर्जुना,

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि माशुचः ॥**

अर्जुना, स्वभावजनित जे धर्म आहेत ते यथाधिकार कर; पण कर्तृत्वादि भावना सोडून आणि या धर्मांनींच मोक्षप्राप्ति होणार आहे, हें अज्ञान टाकून सर्वाराध्य, सर्वकर्ता, अत्यंत देदीप्यमान अशा ज्ञानरूप दीपानें सकल प्राणीमात्रांच्या अंतःकरणांत प्रकाशित झालेला जो मी, त्या मला ज्ञानानें ओळखून शरण ये. बा अर्जुना, पुण्यकारक धर्माचरणानें स्वर्गादिक सुखें मिळतील, परंतु जन्ममृत्यु टळणार नाहीं. मोक्षप्राप्तीनेंच मात्र तो टळतो. आणि

अर्जुना, तें मोक्षपद मिळविण्याकरितां तुला अनन्यगति चित्तानें शरण आलें पाहिजे. आणि अशा रितीनें तूं मला शरण आलास, म्हणजे **मग ताकौनियां काढिलें । लोणी मागौतें ताकीं घातलें । परि न घेपेचि कांहीं केलें । तेणें जेविं ॥** मग ताक घुसळून काढलेलें लोणी, फिरून ताकांत घातलें, तर तें कांहीं केलें तरी जसें घेत नाहीं, त्याप्रमाणें तूं मला अद्वयपणानें शरण आलास. म्हणजे तुला धर्माधर्माची कांहीं एक गरज राहणार नाहीं. अर्जुना, तूं शोक करूं नकोस. अनन्यभावानें मला शरण ये ह्मणजे तूं मद्रूपच होऊन जाशील. महाराज, याप्रमाणें भक्तियुक्त अंतःकरणानें भगवंताला शरण गेल्यानेंच मोक्षपद प्राप्त होणारें आहे, असें भगवंतांनीं अर्जुनाला सांगितलें आहे. आणि बापहो, संजयांनीं राजा धृतराष्ट्राला आपल्या उत्तरांत पर्यायानें तेंच सांगितलें आहे. संजय म्हणतात, राजा धृतराष्ट्रा, या युद्धांत अखेर जय कोणाला होईल म्हणून तुम्हीं मला पुन्हा विचारतां, तर —

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥**

राजा, मला दुसऱ्या तिसऱ्याचें कांहीं माहीत नाहीं, **परि आयुष्य तेथें जिणें । हें फुडें कीं गा ॥** पण आयुष्य असेल तेथें जीव असावयाचा ही गोष्ट उघड आहे. **हें असो तेथ प्रकाश । सूर्य जेथें ॥ तैसे सकळ पुरुषार्थ । जेणें स्वामी कां सनाथ । तो श्रीकृष्ण रावो जेथ । तेथ लक्ष्मी ॥** महाराज, जेथें सूर्य आहे तेथें प्रकाश असावयाचाच; त्याप्रमाणें सकल पुरुषार्थानें शोभणारा प्रभु श्रीकृष्ण, जेथें स्वतः विद्यमान आहे, तेथें, म्हणजे अशा रितीनें नरनारायणांनीं अधिष्ठिलेल्या धर्मराजाचे पक्षाचे ठिकाणीं, शत्रुपराजयानें राजलक्ष्मी प्राप्त होणारी आहे. **कृष्ण विजयस्वरूप निजांगें । तो राहिला असे जेणें भागें ॥ तैं जय लागवेगें । तेथेंचि आहे ॥** राजा, स्वयमेव विजयस्वरूप श्रीकृष्ण ज्या युधिष्ठिर पक्षाकडे स्वतः उभा राहिलेला आहे, त्या पक्षाकडे उत्कर्षरूप विजय उत्तरोत्तर वृद्धिंगत पावणारा आहे, हें

उघड आहे. भूतिः, संपद्विस्तारही तेथेंच होणारा आहे. राजा, अर्जुन हा विजय नांवानें प्रख्यात आहे, आणि श्रीकृष्णनाथ तर विजयस्वरूपच आहेत; तेव्हां लक्ष्मीसहवर्तमान विजय तेथेंच असणार हें खचीत संजय म्हणतात श्रीव्यासांच्या खरेपणावर जर तुमचा विश्वास असेल तर महाराज, हें माझें भाषण अढळच आहे हें पक्कें समजा. **जेथ तो श्रीवल्लभ। तेथ भक्तकदंब। तेथ सुख आणि लाभ। मंगळाचा॥** महाराज, जेथें तो लक्ष्मीपति भगवान् आहे, तेथें भक्तांचा समुदाय आणि तेथेंच सुखाचा आणि कल्याणाचा लाभ प्राप्त होणार आहे. संजयांनीं धृतराष्ट्राला याप्रमाणें सांगितल्यावर ते शेवटीं म्हणाले, **या बोला आन होये। तरि व्यासाचा अंक न वाहें॥** माझ्या या भाषणांत अंतर पडेल तर मी श्रीव्यासांचा शिष्यच होणार नाहीं, असें मोठ्यानें बोलून संजयांनीं आवेशानें हात उचलला. बापहो, अशा रितीनें संजयांनीं या एका उत्तरानें राजा धृतराष्ट्राच्या हातांत सकल भारतसार दिलें. संजयांच्या या वचनाचा अर्थ असा कीं, राजा धृतराष्ट्रा, तुझे पुत्र दुष्ट आहेत, दुराचारी आहेत, आणि ते जोंपर्यंत भगवंताला शरण गेले नाहींत, तोंपर्यंत त्यांना लक्ष्मी, जय, इत्यादि मिळणार नाहींत. यासाठीं राजा, भगवंताला शरण जाऊनच आपलें हित करून घेतलें पाहिजे. परंतु संजयांनीं हें पर्यायानें सांगितलेलें धृतराष्ट्राला कसें कळणार? असो. महाराज, **गीता जाणा हे वाङ्मयी। श्रीमूर्ति प्रभूची॥** गीताशास्त्र हें सारें परब्रह्मस्वरूपच आहे. कलिकालरूपीं ज्वरानें पीडित झालेल्या जनांकरितां श्रीत्र्यंबकांनीं जसा गंगेचा प्रवाह निर्माण केला, तैसें **गीतिचें हें दुभतें। वत्स करूनि पार्थातें। दुभीनली जगापुरतें। श्रीकृष्णगाय॥** श्रीकृष्ण भगवान् हेच कोणी एक गाय, ह्यांनीं अर्जुनाला वासरूं करून सर्व जगाला पुरेल असें हें गीतारूपीं दूधच दिलें आहे. बापहो, जर हें पोटांत घ्याल, तर तुम्ही ईश्वरस्वरूप व्हाल. गीतापाठाची वाटी जरी तोंडाला लावाल तरी तुमच्या आंगाला ब्रह्मतेची पुष्टि येईल.

इतकेंच नाहीं तर ही गीता नुसती कानांनीं ऐकाल तरी सुद्धां मोक्ष-पदाप्रत जाल. महाराज, आणि कृष्णार्जुनीं मोकळी । गोठी चावळेली जे निराळीं । ते श्रीव्यासें केली करतळीं । घेवों ये ऐसी ॥ भगवान् श्रीकृष्ण आणि अर्जुन ह्यांनीं जें हें भाषण अधांतरीं केलें होतें, तें श्रीव्यासांनीं करतळीं घेतां येईल असें करून ठेविलें, हा श्रीव्यासांचा जगतावर मोठाच उपकार झाला. श्रीव्यासांचा माग घेत घेत, भाष्यकारांना वाट विचारीत, मी हें मऱ्हाठी भाषेंत केलेलें गीतार्थ ओवीबद्ध काव्य, हें श्रीनिवृत्तिनाथांच्या रूपेंचें वैभव आहे. श्रीशंकरापासून मत्स्येंद्रनाथांस, मत्स्येंद्रनाथांपासून गोरक्षनाथांस, गोरक्षनाथांपासून गैनीनाथांस आणि गैनीनाथांपासून श्रीनिवृत्तिनाथांस गुरुपरंपरेनें प्राप्त झालेलें हें समाधिरूप धन ग्रंथरूपानें बांधून श्रीनिवृत्तिनाथांनींच माझ्या हातीं दिलेलें आहे, आणि ग्रंथ पुढें करून या काव्याच्या निमित्तानें जगाचें संरक्षण केलें आहे. तर महाराज, परस्वाधीनपणानें, आचार्य या नात्यानें जें मी उणें पुरें बोललों असेन, त्याची मला आपण जननीच्या नात्यानें क्षमा करावी. शब्द कसा योजावा, अर्थ कसा साधावा, अलंकार म्हणजे काय, हें मला माहीत नाहीं. माझ्या श्रीनिवृत्तिनाथ-गुरूंनीं जसें मला दाखवून दिलें तसतसें मी बोलत गेलों. माझ्या श्रीनिवृत्तिनाथसद्गुरूंनीं मला तुम्हांसारख्या संतांची जोड मिळवून दिली तिच्या योगानें माझ्या सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या. महाराज, तुह्मांसारखे मायबाप मला मिळाले म्हणून हा माझा ग्रंथाचा हट्ट तुमच्याच अनुकूलतेनें शेवटास गेला. महाराज, हा ग्रंथसागर येव्हडा । उतरोनि पैलीकडा । कीर्तिविजयाचा धेंडा । नाचें जें कां ॥ हा येवढा ग्रंथसागर उतरून पैलतीरावर कीर्तिविजयाचा झेंडा मीं फडकाविला हा, महाराज, तुमचाच प्रसाद होय. काय बहु बोलों सकळां । मेळविलों जन्मफळा । ग्रंथसिद्धीचा सोहळा ॥ दाविला जो हा ॥ फार काय सांगूं ! ग्रंथसमाप्तीचा जो हा सोहळा तुह्मीं मला आज दाखविला त्या योगानें माझ्या जन्माची सफलता झाली ! तुमचें जें हें मीं धर्मकीर्तन

केलें तें तुमचें तुह्मींच सिद्धीस नेलें, यांत माझा सेवकपणा मात्र उरला. आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥ दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो । जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूतळीं । भेटो तयां भूतां ॥ चलां कल्पतरूचे अरव । चेतनां चिंतामणीचे गांव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांहीं सदा सज्जन । सोयरे होतु ॥ किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुषीं । अखंडित ॥ आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इये । दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ॥ तरी आतां मीं जो हा वाग्यज्ञ केला त्याच्या योगानें विश्वात्मक देवानें संतुष्ट होऊन मला एवढा प्रसाद द्यावा कीं, दुष्ट लोकांची वाईट बुद्धि जाऊन, त्यांची सत्कर्मीं प्रवृत्ति वाढो. प्राणीमात्रांमध्यें सर्वत्र परस्परांचा स्नेह जमो. पापरूपी अंधकार नष्ट होऊन, स्वधर्मरूप सूर्याचा उदय होवो. आणि जो जो प्राणी जी जी वांच्छा धरील ती ती त्याची वांच्छा परिपूर्ण होवो. आणि सदासर्वकाळ जगाचें कल्याण इच्छिणाऱ्या अशा भगवद्भक्तांचे समुदाय प्राणिमात्रांस निरंतर भेटोत. आणि कोट्यवधि चालते बोलते कल्पतरुच सजीव, चिंतामणींचे गांवच, अमृताचे चालते बोलते समुद्रच, जे कलंकरहित चंद्र, जे तापरहित सूर्य, असे जे संतजन ते सदासर्वकाळ सर्वांचे सोयरे होवोत. किंबहुना तिन्ही लोक सर्वसुखीं पूर्ण होऊन आदिपुरुष जो परमेश्वर त्याच्या भजनीं अखंड लागोत. आणखी महाराज, या लोकीं हा ग्रंथ जो कोणी विशेष आदरानें बाळगील, तो इहपरलोकीं विजयी होवो !

**निवृत्तिनाथ.**— (श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे मस्तकावर हात ठेवून) ज्ञानराजा, हा प्रसाद होईल !

ज्ञानेश्वर–
भवे भवे यथा भक्तिः पादयोस्तव जायते । तथा कुरुष्व देवेश नाथस्त्वं मे यतः प्रभो ॥ १ ॥ नमो ब्रह्मण्यदेवाय गोब्राह्मणहितायच । जगद्धिताय कृष्णाय गोविंदाय नमोनमः ॥ २ ॥ कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुध्यात्मना वानुसृत स्वभावात् । करोमि यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयामि ॥ ३ ॥ पुंडलीकवरदे हरिविठ्ठल, पार्वतीपते हरहर महादेव, सीताकांतस्मरण जयजयराम. जयजय श्रीनिवृत्तिनाथ महाराज.

( सर्व श्रोते ज्ञानेश्वरीग्रंथाचें पूजन करून पोथीपुढें दक्षिणा ठेवितात व नंतर श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें पूजन करून त्यांचे गळ्यांत पुष्पमाळा घालून, त्यांच्यापुढें देकार ठेवितात, व शेवटीं ‘ जयजय श्रीज्ञानेश्वरमहाराज ’ असें ह्मणतात. व ते असा जयजयकार करीत असतां पडदा पडतो. )

# अंक ३ रा.

## प्रवेश पहिला.

स्थळः—पुणतांबें क्षेत्र.

( ज्यांनीं आपल्या मस्तकावर जटाकलापाचा भार धरिला आहे, ज्यांनीं आपल्या कपाळावर लालभडक शेंदराचे पट्टे ओढले आहेत, ज्यांनीं गळ्यांत रुद्राक्षाच्या माळा घातल्या आहेत, ज्यांनीं आपल्या बाहूंना व दंडांला रुद्राक्ष बांधून बाहुरुद्राक्षांत मोराचीं पिसें खोविलीं आहेत, ज्यांनीं मूल्यवान् पितांबरानें अपली कमर खेंचली आहे, ज्यांनीं आंगावर व्याघ्रांबर घेतलें आहे, ज्यांचे नेत्र इंगळाप्रमाणें आरक्त दिसत आहेत, ज्यांच्याजवळ पायांतील खडावा व हातांतील त्रिशूल आणि भिक्षापात्र पडलें आहे, असे महासिद्ध चांगदेव ध्यानस्थ बसले आहेत व त्यांचे शिष्यही त्यांच्याच शेजारीं अनेक योगासनें मांडून समाधिस्थ झाले आहेत व सिद्धांच्या आसमंतात अनेक मृतजीव पडले आहेत व शवांच्या रक्षणार्थ ठेविलेला रक्षक तीं शवें व्यवस्थितरणें झांकून टाकीत आहे असा पडदा उघडतो.)

( इतक्यांत मुक्ताबाई व श्रीज्ञानेश्वरमहाराज प्रवेश करितात. )

मुक्ता०—

आधींतूंमुक्तचिहोतासिरेप्राणीया ॥ परिवासनेंपापिणियानाडिलासी ॥ आधींचेंआठवीमगघेईपरी ॥ हरिनामजिव्हारींमंत्रसार ॥ १ ॥ आदिमध्यहरिऊर्ध्वपैं वैकुंठ ॥ जाईलवासनाहरिहोईलप्रगट ॥ धृ० ॥ एक तत्वधरीहरिनामगोड ॥ येरतेंकाबाडविषयओढी ॥ नामतेंसांडीवासनापापिणी ॥ एकनारायणींचाडधरी ॥ २ ॥ मुक्ताईमुक्तलगसांडिलीवासना ॥ मुक्तामुक्ती राणाहरिपाठें ॥ नामाचेनिघोटेंजळतीपापराशी ॥ नयेतीगर्भवासींअरेजना ॥ ३ ॥

**ज्ञानेश्वर**– श्रीसद्गुरु निवृत्तिनाथ आणि सोपानबाळ महिषाला घेऊन बरेच लांब गेलेले दिसतात! मुक्ताबाई, निवासक्षेत्र सोडून निघाल्या दिवसापासून आजच्यासारखा प्रवासाचा शीण तुला कधींच झाला नव्हता; त्यामुळें आज तूं फार गळून गेलेली दिसतेस! तर बाळे, आपण येथें घटकाभर बसून विश्रांति घेऊं आणि मग पुढच्या मार्गास लागूं!

**मुक्ता०**– दादा ज्ञानराया, प्रापंचिकजनांची जेथें उपाधि नाहीं, अशा या प्रशांत मार्गानें, श्रीहरीच्या नामस्मरणाचा पाठ सप्रेम अंतःकरणानें माझ्या मुखांतून एकसारखा निघत असल्यामुळें माझ्या श्रमाचा परिहार क्षणोक्षणीं होत आहे!

**ज्ञानेश्वर**– मुक्ताबाई, इकडे पाहिलेंस का? प्रवृत्तिमार्गांत ज्यांच्यासारखा चतुर पंडित या सर्व जगतांत दुसरा एकही नाहीं, ज्यांनीं सकल विद्यांचें आणि सकल कलांचें ज्ञान संपादन केलें आहे-ज्यांच्या पायांपाशीं सर्व सिद्धि सदैव राबत आहेत, भक्तजनांना जे केवळ कल्पतरुच, असे हे सकलवंद्य, परमसुंदर, अत्यंत तेजः, पुंज, विद्यासागर, योगीश्रेष्ठ चांगदेव समाधिसौख्यांत निमग्न झाले आहेत; आणि त्यांच्याच शेजारीं त्यांचा हा शिष्यवर्ग नानाप्रकारचीं योगासनें धारण करून ध्यानस्थ बसला आहे! अहाहा! मुक्ताबाई, खरोखर आज आपलें थोर भाग्य उदयास आल्यामुळें आपल्याला या सिद्धश्रेष्ठांचें दर्शन झालें! सांप्रत हे श्रेष्ठ समाधि लावून बसले असल्यामुळें जरी त्यांचा आशीर्वादप्रसाद आपल्याला यावेळीं मिळण्यासारखा नाहीं, तरी आपण तेथवर जाऊन या समाधिस्थ सिद्धांस प्रणाम करून मग पुढच्या मार्गास लागूं!

( मुक्ताबाई व श्रीज्ञानेश्वरमहाराज चांगदेवसिद्धांजवळ जाऊन त्यांस नमस्कार करितात. )

**मुक्ता०**– ज्ञानराजा, मला तर हे सिद्ध साक्षात् कैलासरमण या भूलोकीं उतरले आहेत, असें वाटतें!

**ज्ञानेश्वर**– मुक्ताबाई, यांच्या योगसिद्धीचें असेंच अद्भुत सामर्थ्य आहे!

**मुक्ता०**– दादा ज्ञानदेवा, या सिद्धांच्या आसमंतात् हीं मृतजीवांचीं असंख्यात प्रेतें कां बरें पडलीं आहेत?

**ज्ञानेश्वर**– मुक्ताबाई, तो पलीकडे प्रेतरक्षक उभा आहे, त्यालाच हें आपण विचारूं, म्हणजे तोच आपल्याला याचें उत्तर देईल!

**मुक्ता०**– (प्रेतरक्षकाजवळ जाऊन) बाबा, हे सिद्ध कोण आहेत? हीं एथें कोणाचीं प्रेतें पडलीं आहेत? या प्रेतांना दुर्गंधी येऊं लागली आहे तरी तुम्हीं यांना अद्यापि अग्नि कां दिला नाहीं? तुम्ही कोण? आणि एथें कां उभे आहां? हें कृपा करून आम्हांला सांगा बरें?

**प्रेतरक्षक**– मुली, नानामंत्रांचें अधिष्ठान करून अनेक दैवतें ज्यांनीं प्रसन्न करून घेतलीं आहेत, असे हे अष्टांगयोगसंपन्न महासिद्ध चांगदेवमहाराज असून, त्यांच्या सभोंवतीं हा त्यांचा शिष्यवर्ग आहे! या कलियुगांत आयुर्मर्यादा शतवर्षांचीच असल्यामुळें ज्या ज्या वेळीं या सिद्धांचा मृत्युकाल समीप येतो, त्या त्या वेळीं हे सिद्ध समाधि लावून बसून काळाची वंचना करितात! आणि अशा रितीनें हे सिद्ध आज चौदाशें वर्षें वांचले आहेत! यांच्या योगसिद्धीचें असें अलौकिक सामर्थ्य आहे कीं, ज्यावेळेस हे सिद्ध समाधीचें विसर्जन करितात, त्यावेळेस 'कोणी आहे काय?' असा प्रश्न हे विचारतात. तेव्हां त्यांच्याजवळ जितके मृतजीव पडले असतील तितके सर्व "आम्ही आहों!" असें म्हणत जिवंत होतात! सिद्धांच्या या अलौकिक सामर्थ्याची कीर्ति दिगंत पसरली असल्यामुळें, हे सिद्ध ज्या ठिकाणीं समाधि लावून बसले असतील, त्या ठिकाणीं दूरदूरच्या प्रांतांत राहणारे लोक, आपल्या मृत आप्तांचीं प्रेतें आणून टाकितात! हीं जीं प्रेतें तुला एथें दिसत आहेत तीं सर्व दूरदूरच्या प्रांतांतील लोकांनीं येथें आणून टाकिलीं असून, हे सिद्ध समाधींतून उठेपर्यंत या प्रेतांचें संरक्षण करण्याकरितां त्यांनीं मला एथें बसविलें आहे!

**मुक्ता०**– तर मग कायहो बाबा, हे सिद्ध समाधि विसर्जन करीपर्यंत हीं प्रेतें अशींच पडून राहणार आं! आणि मग सिद्धां-

च्या अनुग्रहानें हीं जीवंत होणार! दादा ज्ञानराया, या मृतजीवांची ही दशा पाहून माझें अंतःकरण कळवळत आहे! पण अंगीं सामर्थ्य असल्यावांचून नुसतें कळवळणें काय उपयोगाचें?

**ज्ञानेश्वर**– मुक्ताबाई, या सिद्धांनीं नानाविध मंत्रांचें अध्ययन करून आणि देहास अनंत कष्ट देऊन हें अलौकिक सामर्थ्य संपादन करून घेतलें आहे! आणि मजसारखा सिद्धश्रेष्ठ या त्रिभुवनांतही कोणी नाहीं, असा अहंकार हे सिद्ध चित्तांत सदैव बाळगीत आहेत! परंतु माझ्या पांडुरंगाच्या नामाचा असा अद्भुत महिमा आहे कीं, जीवांनीं श्रीपांडुरंगाचें नांव सप्रेम भक्तीनें उच्चारिलें असतां, सायासावांचून विश्वांतील सकल सिद्धींचें सामर्थ्य त्यांच्या आंगीं येतें! यासाठीं हे जीव आतांच जिवंत व्हावे अशी तुझी इच्छा असेल तर श्रीपांडुरंगाचें ध्यान हृदयीं आणून मुखानें श्रीविठ्ठलनामाचा गजर कर; म्हणजे श्रीरुक्मिणीवराच्या कृपेनें तुझे हेतु पूर्ण होतील! आणि त्याबरोबरच सर्व साधनांपेक्षां हरिनाम हें दिव्य साधन संतांच्या हातीं श्रीपांडुरंगानें दिलें आहे! या गोष्टीचा साक्षात्कार ह्या सिद्धांस पटून यांचें चित्त श्रीपांडुरंगचरणीं जडेल!

( मुक्ताबाई विठ्ठलनामाचा गजर करूं लागते. अमळशानें सर्व प्रेतांत जीव उत्पन्न होऊन त्यांची हालचाल सुरू होते. इतक्यांत श्रीज्ञानेश्वरमहाराज व मुक्ताबाई तेथून निघून जाऊन अदृश्य होतात. पुनर्जीवन झालेलीं माणसें झोंपेंतून जागीं झाल्याप्रमाणें उठून बसतात; व कांहीं वेळ इकडे तिकडे साश्चर्य मुद्रेनें अवलोकन करून प्रेतरक्षकाजवळ येतात. )

**एक गृहस्थ**– अहो बाबा, ज्या सद्गुरूंनीं आह्मांला या काळझोंपेंतून उठवून जिवंत केलें ते सद्गुरु कोठें आहेत?

**प्रेतरक्षक**– बाबा, ते इतक्यांत मी पाहतां पाहतां अदृश्य झाले!

**एक बाई**– तर मग ज्या सद्गुरूंनीं आम्हांला पुनर्जीवन दिलें या प्रभूंचें दर्शन आम्हांला या वेळींही होत नाहीं आं! तेव्हां किती हो आम्ही घोर पातकी आहों! अहो बाबा, ते कोणीकडच्या

दिशेनें गेले तें तरी सांगा, ह्मणजे त्या दिशेनें जाऊन आम्ही त्यांचा शोध करूं !

**प्रेतरक्षक**– जेथपर्यंत ते मला दिसत होते तेथपर्यंत मी तुह्मांला घेऊन जातों ! चला माझ्याबरोबर. सद्गुरुचरणांचें दर्शन घडण्याइतकें थोर पुण्य जर तुमच्या गांठीं असेल तर तें तुह्मांला अजूनही घडेल ! चला, या माझ्यामागें. ( सर्व निघून जातात. अमळशानें ध्यानस्थ चांगदेव समाधि विसर्जन करितात. )

**चांगदेव**– ( झांकलेल्या नेत्रांनींच ) कोणी आहे काय ? ( या प्रश्नास उत्तर न मिळाल्यामुळें ) काय ? कोणींच उत्तर देत नाहीं ? तर यावरून या वेळीं यमराजाला गाढ निद्रा लागल्यामुळें विश्व-संहाराचें काम तूर्त बंद पडलें आहे असें दिसतें ! ( इतक्यांत सर्व शिष्य समाधीचा त्याग करून चांगदेवसिद्धांपुढें हात जोडून उभे राहतात. चांगदेवसिद्ध नेत्र उघडून त्यांपैकीं एकाकडे पाहून ) बेटा, यमलोकींचे दरवाजे बंद करून यमराजानें या वेळीं गाढ निद्रेचा अंगीकार केला, हें एक बरेंच झालें ह्मणावयाचें !

**पहिला शिष्य**– स्वामीमहाराज, यमराजाला विश्रांति हा शब्द कोठून माहीत असणार ?

**चांगदेव**– बेटा, समाधि विसर्जन करतांच, मीं नेहमीं-च्या परिपाठाप्रमाणें ' कोणी आहे काय ? ' असा प्रश्न विचारिला असतां, ओ देणारा एकही प्राणी आज मला येथें आढळला नाहीं ! म्हणून माझ्या मनांत अशी शंका उत्पन्न झाली.

**पहिला शिष्य**– स्वामीमहाराज, स्वामींनीं अनुज्ञा केल्याप्र-माणें स्वामींच्या समाधिकाळीं मी मौनव्रत धारण करून, नेत्र आणि कान उघडे ठेवून, स्वामीदेहाचें संरक्षण करीत होतों. तेव्हां या माझ्या नेत्रांनीं मीं आज एक अलौकिक चमत्कार अवलोकन केला ! तो साद्यंत वृत्तांत स्वामींची आज्ञा होईल तर स्वामींच्या चरणीं निवेदन करतों !

**चांगदेव**– बेटा, असा आश्चर्य वाटण्यासारखा कोणता चम-त्कार तूं पाहिलास तो सांग पाहूं ?

**पहिला शिष्य**– गुरुजी, आपण समाधिस्थ झाल्यावर, आपल्या समाधीची वार्ता चोहोंदेशीं अबालवृद्धांच्या कानीं गेली. तेव्हां नेहमींच्या परिपाठाप्रमाणें लांबलांबच्या देशांत राहणारे हजारों लोक आपले मृतसंबंधी खांद्यावर टाकून येथें आले आणि मृतांस प्रेतरक्षकाच्या स्वाधीन करून आपापले देशीं निघून गेले! कांहीं काळ लोटल्यावर एक पंधरा वर्षांचा लहान बालक आणि दहा वर्षांची एक लहान मुलगी मुखानें हरिनाम गात या वाटेनें जाऊं लागलीं. गुरुजी, त्या उभयतांची अंगकांति अत्यंत तेजःपुंज असून त्यांच्या मुखांवर विलक्षण तेज झळकत होतें! मला तर त्यांना पाहून ते साक्षात् देवच या भूलोकीं मानवदेह धारण करून उतरले आहेत असें वाटलें! वाटेनें जातां जातां त्यांची दृष्टि स्वामींच्याकडे गेली. तेव्हां त्या उभयतांनीं स्वामींच्यापुढें येऊन सप्रेम चित्तानें स्वामींस नमस्कार घातला! आणि मग प्रेतरक्षकास स्वामींबद्दल आणि येथें पडलेल्या मृत-जीवांबद्दल सर्व हकिकत विचारली. तेव्हां प्रेतरक्षकानें स्वामी-महाराजांबद्दल आणि त्या प्रेतांबद्दल सर्व वर्तमान त्यांस श्रुत केलें. तो वृत्तांत ऐकून त्या कुमारीचें हृदय करुणेनें आर्द्र झालें, आणि तिनें सजल नेत्रांनीं तिच्याबरोबर असलेल्या त्या बाल-तपोनिधीस त्या मृतजीवांस तत्काळ सजीव करण्याबद्दलची आपली इच्छा प्रकट केली. त्या वेळीं त्या बालप्रभूनें विठ्ठलनामाचा गजर तीस करावयास सांगितला. तेव्हां काय चमत्कार सांगावा? विठ्ठलाचें नाम ती कुमारिका सप्रेमभक्तीनें घेत असतां, इकडे सर्व प्रेतांत चलनवलनादि व्यापार सुरू झाले! आणि कांहीं वेळानें ते सर्व जीव झोंपेंतून जागे झाल्याप्रमाणें उठून, आपलें पुनर्जीवन करणाऱ्या प्रभूंच्या दर्शनासाठीं आतुर होऊन इकडे तिकडे अवलोकन करूं लागले! इतक्यांत इकडे या ईशमूर्ति अदृश्य होऊन दिसेनाशा झाल्या! तेव्हां ज्या दिशेनें त्या ईशमूर्ति अदृश्य झाल्याचा भास झाला त्या दिशेकडे ते सर्व जीव प्रेतरक्षकासह निघून गेले! गुरुमहाराज, मीं आजपर्यंत पुष्कळ योगी पाहिले; अनेक तपस्वी पाहिले; आणि अनेक संतही पाहिले; परंतु विठ्ठल-

नामाचा गजर करून मृतजीवांस जिवंत करणारे असे संतमहात्मे माझ्या अवलोकनांत आजपर्यंत कधींही आले नव्हते !

**चांगदेव**– बेटा, खरोखरच आश्चर्य वाटण्यासारखेंच हें अद्भुत सामर्थ्य ! तूं सांगतोस या हकिकतीवरून ते कोणी तरी पूर्णज्ञानी महावैष्णवसंत ब्रह्मवेत्ते जगदुद्धार करण्याकरितां साक्षात् परमेश्वर मानवदेहानें या भूतलावर अवतरले असावेत असें मला वाटतें ! ती पूर्णज्ञानी कुमारिका कोण होती, आणि तो बाल योगीश्रेष्ठ कोण होता, तीं उभयतां येथें कोठून आलीं, आणि तीं येथून कोणीकडे गेली; त्यांचीं नांवें काय आणि तीं कोठलीं राहणारीं ह्याविषयीं तुला कांहीं समजलें काय ?

**पहिला शिष्य**– गुरुजी, तीं कोण होतीं, कोठलीं राहणारीं, त्यांचीं नांवें काय, तीं कोठून आलीं, आणि कोणीकडे गेलीं, हें मला कांहींच समजलें नाहीं !

**चांगदेव**– बेटा, आम्ही आतां ध्यानस्थ होऊन, तीं कोण होतीं हें पाहून येतों ! तोंपर्यंत शिष्यहो, तुम्ही क्षणैक स्वस्थ असा ! ( ध्यानस्थ होऊन व अमळशानें ध्यान विसर्जन करून ) अहाहा ! शिष्यहो, प्रतिष्ठानक्षेत्रीं ज्यांनीं महिषमुखानें वेद बोलविले, ज्यांनीं स्वर्गींचे पितर श्राद्धतिथीला भूलोकीं आणिले आणि ज्यांनीं निवास क्षेत्रीं सच्चिदानंदबाबाला जिवंत केलें म्हणून प्रतिष्ठान क्षेत्रांतील ब्राह्मण आपल्याला सांगून गेला, आणि ज्या गोष्टींच्या सत्यतेची खातरी करून घेण्याकरितां आपण प्रतिष्ठान क्षेत्रीं मुद्दाम शिष्य पाठविला आहे, ते साक्षात् भगवान् श्रीविष्णु, श्रीज्ञानेश्वरमहाराज, आणि त्यांची बहीण आदिमाया, मुक्ताबाई, यांनींच ही अगाध करणी केली आहे ! शिष्यहो, ऐका. या वेळीं मला माझ्या पूर्वजन्माची आठवण झाली आहे ! मी पूर्वी इंद्राचा मरुद्गण होतों. एके दिवशीं माझ्या हातून स्वामीसेवेंत अंतर पडलें. तेव्हां स्वामी क्रोधयुक्त होऊन, मरुद्गणा, तूं अत्यंत उन्मत्त झाला आहेस, स्वामीसेवेंत तूं तत्पर नाहींस, तरी तूं स्वर्गांतून मृत्युलोकीं पतन पावून, मानवदेहानें प्रकट होशील, असा त्यांनीं मला शाप दिला ! तेव्हां सकल देवतांत आपण श्रेष्ठ मुकुटमणी

आहां, आपल्या आज्ञेनें पर्जन्यधारा वर्षून वसुंधरा सुखी होते, आपल्या संकटास्तव श्रीविष्णूंनीं वामनरूप धारण करून बळीला पाताळीं नेऊन पोहोंचविला, आणि आपलें पद राखिलें, तरी आतां मज दीनावर कृपा करून मला उश्शाप द्यावा म्हणजे त्यानें माझा उद्धार होईल! अशी मीं स्वामींची स्तुति केली; आणि अनन्यभावानें स्वामींस शरण गेलों! तेव्हां अमरपतीनें संतुष्ट होऊन, मला असा उश्शाप दिला कीं, जगदुद्धार करण्यासाठीं शिव, विष्णु, ब्रम्हा, निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, या नांवांनीं मानवरूपानें कलियुगीं अवतार घेतील, आणि त्यांच्याबरोबर आदि-माया, मुक्ताबाई या नांवानें अवतरेल, तेव्हां त्यांना तूं शरण जा. त्यांच्या उपदेशानें तूं अध्यात्मविद्येंत प्रवीण होशील! तेव्हां सद्गुरुरूपेनें तुझ्या अंतःकरणांतील द्वैताचें निरसन होऊन, तुला सर्व जग विश्वरूप दिसूं लागेल! आणि मग भीमातीरीं श्रीपांडुरंग साक्षात् परब्रह्म विटेवर उभे राहिले आहेत! त्यांची उपासना कर-ण्याची सद्बुद्धि तुझ्या अंतःकरणांत उत्पन्न होईल! तेव्हां श्री-हरीची तुजवर कृपा होऊन, तुला पूर्ववत् स्वर्गप्राप्ति होईल! स्वामींमुखांतून निघालेला हा उश्शाप ऐकून मीं संतुष्ट अंतःकर-णानें स्वामींच्या पायांवर मस्तक ठेवून स्वामींचा धन्यवाद गाईला; आणि स्वामीआज्ञेप्रमाणें स्वर्गांतून या भूलोकीं मानवदेहानें उतरलों! परंतु बळी वामनाला शरण रिघाला असतां, ज्याप्रमाणें शुक्रानें त्याला अडथळा केला, तसें माझ्या प्रतिकूल भाग्यानें आज मध्यें आडवें येऊन, ज्या श्रीज्ञानेश्वर सद्गुरूंची पायधूळ मस्तकीं घेऊन शापमुक्त होण्याकरितां मी योगसिद्धीनें चौदाशें वर्षें जिवंत राहिलों, त्या परात्पर सद्गुरूंच्या दर्शनाचा आज सुयोग आला असतां, तो मला घडूं दिला नाहीं! म्हणून शिष्यहो, मला यावेळीं अत्यंत खेद वाटत आहे!

( इतक्यांत प्रतिष्ठानक्षेत्रीं पाठविलेला शिष्य येतो व चांगदेवांस नमस्कार घालून हात जोडून त्यांच्यापुढें उभा राहतो. )

**दुसरा शिष्य**– गुरुमहाराज, आज्ञेप्रमाणें या सेवकानें गुरूंनीं दिलेली आशीर्वादपत्रिका प्रतिष्ठानक्षेत्रस्थ ब्रह्मश्रेष्ठांस नेऊन दिली.

तेव्हां त्या श्रेष्ठांनीं पत्रिकेच्या मुखावर स्वामींची मुद्रा पाहून, पूज्य-भावानें त्या पत्रिकेस आलिंगन दिलें आणि त्यांनीं ती आपल्या मस्तकीं धारण केली. मग ती पत्रिका खालीं ठेवून त्यांनीं तीस साष्टांग नमस्कार घातला ! स्वामी कुशल आहेतना ? असा प्रश्न विचारून, मीं स्वामी कुशल आहेत असें सांगतांच, परम आल्हाद-युक्त अंतःकरणानें त्यांनीं ती पत्रिका उलगडून वाचण्यास सुर-वात केली. पत्रिका वाचतांच त्या श्रेष्ठांस श्रीज्ञानेश्वरादि बाल-वेषधारी सद्गुरूंचें स्मरण होऊन ते सद्गदित झाले आणि त्यांच्या नेत्रांवाटे एकसारख्या प्रेमाश्रुधारा वाहूं लागल्या ! आमचें पूर्वार्जित फार थोर, म्हणूनच आह्मांला अशा प्रभूंचें दर्शन झालें ! धन्य ! धन्य ते सद्गुरु ! साक्षात् परमेश्वरच ते ! काय त्यांचें अगाध ज्ञान ! काय त्यांचें वैराग्य ! काय त्यांची ईश्वरभाक्ति ! त्यांचें यश आम्हीं कोठवर वर्णन करावें ? अशा प्रभूंच्या विमलकीर्तिरूप चंद्राचा प्रकाश सिद्धांच्या आश्रमावर गेला काय? पण यांत आ-श्चर्य तें कोणतें ! प्रातःकाळ होतांच, संपूर्ण अंधकारास दशदिशा उडविणाऱ्या सूर्यनारायणाचा उदय झाला आहे, असें सांगण्या-करितां दूत थोडेच पाठवावे लागतात ! श्रीसूर्यनारायणाचीं किर-णेंच दूतत्व पतकरून सूर्योदयाची बातमी सर्व जगभर पसरीत असतात ! असें म्हणून सर्वांनीं एकत्र बसून स्वामींस देण्याकरितां एक पत्र लिहून मजजवळ दिलें. आणि तोंडीं मला असें सांगि तलें कीं, हे देवत्रयप्रभु प्रतिष्ठानक्षेत्रांतून निघाल्यावर निवास क्षेत्रीं गेले. तेथें श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं श्रीमद्भगवद्गीतेवर भावा-र्थदीपिका नांवाची मऱ्हाठी भाषेंत टीका लिहिली ! आणि निवास-क्षेत्रांतील अबालवृद्ध स्त्रीपुरुषांस श्रीमद्भगवद्गीतेचा गूढार्थ पूर्णपणें समजून देऊन त्यांस ज्ञानाची ओळख करून दिली ! आणि तेथून ते नुकतेच त्यांची जन्मभूमि जें अलंकापुरक्षेत्र तिकडे निघून गेले. हें साद्यंत वर्तमान स्वामींस निवेदन करून, प्रतिष्ठान क्षेत्र-स्थ श्रेष्ठांनीं दिलेलें हें पत्र मी स्वामीचरणीं अर्पण करीत आहें. ( चांगदेवांच्या पुढें पत्र ठेवितो. )

**चांगदेव**- ( पत्र वाचून झाल्यावर ) शिष्यहो, त्या बाल प्रभूं-

बद्दल प्रतिष्ठान क्षेत्रांतील ब्राह्मणानें आपणास सांगितलेला वृत्तांत अक्षरशः खरा आहे, असें या पत्रांत लिहिलें आहे! काय-हो परमेश्वराची ही एकाहून एक अघटित करणी! माझें गायन अत्यंत रसाळ असा अभिमान नारदाला चढलेला पाहून, श्रीकृष्ण-प्रभूंनीं अस्वलाच्या मुखांतून संपूर्ण राग गाववून नारदाचा गर्व खंडन केला! महासागराला आपल्या विशाल उदरांत सांठवि-लेल्या उदकाचा गर्व झालेला पाहून, अगस्ति मुनीनें एका आच-मनानेंच रत्नाकराचा अभिमान नष्ट केला! ब्रह्मदेवाला सृष्टि-कर्ता काय तो मी एकच, असा अभिमान झाला, तेव्हां विश्वामित्र ऋषींनीं आपल्या तपसामर्थ्यानें प्रतीसृष्टि निर्माण केली! स्वरूपामध्यें सर्व सुंदर काय ती मीच, अशा गर्वानें फुगलेल्या सत्यभामेला रुक्मिणीनें जगन्माता जानकीचें रूप धारण करून लज्जित केलें! त्याप्रमाणें मी चौदा विद्या आणि चौसष्ट कला शिकलों आणि सर्व सिद्धि प्राप्त करून घेऊन चौदाशें वर्षें वांचलों! परंतु साक्षात् परब्रह्ममूर्ति श्रीज्ञानेश्वर-महाराजांनीं आजची ही अद्भुत करणी करून दाखवून माझें चित्त जागच्या जागीं मुरवून टाकिलें! तरी सर्व शिष्यवर्गाला माझें असें सांगणें आहे कीं, तुह्मी यापुढें माझें पूजन कधींही करूं नये!

**तिसरा शिष्य**–गुरुमहाराज, आपणांस आमचा इतका कोप येण्यासारखें आम्हां दीन दासांकडून स्वामिसेवेंत कांहीं न्यून पडलें असल्यास, स्वामींनीं सदय होऊन आम्हांला त्याबद्दल क्षमा करावी!

**चांगदेव**–शिष्यहो, तुमच्या हातून आमच्या सेवेंत कांहीं उणें पडलें म्हणून मी क्रोधानें अशी आज्ञा करीत आहें असें नाहीं. तर या भूतलावर जे पूजार्ह आहेत, त्यांचीच पूजा करणें उचित आहे! श्रीज्ञानेश्वरमहाराज आम्हांपेक्षां ज्ञानी असून पुजेचे खरे अधिकारी तेच आहेत! राजाधिराज रामचंद्रमहाराज कुशलवांच्या धनुर्विद्येपुढें जसे निस्तेज झाले, त्याप्रमाणें श्रीज्ञाने-श्वर सद्गुरूंच्या पूर्णब्रह्मस्वरूपापुढें आमच्या सकल विद्या आणि

सकल कला निस्तेज झाल्या आहेत ! म्हणून त्या परात्पर जगद्गुरूंचीच पूजा करणें उक्त आहे ! शिष्यहो, अशा सद्गुरूंचे पादरज माझ्या मस्तकास लागून त्यांच्या गुरूपदेशानें मी कधीं कृतार्थ होईन, या चिंतेनें मला यावेळीं कांहींच सुचेनासें झालें आहे !

**चौथा शिष्य**– सिद्धराज गुरुमहाराज, आपण श्रुतींचा अभ्यास केला, चारी वेद मुखोद्गत केले, न्याय–व्याकरण इत्यादि पढून हा प्रचंड भूगोल खालीं उतरविण्याची विद्याही संपादन केली, आपण वर्तमान–भूत–भविष्य जाणतां, महारोगांचा परिहार करणारे आपण धन्वंतरी आहां, धनुर्विद्येंतही आपण निष्णात आहां, कामशास्त्र, संगीतशास्त्र आणि नृत्यकला यांचाही आपण अभ्यास केला आहे, परकायाप्रवेश करण्याची विद्या आपण संपादिली आहे, सकल प्राणिमात्रांच्या मनांत काय आहे हें आपण जाणतां, ब्रम्हांडभुवनांत काय चाललें आहे तें योगसामर्थ्यानें आपण निमिषार्धांत पाहून येतां, पृथ्वीवरील सर्व राजे आपलें शिष्यत्व पतकरून आपले आज्ञांकित दास बनले आहेत, सर्व जगांतील वृद्ध, तरुण, ज्ञानी, अज्ञानी, श्रीमंत, गरीब, आपली सद्भावानें पूजा कारितात; असा आपला अधिकार असून यःकश्चित् अजाण पोरांची कीर्ति ऐकून आपण अशा रितीनें निरुत्साह होणें, हें स्वामीमहाराज माझ्या अल्पबुद्धीनें बरें नाहीं !

**चांगदेव**– बेटा, आकाशालाही आधार देववेल ! अस्ताला जाणारा सूर्यही एक वेळ हातांत धरवेल ! पृथ्वीचें वजनही करतां येईल ! परंतु भगवद्भक्तांची अगाध करणी ओळखतां येणें फार कठीण आहे ! याकरितां श्रीसद्गुरू ज्ञानेश्वरमहाराजांच्या दर्शनास जाण्याचें आह्मी मनांत आणिलें आहे ! तरी सर्व शिष्यांनीं उदयीक आह्मांबरोबर अलंकापुरीस जाण्याची तयारी करावी.

**दुसरा शिष्य**– गुरुमहाराज, स्वामिचरणीं या दासाची एक विनंती आहे. ती स्वामींनीं श्रवण करून मग जी उक्त ती आज्ञा करावी. अघटित कृत्यें केल्यानें सिद्ध पुरुषांची सिद्धि फार दिवस टिकत नाहीं असा आजपर्यंतचा अनुभव आहे. यासाठीं ज्ञानेश्वराची सिद्धि अद्यापि स्थिर आहे किंवा नाहीं, याची आह्मी

कोणी तरी अलंकापुरीं जाऊन प्रतीति घेऊन येतों; आणि त्याची सिद्धि स्थिर आहे असें अनुभवास आल्यास मग स्वामींनीं स्वतः जाऊन त्याचें दर्शन घेऊन यावें! असें केल्यानें ज्ञानेश्वराची अगोदर योग्य परीक्षा होईल! आणि स्वामींसही निरर्थक शीण होणार नाहीं!

**चांगदेव**– बेटा, हा तुझा विचार आह्मांला मान्य आहे! ( तिसऱ्या शिष्याकडे पाहून ) बेटा, या सर्व शिष्यांत तूं वयोवृद्ध व तपोवृद्ध आहेस. यासाठीं तूंच अलंकापुरीस जाऊन श्रीज्ञानेश्वर सद्गुरूंच्या संतपणाची परीक्षा पाहून त्वरित परत ये!

**तिसरा शिष्य**– गुरुजी, मी अत्यंत मूढ आहें. संतांना कसें ओळखावें, त्यांची खूण काय, त्यांचें लक्षण काय, हें स्वामींनीं कृपा करून या दासाला सांगावें. कारण, कित्येक संत गृहस्थाश्रमी असतात, कित्येक संसाराविषयीं उदास असतात, कित्येक गलितकुष्ट आणि वेडे असतात, कित्येक सदा हंसत राहतात, कित्येक शिव्या देऊन धोंडे मारतात, कित्येक मलिनस्थानीं बसतात, कित्येक कंठांत पुष्पमाळा घालून नाना भोगांचें सेवन करीत असतात, कित्येक अहोरात्र निद्रिस्त असतात, कित्येक सदा जागृत राहतात, कित्येक अन्नपाणी वर्ज करून वायु भक्षण करून राहतात आणि कित्येक नग्न असतात; तरी यांपैकीं खरा संत कोण आणि त्याला कसें ओळखावें, हें स्वामींनीं कृपा करून या दासाला सांगावें. जे स्वतः संत असतात तेच संतांना ओळखतात! तेव्हां माझ्यासारख्या अज्ञानी दासाला त्यांचें स्वरूप कसें कळणार?

**चांगदेव**– बेटा, तुझें ह्मणणें खरें आहे! मलाही संतांचें वर्म कळत नाहीं! तेव्हां त्यांना कसें ओळखावें हें मी तुला कसें सांगणार? शिष्यहो, अशा वेळीं काय करावें हेंच मला सुचेनासें झालें आहे!

**पहिला शिष्य**– गुरुमहाराज, आह्मांला तेथें पाठविण्यापेक्षां स्वामींनीं त्यांना येथूनच एक पत्र लिहावें; ह्मणजे स्वामींच्या पत्रास त्यांचेकडून जें उत्तर येईल, त्यावरून त्यांचें संतपण स्वामींस तेव्हांच ओळखतां येईल!

**चांगदेव**– बेटा, हा तुझा विचार आह्मांला फारच पसंत वाटत आहे ! आण तर कागद, दौत, लेखणी. ह्मणजे आम्ही एक पत्र लिहितों आणि तें तुह्मांपैकीं एकाबरोबर त्यांचेकडे पाठवून देऊन, त्यांच्याकडून त्याचें उत्तर मागवितों ! म्हणजे आमच्या पत्रास त्यांच्याकडून जें उत्तर येईल, त्यावरून त्यांची परीक्षा आह्मांला सहज करतां येईल ! (शिष्य कागद, दौत, लेखणी आणून देतो. चांगदेव कागद पुढें घेऊन, हातांत लेखणी धरून विचार करीत कांहीं वेळ स्तब्ध बसल्यानंतर) शिष्यहो, हा कागद पुढें घेऊन आणि ही लेखणी हातांत घेऊन मी बसलों खरा, परंतु त्यांस काय लिहावें, प्रारंभ कसा करावा, हेंच मला सुचत नाहींसें झालें आहे ! त्यांना तीर्थस्वरूप लिहावें, तर ते अद्याप लेकरूं आहेत ! त्यांना चिरंजीव ह्मणून लिहूं, तर ते मजपेक्षां ज्ञानवृद्ध असून त्यांची थोर कीर्ति ब्रह्मांडभर पसरलेली आहे ! अग्नि लहान असला तरी इंधनानें तो थोर होतो ! सर्व वसुंधरा आवरून धरणाऱ्या वासुकीला किरडूं कोण म्हणेल ? कामधेनु इतर गाईंप्रमाणें कशीं होईल ? भगवान् श्रीविष्णूला पाठीवर वाहणाऱ्या खगेंद्राला पाखरूं ह्मणून कसें चालेल ? मला तर कांहींच सुचत नाहीं !

**चौथा शिष्य**– गुरुमहाराज, आपण सर्वगुणसंपन्न, सकल कलाविशारद आणि सकल विद्यामंडित असतां, आपण असे चिंताक्रांत कां होतां ? या अखिल भुवनाचे आपण गुरु असून, राजापासून रंकापर्यंत सर्वांस आपण चिरंजीव लिहीत असतां ! त्याप्रमाणेंच याही वेळीं 'चिरंजीव विजयी भव' असाच प्रारंभ करून स्वामींनीं पत्र लिहावें !

**चांगदेव**– बेटा, जे साक्षात् परमेश्वर, त्यांना मी चिरंजीव कसें लिहूं ? दशरथाचा बाळ श्रीरामराजा यानें दशाननाला शिक्षा केली ! यशोदेच्या तान्ह्या श्रीकृष्णानें गोवर्धन पर्वत नखाग्रीं उचलिला ! तसें श्रीज्ञानेश्वर सद्गुरूंचें वय लहान असून त्यांनीं आह्मांहूनही अघटित करणी करून दाखविली आहे ! तेव्हां त्यांना मी लहान कसें लेखूं ?

**दुसरा शिष्य**– अशी शंका गुरुजींच्या मनांत उत्पन्न झाली असल्यास, गुरुजींनीं कोरेंच पत्र पाठवून उत्तर मागवावें ! म्हणजे अनायासेंच ज्ञानेश्वराचें ज्ञान आणि संतपण हीं दोन्हीही गुरुजींना कळून येतील ! माझ्या अल्पबुद्धीनें हाच मार्ग यावेळीं बरा दिसतो !

**चांगदेव**– ( कागद व लेखणी शिष्यास परत देऊन ) शाबास ! बेटा, शाबास ! ही तोड तूं फारच चांगली सुचविलीस ! तर मग हें कोरेंच पत्र घेऊन, तूंच अलंकापुरीस जा आणि श्रीज्ञानेश्वरमहाराजांस भेटून, हें त्यांच्या हातीं देऊन, त्यांना माझें नमन सांगून, माझें कुशल कळीव ! आणि चौकस मनानें त्यांची सिद्धि कशी काय आहे, त्यांनीं कोणतें शास्त्र पठण केलें आहे, ते कोणतें अध्ययन करितात, कोणतें पुराण वाचतात, त्यांची भूतदया कशी आहे, ते वैष्णवी माया कशी पाहतात, कोणत्या योगानें ते इंद्रियांचें दमन करितात, स्नानसंध्या कशी करितात, त्यांना परमेश्वराचा साक्षात्कार कसा काय आहे, ते कोणती तपश्चर्या करितात, लौकिकांत ते कसे वागतात, त्यांचें आचरण कसें आहे, त्यांचा योगक्षेम कोणत्या रितीनें चालला आहे, त्यांनीं कोणत्या विद्या साध्य केल्या आहेत, कोणत्या सिद्धीचा सोहळा ते लोकांच्या दृष्टीस पाडतात, त्यांचें उपास्य दैवत कोणतें, इत्यादि सर्व गोष्टींचा गुप्तपणें शोध करून अलंकापुरीहून तूं त्वरित परत ये. म्हणजे तुझ्या परीक्षेस ते कसे काय उतरतात तें पाहून आम्ही पुढचा विचार करूं !

**दुसरा शिष्य**–( चांगदेवास नमस्कार घालून ) स्वामींचा वरदहस्त माझ्या मस्तकीं असावा, म्हणजे स्वामिकार्य माझ्या हातून निर्विघ्न आणि त्वरित सिद्धीस जाईल !

( चांगदेव शिष्याचे मस्तकावर हात ठेवून ‘ विजयी भव ’ असा आशीर्वाद देत असतां पडदा पडतो. )

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळ अलंकापूर.

( श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे मठाकडे जाण्याचा रस्ता. )

**बहिरंभट**– ( प्रवेश करून, त्याचा मुलगा धोंड्या मागून येत आहे, त्यास उद्देशून ) धोंड्या, अरे धोंड्या, ए गाढवा धोंड्या ! चल की रे लौकर ! सोन्या, पाय जरा लवकर उचल !

**धोंड्या**– ( प्रवेश करून ) बाबा, अजून किती हो लांब जायचें आहे ? माझे पाय आतां दुखायला लागले ! मी नाहीं आतां पुढें यायचा जा ! ( पाय पसरून खालीं बसतो. )

**बहिरंभट**– अरे बाबा, आतां थोडक्यासाठीं नको रे मला असा छळूं ! तुझ्याच बऱ्याकरितां बरें बाबा, मी इतका म्हातारा झालों, माझ्यानें धड चालवत देखील नाहीं, तरी काठी टेकीत टेकीत इतका दूर आलों ! आणि गाढवा, तूं आपला जांगोजागीं असा हातपाय पसरून बसतोस, तेव्हां कारट्या तुझें दैव मला धड दिसत नाहीं ! उठ ! बाबा, उठ ! माझ्या सोन्या, नको माझीं अशीं हाडें घुसळूं ! उठ ! ( धोंड्या उठत नाहीं; इतक्यांत हातांत पळीपंचपात्री घेतलेला एक गृहस्थ प्रवेश करतो. )

**बहिरंभट**– ( गृहस्थास उद्देशून ) नमोनमः ! महाराज, महानुभाव श्रेष्ठ ज्ञानेश्वरमहाराज यांचा मठ कोठें आहे, तो कृपा करून मला दाखवाल, तर तुमचे माझ्यावर थोर उपकार होतील !

**गृहस्थ**– आजोबा, आपण जगद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा मठ विचारतां, यावरून आपण या अलंकापुरींतले राहणारे नसून कोठल्या तरी दूरच्या गांवाहून आलेले दिसतां ! कारण जगद्गुरूंचा मठ माहीत नाहीं, असा एकही मनुष्य या अलंकापुरींत सांपडावयाचा नाहीं !

**बहिरंभट**– होय, महाराज, मी आळ्याचा राहणारा. माझें नांव बहिरंभट आणि हा माझा मुलगा; याचें नांव धोंड्या. आम्हीं सद्गुरूंच्या दर्शनाला आलों आहों !

**गृहस्थ**– आजोबा, जगद्गुरूंनीं आपल्या पवित्र चरणांनीं आळ्याचें उपवन नुकतेंच पुनीत केलें, तेव्हां जगद्गुरूंचें दर्शन तुह्मांला घडलें असतां, तुम्ही पुन्हा जगद्गुरूंच्या दर्शनाकरितां अशा वृद्धपणीं काठी टेकीत इतक्या दूर कां आला? कारण सद्गुरुस्मरणाचें महात्म्यही सद्गुरूंच्या साक्षात् दर्शना इतकेंच आहे!

**बहिरंभट**– महाराज, हें खरें; पण हा माझा कारटा पडला दिवटा! पोराची जात– त्याला काय कळणार? सद्गुरूंचें बालवय, तेव्हां त्यांना पाहून ते आपल्या बरोबरीचेच आहेत असें समजून, या कारट्यानें सद्गुरूंची टवाळी केली! आमच्या आळ्याच्या रानांत सद्गुरु राहिले असतां, त्यांच्याबरोबर असलेला हलेश्वर जेव्हां मुखानें वेदघोष करूं लागला, तेव्हां हा पोरटा आमच्या आळ्याच्या कुटिलबुद्धि आणि मूर्ख ब्राह्मणांच्या आणि बरोबरीच्या कुटाळ पोरांच्या नादीं लागून गुरुजी तर आह्मांला ब्राह्मणांशिवाय इतरांच्या कानीं वेद पाडूं नयेत असें सांगतात, आणि असें असून हा रेडा ज्यापेक्षां ते वेद चांडाळादिकांच्याही कानीं पाडीत आहे, त्यापेक्षां असे भ्रष्ट झालेले वेद आह्मांला मुळींच नकोत! असें ह्मणून लागला सद्गुरूंच्या पुढें वेडींवांकडीं तोंडें करून त्यांची कुचेष्टा करायला! महाराज, तुह्माला काय सांगावें? हें भाषण ऐकून सद्गुरूंनीं शांत चित्तानें "तथास्तु" ह्मणून ह्मटलें! पुढें दुसरे दिवशींच त्या रेड्याचा मृत्युकाल समीप आला. तेव्हां श्रीज्ञानेश्वरमहाराज त्या रेड्याला ह्मणाले, 'महिषा, तुला जें वरदान मागणें असेल तें माग.' तेव्हां तो महिष म्हणाला, "या पशुदेहानें सद्गुरूंनीं मला अलं ह्मणजे पूर्ण केलें आहे, तरी सद्गुरूंनीं मला आतां जन्ममरणापासून सोडवावें. यावर, तूं योगपंथाचा आश्रय कर, ह्मणजे तुझें सकल वांच्छित तुला प्राप्त होईल, असें सद्गुरूंनीं त्या महिषाला सांगितलें. हे सद्गुरूंचें वचन ऐकून त्या रेड्यानें प्राणरोधन केलें आणि ब्रह्मरंध्र विदारून त्यानें देहत्याग केला! त्या वेळीं त्या हलेश्वराच्या देहांतून एक दिव्य पुरुष बाहेर निघाला आणि जगद्गुरूंच्या चरणांवर लोटांगण घेऊन म्हणाला, 'मी पक्षेंद्र ऋषिशापानें यासकट मी दोन जन्मीं

पशूच्या जड देहाप्रत पावलों. गतजन्मीं मी जगत्पालाचा घोडा होतों आणि या जन्मीं महिषरूपानें मी सद्गुरूंच्या चरणांपाशीं हा कालपर्यंत राहिलों. तरी आतां सद्गुरूंनीं माझा उद्धार करावा!' अशा रीतीनें त्या दिव्य पुरुषानें केलेली प्रार्थना ऐकून, श्रीज्ञानेश्वर-महाराजांनीं तूं तिसऱ्या जन्मीं मनुष्यदेहाप्रत जाशील आणि तेव्हां संतसमागमानें तुझा उद्धार होईल, असा त्यास आशीर्वाद दिला! तो आशीर्वाद ग्रहण करून त्या दिव्य पुरुषानें साष्टांग नमस्कार घातला आणि एकदम अदृश्य झाला! मग सद्गुरूंनीं त्या पशुदेहाला स्नान घालून एक खाच खणून तींत त्यास समाधि दिली! आणि त्या समाधीवर आपल्या हातांनीं एक धोंडा ठेवून, त्याला शेंदूर फासून, त्याचें नांव "ज्ञानोबा" असें ठेविलें! आणि त्या समाधीजवळ एक अजानवृक्ष लाविला! महाराज, तुम्हाला काय सांगूं? सद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या मुखांतून निघालेल्या 'तथास्तु' वाणीची सत्यता सद्गुरूंनीं आळ्याकडे पाठ फिरवितांच सर्व ब्रह्मवृंदास पटूं लागली! चतुर्वेद पठण केलेल्या श्रेष्ठ ब्राम्हणांना वेदविस्मृति होऊं लागली! आणि आमच्या धोंड्यासारखीं टवाळ पोरें मंदबुद्धि होऊन त्यांच्या वाणींतून वेदोच्चार स्पष्ट निघेनासा झाला! म्हणून या पोराला सद्गुरूंच्या पायांवर घालून त्यांचा आशीर्वाद घेण्याकरितां मी येथें आलों आहें!

**गृहस्थ**–आजोबा, संतवाणी अन्यथा होऊं नये म्हणून सरस्वतीनें सुद्धां त्यांची आज्ञा पाळली आं? केवढें हो या जगद्गुरूंचें थोर सामर्थ्य! महाराज, जगद्गुरूंच्या दर्शनाला मी माझ्या नित्याच्या परिपाठाप्रमाणें निघालों आहें, तर माझ्याबरोबर चलून या मुलाला तुम्ही सद्गुरूंच्या पायांवर घाला आणि अनन्यभावानें सद्गुरूंना शरण जा! म्हणजे सद्गुरुकृपा झाली तर, हा मुलगा बृहस्पति होऊन तुमचे पांग फेडील!

(इतक्यांत पडदा उघडतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज व मुक्ताबाई आसनस्थ असून त्यांचेभोंवतीं अळंकापुरवासी स्त्रीपुरुषसमूह उभा आहे व त्यांपैकीं कित्येक पुरुष व कित्येक स्त्रिया भक्तियुक्त अंतःकरणानें श्रीज्ञानेश्वरमहाराजांपुढें व मुक्ताबाईपुढें लोटांगण घालीत

आहेत, कित्येक पुरुष हात जोडून मुखानें ' गतं दुःखं गतं पापंस्व ' असें ह्मणत आहेत व कित्येक स्त्रिया मुक्ताबाईला प्रदक्षिणा घालीत आहेत, असा देखावा दृष्टीस पडतो. )

**बहिरंभट**–( धोंड्यास श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे पायांवर घालून व आपण स्वतः त्यांस नमस्कार घालून व त्यांच्यापुढें हात जोडून उभा राहून ) सद्गुरुमुखांतून आळ्याच्या वनांत निघालेल्या ' तथास्तु ' वाणीप्रमाणें हा माझा मुलगा मंदबुद्धि होऊन याच्या मुखांतून वेदोच्चार स्पष्ट निघेनासा झाला आहे ! तरी सद्गुरूंनीं या अज्ञान बालकाकडे कृपादृष्टीनें अवलोकन करून यास बुद्धि-ज्ञान द्यावें, हेंच माझें सद्गुरुचरणीं लीन होऊन मागणें आहे !

**ज्ञानेश्वर**–महाराज, श्रीपांडुरंगानें या दासाकडून वदविलेलीं अक्षरें अन्यथा करण्याचें सामर्थ्य श्रीपांडुरंगावांचून कोणालाही नाहीं ! तरी महाराज, माझी आपणास अशी प्रार्थना आहे कीं, या बालकाकडून श्रीपांडुरंगाची भक्ति करवा, म्हणजे श्रीपांडुरंग-कृपेनें हा बालक सज्ञान होऊन, याच्या हातून तुमच्या कुळाचा उद्धार होईल !

**बहिरंभट**– सद्गुरुमहाराजांची अशी अनुज्ञा होत आहे, तर मी या मुलाकडून श्रीपांडुरंगाची उपासना व पंढरीची वारी हेंच एक व्रत जन्मभर पाळवीन ! ह्मणजे सद्गुरूंच्या आशीर्वादाप्रमाणें हा सज्ञान होऊन याच्या हातून आम्हां सर्वत्रांचा उद्धार होईल !

**ज्ञानेश्वर** – तथास्तु ! (इतक्यांत चांगदेवशिष्य प्रवेश करतो.)

**चांगदेवशिष्य**–( मनाशीं ) काय हो हें आश्चर्य ! इतके पुरुष आणि इतक्या स्त्रिया येथें जमून कोणत्या सिद्धांचें दर्शन घेत आहेत बरें ! ( दर्शन घेऊन परत जाणाऱ्या पुरुषांस व स्त्रियांस उद्देशून ) अहो, या क्षेत्राचें नांव काय आणि हीं पलीकडे कोणची नदी वाहात आहे, हें मला सांगतां काय ?

**गृहस्थ**– या क्षेत्राला अलंकापुर म्हणतात; आणि पलीकडे अनंतजन्मांचीं पापें धुवून टाकणारी पवित्र इंद्रायणी नदी वाहात आहे !

**चांगदेवशिष्य**– तर मग येथें ज्ञानेश्वर कोठें राहतो ? त्याचा मठ कोणता ? हें आह्मांला सांगा बरें !

**एक मुलगी**–( कानांवर हात ठेवून ) अरे मेल्या, तुझ्या वृत्तीवरून तर तूं चांगला सिद्ध दिसतोस ! नी असं असून मेल्या, भीड, मर्यादा, नम्रता, हीं सारीं एकीकडे गुंडाळून ठेवून, उद्धटपणानें जगद्गुरूंचं एकेरी नांव घेऊन त्यांचा मठ विचारतोस, तेव्हां मेल्या, सिद्धाई शिकून त्याचा काय उपयोग केलास ? नी बाबा, कोणत्या गुरूच्या उपदेशानें हा अहंभावाचा ताठा तुझ्या अंगांत शिरला, तें सांग पाहूं ? अरे निर्लज्जा, जी केवळ परब्रह्ममूर्ति, त्या परब्रह्माबद्दल धिकारयुक्त वाणीनें तूं आह्मांला पुसतोस ! तेव्हां मेल्या धिक् धिक् धिक् तुझें जिणें ! ज्या जगद्गुरूंचा झेंडा तिहीं लोकीं फडकत आहे, ते जगद्गुरु तुझ्या दृष्टीसमोर असून, तुझ्या डोळ्यांच्या खाचा झाल्या नसतांही, जेव्हां तुला दिसत नाहींत, तेव्हां तूं पूर्ण हतभागी नी घोरपापी आहेस हेंच खरं !

**चांगदेवशिष्य**–( खजील होऊन व त्या मुलीपुढें साष्टांग नमस्कार घालून ) मातोश्री, मी मूढ, अज्ञानी, महापापी आहें ! आणि त्यामुळें मला नेत्र असूनही मी अंध झालों आहें ! मला क्षमा करा आणि जगद्गुरूंचें दर्शन मला एकवेळ तरी करवा ! म्हणजे त्यांच्या दर्शनानें माझें जडबुद्धित्व नष्ट होऊन मला ज्ञानचक्षु प्राप्त होतील ! आणि त्यांचा आशीर्वाद प्रसाद मागून मी आपल्या देहाचें सार्थक करून घेईन !

**एक मुलगी**–असा शुद्धीवर येऊन विचारशील तर ते पाहा जगद्गुरु तेथें बसले आहेत ! त्यांच्यापुढं दंडवत घालून कृत अपराधांची नाक घासून क्षमा माग, नी जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त हो ! ( निघून जाते. )

**चांगदेवशिष्य**–( श्रीज्ञानेश्वरमहाराजांस साष्टांग नमस्कार घालून हात जोडून त्यांच्यापुढें उभा राहतो. )

**ज्ञानेश्वर**–( समोर उभे असलेल्या लोकांस उद्देशून ) महाराज, जरा दूर व्हा. महासिद्ध चांगदेवमुनींच्या या शिष्यांना मला

नमस्कार करूं या ! (आसनावरून खालीं उतरून शिष्यापुढें नमस्कार घालतात. ) मुक्ताबाई, यांना नमस्कार कर. ( मुक्ताबाई पुढें होऊन शिष्यास नमस्कार करते. तिच्या मागून सर्व पुरुष व स्त्रियाही त्यास नमस्कार करतात. ) समर्थ चांगदेवांना आह्मां अज्ञ बालकांचें स्मरण होऊन, त्यांनीं तुम्हांबरोबर आह्मांकरितां एक आज्ञापत्र पाठविलें आहे ! हा सिद्धांनीं आज आमच्यावर मोठाच अनुग्रह केला ! आणि आपणही स्वामिआज्ञेनें तें आज्ञापत्र घेऊन इतक्या दूर येण्याचे श्रम घेतले आणि आम्हांस तुमचें दर्शन दिलें, याबद्दल आपलेही आम्हांवर थोर उपकार झाले ! सिद्धश्रेष्ठ चांगदेव कुशल आहेत ना ? आणि सिद्धांनीं आम्हांला कोणती अनुज्ञा केली आहे ?

**चांगदेवशिष्य**- (सजील होऊन) सद्गुरूंनीं मीं सांगण्यापूर्वींच अंतर्ज्ञानानें सर्व प्रकार ओळखिला आहे ! तेव्हां आतां मी अधिक तें काय सांगणार ! स्वामिआज्ञेप्रमाणें ही पात्रिका मी सद्गुरुचरणीं अर्पण करीत आहें; तरी सद्गुरूंनीं हिचा अंगिकार करून आमच्या स्वामींना उत्तरीं जी अनुज्ञा करणें असेल ती करावी !

**ज्ञानेश्वर**- ( पत्र उघडून व तें कोरेंच आहे असें पाहून तें मुक्ताबाईच्या हातीं देतात )

**मुक्ताबाई**- ( कोरें पत्र पाहून आश्चर्यानें ) काय ग बाई हें आश्चर्य ! काळाच्या हातून चौदाशें वर्षें देह वांचवून चांगदेव मुनिश्रेष्ठ एरंडासारखे उंच वाढले आणि भोळ्या लोकांना आपली सिद्धि दाखवून त्यांनीं दिगंतकीर्ति मिळविली; तरी ते अद्यापि कोरे ते कोरेच ! चौदाशें वर्षें जगून त्यांनीं काय सार्थक केलें ! अहंकार दवडण्याकरितांच नारायणानें मनुष्यदेह दिला आहे ! तेव्हां या मनुष्यदेहांतही अहंतेचें ओझें वागविणें पारमार्थिकांना अत्यंत लाजिरवाणें आहे ! विषयांची गोडी जोंपर्यंत नष्ट झाली नाहीं, देहाची बांदोडी जोंपर्यंत सुटली नाहीं, तोंपर्यंत नुसत्या सोंगढोंगानें निवृत्तीच्या पैलथडी प्राणी कसा पोहोंचणार ? जो देहापासून गळाला, तोच कर्मापासून सुटला ! चांगदेवांनीं

अहंतेनें दंभाचार वाढवून, देहाचें व्यर्थ मातेरें केलें आहे ! गुरु-कृपेनें आत्मविचारबोध झाला नाहीं, तर त्या लौकिकाचा काय उपयोग ?

**ज्ञानेश्वर**– मुक्ताबाई, सिद्धीचा आंगीं ताठा भरून सिद्ध चांगदेव अंतर्बाह्य अहंकारानें वेष्टून गेल्यामुळें ब्रह्मज्ञानाची कळा या चौदाशें वर्षांत त्यांच्या अंतर्दृष्टीस आजपावेतों पडली नाहीं ! आणि त्यामुळें जसा फळावांचून वृक्ष, किंवा पाण्यावांचून सरोवर, किंवा वैराग्यावांचून संन्यास, किंवा पर्जन्यावांचून जसें अभ्रपटल, किंवा राजावांचून जशी सेना, किंवा दृष्टीवांचून जसे नेत्र, किंवा प्राणावांचून जसें शरीर, त्याप्रमाणें चांगदेव सिद्धांच्या सर्व सिद्धि एका आत्मज्ञानावांचून व्यर्थ झाल्या आहेत !

**चांगदेवशिष्य**– सद्गुरुमहाराज, आपलें भाषण यथार्थ आहे ! आणि हीच गोष्ट आमच्या स्वामींच्या लक्षांत सांप्रत आली असल्यामुळें ते सद्गुरुचरणदर्शनाविषयीं अत्यंत आतुर झाले आहेत !

**ज्ञानेश्वर**– हे सत्शिष्या, तूं येथें येण्यापूर्वींच, माझ्या श्रीनिवृत्तिनाथ सद्गुरूंनीं अंतर्ज्ञानानें तुझ्या स्वामींबद्दल सर्व वृत्तांत मला सांगितला असून, तूं स्वामींचें हें कोरें पत्र घेऊन आलास, म्हणजे तुझ्या हातीं तुझ्या स्वामींना उत्तर पाठविण्याविषयीं मला अनुज्ञा केली आहे ! श्रेष्ठहो, मला कागद, दौत, लेखणी, आणून द्या; म्हणजे श्रीनिवृत्तिनाथ सद्गुरूंच्या आज्ञेप्रमाणें मी मुनिश्रेष्ठ चांगदेवांना उत्तर लिहून पाठवितों. ( एक ब्राह्मण कागद, दौत, लेखणी आणून देतो; तेव्हां श्रीज्ञानेश्वरमहाराज खालील ओव्या कागदावर लिहितात. )

श्रीगुरुभ्योनमः॥ स्वस्ति श्रीवटेशु ॥ जो लपोनि जगदाभासु ॥ दावी मग ग्रासु ॥ प्रगटला करी ॥ १ ॥ प्रगटे तंव तंव न दिसे ॥ लपे तंव तंव आभासे ॥ प्रगट ना लपाला असे ॥ न खोमता जो ॥ २ ॥ बहु जंव जंव होये ॥ तंव तंव कांहींच न होये ॥ कांहीं नहोनि

आहे ॥ अवधाचि जो ॥ ३ ॥ सोनें सोनेंपणा उणें ॥ न येतांचि झालें लेणें ॥ तेवि न वेंचतां जग होणें ॥ अंगें जया ॥ ४ ॥ कल्लोळ कंचुक ॥ न फेडितां उघडें उदक ॥ तेंवि जगेंसी सम्यक् ॥ स्वरूप जो ॥ ५ ॥ परमाणुचिया मांदिया ॥ पृथ्वीपणें न वचेचि वायां ॥ तेंवि विश्वस्फूर्ति इयां ॥ झांकवेना जो ॥ ६ ॥ कळांचेनि पांघुरणें ॥ चंद्रमा हरपों नेणें ॥ का वन्ही दीपपणें ॥ आन नोहे ॥ ७ ॥ ह्मणोनि अविद्यानिमित्तें ॥ दृश्य द्रष्टृत्व वर्ते ॥ तें मी नेणें आइतें ॥ ऐसेंचि असे ॥ ८ ॥ जेंवि नाममात्र लुगडें ॥ येऱ्हवीं सुतचि तें उघडें ॥ का माती मृद्भांडें ॥ जयापरी ॥ ९ ॥ तेंवि द्रष्टा दृश्य दशे ॥ अतीत दृङ्मात्र जें असे ॥ तेंचि द्रष्टा दृश्य मिसें ॥ केवळ होय ॥ १० ॥ अलंकार येणें नामें ॥ असिजे निखिळ हेमें ॥ नाना अवयव संभ्रमें ॥ अवयवियां जेंवि ॥ ११ ॥ तेंवि शिवेंनी पृथ्वीवरी ॥ भासती पदार्थांचिया परी ॥ प्रकाशे तें एकसरी ॥ संविति हे ॥ १२ ॥ नाहीं तें चित्र दाविती ॥ परि असे केवळ भिंती ॥ प्रकाशे ते संवित्ति ॥ जगदाकारें ॥ १३ ॥ बांधियाचिया मोडी ॥ बांधा नहोनि गुळाची गोडी ॥ तयापरि जगपरवडी ॥ संवित्ति जाणा ॥ १४ ॥ घडियेचेनि आकारें ॥ प्रकाशिजे जेंवि अंबरें ॥ तेंवि विश्वस्फूर्ति स्फुरे ॥ स्फूर्तिचि हे ॥ १५ ॥ न लिंपतां सुखदुःख ॥ येणें आकारें क्षोभोनि नावेक ॥ होय आपणिया सन्मुख ॥ आपणचि जो ॥ १६ ॥ तया नांव दृश्याचें होणें ॥ संवित्ति द्रष्टृत्वा आणिजे तेणें ॥ बिंबा बिंबत्व जालेपणें ॥ प्रतिबिंबाचेनि ॥ १७ ॥ तेंवि आपणचि आपुला पोटीं ॥ आपणया दृश्य दावित उठी ॥ द्रष्टा दृश्य दर्शन त्रिपुटी ॥ मांडे तें हे ॥ १८ ॥ सुताचिये गुंजे ॥ आंत बाहेर नाहीं दुजें ॥ तेंवि तिनपणेंवीण जाणिजे ॥ त्रिपुटि हें ॥ १९ ॥ नुसधें मुख जैसें ॥

देखिजतसें दर्पणमिसें ॥ वायांचि देखणें ऐसें ॥ गमों लागे ॥ २० ॥ तैसें न वचतां भेदा ॥ संवित्ति गमे त्रिधा ॥ हेंचि जाणे प्रसिद्धा ॥ उपपत्ति इया ॥ २१ ॥ दृश्याचा जो उभारा ॥ तेंचि द्रष्टत्व होय संसारा ॥ या दोहीं माजिला अंतरा ॥ दृष्टि पंगु होय ॥ २२ ॥ दृश्य जेधवां नाहीं ॥ तेधवां दृष्टि घेऊनि असे काई ॥ आणि दृश्येंविण कांहीं ॥ द्रष्टृत्व असे ॥ २३ ॥ ह्मणोनि दृश्याचे झालेपणें ॥ दृष्टि द्रष्टृत्व होणें ॥ पुढती तें गेलिया जाणें ॥ तैसेंचि दोन्ही ॥ २४ ॥ एवं एकचि झालिं तिं होती ॥ तिन्ही गेलिया एकचि व्यक्ति ॥ तरी तिन्ही भ्रांति ॥ एकपण साच ॥२५॥ दर्पणाच्या आधि शेखीं ॥ मुख असतांचि असे मुखीं ॥ माजि दर्पण अवलोकीं ॥ आन कांहीं होये ॥ २६ ॥ पुढें देखिजे तेणें बागे ॥ देख ऐसें गमों लागे ॥ परी दृष्टीतें वाउगें ॥ झकवित असे ॥ २७ ॥ ह्मणोनी दृश्याचिये वेळे ॥ दृश्यद्रष्टृत्वावेगळें ॥ वस्तुमात्र निहाळे ॥ आपणपांची ॥२८॥ वाद्यजातेंविण ध्वनि ॥ काष्टजातेविण वन्ही ॥ तैसें विशेष ग्रासुनि ॥ स्वयेंचि असे ॥२९ ॥ जें ह्मणतां नये कांहीं ॥ जाणो नये कैसेंही ॥ असतची असे पाहीं ॥ असणें जया ॥ ३० ॥ आपुलिया बुबुळा ॥ दृष्टि असोनि अखमडोळा ॥ तैसा आत्मज्ञानी दुबळा ॥ ज्ञानरूप जो ॥ ३१ ॥ जें जाणणेंचि कीं ठाईं ॥ नेणणें कीर नाहीं ॥ परि जाणणें ह्मणोनियाही ॥ जाणणें कैचें ॥३२॥ यालागीं मौनेंचि बोलिजे ॥ कांहीं नहोनि सर्व होइजे ॥ नव्हतां लाहिजे ॥ कांहींच नाहीं ॥ ३३ ॥ नाना बोधाचिये सोयरिके ॥ साचपण जेणें एकें ॥ नाना कल्लोळ माळिके ॥ पाणि जेंवि ॥ ३४ ॥ जें देखिजतेविण ॥ एकलें देखतेंपण ॥ हें असो आपणिया आपण ॥ आपणचि जें ॥ ३५ ॥ जें कोणाचें नव्हतेनि असणें ॥ जें कोणाचें नव्हतां दिसणें ॥ कोणाचें नव्हतां भोगणें ॥

केवळ जो ॥ ३६ ॥ तया पुत्र तूं वटेश्वराचा ॥ रवा जैसा कापुराचा ॥ चांगया मज तुज आपणयाचा ॥ बोल ऐके ॥ ३७ ॥ ज्ञानदेव ह्मणे ॥ तुज माझा बोल ऐकणें ॥ तें तळहाता तळीं मिठी देणें ॥ जयापरी ॥३८॥ बोलेंचि बोल ऐकिजे ॥ स्वादेंचि स्वाद चाखिजे ॥ कां उजिवडें देखिजे ॥ उजिडा जेंवि ॥ ३९ ॥ सोनिया वरकल सोनें जैसा ॥ कां मुखामुख हो आरिसा ॥ मज तुज संवाद तैसा ॥ चक्रपाणि ॥ ४० ॥ गोडिये आपुली गोडी ॥ घेतां काय न माये तोंडीं ॥ आह्मां परस्परें आवडी ॥ तो पाडु असे ॥४१॥ सखया तुझेनि उद्देशें ॥ भेटावया जीव उल्हासे ॥ कीं सिद्धभेटी विसकुसे ॥ ऐसिया बिहे ॥ ४२ ॥ घेवो पाहे तुझें दर्शन ॥ तंव रूपा येवो पाहे मन ॥ तेथें दर्शना होय अवजतन ॥ ऐसें गमो लागे ॥४३॥ कांहीं करी बोले कल्पी ॥ कां नकरि न बोले न कल्पी ॥ ये दोन्ही तुझ्या स्वरूपीं ॥ न घेति उमसू ॥ ४४ ॥ चांगया तुझेनि नांवें ॥ करणें न करणें न व्हावें ॥ हें काय ह्मणो परि न धरवे ॥ मी-पण हें ॥ ४५ ॥ लवण पाणियाचा थावो ॥ माजि रि-घोनि गेलें पाहो ॥ तंव तेंचि नाहीं मा काय घेवो ॥ माप जळा ॥ ४६ ॥ तैसें तुज आत्मयातें पाही ॥ देखो गेलिया मीचि नाहीं ॥ तेथं तूं कैचा काई ॥ कल्पाव-याजोगा ॥ ४७ ॥ जो जागोनि नीद देखे ॥ तो देख-णेंपणा जेंवि मुके ॥ तेंवि तूतें देखोनि मी ठाके ॥ कांहीं नहोनी ॥ ४८ ॥ आंधाराचे ठाईं ॥ सूर्यप्रकाश तंव नाहीं ॥ परी मी आहें हें कांहीं ॥ नवचेचि जेंवि॥४९॥ तेंवि तूतें मी शिवसी ॥ तेथें तूंपण मीपणेंसी ॥ उखतें पडे ग्रासी ॥ भेटीचि उरे ॥ ५० ॥ डोळयाचे भूमिके ॥ डोळा चित्र होय कौतुकें ॥ आणि तेणेंचि तो देखे ॥ न डंडळितां ॥ ५१ ॥ तैसी उपजतां गोष्टी ॥ न फुटतां दृष्टि ॥ मीतूंवीण भेटी ॥ माझी तुझी ॥५२॥ आतां मी

तूं या उपाधि ।। ग्रासूनि भेटी नुसधी ।। ते भोगिली अनुवादी ॥ घोळघोळू ॥ ५३ ॥ रुचातियाचेनि मिसें ॥ रुचितें जेविजे जैसें ॥ कां दर्पणव्याजें दिसे ॥ देखतें जेंवि ॥ ५४ ॥ तैसी अप्रमेयें प्रमेयें भरलीं ॥ मौनाचीं अक्षरें भलीं ॥ रचोनि गोष्टी केली ॥ मेळियोचि ॥५५॥ इयेचें करुनि व्याज ॥ तूं आपणयातें बुझ ॥ दीप दीपपणें पाहे निज ॥ आपुलें जैसें ॥ ५६ ॥ तैसी केलिया गोठी ॥ तया उघडिजे दृष्टी ॥ आपणिया आपण भेटी ॥ आपणामाजी ॥ ५७ ॥ जालया प्रळयीं एकार्णव ॥ अपार पाणियाची धांव ॥ गिळी आपुला उगव ॥ तैसें करी ॥ ५८ ॥ ज्ञानदेव ह्मणे नामरूपें ॥ विण तुझें साच आहे आपणपें ॥ तें स्वानंदजीवन पे ॥ सुखिया होई ॥ ५९ ॥ चांगया पुढतपुढती ॥ घरा आलिया ज्ञानसंपत्ति ॥ वेद्यवेदकत्वही अतिती ॥ पदीं बैसे ॥ ६० ॥ चांगदेवा तुझेनि व्याजें ॥ मांडलिया श्रीनिवृत्तिराजें ॥ स्वानुभव रसाळ खाजें ॥ दिधलें लोभें ॥ ६१ ॥ एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे ॥ दोन्ही डोळस आरिसे ॥ परस्पर पाहतां कैसें ॥ मुकले भेदा ॥ ६२ ॥ तिये परि जो ईया ॥ दर्पण करील औविया॥ तो आत्म एवढीया ॥ मिळेल सुखा ॥ ६३ ॥ नाहीं तेंचि काय नेणों असे ॥ दिसे तेंचि कैसें नेणो दिसे ॥ असे तेंचि नेणो आपैसे ॥ तें कीं होईजे ॥ ६४ ॥ निदे परौतै निदैजणें ॥ जागृति गिळोनि जागणें ॥ केलें तैसें गुंफणें ॥ ज्ञानदेवो ह्मणे ॥ ६५ ॥

( पत्र लिहिणें झाल्यावर तें शिष्याचे हातांत देऊन ) हे सत्‌शिष्या, तुझ्या स्वामींच्या पत्रास, हें माझें उत्तर नेऊन दे; आणि त्यांना माझे सप्रेम दंडवत सांगून, तोंडीं असा निरोप सांग कीं, परब्रह्म चराचरीं अखंड नांदत आहे ! त्या सच्चिदानंदाला स्वरूप नाहीं, आकार नाहीं, वर्ण नाहीं आणि लहानमोठा भावही नाहीं ! मात्र अविद्येच्या भ्रांतींत द्वैत भावानें अज्ञानी

लोक, मी मोठा आणि तो लहान, असें ह्मणत असतात! तुमचें शरीर कोणाचें आहे? तुमच्या शरिरांत कोण नांदत आहे? हें तुह्मी मीं लिहिलेलीं दोन अक्षरें वाचून त्यांचें मनन करून ओळखून घ्या! जिवास कष्ट देऊन योग साधन केलें असतां ऋद्धिसिद्धि प्राप्त होतील, परंतु आत्मज्ञानाशिवाय सच्चिदानंद-स्वरूपाची ओळख कालत्रयींही होणार नाहीं! आणि ब्रह्माची ओळख झाल्याशिवाय मनांतील द्वैतभाव नष्ट होणार नाहीं! सर्व इंद्रियांत मनाची चंचलता फार आहे! तें सैरवैरा धांवत सुटतें! तेव्हां त्याला आपल्या स्वाधीन करून घेऊन, विचार-दृष्टीनें परब्रह्माकडे पाहिलें पाहिजे! परब्रह्म वेदांनासुद्धां अगोचर आहे! त्या ठिकाणीं प्राणीमात्रांची जाणीव कुंठित होते! परंतु सद्गुरुरूपेनें त्याचें ज्ञान प्राप्त होतें! आतां आपणांस जास्त काय सांगावें? जें तुमच्या हृदयीं वसत आहे, तेंच मीं अनुभवानें जाणून, या पत्रीं उघड करून लिहिलें आहे! तरी मनांत द्वैत-भाव न धरितां, या पत्राचें नित्य मनन करून यांतील अर्थ नीट समजून घ्यावा! आणि मीं पत्रीं लिहिलेलें हें वेदशास्त्रांचें मथन जिवासी जतन करून ठेवा! ह्मणजे तुह्मी चौदाशें वर्षें रक्षण केलेल्या देहाचें सार्थक होऊन तुह्मी कैवल्यपदाप्रत जाल!

**चांगदेवशिष्य**– सद्गुरुमुखांतून स्रवणारें हें बोधामृत आज मला अल्पतरी सेवन करण्यास मिळाल्यानें मी धन्य झालों! जगद्गुरूंचा निरोप मी स्वामींस कळवून, जगद्गुरूंनीं दिलेली ही अनुग्रहपत्रिका, जगद्गुरूंच्या आज्ञेप्रमाणें स्वामींस नेऊन देतों! परंतु जगद्गुरूंपुढें मीं अत्यंत भक्तियुक्त अंतःकरणानें नमविलेल्या या मस्तकावर, जगद्गुरूंनीं आपला, वरदहस्त एकवार ठेवून मला धन्य करावें, हेंच माझें जगद्गुरुचरणीं लीन होऊन मागणें आहे! (श्रीज्ञानेश्वरमहाराज शिष्याचे मस्तकावर हात ठेवितात. शिष्य लोटांगण घालून निघून जातो.)

**ज्ञानेश्वर**– मुक्ताबाई, श्रीसद्गुरु निवृत्तिनाथांच्या पादसेवनाची वेळ झाली. तर चला आपण आतां सद्गुरुसेवेकरितां आंत जाऊं! (पडदा पडतो.)

---

## प्रवेश तिसरा.

स्थळ–अलंकापूर.

( हरिबा कुंभाराचें घर. हरिबा कुंभार हातांत वीणा व चिपळ्या घेऊन भजन करीत प्रवेश करतो. )

हरिबा-

बोला इट्ठल इट्ठल रे पांडुरंग इट्ठल ॥ बोला ॥ ध्रु० ॥
आपुत सोयरे जनु कावळे जमल्यात भोतीं तुझ्या बापा ।
टोचून टोचून घेत्याल मंग बा धायधाय रडशील रे ॥पांडु०॥
जुमीन जुमला ल्योक बाईल माझी माझी तूं ह्मनसी ।
परान जाईल तवा कोनबा, तुझ्या सांगती येईल रे ॥पांडु०॥
बाग वाडा हथ ठिवुनशान् नेत्याल तुजबा यमपुरीं ।
पोरंबाळं घेत्याळ वाटून, ह्मोतुर लाविल बाईल रे ॥ पांडु० ॥
आजे पनजे काका मामा गेळे त्येंची न्हाई गनती ।
त्येंच्या मागं तूंबी जाशील, यर्थ भोगुनी हाल रे ॥ पांडु० ॥
जनमपाव्तर तरास सोसुनी कमाई केली पैक्याची ।
मौजेमंदी येळ काढला, भोगुनी नाना ख्याल रे ॥ पांडु० ॥

( इतक्यांत हरिबाची बायको जानकाई प्रवेश करते. )

जानकाई– कारभारी ! अवो कारभारी ! कारभारी अ ! कान फुटल कीं ऐकाया येतया ? अवो, गन्या ह्मनत व्हता कीं त्यो दोड इसोबा चाटी अक्शी लाल व्हऊन गेलाया म्हनून ! आन् त्यो आपनास दंडाला धरून घराभाहीर वढनार ! आन् समद डाग-डागीनं, चिरगुट कांबरुणं, मडकीं गाडगीं, ढोरं गाढवं, हाय न्हव, त्ये संमदं नेनार आपल्या घरला व्हाऊन ! तवा म्होर कसा इचार करनार ? मी तवा ह्मनत व्हत्ये कीं, कारभारी नगा वरं, त्या मुक्तीला नगा खापरं देऊं ह्मनुन ! मी तवा तुमच्या म्होरं आडवी बी झाल्ये ! पन आपुन तवा माझ न्हाई ऐकलं ! आतां अन्नाला-बी ह्माग व्हन्याची आलीया येळ ! तुमी तर ह्ये असं खूळ लाग-ल्यावानी लागलासा कराया ! तवा आतां माझी चार कच्चींबच्चीं

घेऊनशान् म्या कुनाच्या दाराम्होरं जाव ! न्हाई आई–का न्हाई बा–का न्हाई भाऊ–का न्हाई भहीन–संमदा उन्हाळा झालाया ! तवा आतां कुनाम्होरं दात इचकूनशान् पोटाला तुकडा मागावा ?

**हरिबा–**

**अग इट्ठल आपला मायबाप त्यो पंढरींत हाये ।**
**संता संग तथं जाऊं चल, अन्नपानी देईल ग ॥ पांडु० ॥**

**जानकाई–** इठ्ठल काय देनार ! चंदरभागतल गोट व्हय ! मातींत गाडा नेऊनशान् ह्ये शास्तार ! त्यो इसोबा हथ येऊनशानी जवा पोराबाळासनी मारहान करील, त्येना फरारा वढील, आन् तुमाआमासनी काढन्यानं जखडील, तवांच थंड व्हत्याल तुमच डोळ ! कठीन ! लै कठीन वखत आलाया !

**हरिबा–**

**अग कारभारनी तूं हायेस येडी गुरु आह्मा पाठी ।**
**तिरभुवनामधीं हात कुनाचा, आह्मावरती वाहील ग ॥पांडु॥**
**अग गुरुची करनी थोर हाये ऐकलीस कानी ।**
**त्येच सुमरन कर ग येडे, समद दुःख जाईल ग ॥ पांडु० ॥**

( इतक्यांत गण्या मोठ्यानें हासत प्रवेश करतो )

**गण्या–** ( पोट धर धरून हासत ) ही ! ही ! ही ! ही ! लै, लै, गमात झालीया पगा ! बाबा, बाबा ! चला ! बिगी बिगी चला ! अक्शी गमात पन गमात हाये ! ल्येकाचा वाघावानी डुरकत व्हता न्हव ! आं ! पन आतां अक्शी गाय व्हऊन गेलाया !

**जानकाई–** ( गण्यास पोटाशीं धरून ) गन्या, अरे गन्या, अरे हाय तरी काय ? आं ! तुसनी हासन लै लै लोटलया ! म्हंजी असं झालय तरी काय ? आं ! का येंच्यावानी तुला बी झपाटलं कुनी भुतानं !

**गण्या–** ( मोठ्यानें हांसून ) ही ! ही ! ही ! अग त्यो मुरदाड इसोबा चाटी !

**जानकाई–** ( आनंदानें ) बर मग ! त्येचं काय ? त्येचा मुडदा पगितलास व्हय ? त्येला न्येला का मरीआइनं वढून ?

**गण्या–** अग तस न्हव ! ग्यानुबाह्माराजांच्या म्होरं, त्यो दंडव-

तामाग दंडवत, दंडवतामाग दंडवत घालतुया ! आन् समदा गांव लोटला हाये पग ती गमात पगाया ! अक्शी तोबा उल्डा हाये, पग तोबा !

**जानकाई**– आं ! आन् ह्ये इखाच अमुंत ! कसं झालं कसं ह्ये ! इसोबा म्हंजी समद्या गावाची खट ! आन् त्यो ग्यानुबा-ह्माराजांना सरन कसा गेला ?

**हरिबा**– अग कारभारनी,

**लोटांगन पग संतापाईं त्येनं घातलं भक्तीनं ।**

**ह्मनुन इखाचं अमुंत झालं, यांत कोनतं नवल ग ॥पांडु०॥**

**गण्या**– व्हय, व्हय, व्हय ! ह्ये अक्शी खर हाय पग ! अग त्या मुक्तीला इसोबासनी फसवूशान् बाबांनीं खापरं दिलीं न्हव ? तीं घेऊनशान् मुक्ती वाटेनं बेगुमान जात व्हती. तिकल्यामंदी त्यो इसोबा आला तकडूनशान्, आन् मुक्तीला पगून पल्डा तिच्यावर रानडुकरावानी तुटून ! आन् मुक्तीला शिंईगाळ करून त्येनं त्या खापरांचा लाथेनं चकाचूर केला ! आन् मुक्तीच्या तोडांत मारून शेनी कसं लागला म्हनाया, मांडं करत्येस न्हव ? कर मांड ! रांडं कर मांडं ! तवा ती मुक्ती रडत वरडत गेली आपल्या घरला ! म्होरं काय गमात व्हतीया त्ये पगाव ह्मणून इसोबाबी गेला तिच्या माग लपत छपत ! आन् ग्यानुबाम्हाराजांच्या मठाभाहीर उभा ऱ्हाऊन दाराच्या फटीमधून आंत काय व्हतया त्ये लागला हळूच पगाया !

**जानकाई**– त्यो तसाच हाये मेला मुरदाड ! बरम राकुस हाये ! मेला बरम राकुस !

**गण्या**– मुक्ती रडत वरडत आली ह्ये ग्यानुबा ह्माराजांनीं पगितलं. तवा त्येनी तिला पोटाशीं धरली, आन् तुला कुनी काय केलं, ह्मनून इचारलं, तवां मुक्तीनं समदा परकार सांगितला. त्यो ऐकूनशी ग्यानुबा म्हाराज कसं ह्मनालं ? मुक्ते तूं नग रडूं ! मां-ड्याचं पीठ भिजव ! आन् मांडं करून भाज माझ्या पाठीवर ! !

**जानकाई**– काय ! पाठीवर मांडं भाज असं ह्मनाल ?

**गण्या**– अग व्हय, व्हय ! ह्ये जवा इसोबानं ऐकलं तवा त्योबी तुझ्यावानीच गेला गोंधळून ! आन् ह्यो गारुडी कावा है

तरी काय, ह्ये पगन्यापाई बसला तथच दडून ! इस्तवाबिगर मांडं व्हनार कस ! असा इसोबा इचार करतुया, तिकल्यामंदी मुक्तीन पीठ भिजवूनशान् केलं मांडं. तवा ग्यानुबाम्हाराज झाल ओणव. आन् तोंडाभाहीर जाळ काढून, पाठ, पोट, आन् समद् आंग, केलं त्येनी वनवा पेटल्यावानी लाल गुंज ! तवा मुक्ती लागली त्येंच्या पाठीवर एका म्होर एक मांडं टाकून भरारा भाजाया ! आन् हूं काय ? मुक्तीनं खिनामंदी मांड्यांचा ढीग पाल्डा पग ढीग !

**जानकाई**– कारभारी ! अवो कारभारी ! ऐकलं काय गन्या काय सांगतुया त्ये ! ग्यानुबांनीं गारुड्याच्या बाच्यावर तान केली न्हव ह्मनायची ही ! असा परकार म्या समद्या जल्मांत न्हाई पगितला, का न्हाई कदी ऐकला !

**हरिबा**– अग येंडे, ज्ञानेस्वरम्हाराजासनी गारुडी नग ह्मनू ग ! अग

**ज्ञानेस्वर हे देव हैती इसोबासनी नव्हत ठावं ।**

**त्येची परचित दावायाला, आगीनरूप घेतलं ग ॥ पांडु०॥**

**गण्या**– आईग, तवां कनी त्यो इचितर परकार पगून इसोबाची सुधबुध न्हाईसी झाली ! आन् त्येच्या डोळ्याम्होर चकर येऊन, त्यो डोळे मिटून सवस्थ बसला ! हकड निरवर्तीनाथ, ग्यानुबाम्हाराज, सोपानदेव आन मुक्ती ह्येनी घेतली थाळी वाढूनशान्, आन् बसलीं मांडं खायाला ! इळभरानं इसोबा आला सुद्धीवर, आन् त्येनं जवा त्या समद्यासनी मांडं खातांना पगितलं, तवां त्येच्या आंगामंदी संचार व्हऊन, त्यो मठाचं दार फोडून घुसला तडक आंत ! आन् ग्यानुबाम्हाराजांच्या ह्मोरची थाळी घेऊन, लागला बरम राकुसावानी बका बका बका मांडं खायाला ! तवां ग्यानुबाम्हाराज इसोबाला कसं ह्मनाल ? अर ह्यो खेचर ! ह्यो खेचर ! है कोन ? त्ये सबुद इसोबान ऐकल, आन् त्येसनी काय वाटलं कोन जानं, त्येनं ठेवली ग्यानुबाम्हाराजांच्या पायांवर डोई ! आन् तुमी माझ मावाप हैसा ! तुमी देव हैसा ! माझं रक्सन करा ! मला उपदेस करा ! मला मो-

क्साला धाडा ! असं लागला चळ भरल्यावानी बकाया ! तवा ग्यानुबाह्मराजांनीं त्येच्यावर दया करून ठिवला त्येच्या डोक्शावर हात । त्येनं इसोबाला झालं ग्यान ! आन् त्यो आतां मला घर नग ! मला दार नग ! मला बायकु नग ! पोर नग ! बाळ नग ! कुनी नग ! अस लागलाया ह्मनाया ! त्येची बायकु, पोर, आन् आपुत सोयरे, समदे ग्यानुबाह्मराजांच्या मठामंदी जमा झाल्याती ! आन् इसोबाची समजूत पाडन्यापाई लै वाटकुळ शीन करत्याती ! पन् इसोबा आतां कुनाच्या बाचं बी ऐकत न्हाई ! आन् तोंडानं इठ्ठल ! इठ्ठल ! इठ्ठल ! ह्मनतुया !

**हरिबा**– अहाहा ! ज्ञानेस्वरह्माराज असाच परसाद तुमी या हरिबावर कदी कराल बरं ? म्हंजी या परपंचामधून माझीबी त्या इसोबावानीच सोडवनुक व्हईल ! अग कारभारनी,

अग देवाला कदी सरन जाऊनी न्हाई केलं पूजन भजन ।
परपंचाची हौस धरून पग, डोई वाहिले हेल ग ॥ पांडु० ॥
दो दीसाचा जनम खोटा उमगुनी घेई तूं ध्येनी ।
खिनभर संतापाई लागसी, सुद्ध बुद्धी व्हईल ग ॥ पांडु० ॥
नामघोस हा मंतर त्येंचा शिकवित्याल तुज पेरमानं ॥
त्यो घोकुन तूं पाक मनानं, वैकुंठीं जासील ग ॥ पांडु० ॥
अग म्या ज्ञानेस्वरच्या पाईं डोई ठेवून घेतला उपदेस ।
त्येनं मला ध्येनं लाविलं, पांडुरंग इठ्ठल ग ॥ पांडु० ॥
अग चलग जाऊं भाव भक्तीनं घेऊं चरनावरी लोळन ।
बोधाचा मळवट कपाळीं, तुझ्या सद्गुरु भरत्याल ग ॥ पांडु० ॥

(सर्व निघून जातात.)

---

## प्रवेश चौथा.

स्थळः- अलंकापूर.

( श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानेश्वरमहाराज, सोपानदेव व मुक्ताबाई हीं आपल्या मठापुढील भितीवर श्रीहरीचें भजन करीत बसलीं आहेत असा पडदा उघडतो.)

**निवृत्तिनाथ**–

रामनाममुखींतोएकसंसार॥ येऱ्हवींअघोरनरकरया॥१॥ संसारनरकरामनामसार ॥ तरलेपामरपतितदेखा ॥ध्रु०॥ अजामेळनामेंतरलापतित ॥ नारायणत्वरितआलेतेथें ॥ २ ॥ हरिनामहेंचिशास्त्रपैंजयाचें ॥ तयासियमाचेंभय नाहीं ॥ ३ ॥ उघडामोक्षमार्गगोविंदस्मरणें ॥ रामनाम कीर्तनेंमोक्षपद ॥ ४ ॥ निवृत्तिसंचीतरामनाममहिमा ॥ अवघीचपैर्णिमाहरिपाठें ॥ ५ ॥

**सोपानदेव**–

हरिअसेदेहींसर्वकाळसंपन्न ॥ ह्मणोनिचिंतननिरंतर ॥१॥ हरिविणनाहींहारिविणनाहीं ॥ दिशाद्रुमपाहीबिंबलासे ॥ ध्रु० ॥ हरिविणदेवोनाहींअन्यभावो ॥ हरीअसेसर्व देहभावीं ॥ २ ॥ सोपानसांगतुहरिसर्वत्रवसे ॥ भाग्यवं-तादिसेसर्वकाळ ॥ ३ ॥

**मुक्ताबाई**–

नाममंत्रेंहरिनिजदासांपावे ॥ ऐकोनीध्यावेंझडकरी ॥ १ ॥ सुदर्शनकरिपावेलवकरी ॥ पांडवा साहाकारी श्रीकृष्णरया ॥ ध्रु० ॥ निजानंददावीउघडेंपैंवैकुंठ ॥ नामेंचिप्रगटआह्मांलागी ॥ २ ॥ मुक्ताईजीवन्मुक्तहा संसार ॥ हरिपारावारकेलाआह्मीं ॥३॥

**ज्ञानेश्वर**–

काळवेळनामउच्चारितांनाहीं ॥ दोन्हीपक्षपाहीउद्धरती ॥ १ ॥ रामकृष्णनामसर्वदोषाहरण ॥ जडजीवातारण

हरीएक ॥ २ ॥ रामहरिसारजिव्हाहेनामाची ॥ उपमा त्यादेवाचीकोणवानी ॥ ३ ॥ ज्ञानदेवासांगझालानाम-पाठ ॥ पूर्वजांवैकुंठमार्गसोपा ॥ ४ ॥

**मुक्ताबाई**– दादा ज्ञानराया, हें कायहो नवल, कीं हें सर्व आकाश मेघडंबरानें व्याप्त झाल्याप्रमाणें एकाएकीं काळेंभोर दिसूं लागलें !

**ज्ञानेश्वर**– बाळ मुक्ताबाई, आपण पाठविलेल्या उत्तराचा अर्थ योगीश्रेष्ठ चांगदेवांना न समजल्यामुळें त्याचा उलगडा करून घेण्याकारितां ते चौदाशें शिष्यांसह योगबळानें आकाशपंथें इकडे येत आहेत ! त्यामुळें हा अंधार पडला आहे ! मुक्ताबाई, सुंभ जळतें, पण पीळ जळत नाहीं; त्याप्रमाणें असुर संपत्तीनें भ्रष्ट झालेल्या चांगदेवश्रेष्ठांच्या चित्तांत जरी अनुताप उत्पन्न झाला आहे, तरी त्यांच्या अंतःकरणांतील योगसिद्धीचा अभिमान अद्यापि पुरा जळला नाहीं ! आणि ह्मणूनच आपल्या सिद्धीचा अद्भुत प्रभाव आपणां सर्वत्रांना दाखविण्याकारितां ते आज वाघावर बसून आणि हातांत सर्पाचा चाबूक घेऊन आपल्या भेटीला येत आहेत !

**मुक्ताबाई**– दादा ज्ञानराया, तर मग आपण त्यांना सामोरे जाऊं ! आणि अत्यंत आदरपूर्वक त्यांना आपल्या मठांत घेऊन येऊं ! ह्मणजे त्यांच्या आगमनानें आपला आश्रम पुनीत होईल ! पण दादा आपल्यापाशीं वहन नाहीं, तें आपण कोठून आणावें ? आणि समर्थांच्या भेटीला आपण कशावर बसून जावें !

**ज्ञानेश्वर**– मुक्ताबाई, वहनावरच बसून समर्थ चांगदेवांच्या भेटीला जावें असें तुझ्या मनांत असेल तर, श्रीपांडुरंगकृपेनें ही भिं-तच आपलें वहन होऊन आपल्याला मुनिश्रेष्ठांच्या भेटीला नेईल!

**निवृत्तिनाथ**– ज्ञानदेवा, चला तर मग. या भिंतीवरच बसून आपण सिद्धांना सामोरे जाऊं !

**ज्ञानेश्वर**– भिंतीबाई, श्रीनिवृत्तिनाथ सद्गुरूंची आज्ञा होत आहे, तर चला बाई ! आह्मांला आपल्या पाठीवर घेऊन योगी-श्रेष्ठ चांगदेवांचें दर्शन आह्मांला करवा ! चला !

(असें ह्मणतांच भिंत चालूं लागते. इतक्यांत वर वर्णन केल्याप्रमाणें वाघावर बसून व हातांत सर्पाचा चाबूक घेऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या भेटीला अंतरिक्षांतून येत असलेले चांगदेव आपल्या शिष्यांसह भूतलावर उतरतात, तों श्रीज्ञानेश्वरादि अचेतन भिंतीवर बसून येत आहेत असें त्यांच्या दृष्टीस पडतें.)

**चांगदेव**– (खजील होऊन, मनाशीं) अहाहा! सद्गुरु समर्था ज्ञानदेवा! धन्य! धन्य आहां तुह्मी! कीं आज भक्ति, ज्ञान, वैराग्य, कला बरोबर घेऊन, तुह्मी साक्षात् ब्रह्म पुतळे, आमच्या भेटीचा सोहळा करण्याकरितां, निर्जिव भिंतीला सचेतन करून तीवर बसून, आह्मांला सामोरे येत आहां! सद्गुरुनाथा, काय ही आपली अघटित लीला! श्रीकृष्ण परमात्म्यानें जसा गोवर्धन पर्वत जेवविला, तशी आपण आज ही अघटित लीला करून दाखविली! आणि अशा जगद्गुरूंना न ओळखून मीं स्वतःची थोरवी दाखविण्याकरितां व्याघ्रावर बसून आणि हातीं सर्पाचा चाबूक घेऊन यांच्या भेटीला आलों! तेव्हां धिक्! धिक् माझें अज्ञान! (चांगदेव व्याघ्रावरून खालीं उतरतात व हातांतील सर्पाचा चाबूक टाकून देतात. सर्प व व्याघ्र निघून जातात. हें पाहून श्रीज्ञानेश्वरादि मंडळीही भिंतीस थांबवून तीवरून खालीं उतरतात. चांगदेव व त्यांचे शिष्य श्रीज्ञानेश्वरादि मंडळीपुढें साष्टांग दंडवत घालतात. श्रीज्ञानेश्वरादि मंडळीही त्यांस उलट नमस्कार घालतात.)

**ज्ञानेश्वर**– (चांगदेवांस आलिंगन देऊन)

**चांगदेवसिद्धांआहांतुह्मीथोर ॥ सर्वज्ञउदारआह्मांलागीं ॥ १ ॥ भेदूनषट्चक्रेंसाधिलेंयोमासी ॥ ऋद्धिसिद्धि दासीस्वयेंकेल्या ॥ २ ॥**

**चांगदेव**– (गहिंवरून)

**संतांच्यादर्शनेंशुद्धझालेंमन ॥ गेलाअभिमानाविरोनियां ॥ १ ॥ काळवंचनेनेंवांचविलेंशरीर ॥ पाहावेंयोगीश्वरतुह्मांऐसे ॥ २ ॥ वटेश्वरचांगाकरीतविनंती ॥ तोडा माझी गुंती संसाराची ॥ ३ ॥**

अहो सकल शास्त्रविशारदा ज्ञानराया! अहो सर्वसौख्यप्रदायका!

अहो सुशांता! ज्ञानकरा! धर्मार्थ–काम–मोक्षदायका! निर्जीव भित्तिप्रचालका! योग–कला–निपुणा! अलंकापुरवासी श्री विष्णु-रूपा ज्ञानदेव संता! धन्य! धन्य हा आजचा सुदीन! कीं तुह्मां समर्थांचे चरण दृष्टीनें पाहण्याकरितां मीं काळवंचना करून हा माझा देह आज चौदाशें वर्षें वांचविला, तो माझा मनोरथ आज परिपूर्ण होऊन, मीं आपल्या संतमूर्ति आज डोळे भरून पाहिल्या! सद्गुरुनाथा, आपलें केवढें हें अगाध सामर्थ्य! कीं आपल्या क्षेमा-लिंगनस्पर्शानें मला अष्टभाव दाटून, माझ्या हृदयांत सर्व विश्वीं चराचरीं भरून राहिलेलें चैतन्य एकदम जागृत होऊन, मला सर्व-भूतीं परमेश्वर दिसूं लागला! अहो समर्था, तुमच्या दर्शनानें माझें पूर्व दग्ध होऊन, माझें पुढील जन्माचें बिरडें तुटलें! आणि आपल्या ह्या साक्षात् प्रभुदर्शनानें माझ्या अभिमानाचें निरसन होऊन, माझें चित्त शुद्ध झालें। माझें पूर्वपुण्य उदयास आल्यामुळें मला आज सद्गुरुचरणतीर्थीं स्नान घडून मी पापमुक्त झालों! आणि मीं आजपर्यंत साधिलेले योग सफल होऊन मी सनाथ झालों! सद्गुरुचरणांवर मीं आपलें मस्तक अनन्यभावानें ठेविलें आहे. तरी सद्गुरूंनीं माझ्या मस्तकावर अभय हस्त ठेवून आणि मला आपल्या शिष्यवर्गांत घेऊन, कृतार्थ करावें!

**ज्ञानेश्वर**–अहो चांगदेव श्रेष्ठा! तुह्मी ज्ञाते, वडील; आह्मी अज्ञ, लहान लेकरें! शिवाय आम्ही ना ब्राम्हण, ना शूद्र, ना वैश्य! आम्हांला वर्णविचार नाहीं! तेव्हां तुम्हांसारख्या वर्णश्रे-ष्ठांना आह्मीं काय सांगणार? पण तुमची इच्छाच आहे तर माझें तुम्हांपाशीं इतकेंच मागणें आहे कीं, हीच तुमची परब्रह्मस्वरूपीं जडलेली चित्तवृत्ति सदैव अशीच कायम ठेवा! ह्मणजे तुमच्या इंद्रियांना विश्रांतिसुख मिळेल! मीं पाठविलेल्या पासष्टीचा अर्थ तुह्मी पूर्णपणें ध्यानीं आणा, ह्मणजे तुमची तुम्हांला ओळख पटून, अखंड समाधिसुखांत तुह्मी निमग्न व्हाल! आणि असें झालें ह्मणजे मंदबुद्धीनें जी दंभोपाधि तुह्मीं आपल्यामागें लावून घेतली आहे, त्या उपाधींतून तुमची मुक्तता होऊन तुम्ही जीवन्मुक्त व्हाल। बाळ मुक्ताबाई, या चांगदेव

श्रेष्ठांना मी तुमच्या हातीं निरवीत आहें, तरी यांना आत्मज्ञानाचा बोध करून यांचा द्वैतभाव समूळ नष्ट करावा!

**मुक्ताबाई**– चांगदेवा,

मुक्तपणेंसांगदेवोहोयदेवांग ॥ मीपणेंउद्वेगनेघेरया ॥१॥ वाउगेंमीपणआथिलेंप्रवीण ॥ एकनारायणतत्वखरें ॥ध्रु०॥ मुक्तामुक्तीदोन्हीकरीकारेसिशीराणी ॥ द्वैताची काहाणीनाहींतुज ॥ २ ॥ मुक्ताईअद्वैतद्वैतींद्वैतातीत ॥ अवघाचिअनंतदिसेदेहीं ॥ ३ ॥

**चांगदेव**– ( मुक्ताबाईपुढें दंडवत घालतात. तेव्हां मुक्ताबाई त्यांचे मस्तकावर हात ठेवितें. ) मातोश्री मुक्ताबाई, चौदाशें वर्षें भूमिगत असलेल्या धनाचा ठेवा तुम्हीं आज माझ्या हातीं देऊन मला धन्य केलें! मातोश्री, आजपर्यंत मी ऋद्धिसिद्धि वश करून घेऊन गर्वानें ताठून गेलों होतों, परंतु माझ्या मस्तकावर आज आपण वरदहस्त ठेविल्यानें माझ्या अहंकाराचा मला पूर्ण विसर पडून, माझ्या हृदयीं चित्स्वरूप पूर्णपणें ठसलें! अहो मातोश्री, मीं आजपर्यंत तेरा वेळां योगसिद्धीनें काळ फिरविला, आणि चौदा वेळां जन्माला आलों! परंतु आज या चौदाव्या जन्मीं मी मुक्ताबाई मातोश्रीचा पुत्र झाल्यामुळें, माझ्या मागील सर्व जन्मांचें सार्थक झालें! तरी मातोश्री, मला ज्ञानदुग्ध पाजून कृतार्थ करावें!

**ज्ञानेश्वर**– योगीश्रेष्ठा चांगदेवा! मिथ्या भ्रमानें तुम्ही लौकिकाला भुलून आजपर्यंत सर्वस्वी नाडलां गेलां! तरी योगीराजा, हा मिथ्या भ्रम सांडून सर्वत्र भरलेल्या परब्रह्मस्वरूपाला ज्ञानदृष्टीनें ओळखा, ह्मणजे तुमच्या चित्तांत मीतूंपणा उरणार नाहीं! योगसाधन अत्यंत कठीण, आणि तें साध्य झालें तरी ऋद्धिसिद्धि त्याला विघ्न करतात! आणि त्यायोगें योगी आत्मसुखाला अंतरतो! यासाठीं मी तुह्मांला माझ्या अंतरीचें गुज सांगतों कीं, इंद्रियें आणि मन यांना आंवरून धरा, म्हणजे तुह्मी तात्काळ ब्रह्मज्ञानाला ओळखाल! चांगदेवा, रजोगुण सांडून तमाचें मूळ खंडून टाका; आणि शुद्ध सत्वानें तुह्मी आपल्याला ओळखून घ्या! तुह्मीं चतुर्दश विद्या, चौसष्ट कला, सप्तकोटी

मंत्र, अष्टादश औषधीरसायणें आणि अनेक योगसिद्धि प्राप्त करून घेतल्या ! पंचाक्षरी बनून भूतांना शिक्षा केली ! साधक-बाधक विद्या शिकलां ! परंतु तुमचे चित्तांत एक सरूप ज्ञानकला नसल्यानें त्या सर्व कळा अवकळा झाल्या ! विश्वांतील श्रेष्ठ औषधी एकत्र जमविल्या तरी अमृततुषाराशिवाय जशा त्या प्रेतास सचेतन करण्यास उपयोगीं पडत नाहींत, त्याप्रमाणें आत्मज्ञानाशिवाय सर्व विद्या निष्फळ होत ! अहो योगीश्रेष्ठा, तुह्मीं आजपर्यंत ब्रह्मांडीं प्राण नेऊन काळाला जिंकलें, परंतु श्रीहरीच्या भक्तिप्रेमाशिवाय वैकुंठपीठ तुमच्या हातीं कसें लागणार ? आजपर्यंत हृदयाशीं अहंता धरल्यामुळें तुह्मी आत्मज्ञानाला पारखे झालां ! चांगदेवा, योग्याची खूण ही नव्हे ! ती निराळीच आहे ! जेव्हां तुमच्या हातून तमोगुणाचा नाश होईल, तेव्हांच मी तुम्हांला योगी ह्मणेन ! चांगदेवा,

**अष्टांगयोगेंनसिणिजे ॥ यमनेमनिरोधनकिजेरया ॥१॥ वाचागीतगाईजे ॥ वाचागीतगाईजे ॥ गातांवातांश्रवणींऐकिजेरया ॥ ध्रु० ॥ गीताछंदेंअंगडोलिजे ॥ लीलाविनोदेंसंसारतरिजेरया ॥ २ ॥ बापरखुमादेविवरु विठ्ठलुनामें ॥ जोडे हा उपावो किजेरया ॥ ३ ॥**

**चांगदेव**– ( ज्ञानेश्वरमहाराजांचे चरणावर मस्तक ठेवून )
**मनसंकल्पशुद्धपैंनव्हे ॥ ये=हवींसदोदितआहेचिदानंदीं ॥ १ ॥ मनातेंबुडवुनीइंद्रियातेंदंडुनी ॥ मीहेंसोडुनीसोहं धरि ॥ ध्रु० ॥ चांगावटेश्वरींसोहंजाला ॥ अवघाचि बुडाला ज्ञानडोहीं ॥ २ ॥**

( इतक्यांत शिष्य चांगदेवांस पूजासाहित्य आणून देतात. चांगदेव श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानेश्वरमहाराज, सोपानदेव व मुक्ताबाई यांची पूजा करितात व त्यांचे गळ्यांत पुष्पमाळा घालून चार प्रदक्षिणा करितात व साष्टांग नमस्कार घालून हात जोडून पुढें उभे राहतात. )

अहो सद्गुरुसमर्था, ज्या आपल्या चरणांची ब्रह्मादिकही पूजा करितात, त्या चरणांची मी आज भक्तियुक्त अंतःकरणानें पूजा करून कृतार्थ झालों ! आपल्या कृपादृष्टीनें माझें समूळ अज्ञान

नष्ट होऊन मी सच्चिदानंदस्वरूपीं रत झालों ! मातोश्री चित्कला मुक्ताबाई, हिनें या अज्ञान लेंकराला आपल्या ओटींत घेतल्यानें जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मी आज मुक्त झालों ! याबद्दल अहो दीनदयाळ सद्गुरुनाथा, अहो मातोश्री, मी आपला कसा उतराई होऊं ? मी आपल्याला काय अर्पण करूं ? आणि कोणत्या शब्दांनीं आपला धन्यवाद गाऊं ! सकलकलाविद्यासहित मी आपल्या पंचप्राणांची सद्गुरुचरणांवरून ओंवाळणी केली आहे ! आणि तुह्मां समर्थांचें चरणतीर्थ प्राशन करून तुमच्या चरणीं दृढ मिठी दिली आहे ! तरी सद्गुरूंनीं या दीन दासावर अनुग्रह करून, मला पाठविलेल्या पासष्टीचा अर्थ पूर्णपणें माझ्या मनांत भरवून देऊन माझा उद्धार करावा.

**ज्ञानेश्वर**– चांगदेवश्रेष्ठा, या पासष्टीचा अर्थ मुक्ताबाई तुम्हांला उघड करून सांगेल ! परंतु याला एक बळी द्यावा लागतो ! तरी तुमच्या चौदाशें शिष्यांपैकीं एकास बळी द्या, आणि मग पासष्टीचा अर्थ समजून घ्या !

**चांगदेव**– श्रीची आज्ञा या दासाला प्रमाण आहे.

**ज्ञानेश्वर**– योगीश्रेष्ठा, आमच्या मठांत आपल्याला ठेवून घेऊन, आपल्या सत्समागमाचें सुख कांहीं दिवस तरी उपभोगावें असें आमच्या मनांत आहे ! तरी आह्मांवर एवढा अनुग्रह आपण केलाच पाहिजे.

**चांगदेव**– सद्गुरुनाथा, आपल्या चरणाविरहित या चांगदेवाला त्रिभुवनांत कोणतीच गोष्ट आतां प्रिय उरली नाहीं ! तेव्हां सद्गुरूंनींच कृपाळू होऊन या दासाला सद्गुरुपायांची निरंतर सेवा घडूं द्यावी, हेंच या शरणागताचें सद्गुरुचरणीं अनन्यभावानें मागणें आहे !

**ज्ञानेश्वर**– चांगदेवा, चला तर ! ( सर्व जाऊं लागतात. भिंतही त्यांच्या मागें जाऊं लागते; तिला उद्देशून ) भिंतीबाई, तुम्हांला आमच्या मागून येण्याचें कारण नाहीं. तुह्मी आतां येथें अशाच कल्पपर्यंत उभ्या राहा ! ( भिंत थांबते. सर्व एकामागून एक निघून जातात. मात्र चांगदेवांचे शिष्य मागें थांबतात. )

**चांगदेव**– ( जातां जातां )
सोहंहोतेंतेंकोहंजालें ॥ निजविसरलेंकायसांगों ॥ १ ॥
मार्गचुकलाविसरपडिला ॥ वरपडाझालाविषयचोरा
॥ ध्रु० ॥ वटेश्वरचांगाज्ञानदीपेंउजळला ॥ सोहंशब्दीं
लावियलाबाईयानों ॥ २ ॥

( चांगदेव निघून जातात. तेव्हां मागील पडदा पडतो. )

**पहिला शिष्य**– काय रे, स्वामींनीं बळी देण्याचें कबूल केलें तें ऐकलेंत ना ? आतां कोणाच्या जिवावर पाळी येते तें कोण जाणे !

**दुसरा शिष्य**– मित्रा, याला आतां काय उपाय करावा रे ? स्वामींच्या पंक्तीस बसून आपण आजपर्यंत नानाविध पक्वान्नें सेवन केलीं ! आणि स्वामींच्या कृपेनें अनेक सुखें भोगिलीं ! पण आतां मात्र आपली धडगत दिसत नाहीं !

**तिसरा शिष्य**– मित्रांनो, स्वामींनीं आजपर्यंत योगवृत्तीचा व्यर्थ दंभ माजवून आपल्याला मोहनी घातली, आणि आपल्याकडून सावरी मंत्राचें अध्ययन करविलें ! आणि अशा रितीनें आजपर्यंत आपली बुडवणूक करून, आतां अखेर आपल्या प्राणांवर पाळी आणली आहे ! तेव्हां आपलेंच दैव खोटें आणि म्हणूनच आपल्याला अशी कुबुद्धि झाली, असेंच आतां म्हटलें पाहिजे !

**पहिला शिष्य**– मित्रांनो, मला एक युक्ति दिसते आहे बुवा !

**दुसरा शिष्य**– ती कोणती ? सांग बरें !

**पहिला शिष्य**– अरे, ती हीच कीं, ही बळीची गोष्ट आपल्या इतर मित्रांच्या कानीं जाण्यापूर्वी आपण येथून पळून जावें ! आपण तिघेच पळून गेलों तर स्वामींना दुसरे तेराशें सत्याण्णव शिष्य आहेत ! त्यांत ज्याचें भरेल तो जाईल ! पण आपण मात्र जर काय करावें, कसें करावें, असा विचार करीत आणखी घटकाभर येथें राहिलों, तर आपल्या तिघांपैकींच एकास बळी जावें लागेल !

**तिसरा शिष्य**– खरें आहे मित्रा ! अरे, गोमीला पुष्कळ पाय

असतात. त्यांपैकीं दोन चार मोडले तर तिचें कांहीं अडत नाहीं! त्याप्रमाणें आपल्या गुरुजींचे चौदाशें शिष्य आहेत, त्यांपैकीं आपण तिघेच निघून गेलों तर स्वामींचें थोडेंच अडणार आहे? आपण पडलों कुटुंबाचे घरीं एकएकटे! तेव्हां आपण मेलों तर आपल्या बायकांमुलांना दुसरें कोण आहे! अरे, एक जन्म आपल्या प्रारब्धानें उचल खाऊन आपल्याला सर्व भोग अनुकूल करून दिले आहेत! तर त्यांचा उपभोग घेण्याचें सोडून, गुरुभक्तीसाठीं जीव घालविणें, यासारखा दुसरा मूर्खपणाच नाहीं!

**दुसरा शिष्य**– खरें आहे मित्रा! चला तर आपलें चंबूगबाळें आटोपून आपण आतांच्या आतांच आपापल्या घराचा मार्ग धरूं म्हणजे झालें! चला, चला, चला तर.

(सर्व निघून जातात.)

---

## प्रवेश पांचवा.

**स्थळ**– अलंकापूर.

(श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा मठ. एका भिंतीआड मुक्ताबाई आंग धुवीत बसली आहे. इतक्यांत चांगदेव खिन्नमुद्रेनें प्रवेश करतात.)

**चांगदेव**–(मुक्ताबाई आंग धुवीत बसली आहे तिकडे लक्ष न जाऊन आपल्याशींच) माझ्या शिष्यांपाशीं काल रात्रीं मीं बळीची गोष्ट काढतांच, रणांगणांत राजा पडल्यावर जसे सर्व सैनिक देहलोभानें चारी वाटा पळत सुटतात, त्याप्रमाणें माझे चौदाशें शिष्य बळीची गोष्ट ऐकतांच मला सोडून एका क्षणांत निघून गेले! तेव्हां हर! हर! आज चौदाशें वर्षें या देहाला व्यर्थ शिणवून मी स्वतःची नागवणूक करून घेतली! असो. आतां यापुढें या संतांच्या गांवीं राहून, आणि अहोरात्र यांची सेवा करून, या देहाला विसावा देईन! मातोश्री मुक्ताबाईनें काल मला उपदेश करतांना,

**निर्गुणाचेडाहाळींपाळणालाविला ॥ तेथेंसुतपहुडलासुक्ाईचा ॥१॥ नीजनीजबाळानकरीपैंआळी ॥ अनुहात**

टाळीवाजवीते ॥ ध्रु० ॥ तेथेंनिद्रानाजागृतिभोगीपैं उन्मनी ॥ लक्षतोभेदुनीनिजणातो ॥ २ ॥ निभ्रांतपाळी पाळणाविणउनी ॥ मनेंहेंबांधोनींपवनदोरा ॥३ ॥ एक-विससहस्रसाहाशेंवेळेबाळा ॥ तोहीडोळास्थिरकरी ॥४॥ निद्रानाजागृतिनिजसीकाई ॥ परियेसीचांगयाबोले मुक्ताबाई ॥ ५ ॥

(इतक्यांत चांगदेवांची दृष्टि मुक्ताबाईकडे जाते. तेव्हां ते डोळ्यांवर हात ठेवून, तोंड मागें वळवून, आपल्याशींच ह्मणतात.) शिव! शिव! मातोश्री मुक्ताबाई मंगलस्नान करीत असतां देवानें तिचें शरीर माझ्या दृष्टीस पाडून, आज मला महत्पापांत लोटलें! आतां मी कोणतें प्रायश्चित्त घेऊं? आणि या पापाचें क्षालन कसें करूं?

मुक्ताबाई—(वस्त्र गुंडाळून पुढें येऊन चांगदेवांस उद्देशून) अरे चांग्या! मेल्या निगुऱ्या चांग्या! मला पाहून, डोळ्यांवर हात ठेवून, पाठ वळवून, माघारा फिरलास तो कां? अरे,

आत्मज्ञानबोध ॥ नाहींतुजझाला ॥ विकल्पउदेला ॥ तेणेंचित्तीं ॥ १ ॥ आत्मारामजोका ॥ नांदतवदेहीं ॥ तोचिज्ञानेंपाही ॥ शरीरींया ॥ ध्रु० ॥ स्त्रीपुरुषनामें ॥ कापबाळ्याभिन्न ॥ दोहोंसीकांचन ॥ मूळएक ॥ २ ॥ घागरीरांजण ॥ जरिभिन्नाकृती ॥ मृत्तिकाआहेती ॥ सर्वएक ॥ ३ ॥ स्त्रीपुरुषदेह ॥ दृष्टीसीनिराळे ॥ चैतन्य वेगळें ॥ नाहींत्यांत ॥ ४ ॥ पाहीपांडुरंग ॥ सर्वत्रबिं-बला ॥ रितानाउरला ॥ ठावएक ॥ ५ ॥

आणखी चांग्या,

जनीं वनीं हिंडे गाय ॥ परि वस्त्रें नेसे काय ॥ १ ॥
मी तशीच तुझी माय ॥ अंतरीं येवो प्रत्यय ॥ २ ॥
कोनाडे जसे भिंतीला ॥ नऊ द्वारें या देहाला ॥ ३ ॥
जरि गुरुबोध होता ॥ विकल्प ना मनिं येता ॥ ४ ॥

चांगदेवा, हें जग आत्मवत् माना, ह्मणजे स्त्रीपुरुषांच्या मिथ्याभासाला तुमच्या हृदयांत तिळभरही जागा मिळणार नाहीं!

**चांगदेव**– ( मुक्ताबाईचे पायांवर डोकें ठेवून ) मातोश्री, तुमचें हें अबाधित ज्ञान जाणून मीं तुमचे चरण धरिले आहेत! आणि म्हणूनच मला समर्थ श्रीज्ञानेश्वर सद्गुरूंनीं तुमच्या हातीं निरविलें आहे! तरी मातोश्री, माझ्या मस्तकावर आतां अभयकर ठेवून मला शरणागताला आत्मज्ञानबोधामृत पाजून सज्ञान करावें!

**मुक्ताबाई**– ज्ञानदेवदादांनीं, तुम्हांला उपदेश करण्यापूर्वी, तुम्हांपासून बळी घेण्याबद्दल मला सांगितलें आहे. तरी अहो चांगदेवा, बळी देण्याची तुमची तयारी आहेना?

**चांगदेव**– मातोश्री, काय सांगूं? मीं सिद्धीचा बाजार मांडून चौदाशें सांप्रदायी मिळविले! परंतु मीं त्यांच्यापाशीं बळीची गोष्ट काढतांच, ते मला सोडून केव्हांच चालते झाले! तरी मातोश्री, तुह्मां सर्वांच्या प्रेमळ मूर्ति ज्यांत मीं अखंड सांठविल्या आहेत, अशा या माझ्या देहाचा बळी घेऊन माझ्या कानीं उपदेश सांगून माझा उद्धार करावा!

**मुक्ताबाई**– चांगदेवा, शाबास! धन्य! धन्य आहां तुम्ही! मुमुक्षुदशा परिपक्व स्थितीप्रत पोहोंचली नाहीं तोंपर्यंत निजवस्तु प्राप्त होणें कठीण! तुमच्या मागची शिष्यशाखेची उपाधि नाहींशी होऊन, तुमच्या हृदयांतील शिष्यशाखेचा अभिमान नष्ट व्हावा, म्हणून माझ्या ज्ञानदेवदादांनीं तुम्हांपाशीं बळी मागितला होता! माझ्या ज्ञानदेवदादांनीं योजिलेल्या ह्या उपायामुळें शिष्यशाखेचा अभिमान आणि देहावरील ममत्व या दोन्हीही गोष्टी तुमच्या हृदयांतून आतां नष्ट झाल्या आहेत!

**चांगदेव**– अहाहा! सद्गुरुसमर्था ज्ञानराजा, केवढी ही आपली थोर भक्तवत्सलता!

**मुक्ताबाई**– चांगदेवा, तुह्मी अगोदरच शुद्धपात्र आहां! आणि सद्गुरुवाक्यानें तुमच्या अंतःकरणांत पूर्ण वैराग्य उत्पन्न झालें आहे! तर आतां तुह्मांला अधिक काय सांगावयाचें आहे? पण

**हेंमीहेंमीप्रचितपाही ॥ अनुभवआलियाभेदचिनाहीं ॥१॥**
**सोहंकारमननसंडीसाच ॥ मीपणनाहींतेथेंतूंपणकैंचें ॥ २ ॥**
**अहंतेंमीसोहंतेंगुज ॥ मुक्ताह्मणेचांगयाबुझ ॥ ३ ॥**

मीकोणहेंवोळखावें ॥ आपणआपणापहावें ॥ १ ॥ स्वरूपीं समरसावेंरात्रंदिवस ॥ धृ० ॥ त्रिगुणावरुतेंज्ञानपैंनिश्चित ॥ तयापैंनिरुतेंघेईबापा ॥ २ ॥ मुक्ताबाईह्मणेहोईतूंसावध ॥ सांगीतल्याबोधपुढीलतो ॥ ३ ॥

**चांगदेव**– मातोश्री, आपला बोध माझ्या हृदयांत पूर्णपणें ठसला ! आणि त्यामुळें चराचरीं मला विश्वंभर दिसूं लागून, मी त्या विश्वंभरस्वरूपीं समरस होऊन गेलों !

वळेनावरसेंवरवरपूरआला ॥ तेथेंजनबुडालाबाईयानो ॥ १ ॥ बुडालाबुडालापरीह्मणती ॥ बुडाल्याचीशुद्धि कोणीनघेती ॥ २ ॥ ऐलबुडालपैलबुडाला ॥ कोरड्याचडोहींजनबुडाला ॥ ३ ॥ ज्ञानदेवसांगडीमुक्ताबाईतारूं ॥ चांगापैलपारूपाववीला ॥ ४ ॥

**मुक्ताबाई**– चांगदेवा, हा बोध तुमचे अंतरीं पूर्णपणें ठसला असल्यामुळें, चौदाशें वर्षें जतन करून ठेविलेल्या तुमच्या देहाचें सार्थक होऊन त्यास अमरत्व प्राप्त झालें ! आतां शेवटीं तुह्मांला माझें इतकेंच सांगणें आहे कीं, तुम्ही हा देह सांडून त्वरित दुसरा जन्म घ्या, आणि मग श्रीपांडुरंगाची उपासना धरून सप्रेम चित्तानें त्याचें अर्चन करा ! श्रीपांडुरंगाच्या भक्तीशिवाय तुमच्या आंगीं सात्विकगुणांची प्रवृत्ति होणार नाहीं ! तुह्मी श्रीपांडुरंगाच्या भेटीला पंढरपुरीं जाऊन अत्यंत भक्तियुक्त अंतःकरणानें तेथें कीर्तन करा, ह्मणजे तुह्मी आपल्या ठायीं अपार पुण्य बांधून जीवन्मुक्त व्हाल ! श्रीहरिकीर्तनावांचून मोक्षधाम प्राप्त करून देणारें सोपें साधन या कलियुगांत दुसरें कोणतेंच नाहीं ! चांगदेवा,

नामवळेंदेहीआसोनिमुक्त ॥ शांतिक्षमाचित्तहरिभजनें ॥ १ ॥ दयाधराचित्तींसर्वभूतींकरुणा ॥ निरंतरवासना हरिरूपीं ॥ ध्रु० ॥ माधवमुकुंदहरिनामचित्तीं ॥ सर्वपैं मुक्तिनामपाठें ॥ २ ॥ मुक्ताईचेंधनहरिनामेंउच्चारु ॥ अवघाचिसंसारूमुक्तकेला ॥ ३ ॥

( पडदा पडतो. )

## प्रवेश सहावा.

### स्थळ– अलंकापूर.

(श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा आश्रम. श्रीज्ञानेश्वरमहाराज प्रवेश करतात.)

**ज्ञानेश्वर**– ( मनाशीं ) क्षीरसिंधुमंथनाचे वेळीं भगवान् श्रीविष्णूंनीं मोहनीरूप धारण करून दानवांना मोहित केलें, आणि देवांना अमृत पाजून संतुष्ट केलें; आणि त्याच मोहनीरूपानें भगवंतांनीं प्रवरातीरीं जेथें वास केला, आणि जेथें श्रीविष्णूंच्या अर्धनारीनटेश्वरस्वरूपाचें दर्शन घेण्याकरितां सर्व देवता प्रत्यहीं येत आहेत, अशा निवासक्षेत्रीं मोहनी राजासान्निध राहून, श्रीमद्भगवद्गीतेवर भावार्थदीपिका नांवाची मीं मऱ्हाटींत टीका लिहिली; आणि ती श्रीसद्गुरु निवृत्तिनाथांस दाखविली. तेव्हां सद्गुरुनाथ ती टीका पाहून परम संतोष पावून मला म्हणाले, ज्ञानदेवा, प्राचीन संस्कृत ग्रंथावर मऱ्हाटींत टीका लिहिलेली पाहण्यापेक्षां, तूं मऱ्हाटींत एकादा स्वतंत्र ग्रंथ लिहिलेला पाहावा, अशी माझी फार इच्छा आहे! कारण असा स्वतंत्र ग्रंथ तूं लिहिलास, ह्मणजे त्यांत तुझी बुद्धि, तुझें ज्ञान आणि तुझा अनुभव हीं आम्हांस पाहावयास सांपडतील! तेव्हां सद्गुरूंची आज्ञा शिरीं धारण करून, मीं सद्गुरूंना हो ह्मणून म्हटलें, आणि ग्रंथास सुरवात केली. सद्गुरु-आज्ञेप्रमाणें असा ग्रंथ माझ्या हातून कसा लिहिला जाईल, याची मला मोठी भीति वाटत होती. परंतु श्रीसद्गुरूंच्या आशीर्वादानें आणि श्रीपांडुरंगाच्या कृपेनें, मीं हातीं घेतलेला माझा अमृतानुभव ग्रंथ शेवटास जाऊन, तो मी सद्गुरुचरणीं अर्पण केल्या दिवसापासून माझ्या मनास मोठें समाधान वाटत आहे! आतां एकदां श्रीसद्गुरूंनीं या ग्रंथाचें अवलोकन करून त्याला मान डोलविली, म्हणजे माझ्या श्रमाचें साफल्य झाल्याबद्दल मला अत्यानंद वाटणार आहे! आज सद्गुरु निवांत चित्तानें माझा ग्रंथ अवलोकन करीत बसले आहेत, तेव्हां तेथवर जाऊन सद्गुरुमुखांतून आशीर्वादप्रसाद मिळाल्यास पहावा!

( इतक्यांत श्रीनिवृत्तिनाथ अमृतानुभव ग्रंथ पुढें घेऊन तो अवलोकन करीत बसले आहेत व त्यांच्याजवळ सोपानदेव व मुक्ताबाई हीं उभीं आहेत, असा पडदा उघडतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीनिवृत्तिनाथांस साष्टांग नमस्कार घालून, हात जोडून त्यांच्यापुढें उभे राहतात )

**निवृत्तिनाथ**– बाळा ज्ञानराया, वेदांच्या उपनिषदांचें या ग्रंथांत काढलेलें तूं सार आणि तुझ्या स्वानुभवाप्रमाणें चित्स्वरूपाचें यांत तूं केलेलें दिग्दर्शन पाहून, मला अत्यानंद वाटत आहे! बाळा, तूं या ग्रंथांत सांठविलेलें हें स्वानुभवामृत जे कोणी आवडीनें प्राशन करतील, ते साक्षात् परमेश्वरस्वरूप होऊन जीवन्मुक्त होतील, हा माझा पूर्ण आशीर्वाद आहे !

**ज्ञानेश्वर**– श्रीसद्गुरुसमर्था, आपल्या ह्या आशीर्वादानें मी कृतकृत्य झालों !

**निवृत्तिनाथ**– बाळा ज्ञानराया, काल रात्रीं तुला कांहीं विलक्षण स्वप्न पडल्याचें मुक्ताबाई सांगत आहे. तो स्वप्नचमत्कार तुझ्या तोंडून ऐकण्याची इच्छा आहे. तर सांग बरें असें कोणतें स्वप्न तूं पाहिलेंस तें ?

**ज्ञानेश्वर**– सद्गुरुसमर्था, कांहीं सकल सौभाग्यमंडित स्त्रिया माझ्यापुढें येऊन उभ्या राहिल्या आहेत, असें मीं स्वप्न पाहिलें ! मातोश्रींनो, तुह्मी कोण आहां ? असें मीं त्यांना विचारतांच, त्या एकामागून एक मी कृष्णा आहें, मी भीमा आहें, मी यमुना आहें, असें ह्मणूं लागल्या ! तें ऐकून जगतास पावन करणारीं तीर्थेंच स्त्रियांचीं रूपें घेऊन मला दर्शन देण्याकरितां आलीं आहेत, असें माझ्या मनांत आलें ! ही कल्पना खरी काय ह्मणून मीं त्यांना विचारतांच, त्यांनीं हो ह्मणून ह्मटलें ! तेव्हां मला आनंद होऊन मीं त्यांना साष्टांग नमस्कार घातला, आणि हात जोडून पुढें उभा राहून, आपली आज्ञा काय आहे, ह्मणून मी त्यांना विचारणार, तोंच त्या सर्व स्त्रिया एकदम अदृश्य झाल्या ! आणि मीही इकडे आश्चर्य करीत स्वप्नांतून जागा झालों ! तेव्हांपासून या विलक्षण स्वप्नाचा अर्थ काय असावा, याचा विचार मी हा वेळपर्यंत करीत आहें !

**निवृत्तिनाथ**— ज्ञानराजा, ह्या स्वप्नावरून मला असें वाटतें कीं, या भूतलावरील सर्व तीर्थें तुला दर्शनास बोलावीत आहेत ! ज्ञानराजा, मागें मी श्रीगैनीनाथांच्या आश्रमांत विद्याभ्यास करीत असतां, श्रीदत्तमहाराज, आदिगुरु मत्स्येंद्रनाथ आणि गुरु गोरक्षनाथ, यांचें पुण्यप्रददर्शन मला घडलें, हें मीं तुला सांगितलेंच आहे. तेव्हां सद्गुरूंचें दर्शन या दासाला पुन्हा केव्हां घडेल, असें मीं विचारिलें असतां, सद्गुरूंनीं मला असें सांगितलें कीं, निवृत्ति, तुझा बंधु ज्ञानदेव, याच्याबरोबर जेव्हां तूं तीर्थयात्रेस निघशील, तेव्हां मणिकर्णिकेच्या घाटावर तुला आमचें पुन्हा दर्शन होईल ! तेव्हां तुझ्या या स्वप्नाशीं, सद्गुरूंच्या वचनाचा मेळ बरोबर जुळतो ! तरी तीर्थांनीं व सद्गुरुनाथांनीं उभयतांनींही अनुज्ञा केल्याप्रमाणें आपण उद्यीक सर्वच तीर्थयात्रेस निघूं !

**ज्ञानेश्वर**- श्रीसद्गुरुनाथांची आज्ञा शिरसा वंद्य आहे ! पण प्रथम पंढरीस जाऊन तेथें श्रीपांडुरंगाचे चरण पाहून, मग क्रमाक्रमानें एकेका तीर्थाचें दर्शन घेण्याबद्दल सद्गुरुनाथांची अनुज्ञा असावी !

**निवृत्तिनाथ**— ज्ञानदेवा, तुझी तशी इच्छा आहे तर श्रीपांडुरंगाचें दर्शन घेऊन मग तीर्थयात्रेस निघूं !

**मुक्ताबाई**— सद्गुरुनाथा, या यात्रेंत भगवद्गुणानुवाद गाणाऱ्या एकाद्या श्रेष्ठ संताची संगति जर आपल्याला लाभेल, तर वाटेनें आपला कालक्षेप उत्तम होईल, असें मला वाटतें !

**सोपानदेव**— सद्गुरुनाथा, मुक्ताबाईचा हा विचार मला बरा दिसतो !

**ज्ञानेश्वर**— सद्गुरुनाथांची आज्ञा होईल तर पंढरीस गेल्यावर मी माझ्या लाडक्या नामदेवाला आपल्याबरोबर पाठविण्याविषयीं पंढरीनाथाला गळ घालीन ! जसा पूर्वयुगीं प्रल्हाद तसा या युगीं माझा नामदेव भक्तश्रेष्ठ असून, त्यानें आपल्या थोर भक्तीनें श्रीपांडुरंगाला ऋणी केला आहे !

**निवृत्तिनाथ** - ज्ञानराजा, नामदेवासारख्या प्रेमळ वैष्णवाच्या संगतीचा लाभ जर आपल्याला मिळेल तर याहून अधिक तें श्रीपांडुरंगापाशीं आपल्याला काय मागावयाचें आहे !

( इतक्यांत अलंकापुरींतील विसोबा खेचरादि ब्रह्मवृंद व अठरापगड जातींचे नागरिक प्रवेश करतात; व श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानेश्वरमहाराज, सोपानदेव व मुक्ताबाई यांस साष्टांग नमस्कार घालून, हात जोडून त्यांच्या पुढें उभे राहतात. )

**विसोबा खेचर**– अहो महाशांता शंभुस्वरूपा श्रीनिवृत्तिनाथा, अहो श्रीविष्णुस्वरूपा ज्ञानदेवा, अहो विधिस्वरूपा सोपानदेवा, पृथ्वीवरील अखिल क्षेत्रस्थांचें अनुमत घेऊन, त्यांच्या अनुज्ञेनें आह्मी अलंकापुरवासी ब्रह्मवृंद आणि इतर नागरिक जन, तुह्मां श्रेष्ठांच्या चरणीं अत्यंत लीन होऊन, मौंजीबंधनाविषयीं विज्ञप्ति करण्याकरितां सद्गुरुचरणीं धांव घेतली आहे ! मौंजीबंधनासाठीं विपुल द्रव्य आणि सकल सामुग्री आम्हीं देशोदेशींहून जमा केली आहे ! तरी श्रीसद्गुरूंनीं आमच्या विनंतीस मान देऊन, आह्मांस धन्य करावें ! आणि वेदशास्त्रोचित व्रतबंधसंस्कार झाल्यावर समर्थांनीं येथेंच अखंड वास करून आमचा उद्धार करावा !

**ज्ञानेश्वर**– अहो श्रेष्ठहो ! आह्मां जातिहीनांना संस्कारवैभव कशाला पाहिजे ? कर्मभूमींत येऊन देहबुद्धि निपटून गेली नाहीं, तर संस्कारादि अन्य साधनें नकळत व्यर्थ गेल्याप्रमाणें होत ! हा नरदेह मूळचाच ब्रह्म असून त्याची संस्कारानें रांगोळी कां करावी ? रत्नखचित स्थाली सुवर्णमय चुलीवर ठेविल्यावर आणि त्याखालीं चंदनकाष्ठअग्नि प्रदीप्त केल्यावर, मग त्या रत्नखचित स्थालींत पेंड करण्याचा आग्रह कां धरावा ? देहअहंकार नष्ट झाला नाहीं, तोंपर्यंत संन्यास घेऊन मुंडन केल्यानें नारायण कसा होणार ? सर्व देहांत उत्तमोत्तम असा हा नरदेह मूळचाच ब्रह्मानंदमूर्ति आहे ! याकरितां आह्मांला दीक्षा संस्कार साधन संपत्ति कांहीं एक नको आहे ! खेरीज आह्मांसारख्यांचा व्रतबंध शास्त्रनिषिद्ध आहे !

**विसोबा खेचर**– अहो विठ्ठलभक्तिप्रवर्तका ज्ञानराया, आह्मीं अलंकापूरवासी मूढजनांनीं पूर्वीं आपला अत्यंत द्वेष आणि छल केला ! परंतु आपण सद्गुरुसमर्थांनीं आमचे सर्व अपराध पोटांत

घालून, आपल्या पुनर्दर्शनानें जसें आह्मांस धन्य केलें, तसेंच या वेळींही आमची ही विनंती सद्गुरूंनीं मान्य करून आह्मांला धन्य करावें ! आह्मांस वृद्ध मान्य आपणच आहां ! तेव्हां तुम्ही समर्थांनीं आह्मां बालकांचा एवढा हट्ट पुरविलाच पाहिजे ! भर दोनप्रहरीं पराशर ऋषि गंगेमध्यें कैवर्त्तकाच्या कन्येशीं रत झाले आणि त्या कन्येच्या उदरीं श्रीव्यास जन्मास आले ! निमीच्या शापानें देववेश्येच्या उदरांत वसिष्ठमुनींनीं जन्म घेतला ! असे दाखले आम्ही कोठवर द्यावे ? तेजस्वी पुरुषांना तिळभरही दोष नाहीं ! तुम्ही विश्वगुरु पूर्ण तेजस्वी आहां ! तेव्हां आपल्याला निषिद्ध असें कांहींच नाहीं.

**ज्ञानेश्वर**– श्रेष्ठहो, श्रीव्यासवसिष्ठादिकांप्रमाणें आमच्या आंगांत सामर्थ्य नाहीं ! आणि तसें सामर्थ्य श्रीपंढरीनाथाच्या कृपेनें जरी आमच्या आंगीं आलें, तरी स्वसामर्थ्यबलावर जर आम्हीं वर्णाश्रमधर्माचें सेवन केलें, तर वर्णसंकर होईल ! आणि अशा वर्णसंकरास जर आम्हींच कारणीभूत झालों, तर मग कोण कोणाचें निवारण करील ? कोण कोणाला विचारील ? आणि मग वेदविधि कोठें उरतील ? या कलीमध्यें आमचा दाखला देऊन, विषयांध पुरुष आह्मांसारखेंच आचरण करतील ! तुह्मी द्विजश्रेष्ठ वेदशास्त्रांचे संरक्षक आहां ! धर्माचे प्रतिपादक आहां ! तेव्हां तुह्मां शुद्ध ब्रह्मवृंदांना आम्ही साष्टांग नमस्कार घालून, हेंच मागणें मागतों कीं, ह्या व्रतबंधाच्या आग्रहीं तुम्ही पडूं नये. षड्गुणैश्वर्ययुक्त दयानिधि श्रीपांडुरंग आमचें आराध्य दैवत आहे ! आणि श्रीपंढरीनाथाची शक्ति सर्वाधिष्ठात्री रुक्मिणीदेवी आमची मातोश्री आहे ! निर्गुण जें ब्रह्म तें आमचें स्थितीचें स्थान आहे ! आदिनाथापासून आमची संप्रदायपरंपरा आहे ! अवधूत चिन्ह निर्भय मुद्रा आह्मीं धारण केल्या आहेत ! आणि श्रीविठ्ठलाचें पवित्र नांव हेंच आमचें नित्याचें सेवन आहे ! तरी तुह्मी श्रेष्ठांनीं आह्मांला क्षमा करावी. या भूमंडळावरील सकलतीर्थांनीं आम्हांला दृष्टांत देऊन तीर्थाटन करण्याविषयीं अनुज्ञा

# अंक ४ था.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**- कऱ्हाड नगरी.

( राजवाड्यांत, राजा रामराजा याची स्त्री, राणी सीताबाई, श्रीमद्भागवत ग्रंथ पुढें घेऊन बसली आहे व तिच्या शेजारीं तिची सखी कमळा बसली आहे व पलीकडे दासी पिंगला उभी आहे असा पडदा उघडतो. )

**सीताबाई**- ( श्रीमद्भागवत ग्रंथाचीं पानें चाळतां चाळतां ) सखे कमळे, काल कुठपावतर वाचलं होतं तें आहे ना तुझ्या ध्यानांत ? सांग बरं कुठपावतर वाचलं होतं तें ?

**कमळा**- काल ना ? हो; आहे माझ्या ध्यानांत. उत्तानपाद राजाचा मुलगा ध्रुवबाळ, भगवंतांच्या स्वरूपीं एकाग्र मन करून समाधि लावून बसला होता, त्यामुळं सर्व विश्वाचे प्राण एकदम कोंडले ! तेव्हां सारे देव शेषशाई भगवंताला शरण गेले; नी प्रार्थना करूं लागले कीं, हे देवाधिदेवा, शेषशाई नारायणा, आमचं रक्षण कर ! ही प्रार्थना ऐकून भगवंतांनीं देवांना अभय दिलं, नी ते गरुडावर बसून मधुवनांत ध्रुवबाळापुढं येऊन उभे राहिले ! पण ध्रुवबाळ डोळे उघडून भगवंतांच्याकडे पाहीना ! तेव्हां भगवंतांनीं ध्रुवबाळाच्या हृदयांतून आपलं स्वरूप गुप्त केलं ! हृदयांतलं भगवंतांचं स्वरूप गुप्त होतांच ध्रुवबाळ नेत्र उघडून पाहूं लागला ! तों हृदयांत असलेलं भगवंतांचं स्वरूप आपल्यापुढं उभं आहे असं त्यानं पाहिलं ! तेव्हां तो गोंधळून गेला ! पुढें उभे राहिलेल्या भगवंतांची स्तुति करावी असं त्याच्या मनांत आलं; पण त्याला कांहीं सुचेना ! ध्रुवबाळाची उडालेली ही धांदल भगवंतांनीं ओळखून, त्यांनीं आपल्या हातांतील शंख ध्रुवबाळाच्या गालाला लावला ! तेव्हां ध्रुवाला वाणी फुटून तो

भगवंतांचा स्तव करूं लागला ! ध्रुवबाळानं केलेला भगवंतांचा स्तव तुम्हीं काल थोडासा वाचला, नी आज त्याच्यापुढं वाचायचा आहे ! कां ? खरंना पण ? सांगितलंना मीं बरोबर !

**सीताबाई**– कमळे, अगदीं बरोबर सांगितलंस ! काल ध्रुवबाळानं शेवटीं भगवंतांना असं म्हटलं कीं, हे देवा ! तूं साक्षात् कल्पतरु असं असून, देहादिकांनीं भोगण्यास योग्य, अशीं सुखं जीवांनीं तुजपाशीं मागणं हें अगदीं अयोग्य होय ! कारण जीवांना हीं सुखं नरकांत देखील शवतुल्य देहानं उपभोगितां येतात ! कमळे, आतां यापुढं ध्रुवबाळ देवाला म्हणतो,

**या निर्वृतिस्तनुभृतां तव पादपद्म-**
**ध्यानाद्भवज्जनकथाश्रवणेन वा स्यात् ।**
**सा ब्रह्मणि स्वमहिमन्यपि नाथ माभू-**
**त्किंत्वंतकासिलुलितात्पततां विमानात् ॥ १ ॥**

हे विश्वनाथा ! तुझ्या पादपद्माचं ध्यान केलं असतां, किंवा तुझ्या भक्तांच्या कथा श्रवण केल्या असतां, प्राप्त होणारं सुख, हें प्रत्यक्ष निजानंद ब्रम्हाच्या ठिकाणीं सुद्धां नाहीं ! मग स्वर्गांत जाऊन पुण्यांश संपल्यानंतर पुन्हा जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत सांपडणाऱ्या जीवांना तें मिळणं अशक्य होय, हें सांगणं नकोच ! बाई कमळे, यासाठीं ध्रुवबाळ ह्मणतो,

**भक्तिं मुहुः प्रवहतां त्वयि मे प्रसंगो**
**भूयादनंत महताममलाशयानाम् ।**
**येनांजसोल्बणमुरुव्यसनं भवाब्धिं**
**नेष्ये भवद्गुणकथामृतपानमत्तः ॥ २ ॥**

हे अनंता ! तुझ्या ठिकाणीं अखंड भक्ति करणाऱ्या शुद्धचित्त सत्पुरुषांच्या संगतीची मला नेहमीं जोड दे. म्हणजे अशा सत्समागमाच्या योगानं मला तुझें गुणकथामृत प्राशन करण्यास मिळेल ! नी त्यामुळं अनेक दुःखांनीं भरलेल्या ह्या भयंकर भवसागरांतून मी सहज तरून जाईन !

**तेन स्मरंत्यातितरां प्रियमीश मर्त्यं**
**ये चान्वदः सुतसुहृद्गृहवित्तदाराः ।**

ये त्वब्जनाभभवदीयपदारविंद-
सौगंध्यलुब्धहृदयेषु कृतप्रसंगाः ॥ ३ ॥

हे देवा कमलनाथा ईश्वरा ! ज्या भगवद्भक्तांचे मनोभृंग तुझ्या चरणकमलसुगंधाला लोलुप झाले आहेत, अशा संतांचा मला नेहमीं समागम दे. कारण, देवा, अशा संतांची संगत लाभली असतां, देहाचं नी पुत्रादिकांचं भान नष्ट होऊन भगवत्पदीं चित्त तल्लीन होऊन जातं! बाई कमळे, ऐकलंसना ! ध्रुवबाळ लहान होऊन त्यानं देखील साधुसंतांचा सहवास मला नित्य घडावा, हेंच मागणं देवापाशीं मागितलं ! नी आमच्या या कऱ्हाड नगरींत तर, साधुसंत दृष्टीस पडला कीं, भर दोनप्रहरीं त्याची धिंड काढून त्याला सुळावर देणं चाललं आहे ! हें ठीक नाहीं ! साधुसंतांची हत्या करणं हें घोर पाप आहे ! ही मृत्युलोकची वस्ती क्षणिक ! देवाच्या घरचं बोलावणं कधीं येईल याचा नेम नाहीं ! ह्मणून आयुष्य आहे तंवर पुण्याचरणानं वागत असावं ! मेल्यावर पापाचे झाडे यमाच्या घरीं द्यावे लागतील ! एक कीं दोन, कितीतरी प्रकारांनीं मी महाराजांना रोज हात जोडून प्रार्थना करून विनवीत आहें ! पण बाई, कुटिल मंत्र्यांनीं नित्य महाराजांच्या कानांशीं साधुसंतांची निंदा करून करून, महाराजांचे कान पूर्ण भरविले आहेत ! त्यामुळं अलीकडे तर महाराज माझं बोलणं ऐकून देखील घेईनासे झाले आहेत ! बाई कमळे, या हरिभक्तांच्या हत्येमुळं नगरांत अकालीं मृत्यु होऊं लागले आहेत ! कुत्रीं दिवसा रात्रीं रडूं लागलीं आहेत ! अश्वशाळेंतील अश्व नी गोशाळेंतील गाई नेत्रांतून अश्रु ढाळीत आहेत ! वासरं स्तनपान करीत नाहींशीं झालीं आहेत ! एक ना दोन, अशीं हजारों अशुभ चिन्हं अलीकडे सर्वत्र दिसूं लागलीं आहेत ! नी या सर्व अरिष्टांचं फळ आह्माला लवकरच मिळेल अशी मला आतांशीं मोठी धास्ती वाटूं लागली आहे ! ( इतक्यांत राजवाड्याबाहेर गलबला होतो तो ऐकून ) कमळे, यावेळीं राजवाड्याबाहेर ही कसली ग ओरड ऐकूं येत आहे असं कांहीं ऐकलं ह्मणजे मला धडकीच भरते ! पिंगले, बाहेर जाऊन बघ बाई हें काय आहे तें ! (पिंगला निघून जाते.) कमळे,

साधुसंतांचं दर्शन घेऊन त्यांचं चरणतीर्थ घेतल्याखेरीज तोंडांत अन्न घालायचं नाहीं, हा माझ्या बाबांचा नेम मी माझ्या आठवणींत आज पंचवीस वर्सं पाहतें आहे ! नी त्यामुळं मी जंवर चाकणेस होतें तंवर मला नित्य साधुसंतांचं दर्शन घडत असे ! लग्न झाल्यावर चाकणेहून मी या कऱ्हाडनगरींत आल्यावर देखील पहिलीं दहा वर्सं, जंवर महाराजांची साधुसंतांवर निष्ठा होती, तंवर कधीं सठीं-सामासीं तरी साधुसंतांचं दर्शन मला होत होतं ! पण या उभ्या दोन वर्सांत, साधुसंतांना पाहून महाराजांच्या तळव्याची आग मस्तकाला जाऊं लागल्यापासून, कमळे, मला एक दिवस देखील कुणा सत्पुरुषाचं दर्शन झालं नाहीं ! (इतक्यांत पिंगला परत येते, तिला उद्देशून) पिंगले, काय ग बाई, कसली ग ओरड आहे ?

**पिंगला**– बाईसाहेब, नगरांतील ब्राह्मण नी दुसरे नागरिक राजवाड्यापुढं जमून, आह्मांला राणीसाहेबांची भेट करवा, आह्मांला राणीसाहेबांची भेट करवा, असं मोठ्यानं ओरडत आहेत !

**सीताबाई**– पिंगले जा, नी त्या ब्राह्मणांना दंडवत घालून, इथवर येऊन माझ्या हातून पूजा ग्रहण करावी अशी माझी प्रार्थना आहे, असं त्यांना सांग; नी त्यांना इथवर घेऊन ये. नी इतर नागरिकांना ह्मणावं, तुह्मी स्वस्थ चित्तानं आपापल्या घरीं जा. ब्रह्मवृंदांच्या मुखांतून जशी आज्ञा निघेल तसं वागायला आह्मी तयार आहों ! (पिंगला निघून जाते.)

**कमळा**– बाईसाहेब, बऱ्याच दिवसांनीं आजच महाराज नगर सोडून शिकारीला गेले ! त्यांना गेल्याला अजून प्रहर देखील झाला नाहीं ! तों इतक्यांतच आपल्या नगरावर असं कोणतं संकट ओढवलं असेल बरं, कीं सर्व नागरिकांनीं आपल्या चरणाजवळ इतक्या तातडीनं धांव घेतली ?

**सीताबाई**– कमळे, काय असेल तें असो ! मला तर किनई आतांशीं नित्य वेडींवांकडीं स्वप्नं पडूं लागलीं आहेत ! मग आमच्यावर अखेर असं कोणतं भयंकर संकट ओढवणार आहे तें देवाला ठाऊक ! (इतक्यांत पिंगला ब्राह्मणांस घेऊन येते, व

अनुज्ञा मागण्याकरितां आह्मी यावेळीं येथें आलों आहों! तर आह्मांला सुखानें निरोप दे!

**सीताबाई**– श्रेष्ठहो! महाराजांना नित्य प्रार्थना करून या पापमार्गांतून त्यांचं मन वळविण्याचा मी प्रयत्न करीत आहें! नी आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं परवां, केव्हां तरी परमेश्वर त्यांच्या अंतःकरणांत सद्बुद्धि जागृत करील, अशा आशेवर मी दिवस कंठीत आहें! ह्मणून माझं तुह्मां श्रेष्ठांपाशीं नी सर्व नगरवासी जनांपाशीं पदर पसरून हेंच मागणं आहे कीं, तुह्मी धीर न सोडतां कांहीं दिवस तरी या नगरांत राहून आमच्या हातून चरणसेवा करून घ्यावी! तुह्मी आमचे मायबाप! तुमच्या कृपेच्या सावलींत आह्मी नांदत आहों! अहो महाभागा, तुमच्या पुण्याचरणाचा अग्नि या नगरांत रात्रंदिवस पेटला असून, त्यांत महाराजांच्या हातून नित्य घडणाऱ्या उदंड पापराशी जळून खाक होत आहेत! नी त्यामुळंच महाराजांचं यश, बल नी कीर्ति हीं इतके दिवस स्थिर राहिलीं आहेत! पण तुह्मी जर आह्मांला सोडून गेलां, तर मग आमचा प्रतिपाळ कोण करील? अहो श्रेष्ठहो, आह्मी अनंत अपराधी आहों! पण आमचे अपराध पोटांत घालून, तुह्मीं मनांत आणिलेला हा विचार माझ्यासाठीं ह्मणून तरी कांहीं वेळ लांबणीवर टाका, हेंच माझं तुमच्यापाशीं पुन्हां पुन्हां पदर पसरून मागणं आहे!

**दुसरा ब्राह्मण**– देवी, तुला काय सांगावें? हें सांगतांना माझा कंठ भरून येत आहे! आज प्रातःकाळीं राजसेवकांनीं अत्यंत तेजःपुंज अशा चार साधूंना, ते नगरांतून हिंडत असतां, धरून महाराजांच्या पुढें नेलें. तेव्हां महाराजांनीं, यांची नगरांतून धिंड काढून, यांना एका घटकेच्या आंत सुळावर चढवा, अशी आज्ञा केली! तेव्हां दूतांनीं तत्क्षणींच त्या साधूंच्या मुसक्या बांधून, त्यांच्या खांद्यावर सूळ दिले, आणि नगरांतून त्यांची धिंड काढीत ते त्यांना वधस्थानाकडे घेऊन गेले! आपल्या आज्ञेप्रमाणें राजदूतांच्या हातून काम झटपट होतें किंवा नाहीं, हें पाहण्याकरितां, महाराज शिकारीकरितां नगराबाहेर पडण्यापूर्वी सर्व

त्यांस बसावयास आसन आणून घालते. सीताबाई उठून ब्राह्मणांस नमस्कार करते. ते तिला 'अखंड सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद देतात. ) महाराज, या आसनावर बसून शांत व्हा, नी माझ्या हातून पूजा ग्रहण करून मग प्रसन्नचित्तानं जी आपली अनुज्ञा असेल ती आह्मां सेवकांना कथन करा ! ( सर्व ब्राह्मण आसनस्थ होतात; इतक्यांत पिंगला पूजासाहित्य आणून देते. सीताबाई त्यांची पूजा करून त्यांचें पादतीर्थ घेते. )

**पहिला ब्राह्मण**– शुभं भवतु ! हे देवी ! राज्यांत व्याघ्ररूपी प्रधान आणि ग्रामसिंह सेवक जमल्यावर, आह्मी प्रजा सुखानें कशी नांदणार ? जो राजा आपल्या राज्यांतील लोकांचीं मनें संतुष्ट ठेवितो, त्यांना आपले पंचप्राण समजून त्यांचा प्रतिपाळ करतो, त्यालाच राजेश्वर ह्मणावें ! सत्कीर्तिरूप धर्मपत्नीचा त्याग करून, ज्या राजानें अनीतिदासीचा पदर धरला, त्या राजाच्या हातून प्रजापालन कसें होणार ? महाराजांचें चित्त अलीकडे अधर्मपंकानें मलिन झालें आहे ! सुहृद, प्रजा आणि भूसुर यांच्या अकल्याणाचें चिंतन महाराज अलीकडे करूं लागले आहेत ! जे आमचे महाराज पूर्वी शरत्कालीच्या चंद्राप्रमाणें निर्मळ आणि आकाशांतील ध्रुवासारखे अचल होते ! जे पूर्वी पुण्यशील आणि सत्यवचनी होते ! जे पूर्वी हातीं दानशस्त्र धरून सकल प्रजाजनांचें दारिद्र्य छेदून टाकीत होते ! ज्यांच्या दानधर्माचीं ओझीं वाहतांना याचक कंटाळत होते ! ज्यांच्या दर्शनानें आह्मां प्रजेचा आनंद गगनीं मावत नव्हता ! ज्यांची मधुर वाणी ऐकून आमचे कर्ण सदा तृप्त होत होते ! अशा आमच्या परमपूज्य पुण्यश्लोक महाराजांनीं अलीकडे दुष्टसंग्रहाचें आणि साधुनिग्रहाचें व्रत स्वीकारून नित्यशः साधुसंतांचा छल करून त्यांना सुळी देण्याचा जो क्रम चालविला आहे, तो या आमच्या नेत्रांनीं आह्मांला यापुढें पहावेनासा झाला आहे ! राज्यांत अनेक अशुभ चिन्हें होऊं लागल्याचें, देवी, तुझ्या कानावर आलें असेलच. तेव्हां आह्मी सर्व नागरिकांनीं हें राज्य सोडून दूरच्या रामराज्यांत जाण्याचा विचार केला आहे ! आणि हे देवी, या गोष्टीस तुझी

शिकारी लोकांस आणि इतर परिचारकांस पुढें पाठवून देऊन, आपण स्वतः एकटेच मुद्दाम वधस्थानाकडे गेले! तों तेथें आपल्या आज्ञेप्रमाणें राजदूतांनीं सर्व तयारी केली असून, चांडाळही सूळ रोंवून, साधूंना सुळांकडे फरफर ओढून नेत आहेत असें महाराजांनीं पाहिलें! साधूंचा हा चाललेला छळ नेत्रांनीं पाहून महाराजांचें मुख पुत्रजन्माचा आनंद झाल्याप्रमाणें सुप्रसन्न झालें! आणि त्या प्रसन्नमुद्रेनें महाराजांनीं, हं! चढवा सुळांवर! अशी चांडाळांना आज्ञा केली, आणि त्या साधूंच्या अंतकाळच्या यातना डोळे भरून पहात महाराज तेथें कौतुकानें उभे राहिले! त्यावेळीं सकल नगरवासी नेत्रांतून टपटप अश्रु ढाळीत अधोवदन उभे राहिले! इतक्यांत त्या साधूंनीं परम क्रोधानें सर्व नागरिकांसमक्ष महाराजांना त्यांच्या तोंडावर असें ह्मटलें कीं, हे दुष्ट राजा, आह्मां निरपराध्यांचा तूं निरर्थक प्राणघात करीत आहेस! तरी आठ प्रहरांच्या आंत तूं पुत्रशोकानें विव्हळ होशील, हा आमचा तुला घोर शाप आहे!

**तिसरा ब्राह्मण**– देवी, हा घोर शाप ऐकूनही महाराजांच्या अंतःकरणांत यत्किंचित् भीति अथवा खेद उत्पन्न न होतां, किंवा त्या साधूंना शरण जाऊन त्यांचे पाय धरण्याची सद्बुद्धि त्यांच्या हृदयांत जागृत न होतां, उलट ते अधिकच कोपास चढले! आणि क्रोधानें लाल होऊन त्यांनीं त्या साधूंस लत्ताप्रहार केला! आणि असे काक मीं आजपर्यंत पुष्कळ पाहिले आहेत! असें ह्मणून त्यांनीं चांडाळांस खूण केली! त्याबरोबर चांडाळांनीं तत्क्षणींच त्या साधूंस मोक्षधामीं पाठविलें! देवी, महाराजांनीं त्यावेळीं आह्मां नागरिकांना त्या साधूंची करुणा भाकण्यासही वेळ दिला नाहीं! (हा वृत्तांत ऐकत असतां सीताबाईचें देहभान नष्ट होत जातां जातां शेवटीं ती बेशुद्ध होऊन पडते.)

**कमळा**–(सीताबाईच्या डोळ्यांस पाणी लावून) अहो श्रेष्ठहो! हा प्राणघातक वृत्तांत बाईसाहेबांना सांगून, कायहो हा भयंकर प्रसंग तुह्मीं आणला! बाईसाहेब! बाईसाहेब! अहो बाईसाहेब!

(इतक्यांत राजपुत्र बाळकृष्णा आई! आई! अशा हाका मारीत प्रवेश करतो; व सीताबाईजवळ येऊन पाहतो तों ती बेशुद्ध पडली आहे असें त्यास दिसतें.)

**बाळकृष्णा**–कमळे, माझ्या आईला कुणी काय केलं ग! तिला काय ग झालं! ती असं कां करूं लागली? आई! आई! आई ग! ए आई!

**कमळा**–बाईसाहेब, युवराज हाका मारीत आहेत! त्यांचेकडे डोळे उघडून पहा! तुमची ही अवस्था पाहून ते फार भेदरून गेले आहेत! तर उठून त्यांना जवळ घ्या कीं हो! (बाळकृष्णास जवळ घेऊन त्याचे तोंडावरून हात फिरवून) महाराज! तुह्मी भिऊं नका बरं! आईसाहेबांना सहज आमच्याशीं बोलतां बोलतां एकदम चक्कर आली आहे! त्यांच्या डोळ्यांना मीं आतां पाणी लावलं आहे! त्या आतां सावध होतील बरं!

**बाळकृष्णा**–आई! ए आई! आईग! माझ्याशीं बोल कीं ग! माझ्यावर रागावली आहेस, ह्मणून का ग मला ओ देत नाहींस? आई! ए आई! माझ्यावर अशी रागावूं नको ग!

**सीताबाई**–(मुलाचा शब्द ऐकून खडबडून उठून व त्याला हृदयाशीं घट्ट धरून आणि त्याचें चुंबन घेऊन) माझ्या राजहंसा, भिऊं नको! मला किनई भोंवळ आली होती! बाळा, मला सोडून इतका वेळ कुठें रे गेला होतास? मी तुझी पाखरासारखी केवढा वेळची वाट पाहात आहें! बाळ, महाराज आले कारे शिकारीहून परत!

**बाळकृष्णा**–आईग! मी महाराजांच्याबरोबर शिकारीला गेलों, ह्मणून महाराज माझ्यावर रागावले ग! आणि माझ्या अंगावर ओरडून, चल चालता हो घरीं! असें ह्मणून त्यांनीं मला चार कोसांवरूनच परत पाठविलें! आणि मी आतां नगरांत येणार नाहीं, असें मला रागारागानें ह्मणाले! आई, महाराज आतांशीं मला असं हिडीसपिडीस कां ग करूं लागले आहेत? मजवरचा लोभ त्यांनीं कां ग कमी केला? आई, पण महाराजांप्रमाणें तूं नको हो माझ्यावरची माया पातळ करूं! (सीताबाईला चिकटून) आई, तूं नाहीं ना मला दूर लोटणार!

**सीताबाई**– बाळा, तूं माझे पंचप्राण! तेव्हां तुला दूर लोटून मी कशीरे जिवंत राहीन? बाळा, यापुढं तूं बरीक मला सोडून क्षणभर देखील दूर जात जाऊं नको बरं! बाळ, या श्रेष्ठांना नमस्कार कर, नी यांचं चरणतीर्थ घे! म्हणजे माझ्या राजसा, यांच्या आशीर्वादानं महाराज तुजवर पूर्वीप्रमाणं प्रेम करूं लागतील बरं! ( ब्राह्मणांस उद्देशून ) श्रेष्ठहो! मी आपलं हें बाळ तुमच्या ओटींत घातलं आहे! तर हें आपलंच आहे असं समजून याला आपला आशीर्वादप्रसाद द्या! ( बाळकृष्णा ब्राह्मणांची पूजा करून त्यांचें चरणतीर्थ घेतो. )

**पहिला ब्राह्मण**– दीर्घायुष्मान् भव! युवराजा, तो जगचालक प्रभु तुला उदंड आयुष्य देवो! आणि तुझ्या हातून सकल राजकुलाचा उद्धार होवो। देवी, तूं चतुर आहेस! तूं विवेकी आहेस! तेव्हां तुला आम्ही काय सांगणार? अनन्यभावानें तूं परमेश्वराला शरण जा; त्याचा धांवा कर; ह्मणजे तो भक्तवत्सल प्रभु तुझ्याकडे कधींही पाठ करणार नाहीं!

**सीताबाई**– महाराज, आपणही या आपल्या धर्माच्या कन्येकरितां देवाला संकट घाला! ह्मणजे तुमच्या भिडेस्तव देव आमचा सांभाळ करील! ( इतक्यांत एक राजसेवक प्रवेश करतो. )

**राजसेवक**– ( लांब उभा राहून मुजरा करून ) बाईसाहेब, महाराजांच्या आज्ञेवरून मी राजकार्याकरितां जात असतां, येथून आठ कोसांवर वीस हजार संतांचा मेळा बरोबर घेऊन, अत्यंत तेजःपुंज असे एक बालवयी संतश्रेष्ठ आपल्या नगराकडे येतांना माझ्या दृष्टीस पडले! तेव्हां मीं त्यांच्यापुढें लोटांगण घालून आणि हात जोडून, महाराज, आपण इकडे कोणीकडे जात आहां? ह्मणून मीं त्यांना विचारिलें. तेव्हां आमच्या चाकणच्या महिपतरावांची कन्या, सीताबाई, या कऱ्हाडनगरींत राहात आहेत; महिपतरावांच्या आग्रहावरून त्यांना भेटण्याकरितां आह्मी कऱ्हाडनगरींत जात आहों, असें ते मला ह्मणाले! तेव्हां मी त्यांच्यापुढें आडवा होऊन, त्यांना शरण जाऊन, नगरांत न येण्याविषयीं त्यांना प्रार्थना केली; आणि महाराजांच्या अंतःकर-

णांत साधुसंतांबद्दल सांप्रत अप्रीति उत्पन्न झाली असून, प्रत्यहीं अनेक साधुसंत कऱ्हाडनगरींत राजाज्ञेनें सुळावर जात आहेत, म्हणून मीं त्यांना सांगितलें! तेव्हां त्यांनीं माझी प्रार्थना मान्य केली आणि तेथेंच शिबिरें देऊन राहण्याचें त्यांनीं ठरविलें! आणि मला ह्मणाले, तुला सीताबाई ठाऊक आहेत काय? यावर मीं हो ह्मटलें. तेव्हां ते मला ह्मणाले, मी अलंकापुरीचा ज्ञानदेव, त्यांच्या दर्शनाकरितां आलों आहें; तर कृपा करून येथवर येऊन मला दर्शन देऊन जावें, असा माझा निरोप त्यांना कळीव! तेव्हां मीं कळवितों असें म्हणून त्यांचे चरणीं मस्तक ठेविलें आणि त्या संतश्रेष्ठांचा निरोप बाईसाहेबांना सांगण्याकरितां मी तसाच मुद्दाम माघारा फिरलों! श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा निरोप बाईसाहेबांच्या कानांवर मीं आतां घातला आहे, तरी राजकार्याकरितां निघून जाण्याची मला अनुज्ञा असावी! (सीताबाई मानेनें बरें ह्मणून सुचविते व सेवक निघून जातो.)

**तिसरा ब्राह्मण**– देवी, अशा संकटसमयीं, हे साक्षात् लक्ष्मीकांत श्रीविष्णूच तुला संकटमुक्त करण्याकरितां आणि आह्मां सर्वांचा उद्धार करण्याकरितां धांव घेत इकडे आले आहेत, असें समज! तर आतां विलंब न करतां, युवराजाला बरोबर घेऊन, त्या संतश्रेष्ठांच्या दर्शनाला जा, आणि त्यांच्या ओटींत युवराजाला घाल! ह्मणजे सकल अरिष्टांतून तूं मुक्त होशील!

**बाळकृष्णा**– आई ग, आजोबांनीं ज्या जगद्गुरूंची सेवा तुला करावयास सांगितली आहे, ज्यांचें स्वरूप ध्यानीं आणून, नित्य प्रातःकाळीं ज्यांच्या नांवाचा तूं सहस्रजप करीत असतेस, ज्यांच्या अद्भुत लीला मला सांगून ज्या श्रेष्ठांचें नांव मजकडूनही दिवसांतून तूं दहापांच वेळां घेववीत असतेस, तेच का ग हे श्रीज्ञानेश्वरमहाराज?

**सीताबाई**– बाळा, तेच हे जगद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराज बरं!

**बाळकृष्णा**– आई, तर मग मला त्यांचें एकदां दर्शन करव ग! चल, आपण त्या जगद्गुरूंच्या शिबिराला जाऊं! त्यांची

प्रार्थना करून त्यांना आपल्या वाड्यांत घेऊन येऊं ! ते येथें आले ह्मणजे त्यांचें पूजन करून त्यांना भोजन देऊं ! आणि मग त्यांचा शेषान्नप्रसाद भक्षण करूं !

**सीताबाई**– बाळा, हा तुझा विचार कसा रे घडून येईल ! आपण हीन, दीन, महापातकी, दुष्ट आहों ! साधुसंतांचा नित्य वध करून आपण पातकांचे मंदराचलाएवढे ढीग किरे रचले आहेत ! तेव्हां बाळा, आपल्यासारख्या घोर पातक्यांच्या घरीं ते महावैष्णव संत कोठले रे यायला ! एवढं कुठलं रे बाळा आपलं थोर भाग्य ! बाळा, आपण कडूंकारलीं किरे पेरलीं आहेत, त्यांना अमृतफळं कशीं बरं येतील ? खेरीज महाराजांची प्रार्थना करून त्यांच्याकरवीं या संतश्रेष्ठांना घरीं आणविलं असतं, तर बाळा, महाराजही या वेळीं नगरांत नाहींत !

**बाळकृष्णा**– आई, महाराज नसले ह्मणून काय झालं ? मीच आमंत्रण देतों त्यांना ! महाराज काय आणि मी काय एकच !

**सीताबाई**– बाळा, तूं अज्ञान लहान मूल ! तुझं आमंत्रण ते कसं बरं मान्य करतील ?

**बाळकृष्णा**– आई, पण चलेनास बरें मला घेऊन तेथवर ! मी पोर ह्मणून माझें आमंत्रण त्यांनीं नाहींच पतकरलें, तर तेथवर गेल्यानें संतदर्शनाचें थोरपुण्य तरी घडेल ! आई, संतदर्शनाचा महिमा थोर आहे, असें तूंच परवां वाचीत होतीसना ? आई, संतांना वारंवार नमस्कार केल्यानें सकल दोष निवून जातात !

**सीताबाई**– बाळा, जाऊं बरं आपण त्यांच्या दर्शनाला. ( ब्राह्मणांस उद्देशून ) श्रेष्ठहो, महाराजांच्या अनुज्ञेशिवाय संतदर्शनाला जाणं हा शास्त्रांत अधर्म गणला आहे ! तर हा अधर्म मीं कसा आचरावा ?

**दुसरा ब्राह्मण**– देवी, पतिआज्ञेवांचून स्त्रियांनीं कोणतेंही कर्म करूं नये, असा पतिव्रताधर्म शास्त्रांत सांगितला आहे खरा, तरीपण ज्या योगानें श्रीहरिचरण जोडतील, तो जरी अधर्म असला तरी तो अवश्य आचरावा ! देवी, भरतानें मातृवचन ऐकलें असतें तर प्रभु रामचंद्राचे चरण त्याला जोडले असते काय ?

पितृवचनाचा प्रल्हादानें अव्हेर केला नसता तर भगवान् नरहरि त्याला कसे प्रसन्न झाले असते ! देवी, बळीनें शुक्रवचनाचा अनादर करून श्रीवामनाला त्रिपाद दान अर्पण केलें ! गौळणी भ्रतारांना टाकून श्रीकृष्ण प्रभूच्या रूपीं तल्लीन झाल्या ! ऋषि-पत्न्यांनीं भ्रतारांचें वचन मोडून श्रीकृष्ण प्रभूला अन्न चारलें ! त्यांनीं जर शास्त्रवचन पाळिलें असतें, तर श्रीहरिचरण त्यांना अंतरले असते ! म्हणून म्हणतों, देवी, शास्त्रविचार मनांत आणून या दुर्लभ संतदर्शनाचा अव्हेर करण्याचें कांहीं कारण नाहीं ! संतसेवन हेंच शास्त्राचें मुख्य सार आहे ! आणि संत-समागम हाच नित्य वैकुंठवास आहे !

**सीताबाई**– महाराज, आपण अनुज्ञा करीत आहां, हें साक्षात् भगवंतांचंच वचन आहे असं समजून, मी या माझ्या बाळाला बरोबर घेऊन, आतांच संतदर्शनाला जातें ! ( सीताबाई व बाळकृष्णा ब्राह्मणांस नमस्कार करितात. )

**पहिला ब्राह्मण**– देवी, तुझें ईप्सित तुला प्राप्त होवो ! आणि युवराजा, संतरूपेनें तूं दीर्घायु होऊन या भूतलावर उदंड-काल राज्य कर ! ( सर्व ब्राह्मण निघून जातात. )

**सीताबाई**– कमळे, चल बाई ! या माझ्या राजहंसाला कडेवर घेऊन चल माझ्याबरोबर ! ( कमळा बाळकृष्णास कडेवर घेण्याकरितां पुढें होते; पण बाळकृष्णा मागें सरतो. )

**बाळकृष्णा**– आई, मी नाहीं हिच्या कडेवर बसणार ! मी चालतच येईन ग !

**सीताबाई**– बाळा, असं काय करावं बरं ? आपल्याला फार दूर जायचं आहे ! इतक्या लां कसा बरं चालशील ? तूं चालतांना थकशील ! तुझे पाय दमतील ! कमळेच्या जवळ जायचं नसलं, तर माझ्या सोनुल्याला मीच कडेवर घेतें ! ( त्याला उचलून कडेवर घेऊन ) आतां झालं ना ? (जातां जातां) कमळे, माझ्या बाळासारखं गुणाचं बाळ त्रिभुवनांत सांपडायचं नाहीं बरं ! ( त्याचें चुंबन घेते. )

( सर्व निघून जातात व पडदा पडतो. )

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळ–कऱ्हाडनगरीजवळचा प्रदेश.

(श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानेश्वरमहाराज, सोपानदेव, मुक्ताबाई, नामदेव, गोराकुंभार, विसोबाखेचर, सावतामाळी, नरहरि सोनार, सेना न्हावी, नरसी मेहता, चोखामेळा, इत्यादि तीर्थयात्रेस निघालेले संत हातीं टाळ, विणा, मृदंग व पताका घेऊन भजन करीत प्रवेश करतात.)

**नामदेव**–

**मारगींचालतांउगलेंनचालावें ॥ वाचेंसीह्मणावेंराम-कृष्णा ॥ १ ॥ हरिबोलाहरिमुकुंदमुरारी ॥ माधवनरहरि-केशीराजा ॥ २ ॥ ऐसाछंदवाचेसर्वकाळजया ॥ ना-माह्मणेतयादोषकैंचे ॥ ३ ॥**

**नामगाऊंनामध्याऊं ॥ नामाविठोबालावाहूं ॥ १ ॥ आ-ह्मीदेवाचेदेवाचे ॥ दासपंढरीरायाचे ॥ २ ॥ टाळदिंडी घेउनीहातीं ॥ केशवराजगाऊंगीतीं ॥ ३ ॥ नामाह्मणे लाखोलीसदा ॥ अनंतनामेंवाहूंगोविंदा ॥ ४ ॥**

हे दीनदयाळा, पतितपावना, भक्तवत्सला, करुणाघना, पंढरीनाथा, तूंच माझी जनकजननी, तूंच माझा इष्टमित्र, तूंच माझें गणगोत, तूंच माझें कुलदैवत, तूंच माझें व्रततीर्थ, माझा धर्म, अर्थ, काम आणि माझें मोक्षसाधन काय तें तूंच! हे अंतरसाक्ष चैतन्यघना देवा, हें खरें का खोटें, हें तुलाच ठाऊक! असें असून

**कांगाकेशवराजामोकलिलेंमातें ॥ नयेसीसांगातेंसांभा-ळीत ॥ १ ॥ चिंतातुरथोरपडलोंयेपरजनीं ॥ नादिसेमा-झेंकोणीजिवलग ॥ २ ॥ फुटोनीहृदयहोतीदोनभाग ॥ बहुतउद्वेगवाटताती ॥ ३ ॥ नामाह्मणेआपुल्याअनाथा सांभाळी ॥ येऊनिहृदयकमळींराहेंमाझ्या ॥ ४ ॥**

**ज्ञानेश्वर**– विष्णुदासा नामदेवा, सावध हो! सावध हो! अरे, प्रेमजिव्हाळा तुझे पोटीं असतां तूं वरचेवर कां बरें खंती

करतोस ? हे भक्तराजा, तुझा सुखानंद त्रिभुवनचालक पंढरीनाथ तुझ्या हृदयीं सगुणरूपानें नांदत असतां, तूं कां कष्टी होतोस ? मृगनाभींत सुगंध असून, त्या सुगंधाकरितां अज्ञानानें तो जसें घोर वन धुंडीत बसतो, तसा तूं आत्मस्वरूपाला न ओळखून श्रीविठ्ठलाच्या वियोगदुःखानें व्यर्थ कां शिणतोस ? अरे, दुर्दैवी प्राण्याच्या घरांत अगणित द्रव्य पुरलें असून, तें नेत्रांनीं न दिसल्यामुळें, तो जसा उपवास करीत बसतो, तशी तुझी स्थिति झाली आहे !

**नामदेव**– बापा ज्ञानराजा, जो सनकादिकांचें निजध्यान, नीलग्रीवांचें प्रियभूषण, नारद तुंबरु ज्याचे गुणानुवाद रात्रंदिवस सप्रेम अंतःकरणानें गातात, तो पुंडलीकाचा वरदानी, रुक्मिणीकांत, कासेला पितांबर वेष्टून, कटावर दोन्ही कर ठेवून, जगदुद्धाराकरितां विटेवर उभा आहे, तो भक्तकैवारी विठ्ठलराजा मला दाखवा ! अहो ज्ञानसागरा, मी ज्ञानशून्य आहें. मला योगयुक्तिसाधन माहीत नाहीं. माझी विश्रांति काय तो जगज्जीवन श्रीपांडुरंग ! तो मला दाखवा ! त्याच्याकरितां माझे पंचप्राण व्याकूळ होत आहेत !

**ज्ञानेश्वर**– प्रेमळ भक्ता नामदेवा, तो अविनाशी, सर्वव्यापक, सर्वसाक्षी, जगच्चालक प्रभु, गगनाप्रमाणें सर्वत्र सर्वदेशीं व्यापक आहे ! तो जेथें नाहीं, असें एकही ठिकाण नाहीं ! तो तुझ्या हृदयांत नांदत आहे ! तर हे वैष्णवश्रेष्ठा नामदेवा, भेदभाव सांडून हृदयीं अद्वैत ओळख !

**नामदेव**– अहो ज्ञानराया, हें तुमचें बोलणें मला लटकें वाटतें ! चातक ज्याप्रमाणें आकाशांतून कोसळणारें मेघजलच प्राशन करितात किंवा पतिव्रता ज्याप्रमाणें पतीवांचून इतरांच्या कथा कानानें ऐकत नाहींत, त्याप्रमाणें माझें मन श्रीपंढरीनाथावांचून इतरत्र रमतच नाहीं ! ज्ञानराया, सर्व पदार्थांत मृत्तिका भरलेली आहे, तशी ती साखरेंतही आहे; म्हणून साखर खावयास मागत असलेल्या बालकास, साखरेऐवजीं मृत्तिका दिली, तर त्या मृत्तिकेंत त्याला साखरेची गोडी लागून, त्याचें समाधान

होईल काय ! तसें आपण जें ज्ञान मला सांगत आहां, तें जरी खरें आहे तरी,

सर्वभावेंमजतेंचिरूपआवडे ॥ जेंपुंडलिकापुढेंउभेअसे ॥ १ ॥ तोमाझाविठ्ठलुदावादृष्टिभरी ॥ आसमीनकरीआणिकांची ॥ २ ॥ कायावाचामनेंतोचिमजव्हावा ॥ गीतींगातांजिवासुखवाटे ॥ ३ ॥ ऐकावाश्रवणींपहावा तोचिनयनीं ॥ नवजावाजवळूनिदुरीकोठें ॥ ४ ॥ सर्वसुखमजआहेत्याचेपायीं ॥ आणिकांच्यावाहींनपडेकदां ॥ ५ ॥ तेथेंमाझेंमनरंगलेंसेभावें ॥ सुखयेणेंजिवेंदेखिलेंडोळां ॥ ६ ॥

**ज्ञानेश्वर**– नामदेवा, धन्य ! धन्य आहेस तूं ! तूं आपल्या एकविध भक्तीनें श्रीपांडुरंगाला आपल्या स्वाधीन करून घेतला आहेस ! पंढरीनाथाचा तूं प्रेमभांडारी असून, देवाचें तूं विश्रांतिस्थान आहेस ! आणि ह्मणूनच तुझ्या संगतीचा लाभ म्यां केला आहे ! नामदेवा, प्रेमरसावांचून उदंड ज्ञान काय होय ! तरी नामदेवा, ज्या भक्तीनें तूं पंढरीनाथाला आपल्या स्वाधीन करून घेतला आहेस, ती भक्ति कशी असावी, भजन, नमन, ध्यान, श्रवण आणि मनन कसें करावें, निजध्यासन कसें, धृति कोणती आणि विश्रांति कशाला ह्मणावी, हें मला समजून सांग ! या गोष्टी तुला विचारून घ्याव्या, ही उत्कंठा माझ्या मनांत फार दिवस आहे ! तरी हे प्रेमळ भक्ता तुझ्या अनुभवानें जो साधन उपाय तुला लाभला आहे तो मला सांग !

**नामदेव**– बापा ज्ञानराजा, मी पूर्ण अज्ञानी, तुह्मी प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ति, सर्वज्ञ, उदार ह्मणून तीर्थयात्रेस निघतांना माझ्या श्रीपंढरीनाथांनीं मला तुमच्या हातीं निरविलें ! असें असून तुह्मी मला अध्यात्मज्ञान विचारितां ! पण,

कृपेचेंपोसणेंमीपंढरीरायाचें ॥ एवढेंभाग्यकैचेंजाणिवेचें ॥ १ ॥ नोहेंबहुश्रुतनोहेंज्ञानशील ॥ दासमीदुर्बळवैष्णवांचा ॥ २ ॥

अहो ज्ञानसागरा, कल्पतरूनें कृपणाच्याद्वारीं येऊन याचना

करावी, त्याप्रमाणें तुह्मी सर्वज्ञ असून आंगीं लहानपण घेऊन या गोष्टी मला विचारीत आहां! पण माता ज्याप्रमाणें आपल्या बालकाच्या बोबड्या शब्दांचें कौतुक करते, तशी तुह्मी ज्ञानमाउली, माझें कौतुक करून माझें सुख वाढवीत आहां! ह्मणून जसें वडें वांकडें मला बोलतां येईल तसें मी बोलतों!

**ज्ञानेश्वर**– नामदेवा, तुझे प्रेमळ बोल स्वानंदजलरूप आहेत! तूं पंढरीरायाचा अंतरंगभक्त! तेव्हां तुझें ज्ञान अल्प कसें होईल? अमृताची सरी जशी दिव्य औषधींनाही येणें कठीण, तशी तुझ्या ज्ञानाची बरोबरी कोणालाही करतां येणार नाहीं! तुझें ज्ञान विश्वोद्धार करण्यासही समर्थ आहे! तुझीं रसाळ वचनें ऐकण्यासाठीं माझे कर्ण उत्कंठित झाले आहेत! तरी हे भक्तराजा, माझी एवढी आर्त पुरव!

**नामदेव**—

सर्वभूतींदयासर्वभावेंकरुणा ॥ जेथेंमीतूंपणाभावळला ॥ १ ॥ भजनतयानांववाटेमजगोड ॥ येरतेकाबाडयेणें वीण ॥ २ ॥ नमनेंतनम्रतानदेखेगुणदोष ॥ अंतरींप्रकाशस्वानंदाचा ॥३ ॥ येरतेंदांभीकजाणावेंमायावी ॥ विश्वासमीजीवींनधरींत्याचा ॥ ४ ॥ ध्यानतयानांवनिर्विकारनिकें ॥ जेंविश्वींदेखेविठोबासी ॥ ५ ॥ अखंडहृदयींतेचिआठवण ॥ साजिरेसमचरणविटेवरी ॥ ६ ॥ नादींलुब्धजैशीआसक्तहरीणी ॥ जायविसरूनिदेहभाव ॥७॥ यापरीतल्लीनदृढराखीमन ॥ यानांवश्रवणआवडीचें ॥ ८ ॥ व्यवसायींचित्तठेवोनिकृपण ॥ लाभाचेंचिंतनसर्वकाळ ॥ ९ ॥ यापरीअखंडस्वहितविचारण ॥ करिजेमननसत्वशीळ ॥ १० ॥ परपुरुषींजैसीआसक्तजारिणी ॥ नलगेतिचेमनींकामधंदा ॥ ११ ॥ कीटकभिंगुटीयेजैंअनुसंधान ॥ निकेंनिजध्यासनएकवीध ॥ १२ ॥ सर्वभावेंएकविठ्ठलचीध्याये ॥ सर्वभूतींपाहेरूपत्याचें ॥ १३ ॥ सर्वांहूनिनिराळारजतमावेगळा ॥ भोगीप्रेमकळातेचिभक्ति ॥ १४ ॥ सत्वाचासुभटुअसंग-

एकट्ट ॥ वैराग्यउद्भटुएकनिष्ट ॥ १५ ॥ प्रारब्धाचाभो-
गनेणेंदेहस्मृति ॥ अखंडतेधृतिनिर्विकार ॥ १६ ॥ नि-
र्वासनामननिजलाभेंसंपूर्ण ॥ नेणेस्वरूपज्ञानसंकल्पाचें
॥ १७ ॥ अनुरागेंगोविंदुध्याइजेएकांतीं ॥ यापरतीवि-
श्रांतिआणिकनाहीं ॥ १८ ॥ कायावाचामनेंहामाझा-
अनुभव ॥ सांगितलासर्वआवडीचा ॥ १९ ॥ नामाह्म-
णेहेंचिमोलविलेंतेणें ॥ उदारसर्वज्ञपांडुरंगें ॥ २० ॥

**ज्ञानेश्वर**– नामदेवा, धन्य ! धन्य आहेस तूं ! अहो संतहो, आजपर्यंत अनेक विष्णुभक्त झाले आणि यापुढेंही अनेक होतील, परंतु माझ्या नामदेवाचे हे गोड बोल केवळ कवित्व नसून, हा निरुपम अमृतरस आहे ! अहो वैष्णवहो, या भूतलावर अनेक शास्त्रवेत्ते निर्माण होतील, अनेक विद्यावंत निपजतील, अनेक बुद्धिमान् भेटतील, अनेक कवित्वकुशलता दाखवितील, अनेक आत्मज्ञानाप्रत जाणतील, अनेक वज्रासनीं बसून योगश्रेष्ठ होतील, अनेक आंगीं विरक्तता धारण करतील, अनेक श्रेष्ठत्व संपादून त्रिलोकीं पूज्य होतील, अनेक पाठक बनतील, आणि अनेक वाचाळपणा दाखवितील, परंतु माझ्या नामदेवासारखी ही अपार सुखविश्रांति कल्पांतींही कोणाला मिळणार नाहीं ! अहो संतहो, माझ्या नामदेवानें सांगितलेली ही जिवींची खूण तुह्मी आपल्या जिवाशीं जतन करून ठेवा, आणि त्याप्रमाणें वागा ! ह्मणजे तुह्मीही माझ्या नामदेवाच्या थोर भाग्याचे वांटेकरी व्हाल ! या माझ्या संतमुकुटमणी नामदेवाच्या श्रेष्ठत्वाची खूण एक श्रीपांडुरंगच जाणे !

( इतक्यांत कऱ्हाडचा राजा रामराजा, याचा मुलगा बाळकृष्णा व त्याची आई सीताबाई, दासीसेवकजनांसह प्रवेश करतात. )

**बाळकृष्णा**– आईग !

पाहा तरूछायीं, सकल संत बसले ॥ ध्रु० ॥
वाटे खचितची आज आपुलें, पूर्वपुण्य फळलें ॥ १ ॥
उदार मूर्ति ज्ञाननभींचे, मेघ पाहा वळले ॥ २ ॥
प्रेमें कीर्तन करिती हरींचें, देहभान तुरलें ॥ ३ ॥

प्रपंचतळमळ विसरुनि सारे, श्रीरूपीं रमलें ॥ ४ ॥
कीर्तन कल्लोळाच्या नादें, अंबर हें भरलें ॥ ५ ॥
भजनाचा हा थाट पाहुनी, मन माझें रिझलें ॥ ६ ॥
या संतांच्या दर्शनमात्रें, सकल शीण हरलें ॥ ७ ॥
संत बोल ते अमृतगंगा, पीतां ताप पळे ॥ ८ ॥
दीन भाषणीं प्रार्थुनि यांना, नेऊं घरीं आपुलें ॥ ९ ॥
मोक्षसुखाची जोड मेळवूं, पूजुनी भावबळें ॥ १० ॥
शेषान्नाचा प्रसाद मिळतां, जाइल भय सगळें ॥ ११ ॥

(श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पायांवर लोटांगण घेऊन)

संत माउली सकल जगाची, जाणुनी पद धरिलें ॥ १२ ॥

(नमस्कार केल्यावर बाळकृष्णा श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पुढें खालीं दृष्टि देऊन उभा राहतो.)

**ज्ञानेश्वर**– अहो संतहो, गळ्यांत मोहनमाळा घालून आणि कर्णांत ज्ञानविज्ञान निवडणारीं कुंडलें घालून नासाग्रीं दृष्टि देऊन, समचरणीं उभी राहिलेली ही शामतनु सुकुमार सुंदर मूर्ति पाहून, हा साक्षात् गोकुळवासी श्रीकृष्ण प्रभु आपणा सर्वांना दर्शन देण्याकरितां गोकुळीहून येथवर धांवत आला आहे, असें मला वाटतें ! (बाळकृष्णास कडेवर उचलून घेऊन) हे भगवंता गोपाळकृष्णा, तुझ्या दर्शनानें आज मी कृतार्थ झालों ! आतां या श्रेष्ठासनावर बसून आम्हां सर्वत्रांच्या हातून पूजा ग्रहण करावी, आणि या ज्ञानदेवासह सकल संतांस धन्य करावें !

**बाळकृष्णा**– (खालीं उतरण्याचा प्रयत्न करून) अहो संतश्रेष्ठा, महाराजा ज्ञानदेवा, मी गोकुळवासी भगवान् श्रीकृष्ण नसून क्षुद्र मानवदेही कऱ्हाडनगराधिपति रामराजे यांचा अज्ञ बालक बाळकृष्णा आहें ! आणि ती पलीकडे माझी माता सीताबाई उभी आहे ! तुह्मां सर्व श्रेष्ठांना घरीं नेऊन तुह्मां समर्थांचें भक्तिभावानें पूजन करावें आणि तुह्मां समर्थांना भोजन देऊन तुमचा शेषान्नप्रसाद भक्षण करावा, ही इच्छा पोटीं धरून माझी माता मला बरोबर घेऊन, तुह्मां श्रेष्ठांना आमंत्रण देण्याकरितां येथवर आली आहे ! तरी तुह्मी समर्थांनीं आमचें हें

एवढें कोड पुरवून आह्मांला धन्य करावें ! ( बाळकृष्णा खालीं उतरून श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे चरण धरतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज त्यास 'दीर्घायुष्मान् भव' असा आशीर्वाद देतात. सीताबाई श्रीज्ञानेश्वरमहाराजांस नमस्कार करते. ते तिला 'अखंड सौभाग्यवती पुत्रवती भव' असा आशीर्वाद देतात.)

**ज्ञानेश्वर**– महापतिव्रते मातोश्री सीताबाई, तुला येथवर येण्याचे श्रम मीं दिले याबद्दल मला क्षमा कर ! राजे रामराजे अलीकडे साधुसंतांचा छळ करून त्यांना सुळी देण्यास प्रवृत्त झाले आहेत असें ऐकलें, आणि ह्मणून आह्मीं येथेंच शिबिरें देऊन राहिलों, आणि तुला येथवर येऊन जाण्याविषयीं मीं निरोप पाठविला ! मातोश्री, तुझें कुशल आहे ना ? महिपतराव मजवर थोर लोभ करितात ! तसाच तुझाही लोभ मजवर अखंड असावा. मातोश्री, अशा अनिष्ट वेळीं नगरांत येण्याविषयीं तुझी अनुज्ञा उक्त नाहीं असें मला वाटतें ! तुझ्यासारख्या पुण्यशील साध्वी मातुश्रीच्या आणि ( बाळकृष्णास जवळ घेऊन ) या श्रीकृष्णस्वरूप बालकृष्णाच्या सुखकर दर्शनानें माझे नेत्र पुनीत झाले आहेत ! तेव्हां आतां नगरांत येऊन या नेत्रांना याहून अधिक तो कोणता सोहळा पहावयाचा राहिला आहे ? आणि बाळा, आह्मीं नगरांत आल्यावर राजदूतांनीं राजाज्ञेनें जर आह्मांला सुळावर चढविलें, तर मग कसें बरें होईल ?

**बाळकृष्णा**– अहो संतश्रेष्ठा, तुमच्या हृदयांत श्रीपति नांदत आहे ! तुह्मी साक्षात् श्रीविठ्ठलमूर्ति आहां ! तेव्हां तुह्मांला कोण काय करणार ? माझी आई मला सांगत असते कीं, तुह्मी संतश्रेष्ठ, विठोबारायाचे भक्त, यमालाही शरणागत आणतां ! तुह्मी आपल्या सुकृतांच्या अग्नीनें विश्वांतलि महापातकांची होळी करतां ! तुह्मी श्रेष्ठांनीं हरिनामघोषानें कुंभीपाक ओस पाडले आहां ! आणि हरिकीर्तनानें हरिभक्तांचे यमपाशही तोडून टाकले आहां ! अशा ज्या तुह्मां सद्गुरूंचा प्रताप त्या तुमच्यापुढें काळ कसा उभा राहील ? कौरवांनीं पांडवांचा प्राणघात करण्यासाठीं अनेक उपाय केले, पण पांडवांच्या हृदयांत माधव नित्य वास करीत होता, ह्मणून

कौरवांचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले ! गोपाळांच्या हृदयांत देवकी-नंदन श्रीकृष्ण प्रभु होता, म्हणून त्यांच्यापुढें कोणाचेंही कांहीं चाललें नाहीं ! प्रल्हादाच्या हृदयांत गोविंद होता आणि सीता-मातुश्रीच्या हृदयांत प्रभु रामचंद्र होते, म्हणून त्यांना कशापासूनही बाधा झाली नाहीं ! सर्व लंकेचें अग्नीनें दहन केलें, पण ज्याच्या हृदयांत अखंड श्रीरामप्रभु तिष्ठत होते, अशा बिभीषणाचें घर अग्नीला जाळवलें नाहीं ! आपल्या हृदयांत सच्चिदानंद प्रभु सदा वसत असतां आपल्यापुढें कोणाचें काय चालणार ? अहो ज्ञानराजा, माझ्या मातोश्रींनें मला तुमच्या चरणाचा स्नेह बालपणापासून लावून दिल्यामुळें तुमच्या चरणदर्शनाची मी वाट पहात होतों ! तुम्हां समर्थांचे चरण आज माझ्या दृष्टीस पडल्यानें, तुमचे चरण आणि माझें मन, हीं दोन्हीं एकत्र करून, मी त्यांची दृढगांठ दिली आहे ! म्हणून अहो ज्ञानराजा, हे तुमचे चरण मी आतां कधींही सोडणार नाहीं !

**सीताबाई**– ( श्रीज्ञानेश्वरमहाराजांस पुन्हा नमस्कार करून ) सद्गुरुसमर्थांनीं कृपावंत होऊन या माझ्या तान्ह्याची एवढी आस पुरवावी, हेंच माझं समर्थचरणीं लीन होऊन मागणं आहे ! आम्ही दीन, पातकी आहों ! आम्ही अधम, अमंगळ, अनंत अपराधी आहों, म्हणून आमचा अव्हेर करून समर्थांनीं आम्हांला मोकलून लाविलं, तर पतितपावन हें जें समर्थांचं ब्रीद त्या ब्रीदाला बोल लागेल ! आमच्या कोटि अपराधांकडे पाहून जर समर्थ आम्हांला पाठमोरे झाले, तर आमचा सांभाळ कोण करील ? अहो सद्गुरुनाथा, महाराजांच्या दुष्कृत आहाळानं सर्व नगर होरपळून गेलं आहे! अशा वेळीं सर्व प्रजाजनांचा ताप निववून त्यांना सुखी करणार समर्थांवांचून अन्य कोण आहे ? तुम्ही माझे आईबाप, म्हणून तुमची आस धरून या माझ्या बाळाला बरोबर घेऊन मी समर्थांचे चरणीं धांव घेतली आहे ! तरी समर्थांनीं या आपल्या धर्माच्या लेकीला पाठीशीं घालून हिचं संकटीं रक्षण करावं ! समर्थांच्या दर्शनानं महाराजांच्या चित्तास निवृत्ति येईल, समर्थांचं हें प्रसन्नमुख पाहून महाराजांचा मीपणा जाऊन त्यां-

च्या हृदयांतील साधुसंतांबद्दल द्वेषभाव नष्ट होईल ! समर्थांचं बोधवचन ऐकून मीं कोण, मी येथें कशाला आलों, मी आपलं हित कीं अहित करून जात आहें, याची महाराजांना ओळख पटून महाराज सुखरूप होतील ! नी ते सुखरूप झाले, ह्मणजे आम्हीही सर्व सुखरूप होऊं ! या माझ्या तान्ह्याला मीं समर्थांच्या ओटींत घातला आहे ! तरी हें बाळ आपलंच आहे असं समजून समर्थांनीं याच्याकडे प्रेमदृष्टीनं पहावं, नी याच्यावर समर्थकृपेची सावली घालावी ! ह्मणजे माझ्या बाळाला कशाचंही भय उरणार नाहीं ! ( बाळकृष्णा श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पायांवर डोकें ठेवितो. ) माझ्या बाळानं सद्गुरुचरणीं लोळण घेतली आहे, नी मीं सद्गुरूंपुढं हा पदर पसरिला आहे, तरी अहो ज्ञानराजा, आम्हांला आतां उदास करूं नये !

**ज्ञानेश्वर**– हे कल्याणी, असाच तुझा आग्रह आहे, ( बाळकृष्णास उठवून आणि त्याच्या तोंडावरून हात फिरवून ) आणि बाळा, असाच तुझा छंद आहे, तर येतों बरें आम्ही तुझ्या घरीं ! अहो संतहो, या बाळकृष्णाचें आमंत्रण आम्हीं घेतलें आहे ! तरी तुह्मीं सर्वांनीं आह्मांबरोबर प्रसादाला आलें पाहिजे ! बाळा, आम्ही येतों बरें तुझ्या मागोमाग ! ( बाळकृष्णा पुन्हा पाया पडतो व सीताबाई पुन्हा नमस्कार करते. )

**सीताबाई**– (बाळकृष्णास जवळ घेऊन त्याच्या तोंडावरून हात फिरवून ) बाळा, समर्थांनीं कृपाळू होऊन तुझी आस पुरी करण्याचं कबूल केलं ! आतां झालंना तुझ्या मनासारखं ? ( श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पायाची तीट बाळकृष्णाच्या कपाळीं लावून ) बाळा, संतचरणाची ही तीट मी तुझ्या कपाळीं लावतें, ह्मणजे तुला कशाचंही भय उरणार नाहीं ! अहो सद्गुरुसमर्था, माझ्या बाबांनीं तुमच्या चरणाचा ळळा मला लावून दिला असल्यामुळं सद्गुरुचरण आठवून मी रात्रंदिवस सद्गुरूंची वाट पहात होतें; तो माझा हेतु आज पूर्ण झाल्यामुळं मी धन्य झालें ! ( श्रीज्ञानेश्वरमहाराजांस पुन्हा नमस्कार करून बाळकृष्णाला कडेवर घेऊन जाऊं लागते. )

**बाळकृष्णा**– ( मार्गे वळून श्रीज्ञानेश्वरमहाराजांकडे पाहून ) अहो सद्गुरुसमर्था, माझे तातमहाराज माझ्यावर आतांशीं फार रागवायला लागले आहेत ! तर तुह्मी घरीं आलां ह्मणजे, माझ्यावर रागावत जाऊं नका, असें तातमहाराजांना सांगा बरें !

**सीताबाई**– ( बाळकृष्णाचें चुंबन घेऊन ) सांगतील बरं बाळ ! ( दासीसेवकजनांसह निघून जात असतां ) बाळा ! असं बोलूं नये! ( सीताबाई बाळकृष्णाला घेऊन दासीसेवकजनांसह निघून जाते. )

**नामदेव**–

दुर्लभनरदेहझालातुह्मांआह्मां ॥ येणेंसाधूंप्रेमाराघोबा-
चा ॥ १ ॥ अवघेहातोहातींतराभवसिंधु ॥ आवडींगो-
विंदुगाऊंगीतीं ॥ २ ॥ हिताचियागोष्टीसांगेंयेकमेकां ॥
शोकमोहदुःखानिरसूंतेणें ॥ ३ ॥ येकमेकांकरूंसदांसा-
वधान ॥ नामींअनुसंधानतुटोंनेदूं ॥ ४ ॥ घेऊंसर्वभावें-
रामनामदीक्षा ॥ विश्वासेंसकाळिकांहेंचिसांगों ॥ ५ ॥
नामाह्मणेशरणारिघोंपंढरीनाथा ॥ नुपेक्षीसर्वथादीन-
बंधु ॥ ६ ॥

( भजन करीत सर्व संत निघून जातात. )

---

## प्रवेश तिसरा.

**स्थळ**— कऱ्हाड नगरी– राजवाड्यापुढील गच्ची.

**बाळकृष्णा**– ( आंतून धांवत धांवत येऊन मागें वळून पाहून ) मी नाहीं जा– तूं मला धरूं नकोस आं ! आपला विचार पाहा ! नाहीं तर मी आईला सांगून तुझी खोड मोडीन ! तूं काय समजली आहेस ? ( असें बोलत पळत पळत गच्चीच्या पायऱ्यांकडे जातो. )

**कमळा**– ( बाळकृष्णाच्या मागें धांवत येऊन ) महाराज ! मी आतां न्हातों असं तुम्हीं कबूल केलंत, नी म्हणून पिंगलेला सांगून, चौरंग मांडवून, तिच्याकडून तुमची न्हायची तयारी करविली ! नी मी तुमच्या आंगावरचा पोशाक उतरायला

लागलें, तों तुह्मीं माझ्या हाताला झटकारा देऊन, एकदम धांवत निघून आलांत, तें एवढ्याकरितांच का? दम धराहो! मीच आतां अगोदर, महाराज माझं ऐकत नाहींत, ह्मणून बाईसाहेबांना जाऊन सांगतें! नी त्यांना इथवर घेऊन येऊन, हें चांगलं का ह्मणून पुसतें! (बाळकृष्णा गच्चीवर चढूं लागतो.) महाराज, पाहाहो! तुम्हीं माझं न ऐकतां आपलंच खरं करीत आहां! पण संभाळा! ही मी चाललें बरं बाईसाहेबांना इकडे घेऊन यायला! का होतां खालीं? इश्श! हा कोण जल्ला मुलखाविरहित उतावीळपणा! थोरले महाराज शिकारीहून परतले, असं सांगत सांडणीस्वार हा इतक्यांतच ना परत आला? त्याला येऊन अजून घटका देखील पुरी झाली नाहीं! खरंच पण हो! शर्थ झाली बाई तुमच्या अधीऱ्या स्वभावापुढं!

**बाळकृष्णा**– (गच्चीवर चढून जाऊन व गच्चीच्या सज्जावर उभा राहून) एक घटका झाली नाहीं का? खोटी नाहीं तर! किती तरी वेळ झाला सांडणीस्वाराला परत येऊन! तरी अजून तातमहाराज कां ग परत येईनात? त्यांची वाट पहात मी इथें असा बसणार जा!

**कमळा**– महाराज, असं काय बरं करावं तें? तुह्मी शहाणे ना? आतां घटकेचा प्रहर का होणार आहे? तुमचं न्हाणं होत आहे, तंवर थोरले महाराज येतील बरं परत!

**बाळकृष्णा**– (लांबवर दृष्टि देऊन) कमळे! अग कमळे! ते पाहिलेस का घोडेस्वार कसे भरधांव घोडे फेकीत इकडे दौडत येत आहेत ते! तातमहाराजांच्या बरोबरचेच हे घोडेस्वार असतील, नाहीं ग? अबब! या घोडेस्वारांच्या दवडीनें तो पाहिलास का धुराळा आकाशांत किती उंच उडाला आहे तो! पण कायग कमळे, तातमहाराजांचा अंबारीचा हत्ती अजून कां ग मला कोठें दिसेना?

**कमळा**– महाराज, इतका धुराळा उडाल्यावर, त्यांत महाराजांचा हत्ती इतक्या लांबून कसा बरं दिसेल तुह्मांला?

**बाळकृष्णा**– कमळे, तातमहाराजांच्या बरोबरच्या शिकारी

लोकांपैकीं एक देखील शिकारी अजून कां ग माझ्या दृष्टीस पडेना? श्रीज्ञानेश्वरमहाराज वाड्यांत येण्यापूर्वी तातमहाराज येतील ना ग नगरांत परत ?

**कमळा**– येतील हो येतील ! थोरले महाराज किनई आतां येतील ! तुह्मी कांहीं काळजी करूं नका ! पण आतां येतांना न्हायला ? तुमचं न्हाणं अजून कां झालं नाहीं ह्मणून बाईसाहेब रागावतील ! मग त्यांना मी काय बरं उत्तर देऊं ?

**बाळकृष्णा**– ( आनंदानें ) कमळे, दिसला ग दिसला मला तातमहाराजांचा अंबारीचा हत्ती ! आणि शिकारी लोक देखील दिसायला लागले मला आतां ? तूं वर येऊन पहा तर खरा हा अंबारीचा हत्ती आणि हे शिकारी लोक येथून किती अगदीं लहान दिसत आहेत ते ! हत्ती तर किनई येथून आपल्या कपिलेच्या वासराएवढा दिसतो आहे ग ! आणि हे शिकारी लोक माझ्याहूनही लहान लहान मुलांएवढे दिसत आहेत ग ! वर येऊन पहा तर खरी ही गमत !

**कमळा**– मला नको ती गमत पाहायला ! थोरल्या महाराजांचा अंबारीचा हत्ती दिसला ना तुह्मांला आतां ? आतां झालंना तुमच्या मनाचं समाधान ? या तर कसे आतां खालीं ! नी थोरले महाराज वाड्यांत येण्यापूर्वी, न्हाऊन नी आपला पितांबर नेसून, व्हा श्रीज्ञानेश्वरमहाराजांना सामोरे जायला तयार !

**बाळकृष्णा**– मी नाहीं जा इतक्यांत न्हायला येत !

**कमळा**– ह्मणजे ! थोरले महाराज आतां घटकेच्या आंत नगरांत येतील, ही अजून देखील नाहीं का तुमच्या मनाला खातरी पटली ? मग बरीक खरोखरीच शर्थ झाली बाई !

**बाळकृष्णा**– तातमहाराज वेशीच्या आंत शिरलेले जेव्हां मी पाहीन, तेव्हां मग येईन मी न्हायला ! नाहीं पण तसें देखील नव्हेच ! तातमहाराज आणि मी आह्मी दोघेही आज बरोबरच आंघोळ करूं ! आणि मग गुरूजींना बरोबर घेऊन, आह्मी दोघेही सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजांना हातीं धरून वाड्यांत घेऊन

यायला, वाड्याच्या दक्षिणेच्या थोरल्या दरवाजाजवळ त्यांची वाट पाहात उभे राहूं!

**कमळा**– दोन घटका झाल्या, बाईसाहेब आंग धुवून देवातुळशीची पूजा करीत बसल्या आहेत! त्या तुळशीपुढून आतां उठतील! नी तुम्ही अजून पारोसेच आहां असं त्यांनीं पाहिलं ह्मणजे तुमच्यासाठीं मला बरीक रागं भरतील! ह्मणून म्हणतें, पुरे झाला आतां हा छांदिष्टपणा!

**बाळकृष्णा**– कमळे, अशी कायग तूं घाई करतेस? ते बघ तातमहाराज मघापेक्षां आतां किती तरी जवळ आले आहेत! ते आतां इतक्यांत वेशीपाशीं येतील! ते वेशीच्या आंत शिरले कीं मी येतों न्हायला! मग तर झालें ना?

**कमळा**– तें कांहीं नाहीं! मी आतां तुमचं कांहीं एक ऐकायची नाहीं! तुह्मी बऱ्याबोलानं खालीं उतरतां? का मी येऊं वर, तुह्मांला उचलून खालीं घेऊन यायला?

**बाळकृष्णा**– ये बरें! ये बरें! पाहातों तूं मला कशी उचलून घेऊन जातेस ती! मी मुळीं तुझ्या हातीं सांपडेन तर कीं नाहीं तूं मला उचलून घेऊन जाणार खालीं?

**कमळा**– महाराज, असं वेड्यासारखं काय करावं बरं? (बाळकृष्णा मी खालीं येत नाहीं असें खुणेनें सुचवितो) अस्सं का? आलेंच बरं का तर मी वर! का गुण्यागोविंदानं उतरतां खालीं?

**बाळकृष्णा**– मी नाहीं उतरत जा!

**कमळा**– तुम्ही तसे कुठले ऐकायला? ही आलेंच मी वर! (कमळा पायऱ्या चढून वर जाऊं लागते. बाळकृष्णा तिच्या हातीं न सांपडण्याचा प्रयत्न करीत असतां पाय घसरून गच्चीवरून खालीं फरशीवर पडतो. तेव्हां त्याचें डोकें दगडावर आपटून त्यांतून रक्त वाहूं लागतें व तो बेशुद्ध होतो. कमळा घाईघाईनें पायऱ्या उतरून बाळकृष्णाजवळ येते व त्याची ती अवस्था पाहून) अरे देवा! हें काय रे झालं! (बाळकृष्णाला उचलून मांडीवर घेऊन व त्याच्या तोंडावरील रक्त पुसून) महाराज, कायहो ही तुमची अवस्था झाली!

धांवा हो धांवा! अहो तिकडे कोणी आहे का? कोणी तरी जाऊन बाईसाहेबांना इकडे बोलावा हो! महाराज गच्चीवरून खालीं पडून बेशुद्ध झाले आहेत, असं सांगून, त्यांना चटकन् इकडे घेऊन या हो! (तिच्या ओरडण्यास कोणी उत्तर देत नाहीं व कोणी येतही नाहीं असें पाहून) इथें जवळपास कोणीदेखील नाहीं काहो? महाराज! अहो महाराज! अग बाई! हे तर अगदींच बेशुद्ध झाले! यांची कांहीं धडगत दिसत नाहीं बाई मला! अरे देवा! आतां तर हा रक्ताचा पाट मघाच्यापेक्षां अधिकच वाहूं लागला! अग चांडाळणी, अशी कशीग तुला दुष्ट बुद्धि झाली! अहो, कोणी आहे का तिकडे? नाहीं ना? कोणीच नाहीं तिकडे? (बाळकृष्णास उचलून हातावर घेऊन उठून) महाराज! अहो महाराज! (असें ह्मणत आहे इतक्यांत पडदा पडतो.)

---

## प्रवेश चौथा.

**स्थळ**— राजवाडा- राजवाड्यांतील देवघरापुढील भव्य दालन.

(सीताबाई तुळशीची पूजा करीत बसली आहे. तिच्याजवळ तिची दासी गिरजा उभी आहे. दालनाच्या मध्यभागीं श्रीज्ञानेश्वर महाराजांकरितां एक उच्चासन मांडलेलें आहे व या उच्चासनाजवळ पूजासाहित्य सिद्ध करून ठेविलेलें आहे असा पडदा उघडतो. इतक्यांत कमळा बाळकृष्णाला हातांवर घेऊन ओरडत येते, व तिच्या मागून पिंगलाही प्रवेश करते.)

**कमळा**–बाईसाहेब! अहो बाईसाहेब! धांवा हो धांवा! उठा! धाकटे महाराज गच्चीवरून पडून, त्यांची ही पाहा काय अवस्था झाली आहे ती!

**सीताबाई**–(घाबरून उठून कमळेकडे धांवत धांवत जाते व बाळकृष्णास तिच्या हातांवरून आपल्या हातांवर घेते; व त्याची ती भयंकर अवस्था पाहून नेत्रांपुढें अंधेरी येऊन कमर मोडून

आल्यामुळें मटकन् खालीं बसते. पिंगला घाईघाईनें पाणी आणून तें बाळकृष्णाच्या डोळ्यांना लावते व गिरजा पंखा आणण्याकरितां धांवत निघून जाते) हाय रे हाय! बाळा! काय रे तुझी ही अवस्था झाली! (गिरजा पंखा घेऊन परत येते व बाळकृष्णाला वारा घालूं लागते.) पिंगले, वैद्यराजांच्याकडे असाल तसे या असा माझा निरोप पाठीव, नी महाराज शिकारीहून परत आले असले तर त्यांना चटकन् इकडे घेऊन ये! (पिंगला निघून जाते. गिरजा कमळेजवळ पंखा देते व आपण बाळकृष्णाच्या तोंडावरील रक्ताचे ओघळ पदरानें पुसूं लागते. कमळा बाळकृष्णास पंख्यानें वारा घालूं लागते.) कमळे, तुला नी पिंगलेला माझ्या तान्ह्याला न्हाऊं घाला, असं ना मी सांगितलं होतं? नी असं असून हें माझं बाळ गच्चीकडे ग कसं गेलं? नी हें इतकं विव्हळ होऊन पडेपर्यंत तुह्मी दोघीही याला सोडून कुठे ग गेलां होतां?

**कमळा**–(रडत रडत) बाईसाहेब! पिंगलेनं महाराजांची न्हायची तयारी केलीन तेव्हां मी महाराजांच्या आंगावरचा पोशाक उतरूं लागलें. तों एकाएकीं यांच्या मनांत काय आलं तें कोण जाणे! हे आपले माझ्या हाताला झटकारा देऊन वाड्याच्या पुढच्या थोरल्या दरवाजावरच्या उंच गच्चीकडे धांवत सुटले! मी यांच्या मागोमाग धांवलें नी यांना, महाराज गच्चीवर चढूं नका, असं ओरडून सांगूं लागलें! पण माझं न ऐकतां, हे आपले गच्चीवर चढले! महाराज, तुह्मी शहाणे ना? तुह्मांला न्हायला उशीर होत आहे! खालीं उतरा! अशी मीं यांची पुष्कळ विनवणी केली! पण थोरले महाराज शिकारीहून कुठवर परत आले आहेत, हें पहात मी इथें असा बसणार, असं हे मला ह्मणूं लागले! श्रीसद्गुरुज्ञानेश्वरमहाराज वाड्यांत येण्यापूर्वीं थोरले महाराज त्यांच्या दर्शनाला येतीलना ग नगरांत परत? असं तितक्यांतल्या तितक्यांत यांनीं मला कितींदा तरी विचारलं! नी ते पहा मला घोडेस्वार दिसूं लागले! आतां महाराजांचा अंबारीचा हत्ती मला दिसला! अशी बडबड यांनीं सुरू केली! महाराज, उतरा खालीं! असं मीं यांना पुष्कळ सांगितलं, पण हे आपला

हट्ट सोडीनात! तेव्हां न्हायला उशीर होईल म्हणून यांना खालीं घेऊन यायला मी गच्चीवर चढूं लागलें! तेव्हां माझ्या हातीं सांपडूं नये म्हणून हे गच्चीच्या सज्जावर इकडे तिकडे पळूं लागले! नी मी अर्ध्या पायऱ्या चढून गेलें नाहीं तोंच, त्या धांदलींत यांचा पाय घसरून हे गच्चीवरून खालीं पडले! नी यांची ही अशी अवस्था झाली! बाईसाहेब! अशा रितीनं मी चांडाळीण आज या अनर्थाला कारण झालें! नी माझ्या तोंडाला जन्माची काळोखी लागली!

**सीताबाई**–तान्ह्या! अशी कशी रे तुला दुर्बुद्धि सुचली! कमळे, कायग विद्रूप कळा याच्या तोंडावर आली ही! माझी कमर खचली ग! मला भोंवळ येते आहे! देवा! (असें म्हणतां म्हणतां सीताबाई बेशुद्ध होते. तिला गिरजा सावरते व तिच्या डोळ्यांस पाणी लावते.)

**कमळा**–(सीताबाईस पंख्यानें वारा घालतां घालतां) बाईसाहेब! अहो बाईसाहेब! गिरजे, कसं करावं ग बाई आतां? महाराजांची इकडे ही अवस्था नी बाईसाहेबही यावेळीं अशा बेशुद्ध झाल्या! गिरजे असं मीं कोणतं ग पातक केलं होतं, कीं देवानं अशा तऱ्हेनं ही हत्या माझ्या माथीं लोटली!

**गिरजा**– कमळाबाई, तुमच्याकडे याचा कांहीं बोल नाहीं! अहो! हा किनई, महाराजांना झालेल्या घोर साधुशापाचा ठोका आला बरं!

**सीताबाई**–(साधुशाप हे शब्द ऐकुन दचकून उठून) साधुशाप! खरंच ग खरंच! कमळे, साधुशापच हा वठला बरं बाई! (बाळकृष्णाचें चुंबन घेऊन) बाळा!

सर्वगुणसंपन्नराजसावेळकशीपातली। रुधिरेंन्हालेंआंग
सर्वहीप्रेतकळामुखींआली । नेत्रतेजतेंनष्टजाहलेंशुद्ध
नमुळींराहिली । प्राणविसाव्याआर्द्रतनूतुझीघर्मानेंजा-
हली । साधुमुखींचीशापउक्तिजीकर्णींम्याऐकिली ।
हाय! हाय! रे! दैवा! कैशीसत्यठरूंघातली ।
घेतलातुलाअंकीं। पाहीनेत्रउघडून । रागसर्वसोडी।

बोलमशींहांसून । दीनगायमीवत्सा । जाशीकसाटाकून । नवमासतूजउदरीं । वाहिलेहालसोसून । फिरविशीमुखकांरे । आसतुझीमनींधरिली । नकोजाऊंपाडसाटाकुनिममतासगळी ॥ १ ॥ एकदांकंठींमीठी । लाडक्याप्रेमेंघाली । अमृतबोलतूझे । ऐकूंदेएकवेळीं । चुंबुदेमृदुगालां । वदनवरीउचली । मत्प्राणबाळमाझें—

( इतक्यांत बाळकृष्णास उचकी लागून त्याचें प्राणोत्क्रमण होतें. ) हाय ! हाय ! कमळे गेला ग गेला ! माझा बाळ मला सोडून परलोकीं गेला ! साधूंचा शाप माझ्या बाळाला पुरा किग भोवला. बाळा ! सुंदरा ! मनमोहना ! तुला साधुशाप बाधूं नये, ह्मणून मीं तुला श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या ओटींत घालून, तुझ्या कपाळीं त्यांच्या चरणरजाचा अभयतिलक किरे लाविला ! पण कमळे, माझ्या दुर्दैवानं अखेर आपलंच किग खरं केलं ! गिरजे, आतां मी काय करूं ग ? या माझ्या राजहंसाला मी आतां कुठे पाहूं ? बाळा, संतचरणीं तुझी फार आवड ! ह्मणून माझ्याबरोबर दुडदुड धांवत येऊन तूं संतांना आमंत्रण दिलंस ! नी ते घरीं आले ह्मणजे मी त्यांची पूजा करीन, मी त्याचं चरणतीर्थ घेईन नी त्यांचा शेषान्नप्रसाद भक्षण करून धन्य होईन ! अशी इतका वेळ तूं एकसारखी घोकणी घेतली होतीस ! नी आतां ते येण्यापूर्वींच तूं वैकुंठीं कसारे निघून गेलास ! तान्ह्या, आतां संतांना कोणरे सामोरा जाईल ? त्यांना हातीं धरून इथवर कोण आणील? त्यांची पूजा करून त्यांचं चरणतीर्थ कोण घेईल ? नी त्यांचा शेषान्नप्रसाद मी आतां कोणाच्या रे मुखांत घालूं ? बाळा ! श्रीज्ञानेश्वर सद्गुरूंनीं तुला पाहिलं, तेव्हां तूं साक्षात् श्रीकृष्णप्रभूचीच बालमूर्ति आहेस, असा किरे त्यांना भास झाला ! नी अशा भावनेनं त्यांनीं तुला कडेवर उचलून घेऊन, तुला हृदयाशीं घट्ट किरे धरिलं ! तेव्हां बाळा, मला मोठी धन्यता वाटून, तुला आतां साधुशाप बाधणार नाहीं, अशी शुभशकुनाची गांठ मीं पदराला बांधली ! पण बाळा अखेर तें सारंच किरे व्यर्थ झालं !

**गिरजा**– बाईसाहेब, असा धीर सोडूं नका ! युवराजांना

या वेळीं भयंकर मूर्च्छा आली आहे; पण अमळशानं ते चांगले शुद्धीवर येतील !

( इतक्यांत रामराजा, राजवैद्य व पिंगला धाईधाईनें प्रवेश करतात. )

**सीताबाई**– ( रामराजाकडे पाहून ) महाराज ! आलांत का हो ? ही पहा माझ्या बाळाची काय दशा झाली आहे ती ! ( रामराजा मुलाजवळ जाऊन त्याच्या गळां पडून प्रेमानें त्याचें चुंबन घेतो व राजवैद्य मुलाचा हात धरून त्याची नाडी पाहतात. )

**रामराजा**– ( सद्गदित होऊन ) माझ्या लाडक्या ! तुझ्या तोंडाकडे देखील पाहावत नाहीं रे ! तूं माझ्याबरोबर शिकारीला येण्याचा हट्ट धरिलास, तो तुझा हट्ट म्यां निर्दयानें पुरविला नाहीं, तरी तूं मजवर न रागावतां, बाळा, माझ्याकडे आपले पंचप्राण गुंतवून आतुरतेनें माझी वाट किरे पाहत होतास ! आणि मला यायला उशीर लागला ह्मणून कारे आतां माझ्यावर रागावलास ? ( राजवैद्य बाळकृष्णाचा हात सोडून तोंड फिरवून नेत्रांना पदर लावितात, तें पाहून ) हाय ! हाय ! वैद्यराज, शेवटीं माझ्या तान्ह्यानें मला अखेरचेंच सोडलें ना ? लाडक्या ! ( असें ह्मणून शोकविव्हळ होऊन बाळकृष्णाच्या आंगावर पडतो. व पुन्हा उठून ) वैद्यराज, तें पहा, संतहत्यापापरूपीं पिशाच्च माझ्या नेत्रांपुढें उभें राहून, राजा ! हा साधुशाप तुला बाधला ह्मणून मला सांगत आहे ! हाय ! हाय ! म्यां चांडाळानें आपण होऊनच किहो आपला घात करून घेतला !

**सीताबाई**– महाराज ! खरंच हो खरंच ! आपलीच क्रिया आपल्याला बाधली वरं ! आपणच आपल्या हातांनीं आपला घात करून घेतलांत ! नी आतां शोक करून काय उपयोग ! उरीं पाषाण बांधून महाडोहांत उडी घालून जशी काळाला बळंच मिठी द्यावी, तसं आपण साधुसंतांची नित्य हत्या करून हा अनर्थ बळंच किहो घरांत आणलांत ! महाराज ! विष्णुभक्तहत्येचें घोर पाप राज्यांत माजल्यावर मग अनर्थांना काय हो उणं ? महाराज ! मीं आपलीं नानाप्रकारानं प्रार्थना करीत असतां, आपण संतहिरे सांडून दुर्जनरूपीं गारींचा आजवर

संग्रह केलांत ! संतराजहंसाना दूर लोटून पापबुद्धि मंत्रीदिवाभीतांना पाळलंत ! संतकल्पद्रुम राज्यांतून उपटून टाकून दुरात्मे-अमात्यरूपीं कंटकांचं वन वाढविलंत ! तेव्हां हें घोर पाप देवाला सहन न होऊन, माझ्या थोर पूर्व पुण्याईनं लाभलेलं हें माझं गुणनिधान काळानं आज ओढून नेलं ! यमानं हें राजवंशवल्लीचं रोप उपटून टाकून हा माझा कल्पवृक्ष तोडून किहो टाकला ! नी हा दिव्य कुलदीप आज मालवून सर्व राज्यांत अंधार पाडला! महाराज ! हा गुणराशी बाळ, सगळ्या नगरीचा प्राण किहो होता ? हा प्राण निघून गेल्यामुळं हें सर्व नगर आतां स्मशानवत् झालं ! आतां या नगराला अग्नि लावून, हें दुःखरूपीं राज्य जन्मवेरीं भोगा बरं !

**रामराजा**– देवी ! माझें हृदय अगोदरच फाटून गेलें आहे. त्यावर हा असा वाक्प्रहार करून तें शतशः विदीर्ण करूं नकोग ! परमेश्वरानें हें दिव्य अंजन माझ्या नेत्रांत घातल्यामुळें, माझ्या पापाच्या कोटिराशी यावेळीं माझ्या नेत्रांपुढें मला ढळढळीत दिसत आहेत ! अहो पुराणपुरुषा भगवंता ! मी अनंत अपराधी आहें ! मला क्षमा करा ! आणि हें एवढं पुत्रदान मला द्या !

**सीताबाई**– महाराज ! आपल्या हाकेला देव आतां कुठली हो हाक देणार ! माझ्या जिवींच्या विसाव्या बाळकृष्णा ! तुझे गुण मी आतां किती रे आठवूं ! जन्माला आल्या दिवसापासून तूं कधीं हट्ट केला नाहींस ! कधीं मला शिणविलं नाहींस ! कीं कधीं मला दुःख दिलं नाहींस ! उलट, आई ! तूं फार दमलीस ! तूं फार भागलीस ! मी तुझे पाय रगडतों ! मी तुझी सेवा करतों ! असं ह्मणून तान्ह्या, तूं आपल्या चिमकुल्या हातांनीं माझे पाय किरे दाबीत होतास ! पण बाळा ! आतां मला तूं दमलीस असं कोण रे ह्मणेल ? माझं पुण्य इतकंच होतं तें संपलं ह्मणून का रे मला सोडून तूं एकटाच निघून गेलास ? बाळा ! माझ्याशीं एक शब्द तरी बोल रे ! तुझं हें सुकुमार गोजिरं मुख पाहून माझी तहानभूक किरे हरपत होती ! नी तुझं कौतुक

करून मी आपल्याला धन्य ह्मणवीत होतें! पण बाळा, आतां उद्यां मी कोणाचं रे मुख पाहूं! माझ्या पाडसा, तुझे हे अलंकार आतां मी कोणाला घालूं! नी मी आतां कोणाला रे भरवूं! महाराज! माझं हें गुणाचं बाळ मला परत आणून द्या हो! हा माझा प्राण निघून गेल्यावर मी कशी जिवंत राहूं! महाराज! यावेळीं मी चाकणेस बाबांच्या घरीं असतें, तर त्यांनीं कोणातरी संतश्रेष्ठांना घरीं आणून, त्यांच्या करवीं स्वर्गीचं अमृत माझ्या बाळाच्या मुखांत घालविलं असतं! नी माझा बाळ मला परत देवविला असता! पण महाराज! ही गोष्ट आपल्या हातून कुठली व्हायला? महाराज! कांहीं तरी उपाय करून, या माझ्या बाळाला ह्या कृतांतपाशांतून सोडवा हो! ( बेशुद्ध होऊन निचेष्टित पडते. )

**रामराजा**– ( सीताबाईस सावरून ) देवी! काय ग ही तुझी अवस्था झाली! देवा! या वेळीं हे माझे प्राण एकदम निघून जातील तर फार बरें होईल! ( इतक्यांत राजकुलगुरु शोकविव्हळ होऊन प्रवेश करतात. राजा उठून पुढें होऊन त्यांस नमस्कार करतो. ) गुरुमहाराज, अशा या संकटसमयीं मी कोणाला शरण जाऊं? मला पातक्याला कोण संतश्रेष्ठ आतां पाठीशीं घालून, माझी या घोर साधुशापापासून मुक्तता करील? या अभाग्याकडे आतां कोण कृपादृष्टीनें पाहील? माझ्या हाकेला आतां कोण हाक देईल? आणि या संकटीं माझें कोण रक्षण करील? गुरुमहाराज, मी आतां कोणाचे पाय धरूं? आणि कोणाजवळ करुणा भाकूं?

**राजकुलगुरु**– राजा, ब्रह्मानंदस्वरूप, पूर्णज्ञानी, संतमुकुटमणी, ज्यांच्या दर्शनानेंच अज्ञानांना ज्ञान प्राप्त होतें, ज्यांच्या स्मरणानें कळीकाळाची बाधा नष्ट होते, आणि ज्यांच्या अनुग्रहानें मोक्षपीठ हातीं येतें, असे मानवदेहानें या कलियुगीं भूतलावर अवतरलेले कैवल्यदानी साक्षात् लक्ष्मीकांत श्रीविष्णु, ज्ञानेश्वरमहाराज, विश्वोद्धाराकरितां सांप्रत सर्व पृथ्वीवर हिंडत असून ते तूर्त या कऱ्हाड नगरीसमीप आले आहेत! तर राजा! पूर्ण पश्चात्तापयुक्त अंतःकरणानें त्यांना शरण जाऊन त्यांचे चरण धर;

आणि त्यांची प्रार्थना करून त्यांना घरीं आणून भक्तिभावानें त्यांचें पूजन कर; आणि त्यांचा शेषान्नप्रसाद भक्षण कर; ह्मणजे तूं सर्व संकटांतून मुक्त होशील! राजा, या जगद्गुरूंचा महिमा तुला काय सांगावा? अरे, त्यांचें तें आनंदघन स्वरूप तूं नेत्रांनीं पाहशील तर तुला तुझ्या देहाचा विसर पडेल! त्यांच्या चरण-पद्माचें तूं हृदयीं ध्यान धरशील तर तुझें चित्त जागच्या जागीं मुरून जाईल! आणि त्यांचें प्रेमानें पूजन करून त्यांचें चरणतीर्थ घेशील, तर तूं जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतून मुक्त होशील! राजा, सह-स्त्ररश्मी भगवान् सूर्यनारायण उदयाचलीं येतांच, जसा लहान-थोर भाव मनांत न आणतां तो सर्वांना सारखाच प्रकाश देतो, तसे हे जगद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराज जातिकुळाचा आणि हीनश्रेष्ठाचा भाव मनांत न आणतां सकल जीवांना पाठीशीं घालून या भवसागरांतून पैलपार नेतात! यासाठीं अशा ह्या परात्पर सद्गुरूंना एकवार तरी नेत्रांनीं पाहून, राजा, तूं कृतार्थ हो! कारण, अशा मोक्षदानी सद्गुरूंची भेट या नरजन्मांत गांठीं थोर पुण्य असेल तरच होते! आणि अशा सद्गुरूंचें दर्शन झालें तरच, राजा, मानवदेहाचें सार्थक होतें!

**रामराजा**—गुरुमहाराज, ही आपली अनुज्ञा आज या अभा-ग्यावर सुखाचा सागर लोटल्याप्रमाणें मला वाटत आहे! दरिद्र्याला जसा धनाचा कूप सांपडावा, किंवा रोग्याला जसें दिव्य रसायण सांपडावें, किंवा मृताला जसें अमृतफल सांपडावें, त्याप्रमाणें या वेळीं हें आपलें वचनामृत मला लाधलें असून, तुमच्या कृपेनें मला अंधाला आज नयन आले आहेत! तरी गुरुमहाराज, मला बरोबर घेऊन जाऊन, जगद्गुरूंच्या चरणांवर मला घाला! मी घोर पातकी आहें, तेव्हां जगद्गुरुपादरजस्पर्शाचें सुख मला मिळवून देण्यास, आपल्यासारखे पुण्यशील आणि पूर्णज्ञानी कुल-गुरुच यावेळीं पुढें झाले पाहिजेत!

**राजकुलगुरु**-राजा, अशीच तुझी इच्छा आहे, तर चल माझ्याबरोबर!

**रामराजा**—कमळे, आह्मी परत येईपर्यंत बाळाचें आणि

देवीचें चांगलें रक्षण करा. चलावें, गुरुमहाराज ! ( रामराजा व राजकुलगुरु निघून जातात. ते निघून गेल्यावर सीताबाईला शुद्धीवर आणण्याकरितां कमळा, पिंगला व गिरजा तिच्या डोळ्यांना पाणी लावून, तिला वारा घालतात व कमळा मधून मधून सीताबाईला, 'बाईसाहेब ! अहो बाईसाहेब ! ' अशा हाका मारते. अशा हाका चालू असतां सीताबाई, एका हाकेच्या वेळेस सावध होऊन डोळे उघडून उठून बसते. )

**सीताबाई**– कमळे, अग मला चांडाळणीला चांगली काळझोंप किग लागत होती ! तींतून मला कशाला ग जागी केलीस ? ( इकडे तिकडे पाहिल्यावर रामराजा तेथें नाहीं असें दिसल्यावर ) कमळे ! माझ्या बाळाला सोडून महाराज कुठे गेले ग ?

**कमळा**– बाईसाहेब, राजकुलगुरूंना बरोबर घेऊन, महाराज श्रीसद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजांना इकडे घेऊन यायला गेले आहेत ! त्यांना गेल्याला बराच वेळ झाला ! ते श्रीसद्गुरूंना घेऊन आतां परत येतील !

**सीताबाई**–कमळे, कसं ग हें माझं विपरीत दैव ! कीं श्रीज्ञानेश्वरमहाराज वाड्यांत येण्यापूर्वींच आमच्या कुळीं अंधार पडला ! अहो भगवंता गोपालकृष्णा, मी तुमचं आजवेरीं भावभक्तीनं पूजन केलं ! तुमची एकनिष्ठेनं सेवा केली ! त्याचं हेंच का हो फळ तुह्मीं मला दिलंत ? हे भगवंता ! तूं दीनदयाळ, अनाथांचा नाथ ह्मणवितोस ! नी यावेळींच तुझं हृदय असं कसंरे कठीण झालं !

**कमळा**–बाईसाहेब, देवाच्या करणीचा अंत कुणालाही लागत नाहीं ! देवानंच मनांत आणलं, तर तो युवराजांना अजून दीर्घायु करील !

**सीताबाई**–कमळे, तूं अगदीं वेडी आहेस ग ! अग खुळे, आपल्या भक्तांना संकटीं लोटण्याचं भगवंतांचं ब्रीद कांहीं आजचंच नाहीं ग ! उदार भक्त श्रियाळ याचं पोर भगवंतांनींच मारलं ? शिबीरायाचं शरीरमांस रती रती काढलं ! भक्तश्रेष्ठ मयूरध्वजाच्या मस्तकीं करवत चालवून त्याचं शरीर दुभंग केलं ! धैर्यवं-

त दक्षबाळाला पाताळीं नेऊन घातलं! दुर्वास ऋषींच्या मागं सुदर्शन लावलं! नी राजा दशरथाला भगवंतांनीं राम! राम! ह्मणून प्राण सोडण्याला किंग लावलं! त्याची देखील त्यांना दया आली नाहीं! अग, या श्रीरंगांनीं प्रत्यक्ष आपल्या सख्ख्या आईचा देखील किंग प्राण घेतला! तेव्हां त्या निष्ठुर भगवंतांना या दीन गाईची ग या वेळीं कुठली दया यायला! कमळे, माझं बाळ भूक लागली ह्मणून किंग ह्मणत होतं! बाळा, तेव्हां मीं तुला चाळवलं, म्हणून का रे मजवर रागावलास? बाळा, तुला साधुशाप बाधूं नये ह्मणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पादरजाची तुला तीट किरे लावली! हे चतुरा! सुंदरा! सुगुणा! माझ्याशीं एकतरी शब्द बोल किरे! बाळा, माझी उपेक्षा कां रे केलीस? तुझ्यावांचून मी अनाथ दीन किरे झालें आहें! कमळे, हें माझं दिव्यरत्न हारपल्यानं माझं घर बुडालं ग! बाळा, तूं परलोकीं गेलास हें पाहून संतराज या तुझ्या मातेच्या हातून कशीरे पूजा घेतील? नी आपल्या घरचं अन्न कसं रे ग्रहण करतील? ते विन्मुख गेले ह्मणजे माझ्या तान्ह्या आपली त्रैलोक्यांत किरे अपकीर्ति होईल! लोक आपली निंदा करतील! पाडसा, हें कसं रे नाहीं तुझ्या ध्यानांत आलं? सख्या, माझी माया सांडून तूं स्वर्गाला एकट्यानंच जायची कां बरं घाई केलीस? हे राजवंशतिलका! माझ्याशीं कांहींतरी बोल किरे! मी तुला इतकी हाका मारतें आहें, मी तुझी इतकी विनवणी करतें आहें, तरी तूं मला कां रे ओ देत नाहींस? बाळा! तुझे गुण संतश्रेष्ठांना फार आवडले! नी ह्मणून कां ग कमळे माझ्या बाळाला दृष्ट झाली? बाळा! आतां तुला देवाच्या पायापाशीं कोणाची दृष्ट न लागो! माझ्या उदरीं येऊन तूं व्यर्थ शिणलास! पण आतां वैकुंठीं देवाच्या घरीं तूं सुखांत राहा! बाळा, अखेरीला तूं संतपूजनाची नी संतभोजनाची इच्छा मनांत धरली होतीस! ती तुझी इच्छा संत घरीं आले ह्मणजे पुरवून, तुझ्या मागून मीही वैकुंठीं येतें! कमळे, संत घरीं येईपर्यंत मी माझ्या तान्ह्याला मांडीवर थोपटून अखेरचं गाणं ह्मणून घेतें! राजसा! आतां मागची सारी आठवण विसर

बरं ! प्रभूची मूर्ति ध्यानीं आणून तुझा डोळा सुखानं लागूं दे !
( बाळकृष्णाचें चुंबन घेऊन )

मनमोहना । तान्ह्याबाळकृष्णा । कैसागेलासी । हरि-
सदना । चिरसुखशांतिभुवना । बाळाबोलरे ॥ नचदेशी ।
उत्तरकांमातेशीं । माझ्यापाडसा । गुणराशी । मननि-
ष्ठुरकेलेसीं । बाळाबोलरे ॥ वेल्हाळा । शीणतुजबहु
झाला । ह्मणुनीरूसूनी । ममबाळा । धरिलाकांआबोला ।
बाळाबोलरे ॥ रुपवंता । अलंकारतवआतां । घालूं-
कोणामी । निष्ठुरता । कांधरिलीबाचित्ता । बाळाबो-
लरे ॥ गुणवंता । रागासोडीआतां । सखयाऊठकिरे ।
तूंजातां । कोणपूजिलसंता । बाळाबोलरे ॥ न्हाऊनी ।
पूजाकरिंघेवोनी । जाईसामोरा । ऊठूनी । संताआणी-
सदनीं । बाळाऐकरे ॥ गुरुराया । सद्भावेंपूजाया ।
आसमनींची । पुरवाया । उठिउठिगुणिराया । बाळा
ऐककिरे ॥

कमळे, मी इतका कंठशोष करितें आहें, पण माझं बाळ मला कांहींच किंग उत्तर देत नाहीं ! बाळा, आतां माझ्या अंगाला कांपरं भरलं ! माझं चित्तरुधिर आटत चाललं ! माझे नेत्र भोवंडाला लागून माझ्या डोळ्यांपुढं अंधारी किरे येऊं लागली ! नी माझ्या तोंडाला कोरड पडली ! बाळा, अजून तरी माझ्याशीं बोल किरे ! कमळे, आतां माझं बाळ माझ्याशीं कुठलं ग बोलायला ? तें वैकुंठभुवनाला कायमचंच गेलं बरं !

वेल्हाळा । माझ्याराजसबाळा । देवाहृषिकेशी । सांभ -
ळा । सुखेंकल्पकाळा । आणिकनमागेमी ॥ मधुसुदना ।
माझ्याबाळकृष्णा । चरणींठावद्या । यादीना । नेदीज-
न्ममरणा । आणिकनमागेमी ॥

( सीताबाई गाणें ह्मणतां ह्मणतां बेशुद्ध होऊन पडते. तिला कमळा सावरते व ' बाईसाहेब ! सावध व्हा ! सावध व्हा ! ' असें ह्मणते इतक्यांत रामराजा व राजकुलगुरु प्रवेश करतात. )

**रामराजा**– ( सीताबाई मूर्च्छित पडलेली पाहून ) कमळे, देवी अजून शुद्धीवर आली नाहीं ना ? हाय रे अभाग्या रामराजा ! आपल्या दुष्कृताच्या वन्हिज्वाळेंत सकल राजकुल किरे दग्ध करून टाकलेंस ! गुरुमहाराज, कायहो माझें हें बलवंत पूर्वकर्म !

**राजकुलगुरु**– राजा, हें पूर्वकर्म सर्वांहून बलिष्ठ आहे ! याच पूर्वकर्मानें श्रीरामचंद्र प्रभूंना रानोरान हिंडावयास लाविलें ! याच कर्मामुळें महासती जानकी मातोश्रीला रावणानें चोरून नेली ! याच कर्मानें ब्रह्मा, विष्णु, महेश, यांना या भूतलावर अवतार घ्यावे लागले ! याच्याचमुळें भस्मासुराचें तोंड काळें झालें ! याच्याचमुळें भगवान् श्रीकृष्णाला काळयवनापुढें पळावें लागलें ! मदनाचा देह पूर्वकर्मानेंच दग्ध झाला ! आणि याच पूर्वकर्मामुळें सकल यादवांचा कुलक्षय झाला ! असे किती दाखले देऊं ? राजा, हें पूर्वकर्म आजपर्यंत कधीं कोणाला सुटलें नाहीं !

**रामराजा**– कमळे, आह्मी मघांशीं येथून गेल्यापासून हा वेळपर्यंत देवी एकदां देखील शुद्धीवर आली नाहीं का ग ?

**कमळा**– महाराज, आपण इथून गेल्यावर बाईसाहेबांना शुद्धीवर आणण्यासाठीं आह्मीं पुष्कळ यत्न केले. तेव्हां बऱ्याच वेळानं त्या एकदांच्या शुद्धीवर आल्या. नी मला चांगली काळझोंप लागत होती, तींतून मला कशालाग जागी केलीस, असं मला ह्मणाल्या, नी मग युवराजांचं मस्तक मांडीवर घेऊन, त्या मोठमोठ्यानं आक्रोश करूं लागल्या ! बाळा, संतमहाराज आतां घरीं आले, नी त्यांनीं तुझी ही दशा पाहिली, म्हणजे ते विन्मुख किरे परत जातील ! नी ते परत गेले ह्मणजे जगांत लोक आपली निंदा किरे करतील ! एक नी दोन अशा हजार गोष्टी त्या युवराजांना म्हणूं लागल्या ! नी मग त्या शोकाच्या लहरींत युवराजांना थोपटून गाणं म्हणूं लागल्या. गाणं ह्मणतां म्हणतां त्यांना पुन्हा मूर्च्छा आली, नी त्या आतां इतक्यांत बेशुद्ध झाल्या !

**रामराजा**– गुरुमहाराज, देवीची ही भयकंर स्थिति पाहून माझें हृदय दुभांग होत आहे ! गुरुमहाराज, श्रीसद्गुरुज्ञानेश्वरमहाराज येथें येऊन त्यांनीं बालकाची आणि देवीची ही अवस्था

पाहिली, ह्मणजे ते रागावून माझ्या हातून पूजा ग्रहण न करतां, मला हतभाग्याला या दुःखडोहांत असाच पचत टाकून जाऊं लागले, तर मग मी काय करूं हो !

**कमळा**– महाराजांनीं सद्गुरूंना या वेळीं असंच सांगितलं पाहिजे कीं, युवराज एकाएकीं गच्चीवरून खालीं पडले, नी त्यांना भयंकर मूर्च्छा आली ! पुष्कळ उपाय केल्यावर ते शुद्धीवर आले, नी बाईसाहेबांच्या मांडीवर ते आतां इतक्यांतच झोपी गेले आहेत ! बाईसाहेबांना आज फार शीण झाला, नी त्यामुळं त्यांचाही बसल्याजागींच हा आतांच डोळा लागला आहे ! असं महाराजांनीं सद्गुरूंना सांगितलं, ह्मणजे महाराजांच्या हातून पूजा घेण्यापूर्वी सद्गुरु इथून निघून जाणार नाहींत !

**रामराजा**–हर ! हर ! सद्गुरुसमर्थ श्रीज्ञानेश्वरमहाराज माझ्यापुढें उभे राहिल्यावर, त्यांच्यापुढें देखील या दैवघातक्याला खोटें बोलण्याची वेळ आली ना ! तेव्हां गुरुमहाराज, आपण ह्मणतां त्याप्रमाणें पूर्वकर्म सर्वांहूनही बलिष्ठ आहे, हेंच खरें !

(इतक्यांत राजोपाध्ये येऊन श्रीज्ञानेश्वरमहाराज आल्याचें सुचवितात. रामराजा व राजकुलगुरु त्यांस सामोरे जातात. रामराजा श्रीज्ञानेश्वरमहाराजांस हातीं धरून उच्चासनावर आणून बसवितो. राजकुलगुरु नामदेवादि संतांस श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या आसनाभोंवतीं आणून बसवितात. राजोपाध्ये रामराजास पूजासाहित्य आणून देतात. रामराजा श्रीज्ञानेश्वरमहाराजांची पूजा करण्यास आरंभ करणार इतक्यांत)

**ज्ञानेश्वर**–हे राजश्रेष्ठा ! मातोश्री सीताबाईला आणि श्रीकृष्णस्वरूप बाळकृष्णाला इकडे घेऊन या ! ह्मणजे त्यांना डोळेभरून पाहून आह्मी कृतार्थ होऊं !

**रामराजा**–(कंठ दाटून येऊन) सद्गुरुमहाराज ! मी शिकारीला गेलों असतां, दोन घटकांपूर्वीं माझा बाळकृष्णा गच्चीवरून पडून बेशुद्ध झाला होता ! तेव्हां देवीनें, आणि तिच्या सखी व दासीजनांनीं पुष्कळ उपचार करून, बाळकृष्णाला शुद्धीवर आणलें! सांप्रत तो पहा तेथें देवीच्या मांडीवर नुकताच झोंपी गेला आहे, आणि

देवीलाही फार शीण झाल्यामुळें, तीही जागच्याजागींच लवंडून, तिचाही आतांच डोळा लागला आहे! तरी तीं उभयतां जागीं होईपर्यंत सद्गुरूंनीं माझ्या हातून पूजा ग्रहण करून मला चरण-तीर्थप्रसाद द्यावा!

**ज्ञानेश्वर**– राजा! बाळकृष्णाला क्षेमालिंगन देण्याकरितां मी फार उत्कंठित झालों आहें! तरी त्याला जागा : : न इकडे घेऊन या! नामदेवा, बाळकृष्णाला इकडे आणा हो झणजे ती गोजिरी कृष्णमूर्ति आपण सर्व डोळेभरून पाहून धन्य होऊं! (नामदेव बाळकृष्णाला उचलून आणण्याकरितां पुढें होतात, तेव्हां कमळा त्यांना आडवी होते. रामराजा व राजकुलगुरु एकीकडे जाऊन अधोवदन उभे राहतात.)

**कमळा**– अहो संतमहाराज! युवराजांचा डोळा नुकताच किहो लागला आहे! त्यांची झोंपमोड करूं नका! त्यांची झोंपमोड झाली तर ते रडून रडून गोंधळ करतील! नी तुह्मां स-मर्थांच्या जिवाला त्यापासून उगींच क्लेश होतील!

**नामदेव**– अहो बाई, हें बालक नसून हा साक्षात् पंढरपूर-वासी श्रीपांडुरंग आहे! तेव्हां या बालकाच्या दर्शनानें आह्मांला साक्षात् श्रीपंढरीनाथाचें दर्शन घडणार आहे! तरी कृपा करून श्रीपांडुरंगाच्या भेटींत आह्मांला अडथळा करूं नका! (नामदेव बाळकृष्णाला सीताबाईच्या पुढून उचलूं लागतात; तेव्हां कमळा दूर सरून डोळ्यांना पदर लावून खालीं पहात उभी राहते. नामदेव बाळकृष्णाला हातांवर उचलून घेतात व बाळकृष्णाच्या रक्तानें माखलेल्या मुखाकडे पाहून एकदम घाबरून) हाय! हाय! बापा ज्ञानराया! यावेळीं या श्रीकृष्ण प्रभूंनीं भेसूर स्वरूप किहो धारण केलें आहे! (बाळकृष्णाला घेऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजां-कडे जातां जातां) ज्ञानराया, यावेळीं प्रभूंनीं नेत्र मिटून घेतले आहेत! प्रभूंचे चलनवलनादि व्यापार बंद पडले आहेत! आणि प्रभूंनीं तोंड उघडें ठेविलें आहे! बापा ज्ञानराया, यावरून प्रभूंनीं आपणांवर रुष्ट होऊन, ह्या बालकायेचा त्याग करून इह-लोकावरून वैकुंठीं प्रयाण केलें, असें मला वाटतें! (नामदेव

बाळकृष्णास श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे मांडीवर ठेवितात. सर्व संत पुढें होऊन बाळकृष्णाचे मुखाकडे पाहून डोळ्यांस पदर लावून तोंडें खालीं घालून उभे राहतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज बाळकृष्णाचे तोंडाकडे पाहून सद्गदित होतात.)

**ज्ञानेश्वर**–हे सुकुमारा बाळा! तूं आह्मांला बोलावूं आलास, तेव्हां तूं साक्षात् गोकुळवासी श्रीकृष्ण प्रभूच आमच्या भेटीला आलास असें किरे आह्मांला वाटलें! आणि साक्षात् रुक्मिणीवरानेंच आज आम्हांला प्रसादाचें आमंत्रण दिलें, अशी भावना पोटीं धरून, आम्हीं मोठ्या आशेनें प्रसादाकरितां येथें धांवत आलों! असें असून, हे गोपाळकृष्णा, आम्ही येण्यापूर्वींच तूं आह्मांला सोडून निजधामाला कसारे गेलास! आमची तूं एवढा वेळ आतुरतेनें वाट पाहिलीस आणि आह्मांला यायला उशीर लागला, ह्मणून कारे आम्हांवर रुसून तूं वैकुंठभुवनीं परत गेलास! हे गुणसमुद्रा, आह्मांवर असा रुसूं नकोस रे! यावेळीं तूं जर आह्मांवर असा रुसलास, तर आमच्या तोंडाला काळोखी किरे लागेल! अहो, श्रीमद्भीमातीरविहारा पुंडलीकवरदा पांडुरंगा! हें तुम्ही काय हो केलें? अहो विश्वजीवना करुणार्णवा महाविष्णु, तुह्मांला हें कसें हो रुचलें! अहो श्रीधरा, गोविंदा, आह्मां दीनभक्तांवर तुह्मी हा काय हो घोर प्रसंग आणला! अहो शेषशाई, विश्वंभरा, दीनबंधो, आह्मां भक्तांचा लौकिक तुम्ही असाच काहो वाढविणार? अहो चतुर्दशलोकपालना पुराणपुरुषा, आमच्या शुद्ध भक्तीला वश होऊन, तुम्ही आमच्या सान्निध नित्य राहतां, ह्मणून त्रिभुवनीं आह्मांला धन्य किहो समजतात! आणि हीच भावना मनीं धरून या राजश्रेष्ठानें, या मातोश्रीनें आणि या सुंदर सुकुमार बालकानें आमचा गौरव करून, आह्मांला येथें आणिलें! आणि हे शुद्ध निरंजना, विश्वेशा, येथें जर ही अशी विपरीत गत झाली, तर आम्ही तुझे भक्त द्वाड आहों, असा आमच्या अपकीर्तीचा डंका त्रिभुवनीं गाजून, आह्मांला पाहून सगळे लोक भिऊन पळून किरे जातील! हे सच्चिदानंदा, अनंता, आमच्या आगमनानें

बालकांना मृत्यु येतो, असें किरे सारें जग ह्मणेल ! हे देवाधिदेवा नारायणा, तुझ्या भक्तांना घरीं आणलें असतां, थोर अनर्थ उद्भवतात, अशी आमची अपकीर्ति सर्व जगांत पसरून आह्मांला कोणी पुढेंदेखील उभें राहूं देणार नाहीं ! आमचा सर्व लोक उपहास करतील ! हे सावळे कान्हाई कृष्णाबाई, ही विपरीत करणी कशीग केलीस ! हे जगदुद्धारा, वैकुंठनायका, या बालकाला आह्मीं 'दीर्घायुभव' असा किरे आशीर्वाद दिला ! तें आमचें वचन तूं आज असेंच कारे खरें केलेंस ? हे मायाचक्रचालका भगवंता, मागील युगीं तूं भक्तवचनासाठीं अनंत रूपें आणि अनंत नामें धारण करून, अनंत अवतार घेतलेस ! आणि अनंत लीला करून दाखवून, आपल्या भक्तांचा लौकिक वाढविलास ! असें असून, देवा, यावेळींच कारे अशी निष्ठुरता धारण केलीस ? हे इंदिरावरा माधवा, प्रल्हादाकरितां तूं स्तंभीं प्रगटलास ! उपमन्यूला क्षीरसागर दिलास ! ध्रुवाला अढळपदीं स्थापिलास ! नारदाला ब्रह्मशापापासून सोडविलेंस ! गजेंद्राला संकटीं पावलास ! अहल्येला पाषाणदेहापासून उद्धरलीस ! पार्थासाठीं कळवळून, जें तुझें स्वरूप विधीनें आणि देवांनींही कधीं पाहिलें नाहीं, असें आपलें विश्वरूप त्याला दाखविलेंस ! पांचाळीला संकटीं लुगडीं पुरविलींस ! हे भक्तकामकल्पद्रुमा देवा, हे तुझें ब्रीद सकल विश्व आतां मिथ्या किरे ह्मणेल ! हे अनंत कल्याणदायका पंढरीशा, तुझ्या अनंत युगींच्या कीर्तीला हें उचीत आहे कारे ? हे विश्वमतिचालका पंढरीनाथा, तूं दीनदयाळ, पतितपावन, अनाथनाथ, भक्तकैवारी, संकटीं वरदानी आहेस, ह्मणून तुझे पोवाडे आह्मी नित्य जगापुढें गातों, ते अशाच करितां कायरे ? हे अजआजिता, गुणातीता, तूं विश्वात्मा, आह्मां भक्तांना तातजननी, असें असून हे प्रभो आतांच कारे आम्हांवर निष्ठुर झालास ? अहो भक्तप्रियकरा पांडुरंगा, आम्हांवर दया करा, आणि या बालकाच्या मुखांत अमृत आणून घालून याला जिवंत करा ! आणि आम्हां भक्तांचा लौकिक कायम राखा ! हे सकल देवपालका, तुला शरण आल्यावर

आम्हां भक्तांवर आपदा आली, तर तुझ्या ब्रिदाला उणेपणा किरे येईल ! हे दयाघना नारायणा, तूं आम्हां भक्तांचें निजधन आह्मां भक्तांचीं विघ्नें स्वतः आंगीं सोसून, आम्हां दासांचें तूं! रक्षण करतोस, आणि आमचा हट्ट पुरवून आमची प्रौढी वाढवितोस ! ही तुझी भक्तवत्सलता आतां कोठेंरे गेली ? हे दयाघना, आम्हांसाठींच आतां कारे कृपणता धरलीस ? हे भक्तभूषणा पंढरीशा, तूं पूर्वी गुरुपुत्र परत आणून दिलास ! तसेंच यावेळींही आह्मां भक्तांच्या धावण्या धांवून आमचें यश राखावें ! देवा, हे पाहा सर्व संत दीनवदन करून बसले आहेत ! यांची लज्जा रक्षण करणें, देवा, तुझ्याकडे आहे ! नारायणा, मी तुला इतका आळवीत असतां तुला माझी अजून कारे करुणा येईना ? हे द्वारकाधीशा, तूं आजच कारे इतकें कठीण मन केलेंस ? का हे पांडुरंगा, यावेळीं तूं पंढरपुरीं प्रेमळ भक्तांच्या कीर्तनश्रवणांत गुंग होऊन गेला आहेस ? का देवा, योग्यांच्या ध्यानांत गुंतला आहेस ? का आणीक कोणीं भक्तानें तुला याच वेळीं संकट घातल्यामुळें तिकडे धांवून गेला आहेस ? का हे अधोक्षजा, सगुण उपासकांची पूजा घेत बसला आहेस ? का इंद्र तुला अमृतपान करविण्याकरितां घेऊन गेला आहे ? का पंढरीस तुझ्या भक्तांना दर्शन देण्यांत गुंतला आहेस ? का रुक्मिणी मातोश्रीजवळ निद्रिस्त झाला आहेस ? अहो संत हो,

नामप्रल्हादउच्चारी ॥ तयासोडवीनरहरि ॥ उचलुनि घेतलाकडियेवरी ॥ भक्तसुखेंनिवाला ॥ १ ॥ नामबरवयाबरवंट ॥ नामपवित्रचोखट ॥ नामस्मरेनीळकंठ ॥ निजसुखेंनिवाला ॥ ध्रु० ॥ जेंधुरुसींआठवलें ॥ तेंचि उपमन्येंघोकिलें ॥ तेंचिगजेंद्रालाधलें ॥ हितझालेंतयांचें ॥ २ ॥ नामस्मरेअजामेळ ॥ महापातकीचांडाळ ॥ नामेंझालासोज्वळ ॥ आपणासहितनिवाला ॥ ३ ॥ वाटपाडाकोळिकु ॥ नामस्मरेवाल्मिकु ॥ नामेंउद्धारिलेतिन्हीलोकु ॥ आपणासहितनिवाला ॥ ४ ॥ ऐसे-

अनंतअपार ॥ नामेंतरलेचराचर ॥ नामपवित्रआणि- परिकर ॥ रखुमादेविवराचें ॥ ५ ॥

ह्मणून आतां आपण विठ्ठल नामाचा टाहो फोडून भगवंताला आळवूं ! म्हणजे तो भक्तकैवारी दयाघन प्रभु आपल्याकडे वळून आपला हट्ट पुरवील ! आणि या बालकाला जीवदान देऊन, आपली लज्जा रक्षण करील !

( श्रीज्ञानेश्वरमहाराज, नामदेवादि संत रामराजा, राजकुलगुरु व कमळा विठ्ठल नामाचा गजर करतात; व हा गजर चालू असतां, श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या नेत्रांतून वाहणारे अश्रु बाळकृष्णाच्या उघड्या तोंडांत टपटप पडत असतात. हे अश्रु बाळकृष्णाच्या तोंडांत पडूं लागल्यावर, तो हळू हळू झोपेंतून जागा झाल्याप्रमाणें सावध होऊं लागतो; व अमळशानें उठून बसून श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या मुखाकडे पाहून त्यांस कडकडून मिठी मारतो. तेव्हां विठ्ठलनामाचा गजर बंद करून, श्रीज्ञानेश्वरमहाराज बाळकृष्णाला हृदयाशीं घट्ट धरितात. )

हे भक्तवत्सला श्रीपांडुरंगा ! या बालकाला जीवदान देऊन, तूं आम्हां भक्तांचा माथा आज उजळ केलास, तेणेंकरून आम्ही धन्य झालों ! बाळा ! तो तुझा तात देहभान विसरून, तेथें स्तब्ध उभा राहिला आहे ! तर त्याला भेटून धन्य हो !

**बाळकृष्णा**– ( रामराजाकडे धांवत जाऊन व त्याच्या कमरेस मिठी मारून ) तातमहाराज ! मजवरचा तुमचा राग अजून गेला नाहीं, आणि म्हणूनच काहो तुम्ही असे कष्टी होऊन उभे राहिलां आहां ? तातमहाराज ! आतां मजवरचा राग सोडून मला जवळ घ्या किहो ! ( रामराजा देहावर येऊन बाळकृष्णाला आनंदानें उचलून पोटाशीं घट्ट धरितो व त्याचें चुंबन घेतो. इतक्यांत बाळकृष्णाची दृष्टि सीताबाईकडे जाते ) तातमहाराज ! तुह्मी माझ्या आईला कांहीं कठोर भाषण बोललां, ह्मणून काहो ती विव्हळ होऊन अशी भुईवर आंग टाकून तेथें पडली आहे ?

**रामराजा**– ( गहिंवर दाटून येऊन बाळकृष्णाचें पुन्हा चुंबन घेऊन ) बाळा ! यावेळीं माझ्या अत्यानंदाचा कळस झाल्यामुळें

माझा कंठ दाटून आला आहे ! आणि त्यामुळें माझ्या तोंडांतून एक शब्द देखील निघत नाहींसा झाला आहे ! माझ्या राजसा ! देवी तुझ्याच घोर चिंतेनें तेथें विव्हळ होऊन पडली आहे ! तर बाळा, तिला प्रेमानें चुंबन देऊन तिची समजूत कर ! माझ्या गुणनिधाना ! तुला काळानें ओढून नेलें होतें रे ! परंतु ( श्रीज्ञानेश्वरमहाराजांकडे बोट दाखवून ) या सद्गुरूंनीं काळाच्या तोंडांत मारून ( बाळकृष्णाचें चुंबन घेऊन ) हें त्रिभुवनींचें भांडार माझ्या हातीं परत आणून दिलें ! ( बाळकृष्णा खालीं उतरून पळत पळत आईजवळ जातो. )

**बाळकृष्णा**– आई ! आई ! ए आई ! माझ्याशीं बोल किग ! माझ्या आंगावरून हात फिरवून मला जवळ घे किग ! तूं जर माझ्यावर अशी रागावलीस तर मला कोण ग जवळ घेईल ? आईग ! हें पाहा मीं आपलें तोंड पुढें केलें आहे ! तर प्रेमानें माझें चुंबन घे किग ! आई ! मला फार भूक लागली आहे ग ! आई ! आईग ! आतां राग सोड किग ! आई ! मी इतका विनवितों आहें, तरी अजून तूं कां ग उठेनास ?

**सीताबाई**– ( मुलाचा शब्द ऐकून झोपेंतून जागी झाल्याप्रमाणें खडबडून उठून बसते व बाळकृष्णास पाहून त्यास पोटाशीं घट्ट धरून त्याचें चुंबन घेऊन व त्याचें मुख कुरवाळून साश्चर्य चहूंकडे पाहून ) बाळा ! इतका वेळ कुठें रे गेला होतास ? पाडसा ! मी तुझ्यावांचून दीन किरे झालें होतें ! माझ्या जिवीच्या विसाव्या ! आतां पुन्हा नाहीं ना तूं मला सोडून असा कुठें दूर जाणार ?

**बाळकृष्णा**– ( आईच्या गळ्यास मिठी मारून ) आईग ! तातमहाराज कोठवर आले, हें पाहण्याकरितां मी गच्चीवर चढलों होतों ग ! तों तेथून पाय घसरून खालीं पडलों ! तेव्हां हातांमध्यें शंख, चक्र, गदा, पद्म धारण केलेले लक्ष्मीकांत श्रीविष्णु माझ्या पुढें एकदम येऊन उभे राहिले, आणि त्यांनीं मला चटदिशीं कडेवर उचलून घेतलें ! इतक्यांत स्वर्गांतून एक विमान खालीं उतरलें ! त्या विमानांत भगवान् मला घेऊन बसले ! आणि मी भगवंतांच्याबरोबर वैकुंठाला गेलों ! आई, तेथली मौज

मी तुला काय ग सांगूं ? तेथें गेल्यावर भगवान् एका सिंहासनावर बसले आणि मला मांडीवर घेऊन त्यांनीं माझें प्रेमानें चुंबन घेतलें ! अमळशानें मला तुझें आणि तातमहाराजांचें स्मरण झालें ! पण तुह्मी दोघेंही मला कोठें दिसांना ! तेव्हां मला भूक लागली आहे, मला आईकडे घेऊन चला, असें मीं भगवंतांना ह्मटलें ! तेव्हां त्यांनीं माझ्या मुखांत अमृत घातलें ! आई ग ! त्या अमृताची गोडी माझ्या तोंडांतून अजून किंग गेली नाहीं ! आई ग ! इतक्यांत ( श्रीज्ञानेश्वरमहाराजांकडे बोट करून ) या संतश्रेष्ठांचें मला स्मरण झालें ! हे पूजा ग्रहण करण्याकरितां घरीं आले असतील, माझी वाट पाहात असतलि, मी कोठें आहें ह्मणून तुला विचारीत असतील, असें माझ्या मनांत येत आहे तोंच भगवान् श्रीविष्णूंनीं (श्रीज्ञानेश्वरमहाराजांकडे पुनः बोट करून) हें सद्गुरुस्वरूप धारण केलें; आणि मला हातीं धरून या स्वरूपानेंच भगवान् मला घेऊन येथें परत आले ! आई ग ! तर आतां ऊठ लवकर, आणि माझ्या हातून या सद्गुरुस्वरूपीं भगवान् श्रीविष्णूंचें पूजन करीव !

**सीताबाई**– ( आनंदानें उठून बाळकृष्णास कडेवर घेऊन त्यास श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे चरणांवर आणून घालते व आपण स्वतः श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे पाय घट्ट धरून बसते ) अहो सद्गुरुसमर्था! आपण या आपल्या धर्माच्या बहिणीला हें पुत्रदान देऊन आज धन्य केलं ! सद्गुरुनाथा ! या आपल्या उपकाराबद्दल मी आपली कशी उतराई होऊं ? मी आपल्याला काय अर्पण करूं ? मी आपला धन्यवाद किती गाऊं ? माझें हें सुखनिधान मला आज लाधल्यामुळं, यावेळीं मी आनंदानं अगदीं वेडी झालें आहें ! माझा कंठ दाटून आला आहे ! मी काय करूं, काय बोलूं, हें मला कांहींच सुचत नाहींसं झालं आहे ! ह्मणून हे सद्गुरुचरण मीं घट्ट धरिले आहेत !

**राजकुलगुरु**– अहो सद्गुरुसमर्था, ही देवी आणि हा राजा हीं उभयतांही यावेळीं अत्यानंदानं अगदीं वेडावून जाऊन गोंधळून गेलीं आहेत ! त्यांचें देहभान यावेळीं सर्वस्वी नष्ट झालें

आहे ! तरी समर्थांनीं त्यांच्या मस्तकांवर हात ठेवून त्यांना देहावर आणावें, आणि त्यांना उपदेशामृत पाजून त्यांचें अज्ञान दूर करावें ! ( रामराजा व बाळकृष्णा श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चरणांवर मस्तक ठेवितात. )

**ज्ञानेश्वर**– अहो राजकुलगुरु ! तुम्हासारखे ज्ञानवृद्ध राजाला उपदेशामृत पाजण्याकरितां नित्य सन्निध असल्यावर मी तें याला अधिक काय सांगणार ? ( श्रीज्ञानेश्वरमहाराज रामराजा, सीताबाई व बाळकृष्णा यांच्या मस्तकांवर हात ठेवितात. ) हे राजश्रेष्ठा ! आणि अहो मातोश्री ! आतां उठा ! ( त्रिवर्ग उठून श्रीज्ञानेश्वरमहाराजांपुढें हात जोडतात. ) राजा ! विषभक्षण करून त्यावर अमृतपान केलें असतां, जसे सर्व अनर्थ चुकतात, त्याप्रमाणें अगोदर हातून उदंड दुष्कृत घडल्यावर जर शेवटीं पोटीं अनुताप उत्पन्न झाला तर मागील सर्व पातकें जळून जातात ! हे राजश्रेष्ठा, तुला आतां अनुताप झाल्यामुळें, तुझा भवरोग दूर गेला आहे ! तर आतां दांभिक अभिमान टाकून, आंगीं सात्विक गुण धर. सर्वांमध्यें धर्म हा श्रेष्ठ आहे ! याकरितां सदा धर्मावर चित्त ठेवून अनादिकालापासून सज्जन तो जसा आचरीत आले आहेत, त्याप्रमाणें तो तूं आचरीत जा. कुल, शील, विद्या, धन, राज, तप, रूप व यौवन, या अष्टमदांनीं आपलें मन भुलूं देऊं नको. धर्मानेंच राज्य मिळवून त्याचें धर्मानेंच रक्षण करीत जा. अविहित अनाचारकर्मीं प्रवृत्त होऊं नको सत्पात्रीं दान देऊन, दीन जनांचे क्लेश हरण करीत जा. वेद हे जसे ब्राह्मणांचे बांधव आहेत, त्याप्रमाणें मंत्री हे राजाचे बांधव आहेत ! ह्मणून धर्मशील प्रधान नेमून प्रजेचें पुत्रवत् पालन कर. स्त्रिया, ब्राह्मण, साधु, यांना दंडूं नको. देव-विप्रांचें वेतन चालवीत जा. कोणी सेवक व प्रधान प्रजेला पीडा करतील, तर त्यांना पदावेगळे करीत जा. आश्रित, उपाध्ये, ऋत्विज, ब्राह्मण, हे अनुष्ठान, जप, तप, याग, पुरश्चरण, हीं यथासांग करितात किंवा नाहीं, हें नित्य पाहून, आपल्या कृतीनें, आपल्या वाणीनें,

आपल्या दृष्टीनें, आणि आपल्या मनानें, सर्व प्रजा नेहमीं संतुष्ट ठेवीत जा. सर्वभूतीं नारायण आहे, अशा भावनेनें अन्नदान करीत जा. मीं तुला बहुत काय सांगावें ? मनुयाज्ञवल्क्यस्मृतियुक्त आपलें वर्तन ठेव. ही राजनीति भारतांत विदुरानें धृतराष्ट्राला सांगितली आहे. तिचें मनन करून त्याप्रमाणें वागत जा. ह्मणजे लाभ आणि सौख्य हीं तुला प्राप्त होतील. दुर्जनांच्या बुद्धीचा त्याग करून सत्संग धर. साधुसंतांचे आशीर्वाद घेत जा. गुरुवचनीं सदा सादर रहात जा. कुमार्ग टाकून सन्मार्गानें वाग. आणि साधुजन पाळून हरिभजनीं आंग झिजव. विषयांवरील आदर सांडून, कामक्रोधादि शत्रूंना आपल्या पराक्रमानें दमवून टाक. इंद्रियें स्वाधीन ठेवून, नित्य नैमित्तिक कर्में यथासांग करीत जा. अहोरात्र आपल्या हातून पापपुण्य किती घडलें, हें मनाला विचारून, भावभक्तीनें श्रीहरीचें पूजन करीत जा. अभिमान सांडून संतांचें दास्य कर. संतमुखानें वेदांत श्रवण करून, हरिकीर्तन ऐकत जा. संतश्रेष्ठांना आपलें तन, मन, धन अर्पून त्यांची सेवा करीत जा. ह्मणजे तुला ते मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखवून देतील. राजा, संतसेवा हेंच मोक्षाचें साधन आहे. याकरितां सदैव त्यांची संगत धर; ह्मणजे ते तुझें अपेक्षित तुला सांगतील. त्यांच्या संगतीनें तुझ्या अंतःकरणास बोध होऊन, तुझें मन कल्पनारहित होईल, आणि तुझ्या त्रिविध वासना मावळतील. त्यांच्या कृपेनें तुला सर्वत्र नारायण दिसूं लागेल ! आणि अशा रीतीनें शुद्ध ब्रह्म तुजपुढें येऊन उभें राहिलें ह्मणजे, तूं इहलोकीं उदंड कीर्ति आणि अपार सुख संपादून, देहत्यागानंतर चिन्मयपदाची जोड मिळविशील !

( राजा, राणी व बाळकृष्णा श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें पूजन करितात, व त्यांस ओवाळून त्यांचें पादतीर्थ सेवन करितात. तेव्हां श्रीज्ञानेश्वरमहाराज आपल्या कंठांतील तुळसीकाष्ठमाला राजाच्या गळ्यांत प्रसाद ह्मणून घालतात. तेव्हां राजा त्यांस साष्टांग

नमस्कार घालतो. नंतर राजा, राणी व बाळकृष्णा हीं नामदेवादि संतांस नमस्कार घालतात. )

**नामदेव**– राजा, ज्ञानरायांनीं आपल्या कंठांतील तुळसी-काष्ठमाला तुझ्या गळ्यांत घातली आहे, ही तूं अखंड गळ्यांत वागव ! आणि आह्मां संतांचें श्रेष्ठ भूषण जी ही पताका ती मी तुझ्या हातीं देत आहें, (पताका राजाच्या हातांत देऊन ) ही हातीं घेऊन विठ्ठल नामाचा घोष करीत,

**पंढरीसीजावेंजीवन्मुक्तव्हावें ॥ जीवलगाभेटावेंविठोबा-सी ॥ १ ॥ कायावाचामनचरणींठेवावें ॥ प्रेमसुखमागा-वेंपंढरीनाथा ॥ २ ॥ सुखाचेंसाजिरेंश्रीमुखपहावें ॥ जीवेंउतरावेंलिंबलोण ॥ ३ ॥ नामाह्मणेआह्मांदीनांचें माहेर ॥ गातांमनोहरगोडवाटे ॥ ४ ॥**

( पडदा पडतो. )

# अंक ५ वा.

## प्रवेश पहिला.

**स्थळ**– श्रीवाराणसी ( काशी ) क्षेत्र. मुद्गलाचार्यांचा यज्ञमंडप.

( यज्ञकुंडांत नुकीच पूर्णाहुति पडून कुंडांतील हुताशन हळूहळू शांत होत चालला आहे, यज्ञ करणारे ऋत्विज, ब्राह्मण व यजमान मुद्गलाचार्य, यज्ञमंडपांत अग्रपूजेकरितां एक उच्चासन मांडून, त्याच्या सभोंवतीं विचार करीत बसले आहेत व त्या उच्चासनाजवळ अग्रोदक कलश व गंधचंदनपुष्पादि पुजासाहित्यांनीं भरलेलीं पात्रें ठेविलेलीं आहेत, असा पडदा उघडतो. )

**मुद्गलाचार्य**– अहो श्रेष्ठहो, एका गृहींचच द्रव्य मिळेल, तेव्हांच महायज्ञ करावयाचा, असा जो हेतु मीं बहुतकालपर्यंत मनांत धरला होता, तो माझा हेतु श्रीविश्वेश्वरांनीं आज शेवटास नेल्यामुळें मला थोर धन्यता वाटत आहे ! मथुराधिपति पिपाजी राजे यांनीं आपले पुत्र आदीप राजे यांच्याकरवीं या यज्ञाकरितां मला पंचवीस सहस्र होन देवविले, ह्मणूनच एक संवत्सरपर्यंत हा यज्ञ यथासांग चालून आज पूर्णाहुति होऊन त्याची निर्विघ्नपणें समाप्ति झाली ! या महायज्ञाच्या थोर पुण्याचे अधिकारी पिपाजी राजे आणि त्यांचे पुत्र आदीप राजे हेच सर्वस्वी आहेत. या वाराणसी क्षेत्रांतील आणि अयोध्या, मथुरा, माया, कांची, अवंतिका आणि द्वारका अशा सप्तपुऱ्यांतील तुह्मांसारखे वेदज्ञ, सकलशास्त्रविशारद, व्यास, वसिष्ठ, याज्ञवल्क्यतुल्य श्रेष्ट ऋत्विज या यज्ञास मिळाले, म्हणूनच यज्ञांत कांहीं एक न्यून न पडतां वसुधारा अखंड चालून जातवेद तृप्त झाला ! आतां एकदां कोणातरी जगद्गुरु समर्थास या अग्रपूजासनावर बसवून या माझ्या हातांनीं मीं त्यांची अग्रपूजा केली, ह्मणजे मी कृतार्थ झालों ! श्रेष्ठहो, या कलियुगांत जगदुद्धाराकारितां शिव, विष्णु ब्रह्मा आणि

आदिमाया चिच्छक्ति, यांनीं श्रीनिवृत्तिनाथमहाराज, श्रीज्ञानेश्वर-महाराज, सोपानदेव आणि मुक्ताबाई हीं नांवें धारण करून, या भूतलावर अवतार धारण केले आहेत, व सांप्रत या ईश्वरविभूति भूवैकुंठ पंढरीक्षेत्राहून समागमें वीस हजार वैष्णवसंत घेऊन तीर्थाटनाच्या निमित्तानें जड जीवांचा उद्धार करीत हिंडत आहेत! हें तुह्मांस माहीत आहेच. पंढरीहून निघाल्यानंतर या जगद्गुरूंनीं आरणभेंडी, लऊळ, बार्शी, जोगाईचें आंबें, कऱ्हाड, तेर, कपिलधारातीर्थ, औंढ्या नागनाथ, प्रतिष्ठान, देवगिरी, वगैरे प्रांतांतील भाविक जनांस भक्तिमार्गास लावून, वेरूळ, घृष्णेश्वर, कचेश्वर, शुक्रेश्वर, पंचवटी, त्र्यंबकेश्वर, द्वारका, डाकूर, इत्यादि तीर्थें आपल्या चरणरजानें शुद्ध केलीं! आणि तेथून हे जगद्गुरु जुनागड प्रांत, प्रयाग, भारद्वाजाचा आश्रम, लोपामुद्रेचें स्थान, अयोध्या, पलखपुकार आश्रम आणि चित्रकूट इत्यादि स्थळें पवित्र करीत करीत कालच या पंचक्रोशींत आले आहेत! तर श्रेष्ठहो, मला असें वाटतें कीं, साक्षात् श्रीविष्णुस्वरूप श्रीज्ञानेश्वरमहाराज, यांना प्रार्थना करून या यज्ञमंडपीं घेऊन यावें, आणि त्यांना या पूजासनावर बसवून त्यांचें पूजन करावें! ह्मणजे शुकाचार्यांच्या आगमनानें धर्मराजाचा राजसूय यज्ञ जसा पूर्ण झाला, त्याप्रमाणें श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या आगमनानें हा आपला यागही पूर्णतेप्रत पावेल!

**बिंदुमाधव शास्त्री**– योग्य! योग्य! का दीक्षित, आचार्यांची योजना उत्तम आहे, नाहीं?

**विरेश्वर दीक्षित**– शास्त्रीबुवा, उत्तम म्हणून काय विचारतां? फारच उत्तम! सर्वोत्कृष्ट! अहो, मुद्गलाचार्यांचा विचार! मग तो वावगा कसा असणार?

**त्रिलोचन भट**– अहो शास्त्रीबुवा, अहो दीक्षित, शांतं पापं! शांतं पापं! अहो काय, म्हणतां काय? तुह्मी का त्या भ्रष्ट कारट्याला अग्रपूजेचा मान देणार?

**गोविंदबुवा पुराणीक**– अहो भटजी, अहो घाबरूं नका! दीक्षित आणि शास्त्रीबुवा आचार्यांचा हा अमंगळ विचार ऐकून,

त्यांचा उपहास करीत आहेत! हें नाहीं वाटतें तुमच्या ध्यानांत आलें! अहो आचार्य! तुम्हांसारख्या वेदांतज्ञानी, शास्त्रज्ञ आणि पूर्ण धर्माभिमानी श्रेष्ठांच्या मनांत जेव्हां हा असला अत्यंत अमंगल विचार येऊं लागला, तेव्हां या कलियुगांतील वर्णसंकरकाल अगदींच समीप आला, असेंच म्हटलें पाहिजे! आम्ही तर अज्ञानीच आहों ह्मणा, पण—

**दंडपाणी गंगापुत्र**– अहो पुराणीकबुवा, पण म्हणून तितकेच कां थांबलां? अहो, बोला! स्पष्ट बोला! अहो, अनादिकालापासून चालत आलेल्या धर्माविरुद्ध आचरण करूं पाहणारा जरी श्रेष्ठ, वंद्य आणि विद्वान् असला, तरी स्पष्ट शब्दांनीं त्याचा निषेध करण्याचा आपल्यासारख्या धर्मरक्षकांना पूर्ण अधिकार आहे! तेव्हां येथें भीड धरण्याचें कांहींएक कारण नाहीं! आणि आपल्याकडून निर्भिडपणा होत नसेल, तर मी सांगतों! अहो आचार्य, हा आपला विचार आह्मां कोणालाच यत्किंचितही पसंत नाहीं! का धर्माधिकारी, असेंच कीं नाहीं?

**धुंडिराज धर्माधिकारी**–अहो गंगापुत्र, तुह्मी सांगितलें, तें अगदीं यथार्थ आहे! अहो, नवखंडांतून या यज्ञाकरितां येथें आलेले साक्षात् कपिल, याज्ञवल्क्य, ब्रह्मपुत्रतुल्य असे हे ऋत्विज अग्रपूजेचे योग्य अधिकारी असतां, यांचा अपमान करून, त्या जातिहीन, वर्णहीन आणि धर्महीन भ्रष्ट पोराला पूजासनावर बसवून त्याची पूजा करण्यास जेव्हां हे आचार्य सिद्ध झाले, तेव्हां खचीत खचीत आचार्यांच्या देहांत यावेळीं कलीनेंच संचार केला आहे! आणि तोच आचार्यांच्या मुखांतून अशीं हीं अभद्र वचनें काढीत आहे! यांत यत्किंचित् संशय नाहीं! अहो आचार्य, वेळींच श्रीविश्वेश्वरांचें आणि काळभैरवांचें स्मरण करा! ह्मणजे तो कलिपुरुष भिऊन, तुह्मांस सोडून निघून जाईल! आणि भ्रष्ट झालेली ही तुमची धर्मबुद्धि पुन्हा शुद्ध होईल!

**विश्वेश्वर पंडे**–नाहीं पण, अहो धर्माधिकारी, आचार्यांना अगोदर असें विचारा कीं, हा धडधडीत सन्याशाच्या पोटीं आलेला भ्रष्ट कारटा पूर्ण ...

ज्याची सावली पडली तर सचेल स्नान करावें, आणि ज्याचें तोंड पाहिलें तर प्रायश्चित्त घ्यावें, असें धर्मशास्त्र सांगत आहे, अशा भ्रष्टाला या यज्ञमंडपीं आणून, त्याला या पूजासनावर बसविण्याचा जो धर्मबाह्य विचार आचार्यांनीं मनांत आणिला आहे, तो त्यांनीं या पोरांत असा कोणता पुरुषार्थ पाहिला आहे !

**धुंडिराज धर्माधिकारी**– काय हो मुद्गलाचार्य, आह्मां सर्वांचीं नाकें कापून, त्या भ्रष्टाचें पूजन करण्यास जे तुह्मी तयार झालां, तो त्यानें असा कोणता पुरुषार्थ संपादिला आहे तो सांगा पाहूं ? तो का वेद पढला आहे ? का त्यानें शास्त्र अवलोकन केलें आहे ? का जप तप आचरलें आहे ? अहो, जन्मादारभ्य त्याला ब्रह्मसंस्कार ह्मणजे काय हें माहीत नाहीं ! का अद्यापि त्याचें उपनयन झालें नाहीं ! त्यानें केशव नारायण ह्मणून संध्येचीं दोन आचमनें कधीं टाकिलीं नाहींत ! का गायत्री मंत्र कानांनीं ऐकला नाहीं ! आणि अशा पोराला जेव्हां तुह्मी पूजासनीं बसवावा म्हणून म्हणतां, तेव्हां खरोखर मीं मघाशीं ह्मटलें त्याप्रमाणें तुमच्या देहांत कलिसंचार झाला आहे, हेंच खरें !

**मुद्गलाचार्य**– अहो धर्माधिकारी, अहो गंगापुत्र, अहो पंडे, अहो भटजी, अहो पुराणीकबुवा, अहो दीक्षित आणि अहो शास्त्रीबुवा, त्या परात्पर जगद्गुरूंबद्दल अशीं निंदावचनें बोलून आपली जिव्हा कां विटाळून घेतां ? आणि अक्षय्य नरकाचें साधन कां करून ठेवितां ! अहो, वेदशास्त्र अवलोकन करून करून शिणलेल्या तुमच्या या नेत्रांनीं जगद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें तें साक्षात् श्रीविष्णुस्वरूप जर तुह्मीं एकवार पाहाल, तर तुह्मी ब्रह्मानंदीं डुलूं लागाल ! अहो श्रेष्ठहो, नवखंडांतील वैराग्यानें तप्त झालेले लक्षावधि तपस्वी, आणि संसारावर तिलांजलि सोडून विरक्त चित्तानें सर्व भूतलावर इतस्ततः भ्रमण करणारे कोट्यवधि यति, संन्यासी आणि बैरागी, जगद्गुरूंचा तो पूर्णमुखचंद्र पाहून, श्रमरहित होत्साते श्रीहरीच्या स्वरूपध्यानीं निमग्न झाले आहेत ! आणि जप, तप, अनुष्ठान, यज्ञयागादिक

करणाऱ्या असंख्य ब्रह्मश्रेष्ठांचे आणि गिरिकंदरीं वज्रासनावर बसून योगसाधनीं रत झालेल्या महंतांचे नेत्र, सद्गुरुदर्शनानें निवून, ते ब्रह्मानंदसुखांत निमग्न होऊन गेले आहेत! तरी श्रेष्ठहो, ही कुटिलबुद्धि सांडून त्या जगद्गुरूंना अनन्य भावानें शरण चला! म्हणजे त्यांच्या रूपादृष्टीनें तुमचा हा मिथ्याभिमान नष्ट होऊन, तुम्हांस शुद्ध परब्रह्माची ओळख होईल!

**विरेश्वर दीक्षित**– हीही! हीही! हीही! अहो शास्त्रीबुवा, या पोरानें जारणमारणउच्चाटण शिकून, दक्षिणप्रांतीं, भोळ्या लोकांच्या बुद्धि गुंग करून टाकून, ईश्वरभक्तीचें नसतेंच स्तोम माजविलें आहे, म्हणून आजपर्यंत आपण कानांनींच ऐकत होतों! पण आचार्यांच्या या स्थितीकडे पाहून, त्याची साक्ष आज आपल्या नेत्रांनाही पूर्णपणें पटत आहे! त्या पोरट्याला या पंचक्रोशींत येऊन आठ प्रहर लोटले नाहींत, तोंच त्यानें आचार्यांना आपल्या विद्येनें इतकें वेडें करून सोडलें कीं, ते त्या भ्रष्टाला या यज्ञमंडपीं आणून आणि त्याला या पूजासनावर बसवून, या कलशांतील अग्रोदकानें त्यास स्नान घालण्यास आणि येथें सिद्ध करून ठेविलेल्या षोडशोपचारांनीं त्याचें पूजन करण्यास तयार झाले! अहो आचार्य, या पात्रांतील सुगंध चंदनाची उटी त्या पातक्याच्या आंगाला लावून, या पुष्पमाला त्याच्या गळ्यांत घालाव्या, असें जेव्हां तुम्ही म्हणूं लागला, तेव्हां खचीत खचीत त्याच्या जारणमारणसिद्धि फारच जाज्वल्य दिसतात! विश्वेश्वरा, आम्हांस या संकटांतून मुक्त करणारा आतां तूंच एक समर्थ आहेस!

**बिंदुमाधव शास्त्री**– अहो दीक्षित, असे भितां काय? अहो, त्या पोराची ती काय कथा! आचाय, अहो आचार्य, या भ्रष्टानें शूद्र, शिंपी, सोनार, कसाई, कलाल, चर्मक, अशा बारा जाती एकत्र जमवून, वेदप्रणित धर्माची सर्वत्र बंडाळी माजविली आहे! तेव्हां अशा धर्मविध्वंसकाला राजाकरवीं देहांतशासन करविण्याचें एकीकडे ठेवून, तुम्ही त्याला या पूजासनावर बसवून त्याचा गौरव करूं म्हणतां! अहो, असे नुसते शब्द तोंडान उच्चारणें सुद्धां महत्पाप आहे! आणि तुम्हीं जर तसें आचरणही

करूं लागला, तर या धर्मग्लानीस प्रवृत्त झाल्याबद्दल अनंत ब्रह्महत्यांचें घोर पाप डोक्यावर घेऊन, तुम्ही अक्षय्य रौरव नरकाचें साधन मात्र करून ठेवाल !

**त्रिलोचन भट**– अहो आचार्य, तुम्हींच आजपर्यंत आह्मांला धर्म सांगून, आणि धर्मकृत्यांत आह्मांला साहाय्य करून, तुह्मीं स्वतःच असे अधर्माचरणीं प्रवृत्त होऊं पाहतां, तेव्हां खरोखर तुम्ही त्या परमभ्रष्ट बीरमांत्रिकाच्या तडाक्यांत सांपडलां, यांत कांहीं संशय नाहीं ! अहो आचार्य, त्या पोराबद्दल काय ही विलक्षण भावना तुह्मीं पोटीं धारण केली आहे ! अहो अठरापगड जाती गोळा करून, अहोरात्र टाळ कुटल्यानें जर वैकुंठपीठ हातीं येतें, तर तुमच्या आमच्या आजापणज्यांनीं कोट्यवधि टाळ फोडले असते ! मग हो त्यांनीं सर्व आयुष्यभर घसा फुटेपर्यंत वेद घोकण्याची आणि शास्त्रग्रंथांचे ढीग उलथे पालथे करण्याची यातायात कां केली असती ? देवांपुढें जन्मभर घंटा बडविण्याचे आणि देवांच्या डोक्यावर पाणी ओतून तुळशीबेलफुलांचे पर्वतांसारखे ढीग रचावयाचे श्रम तरी त्यांनीं कशाला घेतले असते ? अग्निहोत्राच्या आणि यज्ञयागाच्या धुरानें त्यांनीं आपले डोळे कशाला हो फोडून घेतले असते ? आणि तीर्थयात्रेची पायपिटी आणि जपजाप्याची खटपट तरी त्यांनीं कां केली असती ? कां शास्त्रीबुवा, दीक्षित, धर्माधिकारी, मी म्हणतों हें खरें कीं नाहीं ?

**दंडपाणी गंगापुत्र**– आणि तुम्हीं आह्मीं आचार्यांच्याकारितां या यज्ञांत सर्व कामें वांटून घेण्याच्या भानगडींत तरी कशाला पडलों असतों ! अहो, या यज्ञांत ऋषि, यति, तापसी, ब्राह्मण यांच्या कोटिमूर्तींचे चरण धुतां धुतां आणि त्यांच्यापुढें वांकतां वांकतां आज एक वर्ष आमच्या कमरेचे टाके ढिले झाले ! त्यांना धूपदीपांनीं ओवाळतां ओवाळतां, सुपुष्पमाळा त्यांच्यां गळ्यांत घालतां घालतां, त्यांना षड्रस अन्नें वाढतां वाढतां आणि त्यांचीं उष्टीं काढतां काढतां आमच्या हातापायांचे तुकडे पडले ! त्यांना अर्पण केलेल्या वस्त्रांचे ढीग आणि त्यांना वांट-

लेल्या दक्षिणेच्या थैल्या उरापोटावर उचलतां उचलतां आणि हाताखांद्यावर घेतां घेतां आम्ही अर्धमेले झालों ! आणि खेरीज यज्ञांत कांहीं न्यून पडूं नये ह्मणून, ऋत्विजांना जे उपचार लागले ते त्यांना पुरविले ! पुरोहितांना जी जी सामग्री लागली ती ती आणून दिली ! दीन, अनाथ, क्षुधितें, व्याधिष्ठ, आंधळे, पांगळे यांना अन्न देऊन तृप्त केलें ! या सकल ऋत्विजांनींही विधानाप्रमाणें हवन करून, देवांना अवदानें दिलीं ! आणि त्यामुळें सकल देव तृप्त झाले ! यज्ञधूम्रज्वाला स्वर्गापर्यंत पोहोंचून यज्ञनारायण संतुष्ट झाला ! यज्ञभोक्ते श्रीकाशीविश्वेश्वर प्रसन्न झाले ! आणि इंद्रादि देवांनी संतुष्ट होऊन स्वर्गीं घंटानाद केला ! असा हा अपूर्व यज्ञसमारंभ कधीं झाला नव्हता, असें सर्वांतोंडीं झालें ! अहो आचार्य, अशा प्रकारें तुह्मांस आम्हीं त्रिभुवनीं धन्यता मिळवून देऊन, स्वर्गप्राप्तीसाठीं या महायज्ञाचें महत्पुण्य जें आम्हीं तुमच्या पदरीं बांधून दिलें, तें तुह्मी अखेर हा असला भ्रष्टाच्या पूजनाचा विचार मनांत आणून निरर्थक करून टाकीत आहां, याचा कांहींतरी विचार करा !

**विश्वेश्वर पंडे**–अहो धर्माधिकारी, शास्त्रीबुवा, दीक्षित, मी तर असें ह्मणतों कीं, हा धर्मविध्वंसक पोरटा आपण होऊन आपल्या पायांनीं चालत या अनादिश्रेष्ठ धर्मक्षेत्रीं अनायासेंच आला आहे; तेव्हां याला बहिष्कार घालून, याचे तीन पाट काढून, याला गर्द्भावर बसवून, याची या पंचक्रोशींत भर दोनप्रहरीं धिंड काढावी ! ह्मणजे हा शुद्धीवर येऊन असला धर्मभ्रष्टपणा सोडून मुकाट्यानें बसेल ! आणि हें वर्तमान आपण पृथ्वीवरील सर्व क्षेत्रस्थांस कळविलें ह्मणजे, सर्वांना चांगला धाक बसून, असें धर्मबाह्य आचरण पुन्हा कोणी कधींही करणार नाहीं ! काहो गंगापुत्र, पुराणीकबुवा, का असेंच कीं नाहीं ?

**गोविंदबुवा पुराणीक**–यांत काय संशय ! त्याच्या भ्रष्ट आचाराबद्दल त्याला हाच दंड योग्य आहे ! अहो आचार्य, सोडा, सोडा आतां ही असली भ्रष्टबुद्धि आणि हे शापादपि शरादपि, साक्षात् वेदोनारायण ज्यांच्या हृदयांत सदैव नांदत आहे, अशा

या निगमानिगमीं निपुण, याज्ञिक, महासमर्थ विप्रामध्यें हे बिंदुमाधव शास्त्री अग्रपूजेचे योग्य अधिकारी आहेत! तेव्हां यांना या पूजासनावर बसवून, यांचें पूजन करा, आणि हा महायज्ञ करून संपादिलेलें थोर पुण्य कायम राखा! का हो गंगापुत्र, मी ह्मणतों हें सत्य आहे कीं नाहीं?

**दंडपाणी गंगापुत्र**– हो! हो! अहो एकवार नाहीं, त्रिवार सत्य आहे! बिंदुमाधव शास्त्री आह्मां सर्वांत खरोखर तसेच श्रेष्ठ आहेत!

**विश्वेश्वर पंडे**–अहो पुराणीकबुवा, अहो गंगापुत्र, अहो, या विश्वेश्वर दीक्षितांच्यासारखे पूर्ण ब्रह्मज्ञानी येथें असतां, त्यांना एकीकडे टाकून बिंदुमाधवशास्त्र्यांना पूजासनीं बसविणें, हें सर्वथा अयोग्य आहे! का हो भटजी, तुह्मांला कसें वाटतें?

**त्रिलोचन भट**– अहो पंडे, शास्त्रीबुवांच्यापेक्षां दीक्षितांचा अधिकार थोर आहे यांत तर शंकाच नाहीं! पण हे गोविंदबुवा, साक्षात् ज्ञानसूर्य! यांच्यापुढें शास्त्री काय आणि दीक्षित काय, उभयतांही खद्योतच! का आचार्य, मी बोलतों हें यथार्थ आहे कीं नाहीं?

**मुद्गलाचार्य**- श्रेष्ठहो, तुमच्या आमच्या थोर भाग्योदयानें श्रीज्ञानेश्वरमहाराज, साक्षात् वैकुंठवासी श्रीविष्णु, यांचे चरण प्रक्षाळून आणि त्यांचें पादतीर्थ सेवन करून जीवन्मुक्त होण्याचा सुयोग प्राप्त झाला असतां, तो अंधपणानें दूर लोटून, तुह्मां आह्मांसारख्या यःकश्चित् पुरुषांत हा श्रेष्ठ, याहून तो श्रेष्ठ आणि त्याहून तो श्रेष्ठ, असा निरर्थक वाद कां घालीत बसतां? अहो या साक्षात् लक्ष्मीकांत श्रीविष्णूचा पूर्ण मुखचंद्र या युगींही पाहून धन्य होण्याकरितां, मागील युगायुगींचे भक्तचकोर वेधून गेल्यामुळें, त्यांनींही भगवंतांच्याबरोबर या युगीं अवतार धारण केले आहेत! आणि भगवंतांच्या सान्निध्याचें अपार सुख ते सांप्रत सेवन करीत आहेत! अहो, इतकेंच नाहीं तर भगवंतांच्या बरोबर ते कीर्तनरंगीं आनंदानें नाचून भगवंतांचीं अनेक युगांचीं चरित्रें गात आहेत! श्रेष्ठहो, वैष्णवाग्रणी नामदेव, हे पूर्व युगीचे

उद्धव होत ! सज्जन कसाई हेच उद्दालक ! नरहरि सोनार हेच जांबुवंत ! विसोबा खेचर हेच षडानन ! चांगदेव हेच मरुद्गण ! सच्चिदानंदबाबा हेच अर्जुन ! आणि आपले क्षेत्रस्थ रामानंद हेच जनकराजे होत ! तेव्हां श्रेष्ठहो, माझी तुम्हांला करद्वय जोडून अशी प्रार्थना आहे कीं, या सकल भक्तश्रेष्ठांसह भगवान् श्रीज्ञानेश्वरमहाराज यांना या मंडपीं घेऊन येऊन, त्यांचें आपण षोडशोपचारें पूजन करूं ! आणि आपलीं मनरूपीं सुकुमार सुमनें त्यांच्या चरणीं अर्पण करून, त्यांची मूर्ति अखंड हृदयांत सांठवून मोक्षधाम गाठूं ! ( यावर कोणींच कांहीं बोलत नाहीं असें पाहून ) अहो श्रेष्ठहो, अजूनही हा माझा विचार तुम्हांस रुचत नाहींना ?

**सर्वजण**– नाहीं ! नाहीं ! अगदीं नाहीं ! शांतं पापं ! शांतं पापं !

**मुद्गलाचार्य**– तर मग श्रेष्ठहो, हा असा वाद घालीत बसण्यापेक्षां आपण हत्तिणीची पूजा करून, तिच्या शुंडेंत पुष्पमाला देऊन, तिला सर्व पंचक्रोशींत हिंडवूं; ती हत्तीण श्रीकाशीविश्वेश्वरांच्या प्रेरणेनें ज्या श्रेष्ठाच्या गळयांत ती पुष्पमाला घालील, त्या श्रेष्ठास या पूजासनावर बसवून, त्यासच अग्रपूजेचा मान देऊं ! म्हणजे हा वाद आपोआपच मिटेल !

**विश्वेश्वर दीक्षित**– योग्य ! योग्य ! का शास्त्रीबुवा, आचार्यांचा हा विचार सर्वोत्कृष्ट आहे, नाहीं ? आतां आचार्यांना कोण बरें नांव ठेवणार आहे !

**बिंदुमाधव शास्त्री**– आचार्यांनीं तोड पण तोड काढिली ! उत्तम ! फार उत्तम ! चला तर, राजदरबारीं जाऊन, राजापासून हत्तीण मागून घेऊं. आणि मग तिच्या शुंडेंत पुष्पमाला देऊन, तिला या पंचक्रोशींत हिंडवीत आपण तिच्या मागें जाऊं ! म्हणजे श्रीविश्वेश्वरांच्या साक्षात्काराचा अद्भुत चमत्कार आपणांस पाहण्यास मिळेल ! चला !

( सर्व ब्राह्मण उठूं लागतात तों पडदा पडतो. )

---

## प्रवेश दुसरा.

स्थळ– श्रीवाराणसी ( काशी ) क्षेत्रांतील रस्ता.

( एका बाजूनें गंगास्नानाकरितां काखेंत सोवळें घेऊन निघालेली पार्वतीबाई खालील नित्याचा पाठ ह्मणत प्रवेश करते. )

**पार्वती०**–

अभिनवबिसवल्लीपादपद्मस्यविष्णोर
मदनमथनमौलेर्मालतीपुष्पमाला ॥
जयतिजयपताकाकाप्यसौमोक्षलक्ष्म्या
क्षपितकलिकलंकाजान्हवीनःपुनातु ॥ १ ॥

( इतक्यांत तिच्या समोरून गंगेचें पूजन करून घरीं परत चाललेली अंबाबाई प्रवेश करते. )

**अंबा०**– का पार्वतीबाई, कुठें मणिकर्णिका घाटावर का आंग धुवायला निघालां ? छे ! छे ! छे ! आज कांहीं बाई या वेळेला घाटावर आंग धुवायला, का पुजेला, का कशाला जायची सोय उरली नाहीं हो ! कोण ग बाई ती गर्दी ! मेल्यांनो यात्रेचा दंगा देखील कमी ! अशी चालली आहे हो आज रेटारेटी ! इश्श ! नाहीं कुणी ब्राह्मण पाहात ! का नाहीं कुणी शूद्र पाहात ! का नाहीं कुणी महार डोंब पाहात ! जशी कांहीं माणसांना आज दिवसाढवळ्याच रातांधळीं लागलीं आहेत !

**पार्वती०**– ह्मणजे ! आज असं आहे तरी काय घाटावर ? आजची ही पर्वणी केव्हां सांपडली बाई पंचांगांत ?

**अंबा०**– अहो पार्वतीबाई, पर्वणी कसची कपाळाची ! ही मुद्गलाचार्यांच्या यज्ञाची समाप्ति बोकळली आहे हो !

( इतक्यांत धुतलेले पिळे काखेंत घेऊन मणिकर्णिका घाटावरून घरीं परत चाललेली उमाबाई प्रवेश करिते. )

**उमा०**–( अंबाबाईस उद्देशून ) बाई, बऱ्याच आहां किहो तुह्मी अंबाबाई ! मला मागं टाकून केव्हां बाई तुह्मी पुढं सुटकलां ? तुह्मी मागंच आहां, असं समजून मी त्या तसल्या गर्दींत तुमची वाट पाहात केवढा वेळ तरी उभी राहिलें ! ह्मटलं एकीला दोघी

असलों, ह्मणजे आरडण्याओरड्यानं मेला विटाळचंडाळ तरी व्हायचा नाहीं! अंबाबाई, अगदीं या इथवेरीं येइस्तवर किहो देवानं चांगलं संभाळलं होतं! पण इतक्यांत मेला गांवाबाहेरला एक धटिंगण, मी शिवशील! शिवशील! ह्मणून ओरडतां ओरडतां मला खेटून पुढें चालता झाला! पार्वतीबाई, घाटावर निघालां असलां तर इथूनच परता कशा बाई घरीं माघाऱ्या!

**पार्वती०**–ह्मणजे? आज हें मी नवलच ऐकतें आहें बाई!

**अंबा०**– अहो नवल कसलं! हत्तिणीच्या सोंडेंत फुलांची माळ देऊन तिला सोडली होती ना मुद्गलाचार्यांनीं पंचक्रोशींत? तिनं किनई तो भ्रष्ट पोरटा ज्ञानेश्वर का फानेश्वर आला आहे ना यात्रा करीत काल घाटावर, त्याच्या गळ्यांत ती फुलांची माळ घातली हो! म्हणून त्या पोरट्याला पाहण्याकरितां, लोटली आहे सारी पंचक्रोशी घाटावर!

**पार्वती०**–इश्श! होय का? नी त्या भ्रष्टाला का यज्ञमंडपांत घेऊन जाऊन मुद्गलाचार्य त्याची अग्रपूजा करणार?

**उमा०**–बाई कलीच मातला! मग हा भ्रष्ट कारटा काय नी कोण काय! उद्यां गांवाबाहेरल्या म्हारोड्यांतल्या एकाद्या धटिंगणाची देखील पूजा होऊं लागेल बरं या क्षेत्रांत? येतां येतां लोक बोलत होते तें मीं ऐकलं हो, कीं या अंबाबाईचे यजमान, त्या हत्तिणीनं आपल्या गळ्यांत माळ घालावी ह्मणून, तिच्यापुढं शंभरवेळां जाऊन उभे राहिले ह्मणून! नी पार्वतीबाई, तुमच्या यजमानांनीं देखील म्हणतात जिवाची बरीच धडपड केली हो! पण शेवटीं त्या हत्तिणीनं या साऱ्यांनाच एकीकडे ठेवून आपली त्या पोरट्याकडेच धांव घेतली!

**अंबा०**– अहो उमाबाई, हत्तीण ती! तिला माणसासारखं कळतं का आहे? अहो, बोलून चालून तें मुकं जनावर! तिला कसली लहानथोराची का शुद्धाशुद्धाची पारख! यांनीं मुळीं ही असली निवड तिच्याकडे सोपवायचीच नव्हे! अहो, म्हणतात–ना, आधीं जाते बुद्धि नी मागून जातं भांडवल, तशांतली गत!

(इतक्यांत वाराणशीकाकू प्रवेश करतात.)

**पार्वती०**- का काकू, घाटावरूनच का आलां ?

**वाराणशी०**- हो. ही मी तिकडूनच येत आहें. ( सर्व जणी तिच्याजवळ जाऊं लागतात ) हं हं मला खेटूं नका, दूर व्हा, कुत्र्याचा विटाळ झाला आहे हो मला! अहो आमच्या बिंदुमाधव-शास्त्र्यांच्याकडे तुमचे पुरुष हें असं असं झालं, आतां पुढं कसं करायचं, म्हणून धापा टाकीत विचारायला आले हो ! तेव्हां ते दोघेही घाईघाईनं घराबाहेर पडले ! मी तुळशीला पाणी घालून नुक्तीच माळ ओढीत बसलें होतें! पण बाई हा विलक्षण प्रकार जेव्हां कानांनीं ऐकला, तेव्हां कसची माळ नी कसची बीळ ! अर्धीच माळ सोडून उठलें तुळशीपुढून, नी तशीच निघालें त्यांच्या मागोमाग !

**अंबा०**- मग, तुम्हांला समजला का काकू पुढं काय प्रकार झाला तो ? त्या कारव्याच्या गळ्यांत हत्तिणीनं माळ घातली, इथवर कळलं आहे आह्मांला या उमाबाईच्या तोंडून !

**उमा०**- अहो काकू, मला पुष्कळ वाटलं कीं तसंच त्या गर्दीत अमळ पुढं होऊन, पहावं पुढं काय होतं तें ! पण बाई, पुरुषांची देखील जिथे त्रेधा उडाली, तसल्या गर्दीत आपली बाय-कांची कुठली डाळ शिजायला ! असं मनांत आलं, ह्मणून मी बाई परतलें घरीं माघारी ! काकू, तुमची गोष्ट वेगळी नी आमची वेगळी ! बरं आतां सांगा बरं, घाटावरचा प्रकार कुठवर आला आहे तो ?

**वाराणशी०**- उमाबाई, आतां किनई घाटावर सारं शुक्र झालं आहे ! चिटपांखरूं देखील राहिलं नाहीं आतां तिथे ! सारी पंचक्रोशी आतां विश्वेश्वरांच्या देवळाकडे लोटली आहे ! मी देखील तशीच परभारी विश्वेश्वरांच्या देवळाकडे जाणार होतें. पण मेली ब्राह्मणशूद्रांच्या पागोट्यांची नी महारडोंबांच्या डोक्यावरच्या चिंधोट्यांची सगळ्या वाटभर पसरलेली गुंतावळ तुडवून तुडवून, मला अगदीं चिळस आली होती ! नी तितक्यांत मला कुत्रं शिवलं ! तेव्हां असा विटाळ घेऊन कसं जावं देवळांत ? ह्मणून दोन तांबे आंगावर ओतून घेण्याकरितां घराकडे वळलें !

**पार्वती०**– म्हणजे ! हे सारे आतां देवळांत जाऊन काय करणार ?

**वाराणशी०**– इश्श ! काय करणार म्हणजे ? नाहीं तर हा असा भ्रष्टाकार क्षेत्रांत माजूं देऊन, ज्यां ब्राह्मणांनीं महारडों-बांच्या पानांशीं पान लावून का गिळायला बसायचं आहे ?

**अंबा०**– अहो काकू, तें सारं खरं ! पण क्षेत्रांतील शहाण्या ब्राह्मणांनींच अगोदर हात चावून अवलक्षण दाखविलं ! मग आतां हें कसं टळणार ?

**वाराणशी०**– हें कसं हो अंबाबाई तुमचं उफराटं बोलणं ? हें असं होईल, हें कुणाला स्वप्न का पडलं होतं आधीं ! पण आतां याला तुमच्याच यजमानांनीं कशी खाशी सुरेख तोड काढली आहे ! ते मुद्गलाचार्यांना ह्मणाले, हत्तीण ह्मणजे काय ? ज्ञानहीन पशु ! त्या मुक्या जनावराला काय समजतं आहे ! म्हणून हत्ति-णीनं माळ घातली, एवढ्याचकरितां या भ्रष्ट पोराला आम्ही अग्र-पूजेचा मान कधींही देणार नाहीं ! आह्मांला अग्रपूजेकरितां असा अधिकारी पुरुष हवा कीं, श्रीविश्वेश्वरांनीं प्रत्यक्ष प्रगट होऊन, त्याच्या हातून यज्ञाचा पुरोडाश ग्रहण केला पाहिजे !

**अंबा०**– हें खरंच नव्हे का तर उमाबाई ? अहो हत्तिणीनं माळ घातली म्हणूनच का त्या पोरट्याला श्रेष्ठ ह्मणायचं ?

**वाराणशी०**– अंबाबाई, तुमच्या यजमानांच्या ह्या विचा-राला साऱ्या क्षेत्रस्थांनीं मान डोलविली ! नी सारे क्षेत्रस्थ त्या कारट्याच्या हातांत पुरोडाश देऊन, त्याला पुढं घालून, आतां देवळाकडे गेले आहेत !

**उमा०**– नी मेल्यांनो, तो भ्रष्ट पोरटा का आतां देवाच्या गा-भाऱ्यांत जाऊन देवाला विटाळ करणार ? बरं आहे ह्मणावं ! आमच्या विश्वेश्वरांचं सोवळं किती कडक आहे तें कुठें आहे तुला अजून ठाऊक ! घी देखलंस पण मेल्या बडगा कुठें पाहिला आहेस अजून ! गाभाऱ्यांत तूं पाय तर ठेव, ह्मणजे श्रीविश्वेश्वर हजारों भुंगे उत्पन्न करून, तुझ्या आंगाला डसवितील, नी तुझा डोंब करून सोडतील !

**पार्वती**०– खरंच काकू, विश्वेश्वरांनीं असाच कांहीं तरी साक्षात्कार आज दाखविला तरच टळणार आहे बाई हा भ्रष्टाकार! नाहीं तर उद्यां या क्षेत्रांत क्षणभर देखील राहण्याची सोय उरणार नाहीं!

**वाराणशी**०– बाई, देवाला आपली पूर्ण काळजी आहे! तेव्हां तो असा भ्रष्टाकार कां बरं होऊं देईल? कधीं होऊं द्यायचा नाहीं! चला, आतां गंगेवरच आंगं धुवून साऱ्याजणी देवदर्शनाला जाऊं!

( वाराणशीकाकूंच्या मागून सर्व स्त्रिया निघून जातात. )

---

## प्रवेश तिसरा.

**स्थल**– काशीक्षेत्र–श्रीविश्वेश्वरांचें देवालय.

( देवालयांत श्रीविश्वेश्वराच्या अग्रभागीं श्रीज्ञानेश्वरमहाराज उभे असून, ते नेत्र मिटून सद्गुरुध्यानांत निमग्न झाले आहेत; त्यांचे शेजारीं मुद्गलाचार्य हात जोडून उभे आहेत, व सभोंवतीं दूर अंतरावर ब्राह्मणादि अठरापगड जातीचे लोक उभे आहेत, असा पडदा उघडतो. )

**बिंदुमाधव**०– अहो आचार्य, असें एकसारखं तिष्ठत उभें राहून आमचे पाय आतां दुखायला लागले! हा भ्रष्ट असा डोळे मिटून आणखी किती वेळ येथें उभा राहणार?

**विरेश्वर**०– अहो शास्त्रीबुवा, या कांहीं तोंडच्या का गोष्टी आहेत! अहो, ज्याचें अवसान त्याला माहीत! अहो, हा रडत राऊत आचार्यांनीं उगीच मोट बांधून घोड्यावर बसविला आहे! आणि दुसरें काय?

**गोविंदबुवा**०– दीक्षित, यथार्थ बोललां! मला तर हा प्रसंग फारच कठीण दिसत आहे! अहो, अशा जातिभ्रष्टानें देवालयाबाहेर उभें राहून लांबून कळसाला नमस्कार करून पुढें चालूं व्हायचें एवढाच याचा अधिकार! असें असून या जातिहीनानें

देवालयाच्या आंत शिरण्याचें महत्पाप केलें, यामुळें श्रीविश्वेश्वरा-चा क्षोभ होऊन, मला वाटतें, देवांनीं याची येथें खोडाविडी करून, याला जागच्या जागीं खिळून टाकला आहे! अहो आचार्य, तुमच्या समर्थाची दातखिळी उघडी आहे, का बसली आहे, हें तरी बघा एकदां!

**विश्वेश्वर०**— पण काय हो गोविंदबुवा, आचार्यांना ही नसती उठाठेव सांगितली होती कोणीं? शिव! शिव! आचार्यांनीं या पापिष्ठाला व्यर्थ व्यर्थ संकटांत लोटलें! आणि आह्मांलाही एवढा वेळ निरर्थक शीण दिला! आतां या भ्रष्टाच्या आगमनानें विटाळलेलें हें देऊळ, गंगेच्या कावडी भरून आणून मला धुवून टाकिलें पाहिजे कीं नाहीं? (श्रीज्ञानेश्वरमहाराजांस उद्देशून) अरे बाबा, असा महंतासारखा उभा काय राहिलास? अरे तुझ्या अनंत जन्मींच्या पापराशी तुझ्या डोळ्यांपुढें दिसूं लागून जर तुला भीति वाटत असली, तर चल आह्मी तुला गंगेंत लोटून जलसमाधि तरी देतों! ह्मणजे, कायहो गंगापुत्र, पुढच्या जन्मीं तरी हा पुण्यदेहानें जन्माला येईल!

**दंडपाणी०**— अहो पंडे, तुह्मांला काय वेड लागलें कीं काय? अहो, अशा घोर पातक्याला गंगेंत समाधि देऊन, तुह्मीं पवित्र गंगामातेला विटाळ करणार कीं काय? अहो तुमचें ठीक आहे; पण उद्यां गंगाशुद्ध्यर्थ मलाच यातायात करावी लागेल!

**मुद्गलाचार्य**— अहो गंगापुत्र, पंडे, दीक्षित, शास्त्रीबुवा, भटजी, सद्गुरुसमर्थ या वेळीं गुरुचरणमुद्रा हृदयीं आणून ध्यानस्थ झाले आहेत! तर क्षणभर स्वस्थ राहा, अशी माझी आपल्याला प्रार्थना आहे!

**बिंदुमाधव०**— हीही! हीही! अहो आचार्य, कसलें ध्यान आणि कसलें काय? अहो, तें पहा या घोर प्रसंगानें याच्या सर्वांगाला कसें कांपरें भरलें आहे तें! आणि याचे ओठ पहा किती थरथरत आहेत ते! अहो, नेत्र उघडून प्रभूंच्या या स्वयंभू लिंगाकडे पाहण्याचेंसुद्धां अवसान याच्या अंगीं उरलें नाहीं! अहो, याची राम ह्मणण्याची वेळ आली! आणि तुह्मी म्हणतां

हा ध्यानस्थ झाला आहे ! बाकी यानें असा येथेंच राम म्हटला, तर डोंबाच्या लाथेनें तरी याला मुक्ति मिळेल !

**त्रिलोचन०**– अहो आचार्य, आम्हां सर्वांची अजून तरी एवढी प्रार्थना ऐका, कीं या भ्रष्टाचा हा अमंगल देह श्रीविश्वेश्वरांनीं आपला तृतीय नेत्र उघडून, भस्म करून टाकण्यापूर्वींच तुम्ही याला येथून घेऊन जाऊन, याच्या जातभाईंत याला नेऊन घाला ! नाहीं तर याच्या देहाची राखुंडी झालेली पाहून, याचे सगेसोयरी येथें येऊन गोंधळ करून सोडतील !

**मुद्गलाचार्य**– ( श्रीज्ञानेश्वरमहाराजांस उद्देशून ) समर्थांचें ध्यान आटपलें म्हणजे समर्थांनीं गाभाऱ्यांत चलावें !

**ज्ञानेश्वर**– अहो आचार्य, अहो श्रेष्ठहो, श्रीसद्गुरुध्यानानंतर श्रीसद्गुरुनिवृत्तिनाथांस हा पहिला प्रणिपात घालून, हा दुसरा प्रणिपात मी तुम्हां श्रेष्ठांच्या चरणीं घालीत आहें! ( श्रीज्ञानेश्वरमहाराज एकापुढें एक दोन नमस्कार घालतात. दुसऱ्या नमस्काराच्या वेळेस सर्व ब्राह्मण आपले पाय मागें काढून घेतल्यासारखें दाखवितात. ) आणि हा तिसरा प्रणिपात मी श्रीपांडुरंगचरणीं अर्पण करीत आहें ! ( श्रीज्ञानेश्वरमहाराज तिसरा नमस्कार घालतात. ) तरी अहो श्रेष्ठहो, तुमचा वरदहस्त माझ्या मस्तकीं असावा, म्हणजे तुम्हां श्रेष्ठांच्या आशीर्वादानें ( सर्व ब्राह्मण श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा धिक्कार करतात. ) आणि श्रीपंढरीनाथाच्या कृपेनें तुम्हीं आज्ञा करीत आहां, असलें दिव्य तुम्हां श्रेष्ठांस करून दाखविण्याचें सामर्थ्य माझ्या आंगीं येईल ! ( सर्व ब्राह्मण श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा पुन्हा धिक्कार करतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रीकाशीविश्वेश्वरांकडे तोंड करून, हात जोडून, प्रार्थना करूं लागतात. ) हे ब्रह्मानंदा, पुराणपुरुषा, शिवस्वरूपा श्रीहरि, तुझा जयजयकार असो ! हे भक्तप्रियकरा, निरंजना, भालनेत्रा, तुझा जयजयकार असो ! हे मायातीता, कैलासनगविहारा, तुझा जयजयकार असो ! हे अखिल जगत्पालका, मंगलरत्नभांडारा, चंद्रशेखरा, तुला नमस्कार असो ! ( श्रीज्ञानेश्वरमहाराज नमस्कार घालतात. ) हे श्रुतिसारसमुद्रा,

अमूर्तमूर्ता, धर्मवर्धना, सदाशिवा, तुला नमस्कार असो! ( दुसरा नमस्कार घालतात. ) हे सकळ कल्याणदायका, योगभूषणा, गंगाधरा, तुला नमस्कार असो! ( तिसरा नमस्कार घालतात. ) हे भवभयमोचका, ज्ञानघना, विश्वनाथा, कर्पूरगौरा, तुला नमस्कार असो! ( चौथा नमस्कार घालतात. ) हे सर्वश्रेष्ठा, सर्वोत्तमा, वेदप्रतिपाद्या, ओंकारस्वरूपा, विश्वेश्वरा, तुला नमस्कार असो! ( पांचवा नमस्कार घालतात व हात जोडून पुन्हा देवाची प्रार्थना करूं लागतात. ) अहो भक्तकाजकैवारी शूलपाणी, तुमचे चरणीं मी वारंवार नमस्कार घालीत आहें, तरी अहो दयाळा, यावेळीं कैलासभुवन सोडून येथवर येऊन, हा पुरोडाश ग्रहण करावा, आणि या समर्थाची ही एवढी इच्छा तृप्त करून, आपल्या या दीन दासाला धन्य करावें! अहो पंचदशनेत्रा, भवानीवरा, भगवंता, तुह्मी सकल विश्वाचा उद्धार करण्याकारितां, अखिल भूमंडळांत श्रेष्ठ अशा या वाराणसी क्षेत्रीं नित्य वास करीत आहां! तेव्हां आपलें दर्शन घेऊन कृतार्थ व्हावें, ह्मणून मी तीर्थयात्रा करीत आपले चरणापाशीं धांवून आलों असतां, अहो जगदानंदकंदा, उमावरा, तुह्मी हत्तिणीच्या हृदयांत प्रेरणा करून, तिच्या करवीं या दीनदासाच्या गळ्यांत ही पुष्पमाला घालविली! आणि या कलियुगीं असंभाव्य असें हें दिव्य या श्रेष्ठांस करून दाखविण्याचा प्रसंग मजवर आणला! अहो मायाचक्रचालका, श्रीहरि, यावरून मजसारख्या यःकश्चित् भक्ताच्या हातून हें दिव्य जगतास करून दाखवावें, अशी तुमची इच्छा दिसते! आणि अशीच जर प्रभूंची इच्छा असेल, तर यावेळीं प्रभूंनीं प्रगट होऊन, ही आपली इच्छा परिपूर्ण करून घ्यावी! आणि आपल्या स्वकृतीनें या पामराला धन्य करावें! अहो कृपानिधि, पूर्वयुगीं तुह्मीं स्वभक्तांकरवीं असलीं अनेक दिव्यें करून दाखवून, स्वभक्तांचें यश मिरविलें आहे! तरी हरस्वरूपा श्रीहरि, यावेळीं आपण या आपल्या दीन दासाकरितां धांवून येऊन, या दासाची लज्जा रक्षण करावी! देवा, तुझ्यापाशीं लहान-

थोर भाव नाहीं, जातिकुळाचा विचार तूं मनांत आणीत नाहींस, ज्ञानी मूढ ही आवडनिवड तुझ्यापाशीं नाहीं, तूं सकल शरणागतांचा सोयरा आणि स्वभक्तांचा पाठीराखा आहेस! देवा, तेव्हां यावेळीं माझ्या या अमंगल देहाकडे न पाहतां, माझा वर्ण माझी जात न पाहतां, माझी हांक ऐकून वैकुंठीहून धांवून या! देवा, मी मूढ आहें, हीनकुल आणि हीनभाग्य आहें; परंतु हे सकलभुवनपालका पांडुरंगा, कमल-चक्रअंकुशवज्रचिन्हित तुझे सुंदर पदांबुज मीं आपल्या हृदयीं धरले आहेत! आणि मुखीं सदां तुझें पवित्र नांव ठेविलें आहे! आणि अशा रितीनें मीं तुझे दास्यत्व पतकरिलें आहे! यासाठीं माझ्या अनंतकोटि पापराशी किंवा माझे अनंत अपराध यावेळीं मनांत न आणतां माझी प्रार्थना मान्य करावी! हे अनाथनाथा माधवा, (ब्राह्मणांकडे बोट दाखवून) हे श्रेष्ठ तुजहूनही थोर असून, या श्रेष्ठांचें सामर्थ्य तुजहूनही अधिक आहे! कारण देवा, या श्रेष्ठांनीं पूर्वयुगीं यादवकुळ भस्म केलें, शुक्राची संपत्ति सागरांत नेऊन लोटली, परीक्षितराजाला निमिषार्धांत भस्म केला, नृगराजाला सरड केला, अत्रिनंदनाला क्षयरोगी केला, सूर्यनंदनाला दासीपुत्र केला, कुबेरपुत्राला वृक्ष केला, आणि देवा, तुलाही अंबरीषाचे जन्माला घातलें! असा या ब्रह्मश्रेष्ठांच्या सामर्थ्याचा अतुल प्रताप आहे! परंतु सर्व गुणांमध्यें आपल्याला मुलानें जिंकावें, ही जशी बापाला हौस असते, त्याप्रमाणें या श्रेष्ठांनीं यावेळीं मला अज्ञ बालकाला पुढें करून, मजसारख्या तुझ्या दीनदासाचें, देवा, कौतुक मांडलें आहे! तरी अहो विश्वेश्वरा, आतां विलंब न करतां प्रकट होऊन हा पुरोडाश ग्रहण करावा! (हें शेवटचें भाषण बोलतां बोलतां श्रीज्ञानेश्वरमहाराज गाभाऱ्यांत प्रवेश करतात. इतक्यांत चहूंकडे दिव्य प्रकाश पडून, पिंडींतून श्रीविश्वेश्वर आपला हात बाहेर काढून, श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे हातांतून पुरोडाश उचलून घेतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज गाभाऱ्याबाहेर येऊन श्रीविश्वेश्वरांच्या पुढें दंडासारखे पडून श्रीविश्वेश्वरांस नमस्कार घालतात. तो ग्रहण करून श्रीविश्वेश्वर

अंतर्धान पावतात. त्याबरोबर सर्वत्र पडलेला दिव्य प्रकाशही नाहींसा होतो. प्रकाश नाहींसा होतांच श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रीविश्वेश्वरांच्या पुढें दंडासारखे पडले असतांना, सर्व ब्राह्मण त्यांच्या पायांवर आपलीं डोकीं ठेवितात व इतर जन लांबूनच त्यांना साष्टांग नमस्कार घालतात. अनळशानें श्रीज्ञानेश्वरमहाराज उठून उभे राहतात. )

**बिंदुमाधव०**– भगवंताचें प्रत्यक्ष दर्शन व्हावें, ह्मणून अनेक योगी अरण्यवास पतकरून वज्रासनीं बसून, प्रभूचें अखंड ध्यान करितात; ऋषि, तापसी ब्रह्मचर्यव्रत धारण करून अहोरात्र गिरिकंदरीं हरिचिंतनीं रत होतात, आणि आह्मांसारखे मूढ यज्ञयागादिक कर्में करून जन्मभर यातायात करितात; तरी आह्मांपैकीं कोणालाही स्वप्नांत देखील प्रभूंचें दर्शन घडत नाहीं! परंतु अहो ज्ञानराया, तुह्मीं आपल्या अगाध लीलेनें भगवंतांचें प्रत्यक्ष दर्शन आज आह्मांला घडवून दिलें! त्यामुळें आमच्या मागील अनंतजन्मांच्या पापराशी दग्ध होऊन गेल्या! आणि अहो ज्ञानदेवा, आपण साक्षात् वैकुंठवासी प्रभु, मानवदेह धरून आह्मां जडजीवांचा उद्धार करण्याकरितां या मृत्युलोकावर आलां आहां, हें आह्मांस ज्ञानचक्षूनें यावेळीं स्पष्ट दिसूं लागलें! हा कालपर्यंत अज्ञानानें आमच्या दृष्टीस अंधत्व आल्यामुळें, आपल्या या स्वरूपाची आह्मांला ओळख पटली नव्हती, आणि त्यामुळें आपला आह्मीं व्यर्थ उपहास केला. तरी समर्था, आमच्या या थोर अपराधाबद्दल आह्मांला क्षमा करून, आमच्या मस्तकांवर आपला अभयहस्त ठेवा; ह्मणजे समर्थकृपेची सांगड आह्मीं पोटाखालीं घेऊन, हा दुस्तर भवसागर तरून जाऊं!

**विश्वेश्वर०**– अहो सद्गुरुसमर्था, आह्मी वेदशास्त्रें पठण केलीं, उपनिषदें ह्मटलीं, श्रुतींचा अभ्यास केला, पुराणव्युत्पत्ति केली, अग्निकुंडें फुंकलीं, आणि आह्मी ब्राह्मण उच्चवर्ण अशा भ्रांतीनें आजपर्यंत थोर बंधनांत पडलों! परंतु अहो श्रेष्ठा, आमच्या थोर भाग्योदयानें तुमचें आज दर्शन झाल्यामुळें, आमची सर्व अहंता नष्ट होऊन आह्मी पावन झालों! अहो सद्गुरु ज्ञानदेवा, आह्मी

आपली अंतःकरणरूप भूमि पश्चात्ताप अग्नीनें जाळून शुद्ध केली आहे, तरी अहो कृपासिंधु, या भूमींत भगवंताचें प्रेमरसबीज पेरून त्यावर आपल्या उपदेशजलाचें सिंचन करा. ह्मणजे आपण लाविलेल्या बिजाच्या वृक्षसावलींत आह्मी जन्मभर सुखानें राहून अंतकाळानंतर प्रभूच्या मोक्षधामीं निरंतर वास करूं!

**मुद्गलाचार्य**– अहो सद्गुरुनाथा, तुह्मासारख्या जगद्गुरूवांचून आह्मांला आत्मज्ञान कधींही प्राप्त होणार नाहीं; आणि आत्मज्ञानावांचून आमची कल्पांतींही सुटका होणार नाहीं! अहो समर्था, आत्मज्ञानाकरितां श्रीरामचंद्र प्रभूंना वसिष्ठाचे चरण धरावे लागले, ब्रह्मसनातन श्रीकृष्ण अनन्यभावें सांदीपनीला शरण गेले, व्यास नारदांच्या पायीं लागले, इंद्रानें बृहस्पतीचे पाय धरले, उमा श्रीशंकरांना शरण गेली; तात्पर्य, अहो श्रेष्ठों, नेत्रीं अंजन घातल्याशिवाय भूमिगत द्रव्य दिसणें जसें कठीण, त्याप्रमाणें आपल्यासारख्या जगद्गुरूंना शरण गेल्यावांचून आह्मांला यथार्थज्ञान कधींही होणार नाहीं. ह्मणून आह्मीं गुरुपद्मकरंद सेवन करण्याकरितां भ्रमर होऊन गुरुचरणीं ठाव मागत आहों. तरी अहो दयाळा, आमच्यावर कृपा करून आह्मांला उपदेशामृत पाजावें, पंचवीस तत्वांच्या मेळांत आह्मीं बहुत काल सांपडलों आहों, त्यांतून आह्मांला मुक्त करावें आणि पंचभूतांची झाडणी करून आह्मांला सावध करावें!

**ज्ञानेश्वर**– अहो सुजनहो, तुह्मांसारख्या श्रेष्ठांना मीं सांगावें असा माझा अधिकार नाहीं! पण तुह्मीं विचारीतच आहां ह्मणून तुह्मांला माझें हेंच सांगणें आहे कीं, श्रीशंकर, श्रीरामचंद्र, सूर्य, चंद्र, महेंद्र कुबेर, बृहस्पति, वरुण, यमधर्म, अग्नि, वेद, गायत्री, भागीरथी, अश्वत्थ, अंबिका, लक्ष्मी, सरस्वती, इत्यादि अनंत देवदेवी भिन्न भिन्न आहेत हा मिथ्या भेदभाव मनांतून दूर लोटा; आणि अनंत ब्रह्मांडें निर्माण करून त्यांचीं सूत्रें चालविणाऱ्या भगवंताच्याच या अनंत विभूति आहेत. इतकेंच नाहीं, तर तो आत्माराम अखिल प्राणिमात्रांच्या हृदयांत सदैव नांदत आहे; तात्पर्य, हें चराचर सर्व भगवद्रूपी आहे, हें

ज्ञानानें ओळखा ! कारण हें ज्ञान सकल कर्मांचे डोळे आहेत; तेव्हां हे निर्मळ असले पाहिजेत ! यांच्या अभावीं तुह्मीं भगवंताच्या या अनंत विभूतींचें जरी पूजन केलें, विधियुक्त नित्यनैमित्तिक कर्में जरी यथासांग केलीं, यज्ञयागादिक केले, व्रतें नेम पाळले, अग्निहोत्रादिक होमहवनें दिलीं, शिखा दाढी काढून संन्यास ग्रहण केला, व्यासपीठावर बसून पुराणव्युत्पत्ति केली. स्पर्शास्पर्शाचा विटाळ पाळून शुचिर्भूत राहिलां, घोर तप आचरलें, तीर्थयात्रा केल्या, ऋच्, यजुस्, साम असे तिन्ही वेद पढलां, मोठें शास्त्र शिकून दशग्रंथी झालां, विशाळबुद्धि चालवून विद्या, धन, कीर्ति आणि सामर्थ्य संपादिलें, तरी या सकल कर्मांचा भोक्ता जो भगवंत त्याची ओळख तुह्मांला नसल्यामुळें, षड्रस अन्नांत फिरणाऱ्या पळीप्रमाणें तुमची ही कर्माचरणाची यातायात व्यर्थ होय ! इतकेंच नाहीं तर अज्ञानानें हीं कर्में आचरून तुह्मीं पुण्यात्मक पापाची जोड संपादन करून, पुनर्जन्माची सामुग्री करून ठेवीत आहां ! कारण या पुण्यात्मक पापानें जरी तुह्मीं स्वर्गावर चढून गेलां, आणि तेथें इंद्राच्यासारखे भोग भोगले, तरी संचित पुण्य क्षीण झाल्यावर पुन्हा तुह्मांला या लोकीं येऊन जन्ममृत्यूच्या येरझारा कराव्या लागतील ! सुजनहो, प्राणिमात्रांच्या भावनेची प्रवृत्ति जिकडे असते त्या भावनेप्रमाणें प्राण्यांचीं बरींवाईट कर्में त्यांना फलद्रूप होतात, आणि हीं सुखदुःखाचीं फळें भोगण्याकरितां पुन्हा पुन्हा जन्मास यावें लागतें ! दगडाची प्राणप्रतिष्ठा करून इच्छित फल प्राप्त होईपर्यंत त्याची पूजाअर्चा करणें, त्याची आराधना करणें, त्याला नवस करणें, त्याला बळी अर्पण करणें, आणि फलप्राप्ति झाली कीं तो धोंडा ह्मणून त्याला फेकून देणें, हें घोर पाप नव्हे काय ? सुजनहो, मनांत फलेच्छा धरून परमेश्वराच्या भजनीं लागलें असतां फलभोगानें प्राणिमात्रांच्या हृदयांत काम शिरतो, आणि तो शिरला ह्मणजे त्याच्या संगतीनें ज्ञानदीप मालवतो, आणि फलाशेनें अंधत्व पावलेल्या दृष्टीस इहलोक आणि परलोक दोन्हीही दिसेनासे होऊन, भगवान् जवळ असतांहि

त्याला दिसेनासे होतात ! यासाठीं सुजनहो, सकल कर्मांचा, सकल पूजनाचा आणि सकल आराधनेचा भोक्ता भगवंत आहे, हें जाणून तुह्मी जें जें कांहीं कराल, तें तें फलेच्छा सोडून भगवंताला अर्पण करा ! ह्मणजे अग्निकुंडांत घातलेल्या बिजाला जसा कोंब येत नाहीं, त्याप्रमाणें अशा रीतीनें परमेश्वरास अर्पण केलेलीं तुमचीं कर्मे कधींही फलद्रूप होणार नाहींत ! आणि अशा रीतीनें भजन याजन करणें हाच भगवंताशीं एकरूप होण्याचा सरळ आणि सुलभ मार्ग आहे ! याकरितां श्रीहरि सर्वत्र भरला आहे हें ज्ञानचक्षूंनीं ओळखून अनन्यगतिक चित्तानें प्रभूला शरण जा. नेत्रांनीं सर्वत्र भगवंताचेंच रूप पहा. वाणीनें भगवंताचेंच नांव घ्या. कानांनीं नित्य भगवंताचे गुणानुवाद ऐका. मनानें सदैव भगवंताचाच लोभ धरा. भगवंताची सेवा हेंच भूषण सर्वांगीं धारण करा आह्मी श्रीहरीचे अलंकार असा अभिमान सदैव हृदयीं बाळगा. विषयांची भूल विसरून भगवंताच्याच भुलीनें भुलून जा. भगवंताच्याच प्रेमानें सप्रेम व्हा. आणि अशा रीतीनें भगवंताच्याठायीं तुह्मी एकनिष्ठ भक्ति धरली, ह्मणजे ज्या भगवंताचें यथार्थ वर्णन करतांना वेद नेति नेति ह्मणून मागें सरले, सनकादिकही ज्या प्रभूकरितां वेडे होऊन गेले, श्रीशंकरांनींही ज्या श्रीहरीचें पादतीर्थ मस्तकीं धारण केलें, आणि लक्ष्मीही अभिमान सोडून, ज्या प्रभुचरणांची अखंड सेवा करूं लागली, अशा त्या सर्वश्रेष्ठ प्रभूला तुह्मी मरणापूर्वींच मिळाल ! एका भक्तीशिवाय दुसऱ्या कोणत्याही उपायांनीं श्रीहरि तुम्हांला सांपडणार नाहीं. इतकेंच नाहीं तर भक्तीशिवाय जे जे उपाय तुह्मी कराल ते ते अपायच होतील ! ह्मणून तुमची वेदज्ञता, तुमची शास्त्रज्ञता, तुमचें बुद्धिवैभव, तुमचें श्रेष्ठ व्यावहारिक ज्ञान, वर्णश्रेष्ठत्वाचा तुमचा अभिमान, आणि तुमचे तर्कवितर्क बाजूला सारून सर्व जग भगवद्रूपच आहे, असें समजून त्याला नम्र व्हा. तुमचे सकल गुण भगवंतावरून ओवाळून टाका. तुह्मी आपल्या संपत्तिमदाची प्रभूवरून कुरवंडी करा. मीं अमुक कर्म केलें, मी कर्मकर्ता, हा अभिमान विसरून जा.

आणि जें जें कांहीं कराल तें तें भक्तिपूर्वक भगवंताला अर्पण करा. देव भक्तीचा पाहुणा आहे; तो लहानथोर म्हणत नाहीं; जातिकुळाचा लहानमोठेपणा तो ओळखीत नाहीं; क्षत्रिय असो, वैश्य असो, शूद्र असो, अत्यंज असो किंवा यांहूनही अत्यंत पापयोनींत जन्मलेला असो, पुरुष असो अथवा स्त्री असो, एवढेंच नव्हे तर तो पशु कां असेना, दगडासारखा मठ्ठ असो, वेद शिकलेला नसो, शास्त्र पढलेला नसो, कोणी कसाही असो, ज्यानें म्हणून भगवंताच्या प्रेमांत मनोभावानें बुडी दिली, तो कोणत्याही जातींत, कोणत्याही कुळांत आणि कोणत्याही वर्णांत जन्मलेला असो, भगवंताच्या एकनिष्ठ सेवेनें, समुद्रांत जसे मिठाचे खडे मिळून जातात त्याप्रमाणें त्याच्या जातीवर, त्याच्या कुळावर आणि त्याच्या वर्णावर पाणी पडून, तो भगवंताच्या स्वरूपीं मिळून जातो ! अहो श्रेष्ठहो, हें मी आपल्या पदरचें सांगत नाहीं, तर भगवंतांनीं अर्जुनाला सांगितलेलें हें भगवंतांचें प्रतिज्ञावचन आहे ! यासाठीं, अहो सुजनहो, चित्ताचे सारे व्यवसाय सोडून प्रभूच्या कीर्तनरंगीं रंगून जा, आणि प्रभूच्या नामसंकीर्तनानें आपलीं सकळ दुःखें दिगंतरीं दवडून, सकळ विश्व निर्मल करून सोडा; ह्मणजे श्रीहरि सदैव तुमच्याजवळ राहतील आणि देहत्यागानंतर तुह्मी प्रभूच्या आत्मस्वरूपाप्रत पावाल! सुजनहो, शेवटीं तुह्मां सर्वांस माझी हात जोडून अशी प्रार्थना आहे कीं, तुह्मी जन्मास आल्यासारखे एक वेळ तरी भूवैकुंठ पंढरीस जाऊन माझ्या पांडुरंगाला डोळे भरून पाहून कृतार्थ व्हा ! कारण

बापतीर्थपंढरिभूवैकुंठमहीवरी ॥ भक्तापुंडलिकाचेद्वारीं करकटावरीराहिला ॥ ध्रु० ॥ हेंनव्हेआजिकालिचे-युगांअठ्ठाविसांचे ॥ मजनिर्द्धारितांसाचेंहामृत्युलोकु-चिनव्हे ॥हाचिमानिरेनिर्द्धारुयेरुसांडिरेविचारु॥जरि-तूंपाहासिपरात्परुतारितूंजारेपंढरिये ॥ १ ॥ काशीअयो-ध्याकांचिमथुरामायागोमति ॥ ऐसीतीर्थेंइत्यादिकेंआ-हेतीपरिसारिनपवतिपांडुरंगी ॥ हाचिमानिरेविश्वासुयेर-

सांडिरेहव्यासु ॥ जरितुंपाहासिवैकुंठिवासुतरितूंजाये पंढरिये ॥ २ ॥ आडवाहेभीमातारावयादेहआत्मा ॥ पैलथडियेपरमात्मामध्यराहिलापुंडलिकु ॥ यातिहींचें दरुशनप्राण्यानाहींजन्ममरण ॥ पुनरपिआगमनयेथेंबोलिलेंचिनाहीं ॥ ३ ॥ पंढरिह्मणिजेभूवैकुंठब्रह्मतंवउभेंचिदिसताहेनीट॥ याहरिदासासिवाळुवंटजाग्रणासिदीधलें॥ ह्मणोनिकराकरारेक्षीरापातिनटानटाकीर्तनवृत्ति॥ तेनरमोक्षातेंपावतीऐसेंबोलतिसुरनर॥ ४ ॥ हेंचोविसामूर्तिचेंउद्धरणाशिवसहस्रनामासिगहन॥हेंचिहारिहराचेंचिंतनाविश्ववंद्यहेंमूर्तिते॥तोहादेवादिदेवोबरवापांडुरंगसदाशिवाचानिजठेवा॥बापरखुमादेविवरुपंचविसावाचोविसामूर्तिवेगळा ॥ ७ ॥

( श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा उपदेश ऐकून सर्व क्षेत्रस्थ सद्गदित अंतःकरण होत्साते श्रीज्ञानेश्वरमहाराजांपुढें आळीपाळीनें लोटांगण घेतात. इतक्यांत वाराणसी क्षेत्रस्थ कांहीं भजनी लोक पालखी घेऊन प्रवेश करतात.)

**मुद्गलाचार्य**– अहो ज्ञानराज, आपलें हें सुबोधामृत आह्मांस आज प्राशन करावयास मिळाल्यानें आम्ही धन्य झालों! आपल्या सद्गुरुवाक्याप्रमाणें वागून आम्हीं आपल्या जन्माचें सार्थक करून घेऊं ! तुम्हां जगद्गुरूंच्या चरणापाशीं आम्हां सर्व क्षेत्रस्थांचें अखेरचें हेंच मागणें आहे कीं, देव उपचारांचा भुकेला नसतांही, आम्हीं आपल्या आवडीप्रमाणें देवपूजेकरितां अनेक उपचार मिळवून, त्या उपचारांनीं जशी देवाची पूजा करितों, त्याप्रमाणें तुम्हां समर्थांना सकल ऐहिक गौरव निर्माल्यवत् असतांही, समर्थांना या पालखींत बसवून गौरवानें यज्ञमंडपीं घेऊन जाण्याची आवड आम्हीं मनांत धरिली आहे. तरी सद्गुरुसमर्थांनीं केवळ आमच्या आवडीकरितां म्हणून, या पालखींत बसून, यज्ञमंडपीं चलावें; आणि आमची एवढी आवड पुरवून, यज्ञमंडपीं पूजासनावर बसून, सद्गुरूंनीं आमच्या हातून पूजा ग्रहण करावी !

ह्मणजे सद्गुरुपूजनानें आमच्या अगणित पापराशी दग्ध होऊन, सद्गुरुचरणतीर्थप्राशनानें आमचे हे अमंगल देह पुनीत होतील !

( श्रीज्ञानेश्वरमहाराज पालखींत बसतात. तेव्हां सर्व मंडळी ' जय जय श्रीज्ञानेश्वरमहाराज ' अशी मोठ्यानें गर्जना करितात. पालखी उचलून सर्व क्षेत्रस्थ खालील अभंग ह्मणत भजन करीत व आळी-पाळीनें पालखीस हात लावीत श्रीज्ञानेश्वरमहाराजांना यज्ञमंडपाकडे घेऊन जातात. )

**जगद्गुरुज्ञानराजा ॥ प्रगटलाभक्तकाजा ॥ १ ॥ घडेदर्शन जैयाचें ॥ फिटेभयतैंभवाचें ॥ २ ॥ ज्ञानदेवहींअक्षरें ॥ गात अज्ञानतेंनुरें ॥ ३ ॥ नित्यस्मरेज्ञानराय ॥ मुक्तिपद-त्याअक्षय्य ॥ ४ ॥**

---

## प्रवेश चौथा.

**स्थळ**– श्रीवाराणसी ( काशी ) क्षेत्र–मुद्गलाचार्यांचा यज्ञमंडप.

( पडदा उघडून याच अंकांतील पहिल्या प्रवेशांत वर्णन केलेला यज्ञमंडप प्रेक्षकांच्या पुन्हा दृष्टीस पडतो. येथें सर्व क्षेत्रस्थ पालखी खालीं उतरून श्रीज्ञानेश्वरमहाराजांस पूजासनावर नेऊन बसवितात; व गंधचंदनादि द्रव्यांनीं त्यांचें पूजन करून त्यांच्या गळ्यांत पुष्प-माला घालतात; आणि त्यांच्यापुढें साष्टांग नमस्कार घालून, त्यांचा स्तव करून, त्यांच्यापाशीं प्रसाद मागतात. )

**सर्व क्षेत्रस्थ**–

**श्रीविष्णुस्वरूपागुरुज्ञानदेवा ॥ परब्रह्मठेवादिलाहातीं ॥ १ ॥ हृदयींचेंद्वैतसारेंमावळलें ॥ अद्वैतबाणलेंगुरुराया ॥ २ ॥ जैसेंकाबोधिलेंतैसेंवागूंआह्मी ॥ चित्तपरब्रह्मीं-ठेवूंसदा ॥ ३ ॥ जगकर्ताहर्ताएकभगवंत ॥ भावहानि-श्चितमनींधरूं ॥ ४ ॥ भावेंपुजूंहरीभावेंभजूंहरी ॥ हरी-सीवैखरीवाहूंआह्मीं ॥ ५ ॥ सर्वक्रियाकर्मकरूंकृष्णा-र्पण ॥ नेदूंकधींमनफळआशीं ॥ ६ ॥ रामकृष्णहरी-**

रामकृष्णहरी ॥ मंत्रषडाक्षरीगाऊंप्रेमें॥ ७॥ पढरीसीजा-
ऊंभेटूंविठुराया ॥ येरकर्मवायांलोटूंदुरी ॥ ८ ॥

अहो जगद्गुरु ज्ञानदेवा,

तवपदमुद्राजेथेंउमटती ॥ तेथेंमनोगतीजाऊंआह्मी ॥ ९॥
ज्ञानराजातूझेंस्वरूपअंतरीं ॥ राहोसदांदूरीजाऊंनको
॥ १० ॥ सर्वचराचरींदिसोतवमूर्ति ॥ तेणेंहोविश्रांति-
आह्मांलागी ॥ ११ ॥

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश पांचवा.

स्थळ–श्रीपंढरीक्षेत्र.

( श्रीपांडुरंगाचें देवालय. देवापुढें गोरा कुंभार, सावता माळी, नरहरि सोनार, कूर्मदास, सज्जन कसाई, वगैरे सर्व उभे आहेत असा पडदा उघडतो. )

**गोरा कुंभार**– संतहो ! श्रीहरीनें आपल्या त्रिशुल शिखरीं उभी केलेली मोक्षपुरी काशी सोडल्यावर, आह्मी श्रीज्ञानेश्वर-महाराजांबरोबर मारवाडांतून, तेर आरणभेंडीच्या बाजूनें, या पंढरपुरीं आलों आणि पुन्हा जे दक्षिणेकडे निघालों, ते कृष्णा-तीरचीं सर्व तीर्थें करीत करीत विजापुराहून घटप्रभा, मलप्रभा, ऋष्यमूक पर्वत, किष्किंदा नगरी, तुंगभद्रा, कुमारतीर्थ इत्यादि पुण्यस्थानें पाहून श्रीव्यंकटेशाचें दर्शन घेतलें; आणि तेथून श्री-शैलमल्लिकार्जुन, शिवकांची, विष्णुकांची, मदुरामीनाक्षी हीं पहात पहात सेतुबंध रामेश्वरीं पोहोंचलों. तेथें श्रीरामेश्वरांना आह्मीं भागीरथीच्या कावडी अर्पण केल्या; आणि तेथून ताम्रपर्णी, करवीर, विराटनगरी, अलंकापूर, देहू, हीं अवलोकन करून पुन्हा पंढरपुरीं पांडुरंगाच्या भेटीला आलों. या गोष्टीला आज इतके दिवस झाले तरी देखील या तीर्थयात्रेंत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं, ज्या आपल्या सुबोध आणि गंभीर वाणीनें ठिकठिकाणच्या मुमुक्षुजनांस

अद्वय बोध केला, आत्मज्ञान कथन केलें आणि भगवंताच्या भक्तिरहस्याचें निरूपण केलें, त्या त्यांच्या गंभीर वाणीचा नाद आमच्या कानीं अद्यापि घुमत आहे! आणि त्यांनीं आपल्या अंगच्या ईश्वरीअंशाच्या ज्या अनेक लीला लोकांत प्रकट केल्या, त्या जणूं काय आतांच आमच्या नेत्रांपुढें घडत आहेत, असा भास आह्मांला सदैव होत आहे! खरोखर अलंकापुरवासी-जनांचें थोर भाग्य, ह्मणूनच तीर्थयात्रेहून परत आल्या दिवसा-पासून त्यांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अपूर्व पुण्यप्रद दर्शनाचें सुख मिळत आहे! आणि त्यांच्या मुखांतून स्रवणाऱ्या बोधगंगेचें स्नान नित्य घडत आहे! आणि आपण हतभागी ह्मणून आपल्याला हरिदिनीं श्रीज्ञानेश्वरमहाराज, पांडुरंगाच्या भेटीस येतात तेव्हांच कायतो त्यांच्या दर्शनाचा आणि उपदेशाचा लाभ मिळत आहे! तरी पण या कार्तिक शुद्ध एकादशीकरितां श्री-ज्ञानेश्वरमहाराज या खेपेस येथें आल्यापासून आज पूर्णिमेपर्यंत त्यांच्या वागमृताचें पान आपणा सर्वांना जसें करण्यास मिळालें, तसें आकंठ पान आजपर्यंत आपल्याला कधींच करावयाला सांपडलें नव्हतें! अहो संतहो, ज्ञानरायाचें चरित्र हेंही सकल पापविनाशी चंद्रभागा तीर्थच आहे! तर श्रीज्ञानेश्वरमहाराज पुंडलिकाचें दर्शन घेऊन येईपर्यंत आपण त्यांच्या चरित्रतीर्थांत स्नान करूं! ( इतक्यांत नामदेव प्रवेश करतात. )

**नामदेव**–अहो गोरोबा, माझ्या ज्ञानमाउलीच्या चरित्रतीर्थांत स्नान करूनच आणि माझ्या ज्ञानरायाच्या अतर्क्य लीला आठ-वूनच दिवस कंठण्याचा प्रसंग आतां आपल्याला आला आहे! कारण, श्रीपांडुरंगांनीं ( गहिंवरून ) ज्ञानरायाच्या विनंतीवरून, श्रीहरीनीं आपल्या श्रेष्ठ पद्मावर वसविलेल्या अलंकापूर क्षेत्रीं, आपणा सर्वांना बरोबर घेऊन जाऊन, तेथें ज्ञानरायाला येत्या कार्तिक वद्य त्रयोदशीस समाधिस्थ बसविण्याचें अभिवचन दिलें आहे! अहो संतहो, श्रीकेशीराजाचें जगीं प्रकट झालेलें हें व्यक्त ज्ञानरूप इतक्यांतच समाधिस्थ होणार, ह्मणून मनाला अत्यंत हुरहुर वाटत आहे! ( सर्व संत गहिंवरून जातात. )

पांडुरंगा, सख्या ज्ञानदेवावांचून आह्मीं सर्व संतांनीं येथें कसें रे रहावें, ह्मणून मी विठ्ठलराजांना पुसलें, तेव्हां ते मला ह्मणाले, नाम्या, अरे, ज्ञानराजा तो मीच. माझें रूप, तेंच ज्ञानराजाचें रूप. अरे, त्याच्यांत माझ्यांत दुजेपणा नाहीं. अरे, मी मौन धरून असाच विटेवर उभा राहिलों, तर या युगीं भवसागरांत बुडणाऱ्या असंख्य जीवांना वर काढून त्यांना मोक्षप्राप्तीचा सुगम मार्ग कोणता, हें कोण दाखवून देणार ? ह्मणून मींच ज्ञानरूपानें अवतार घेतला ! आतां माझें अवतारकृत्य संपलें, ह्मणून ज्ञानदेवाचें हें मदांश रूप मी आपल्या क्षेमस्थानीं पुन्हा स्थापीत आहें ! तेव्हां हें गुप्त रहस्य तूं स्वतः ज्ञानानें ओळखून, तें सर्व संतांनाही सांग, आणि ज्या ज्या वेळीं तुम्हांला ज्ञानरायाबद्दल खंती वाटेल, त्या त्या वेळीं तुम्हीं त्याचें ध्यान करीत जा, म्हणजे ज्ञानमूर्तीच्या व्यक्त रूपानें मी तुम्हांला दर्शन देत जाईन! संतहो, देवांनीं हें ज्ञान मला सांगितलें खरें, परंतु माझ्या मनाला ज्ञानरायाच्या वियोगाचे थोर क्लेश वाटत आहेत !

( इतक्यांत श्रीज्ञानेश्वरमहाराज, निवृत्तिनाथमहाराज, सोपानदेव आणि मुक्ताबाई प्रवेश करतात. सर्व संत त्यांचे चरणांवर डोकीं ठेवितात. नामदेव श्रीज्ञानेश्वरमहाराजांना कडकडून भेटतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज नामदेवांचे डोळे पुसून त्यांच्या पाठीवरून हात फिरवितात. श्रीज्ञानेश्वरमहाराज देवापुढें लोटांगण घालून, खालील अभंग ह्मणत, देवाभोंवतीं चार प्रदक्षिणा घालतात. तेव्हां सोपानदेव व मुक्ताबाई देवापुढें लोटांगण घालतात. श्रीनिवृत्तिनाथ व सर्व संत देवापुढें हात जोडून उभे राहतात. )

ज्ञानेश्वर—

रूपपाहातांलोचनीं ॥ सुखजालेंवोसाजणी ॥ १॥ तोहाविठ्ठलबरवा ॥ तोहामाधवबरवा ॥ ध्रु० ॥ बहुतासुकृतांचीजोडी ॥ ह्मणौनिविठ्ठलींआवडी ॥ २ ॥ सर्वसुखाचेंआगरु ॥ बापरखुमादेविवरु ॥ ३ ॥

( चार प्रदक्षिणा संपल्यावर )

संतहो, या सत्य, सनातन, श्रुतिशास्त्रप्रतिपाद्य, चतुर्वेदवंद्य, अद्वैत, अनंत, लीलानाटकी, आदिनारायण, दीनोद्धारी श्रीपांडुरंगाचा महिमा मी किती वर्णन करावा !

तोहाविठोबानिधान ॥ ज्याचेंब्रह्मादिकांध्यान ॥ ध्रु० ॥
नेणोब्रह्ममार्गचुकलें ॥ उवडेंपंढरपुराआलें ॥ भक्तेंपुंडलिकेंदेखिलें ॥ उभेंकेलेंविटेवरी ॥ १ ॥
हेंक्षीरसागरीचेंनिजरूपडेंपाहतांपारखियांत्रिभुवनींनसापडेतेंउभेंआहेवाडेकोडेंपुंडलिकाचेआवडीं ॥ मेघश्यामवेऊनियांबुंथीजयातेंश्रुतिपैवानितीकीर्तिपुराणासीवाड ॥ तेंपंढरियेउभेंअसेकानडेंगेमाये ॥
तोहाविठोबानिधान ॥ ज्याचेंब्रह्मादिकांध्यान ॥ ध्रु० ॥
जयातेंपाहतांपरतलाआगमुनिगमानाकळेदुर्गमु ॥ सिद्धासाधकांनिरुतेंवर्मनपडेठायींसर्वथा ॥ तेंयापुंडलिकावोळलेंप्रेमप्रीतीनेंवोळलें॥ भक्तिमातेनें चाळविलेंआधीनकेलेंआपणया॥ जेंमायेअविद्येवेगळेंगुणत्रयानातळे ॥ काळेंगोरेंनासांवळेनिर्द्धारितांनेणवे ॥ जेंद्वैताद्वैताह्वनिपरतेंतेंसुखातेंवाढवितें ॥ योगीलक्षींलक्षितीज्यातेंपरिनेणवेसर्वथा॥ जेंरूपाअरूपावेगळेंसहस्रनामाहूनिआगळें ॥ परमकृपेचेंकोवळेंक्रियाकर्माविरहित ॥ जेंब्रह्मरसाचेंगोठलेंतेंपंढरियेंप्रगटलें ॥ बापरखुमादेविवरविठ्ठलनामेंआथिलेंचोखडेरया ॥
तोहाविठोबानिधान ॥ ज्याचेंब्रह्मादिकांध्यान ॥ ध्रु० ॥
रूपपाहतांतरीडोळसु ॥ सुंदरपाहतांगोपवेषु ॥ महिमापाहातांमहेशु ॥ जेणेंमस्तकींवंदिला ॥ २ ॥
बरवेंपाउलेंपाउलें ॥ सुंदरसुकुमारपाउलें ॥ शीतळहरीचेंपाउलें ॥ गोमटेंहरीचेंपाउलें ॥ ध्रुवासिउपदेशिलें ॥ तेंचिप्रल्हादेंस्मरिलें ॥ उपमन्याप्रसन्नझालें ॥ तेंचिगजेंद्रेंचिंतिलें ॥ अहल्येसिउद्धारिलें ॥ तेंचिद्रौपदियेधाविन्नलें ॥ यशोदेनेंवोवाळिलें ॥ तेंचिगोवर्धनींरंगलें ॥ शकटाअंगींजेंउमटलें ॥ तेंचिबाळिपृष्ठींशोभलें ॥ शिवेंशक्तिप्रतीकाथिलें ॥ धर्मराजेंतेंपूजिलें ॥ बापरखुमादेविवरविठ्ठलें ॥ तेंविटेवरीदाविलें ॥

तोहाविठोबानिधान ॥ ज्याचेंब्रह्मादिकांध्यान ॥ ध्रु० ॥ भक्तिदेखोनिलांचावला ॥ जावोंनेदीउभाकेला ॥ निवृत्तिदासह्मणेविठ्ठला ॥ जन्मोजन्मींनविसंबे ॥ ३ ॥

अहो भावीक सुजनहो,

सदापरिपूर्ण ॥ तोहाजनार्दन ॥ नित्यजपतांनारायण ॥ कोटियागघडतील ॥ एवढेंक्षेत्रपांडुरंग ॥ तेथेंउद्धरिलेंहेंत्रिजग ॥ आनंदतब्राह्मणयाग ॥ कोटिकुळेंउद्धरती ॥ कीर्तनकेलियावाळवंटीं ॥ घेतांवैष्णवांचीभेटी ॥ होईलसंसाराचीतुटी ॥ चरणरजवंदिता ॥ तुळशीच्यामाळा ॥ घालितांहरिदासाच्यागळा ॥ तोनभियेकाळिकाळा ॥ त्यासीजिव्हाळाहरिविठ्ठल ॥ पंढरीसीजाऊंह्मणती ॥ तयाकडेयमनपाहती ॥ त्याचेपूर्वजउद्धरती ॥ ह्मणतीवैकुंठाजाऊंआतां ॥ पंढरीसीकीर्तनकरी ॥ पुंडलिकासीनमस्कारी ॥ विठ्ठलचरणअंतरींधरी ॥ धन्यजन्मतयाचा ॥ सकळकुळाचातारकु ॥ तोचिजाणावापुण्यश्लोकु ॥ पांडुरंगींरंगलानिःशंकु ॥ धन्यजन्मतयाचा ॥ त्यासीअंतींवैकुंठप्राप्ती ॥ ऐसेंशुकेंसांगितलेंपरीक्षिती ॥ जेजेहरिचरणींभजती ॥ तेतेपावतीवैकुंठ ॥ अनंतीअनंतबोतलेंसंचीत ॥ वैकुंठअद्भुतउभेंअसे ॥

तोहाविठोबानिधान ॥ ज्याचेंब्रह्मादिकांध्यान ॥ ध्रु० ॥

बापहो,

कल्पनावृक्षामीदेखिलें ॥ चिंतामणिसचिंतिलें ॥ कामधेनुसीअपेक्षिलें ॥ जिण्याजिवाविलेंतेंचिहरिरूपपंढरीये ॥ कटावरी ठेवूनिहातजनादावीसंकेत ॥ भवजलाब्धीचाअंतइतुलाची ॥ समचरणीच्याखुणाउभापंढरीचाराणा ॥ तोआवडेजनामनां दुर्लभगेमाये ॥ भक्ताकारणेंयेणेंघेतलीसेआळी ॥ दहागर्भवाससोसिलेवनमाळी ॥ पुंडलिकेभक्तेंरेतारिलेंविश्वजन ॥ वैकुंठिचिमूर्तिआणिलीपंढरपूरपाटणा ॥

तोहाविठोबानिधान ॥ ज्याचेंब्रह्मादिकांध्यान ॥ ध्रु०॥

अहो सुजनहो,

विठ्ठलुनाहींजयेशरीरी ॥ वायाकागाजन्मलेसंसारीं ॥ विठ्ठलु-

नाहींजयेनगरीं ॥ तअरण्यजाणवि ॥ विठ्ठलुनींहाजेथदेशीं ॥ स्मशानभूमितेपरियेसी ॥ रविशशिवीणदिशाजैसी ॥ रसनातेसीविठ्ठलेविण ॥ विठ्ठलावेगळेंजितुकेकर्म ॥ विठ्ठलावेगळा जितुकाधर्म ॥ विठ्ठलावेगळेंबोलतीब्रह्म ॥ तितुकाहिभ्रमजाणावा ॥ सच्चिदानंदघन ॥ पंढरियेपरिपूर्ण ॥ करठेवूनियांजघन ॥ वाटपाहेभक्तांची ॥ विठ्ठलेविणदेवोह्मणती ॥ तेसंसारपुढतीपावती ॥ विठ्ठलाविणतृप्ती ॥ नाहींप्रतीतिविठ्ठलेंविण ॥ सर्वांमाजीश्रेष्ठपुण्यभूमिवैकुंठ ॥ विठ्ठलमूळपीठजगदोद्धारा ॥ तोहाविठोबानिधान ॥ ज्याचेंब्रह्मादिकांध्यान॥ ध्रु०॥

अहो लोकहो,

वाडासायासिमनुष्यजन्मपावावा ॥ वियालापुरुषार्थतोकावायादवडावा ॥ वाचामनेंकरुनिमुरारिबोळगावा ॥ व्रतेंएकादशीकरुनिपरलोकठाकावा ॥ श्रवणघ्राणरसनात्वचाआणिलोचनहेंतोंदैन्याचींद्वारेंवोळगसीयांचेयांसीचिनपुरेतुजपुरवितीकाये ॥ यालागींधरिजेसुआपुलीसोयरेबापा ॥ कवणाचेमायबाप ॥ कवणाचेगणगोत ॥ मृगजळवतवायाजाईलरया॥ विषयांचेसमसुख ॥ वेगडाचीबाहुली ॥ अभ्राचीसावुली ॥ वायांजाईलरया ॥ ज्ञानदेवह्मणेंपाहतांपाहलें ॥ स्वप्नीचेंचेईलें-तैसेंहोईलरया ॥ अरेमनारेअरेमनारे ॥ नसंडीनसंडीहरिचरणकमळारे ॥ स्वप्नीचेंधनतेंधनाचिनव्हे ॥ मृगजळीचेंजळतेंजळचिनव्हे ॥ अभ्रीचीछायातेसाउलीनव्हे ॥ ऐसेंजाणोनियांवेगींधरिजेसुआपुलीसोयरेरया ॥ याहरिभजनेविणतुझेंजन्मजातेंवाया ॥ यालागिंवैकुंठनाथाच्यातूंचिंतीपायां ॥ बापरखुमादेविवराविठ्ठलाचिंतीसीतेणेंपावसीतूंसुखाचियाराशीरया ॥

तोहाविठोबानिधान ॥ ज्याचेंब्रह्मादिकांध्यान ॥ ध्रु० ॥

अहो मायबापहो,

उठाउठाजागापाठींभयआलेंमोठें ॥ पंढरिवांचुनिदुजाठावनाहींकोठें ॥ तापत्रयअग्नीचालागलावोणवा ॥ कवणरिघेआडकवणकरिसावाधावा ॥ देखोनिऐकोनिएकवहिरअंध-

झाले ॥ विषयाचेलंपटबांधोनियमपुरिसनेले ॥ आजामेला-पणजामेलाबापमसणानेला ॥ देखतदेखतनातुपणतुतोहिवेडा-झाला ॥ व्याघ्रलासीभुतेंयेलागतातिपाठीं ॥ हरिभजनन-करितांसगळेंघालुपाहेपोटीं ॥ संतसंगधरातुह्मिहरिभजनकरा ॥ पाठींलागलासेकाळदातखातोकरकरा ॥

अहो जनहो,

बापरखुमादेविवराविठ्ठलाशरण ॥ भावेंननिघतांनचुकेजन्म मरण ॥ बापरखुमादेविवराचिंतितातुटेयेरझार ॥ स्थिरकरीं वेगींबिढार ॥ चरणींथारविठ्ठलाचे ॥

तोहाविठोबानिधान ॥ ज्याचेंब्रह्मादिकांध्यान ॥ ध्रु० ॥

विठ्ठलनामतीनअक्षरें ॥ अमृतपानकेलेंशंकरें ॥ रखुमादेविवर-विठ्ठलेंमहापातकीउद्धरिले ॥ विठ्ठलविठ्ठलस्मरेमना ॥ चुकेल-संसारदर्शना ॥ विठ्ठलनामनुच्चारिसीतरीरिवरवकुंडीपडसी ॥ विठ्ठलनामउच्चारीआळसुनकरीक्षणभरी ॥ पुण्यकरितांस्वर्ग-पापेंकरितांभोग ॥ नामजपतांसर्वांगहोईलपांडुरंग ॥ शरीर-आटेसंपत्तीआटे ॥ हरिनामनआटेंतेंबरवें ॥ बापरखुमादेविव-राचेंनामनाटे ॥ युगेंगेलींपरिउभाविटे ॥

तोहाविठोबानिधान ॥ ज्याचेंब्रह्मादिकांध्यान ॥ ध्रु० ॥

जनहो, आम्हांला तर

त्रिभुवनींचेंसुखएकतत्वविठ्ठल ॥ नलगेआह्मांमोलउच्चारितां ॥ विठ्ठलउघडामंत्रकळिकाळात्रास ॥ घालूनियांकांसजपोआ-धीं ॥ बापरखुमादेविवरु ॥ कृपाळुउदारु ॥ नामस्मरणेंपारु ॥ उतरीहानिर्धारु ॥

यासाठीं ह्मणा, विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल. ( सर्व विठ्ठलनामाचा गजर करितात. )

अहो भीमातीरविहारा पांडुरंगा, तुम्हांला पाहून ब्रम्हादि-कही वेडे झाले, त्या तुमचें सुयश या तुमच्या दीनदासानें कोठवर गावें ! अहो नारायणा, तुमचे गुण गातां गातां सात्विक अष्टभाव दाटून, माझ्या आंगावर रोमांच उभे राहिले आहेत ! माझा कंठ भरून आला आहे ! आणि माझ्या नेत्रांत प्रेमाश्रू लो-

टले आहेत ! अहो ब्रह्मांडाधिपति पंढरीनाथा, श्रीमत्परमहंस श्रीपादरामानंदस्वामी यांच्या हातून, तुमच्या सुंदर कंठांतील ही दिव्य तुळसीकाष्ठमाला माझ्या गळ्यांत घालवून, अहो जगन्नाथा विठ्ठला, तुमच्या भक्तीचा थोर महिमा सकल विश्वाला सांगण्याविषयीं तुम्हीं मला अनुज्ञा केली, आणि अशा रितीनें देवा, अनंत युगींच्या तुमच्या लीला माझ्या मुखानें गावबून माझें यश तुम्हीं अखिल भूमंडळीं गाजविलें, आणि मला त्रिलोकीं धन्य केलें ! देवा, तुमच्या या अपार भक्तवत्सलतेचा महिमा मी कोठवर वर्णन करूं ! अहो सकल देवाधिदेवा, तुम्हीं मला साहाय्य झालां म्हणूनच तुमच्या अनुज्ञेप्रमाणें तुमची अल्प सेवा या ज्ञानदेवाच्या हातून घडली ! अहो आदिनारायणा, तुमचें नामघोषीं नित्य गाइल्यानें माझी सकल कार्यासिद्धि झाली ! आणि तुमचे पादकमल मीं अखंड हृदयीं धरल्यामुळें माझ्या देहाला साक्षात् पुरुषोत्तम स्वरूप प्राप्त झालें ! अहो अनंता, मला आतां भुक्ति, मुक्ति किंवा सायुज्यता, यांपैकीं कशाचीही चाड उरली नाहीं ! अहो माधवा, मीतूंपणा वेगळ्या अशा तुमच्या निश्चल रूपाचें मला चिन्मयपणें अखंड ध्यान घडावें, आणि पृथक्पणा सोडून तुमच्या स्वरूपीं ऐक्य होऊन कल्पांतवाधि अमरत्वानें तुमचें शांत चित्तानें पादसेवन करीत बसावें, एवढाच काय तो माझा हेतु आतां उरला आहे ! आणि अहो भगवंता, ह माझा हेतु परिपूर्ण व्हावा ह्मणून मीं तुह्मांपाशीं ज्ञानसमाधिसुखाचें अखेरचें मागणें पदर पसरून मागितलें आहे. आणि अहो दीन दयाळ वासुदेवा, तुह्मीं कृपाळू होऊन समाधि देण्याचा अनुग्रह करण्याचें कबूल केलें आहे ! तेव्हां अहो पांडुरंगा, मा तीन वर्षांपूर्वीं जसें तुह्मीं मला चाळविलें होतें, तसें यावेळ पुन्हा मला चाळवूं नका, हीच काकुळतीस येऊन अहो प्रभो, म तुह्मांला वरचेवर प्रार्थना करीत आहें ! अहो पुंडलीकवरदा पांडु रंगा, तुमच्या भिडेस्तव मीं हा कालपर्यंत बहुत जनउपाधि सोशि ली ! आणि तुमच्या निश्चलध्यानसुखास पारखा झालों ! प अहो नरहरि, आतां नका बरें पुन्हा मला अशी गळ घालूं! गोपाळ

कृष्णा, तुह्मीं कबूल केल्याप्रमाणें रुक्मिणी मातोश्रींना, तुमच्या पूर्वयुगींच्या सकल भक्तांना आणि माझ्या या सर्व संतबंधूंना बरोबर घेऊन, अलंकापुरीस या, आणि या आपल्या दासाला वद्य त्रयोदशीस समाधिस्थ बसवून याला कृतार्थ करा ! अहो नारायणा, मातोश्रीबाबांच्यामागें आह्मां चौघां पोरक्या भावंडांचा तुह्मीं जसा आजवर अपत्यस्नेहानें सांभाळ केला, तशीच अहो भगवंता, आह्मां चौघां भांवडांची अखेरीची निरवानिरव करणें तुमच्याकडेच आहे ! यासाठीं अहो गोविंदा, तुह्मी आपल्या वचनाप्रमाणें माझ्या निवृत्तिनाथ सद्गुरूंना त्र्यंबकेश्वरीं घेऊन जाऊन, कुशावर्त तीर्थी जलसमाधि देण्यास विसरूं नका बरें ! आणि माझ्या सोपानाला कऱ्हेच्या तीरीं वत्सरग्रामीं दिव्य भूमींत अखंड समाधिसुख द्या बरें ! अहो बापा पांडुरंगा, माझ्या मुक्ताबाईला मी तुमच्या आणि रुक्मिणी मातोश्रीच्या ओटींत घालीत आहें, तरी हिला तुमचे चरणांजवळ ठाव देऊन, आकल्प हिच्या हातून सेवा ग्रहण करा ! अहो सद्बंधो नामदेवा, तुह्मांपाशीं या ज्ञानदेवाचें अखेरचें एवढेंच मागणें आहे कीं, तुह्मी या माझ्या सकलसंतबंधुवर्गासह आतांच प्रस्थान करून मजबरोबर अलंकापुरीस चला, आणि तुह्मीं सर्वांनीं आपल्या हातांनीं या ज्ञानदेवाला समाधि देऊन याला धन्य करा ! अहो पंढरीनाथा, तुमच्या कृपेनें माझे सर्व मनोरथ पूर्ण झाले आहेत. तेव्हां आतां तुमच्यापाशीं मला मागावयाचें असें कांहींच उरलें नाहीं ! हे रुक्मिणीवरा पांडुरंगा, आतां शेवटीं, जन्मादारभ्य जें जें कर्म माझ्या हातून घडलें, जो जो धर्म मीं आचरिला, जी जी तुमची सेवा केली, तुमचे गुणानुवाद गातां गातां जीं जीं पदपदांतरें मीं रचिलीं, तुमच्या आज्ञेप्रमाणें तुमचें भक्तिमहात्म्य स्पष्टपणें उकलून सांगण्याकरितां जीं जीं कांहीं अक्षरें मीं लिहिलीं, वैकुंठभांडार श्रीमद्भगवद्गीतेचा प्राकृत जनांकरितां जो स्पष्टार्थ केला, स्वानुभवाचे द्योतक ह्मणून जे चार शब्द मीं लिहिले, तीं तीं सर्व मी तुमच्या चरणीं अर्पण करीत आहें !

तसेंच अहो श्रीहरि, माझ्या वृत्ति, माझें मन, माझी वासना, माझी बुद्धि आणि माझें ज्ञान मी तुमचे स्वाधीन करीत आहें ! तरी या सर्वांचा स्वीकार करून, देवा, तुमच्या चित्स्वरूपीं मला अखंड ठाव द्या !

पायजोंजीह्मयेदेखिलेंदेखणें ॥ गेलीआर्धीतेणेंदृष्टिमाझी ॥ १ ॥ उपकारियाबापाक्षेमदेईनतया ॥ गेलीमाझी-मायादेहल्याचें ॥ ध्रु० ॥ आनंदेंस्फुंदतयेतीअश्रुपात ॥ अष्टांगुलाथदेखरावा ॥ २ ॥ निवृत्तिदासह्मणेंहृतेंजिवें-योंचाळिलें ॥ शिरमिरोपिलेंह्याच्याचरणीं ॥ ३ ॥

(वरील अभंग ह्मणत असतां श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रीपांडुरंगच-रणीं अत्यंत सद्गदित अंतःकरणानें मिठी मारून श्रीपांडुरंगाच्या पायांवर आपलें डोकें ठेवितात. तेव्हां सर्व संत 'जय जय रामकृष्ण हरि' असें भजन सुरू करतात व भजन चाललें असतां पडदा पडतो.)

---

## प्रवेश सहावा.

स्थळ—इंद्रायणीचे तीरावरील सिद्धेश्वरलिंगाचे वामबाजूक-डील सरोवरावरील पटांगण.

(इंद्रायणीचे तीरावरील सिद्धेश्वरलिंगाचे दक्षिणेस जिचें द्वार आहे, अशी श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीकरितां तयार केले-ली गुहा असून, या गुहेचे जवळ अजान वृक्ष व पलीकडे सुवर्ण पिंपळ आहे. गुहेचे भोंवतीं कुंकुमाचे सडे घातले असून, गुहेत तळीं दर्भ, दुर्वा व बेल पसरले आहेत व त्यांवर धूतवस्त्र आंथरलें आहे; व त्या धूतवस्त्रावर तुळशी व सुगंध पुष्पें पसरलीं असून, त्यांवर मध्यभागीं कुशासन व मृगासन हीं आंथरलेलीं आहेत. सिद्धास-नाचे अग्रभागीं ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, पासष्ठी, योगवासिष्ठ, स्वा-त्मज्ञान, हरिपाठ, स्फुट अभंग, इत्यादि ग्रंथ ठेविलेले आहेत व ज-

वतामाळी, कूर्मदास, सज्जनकसाई, रोहिदास, नरहरिसोनार, भानुदास, चोखामेळा, कन्हूपाठक, इत्यादि वैष्णवसंत हातांत पताका, टाळ, मृदंग घेऊन भजन करीत प्रवेश करतात.)

नामदेव–

आतांपांडुरंगस्मरा ॥ जन्ममृत्युचुकवाफेरा ॥१॥ ऐसाकांहींकरानेम ॥ मुखींस्मरारामनाम ॥ २ ॥ चिंताऐसेध्यान ॥ तेणेंहोईलसमाधान ॥ ३ ॥ नामाह्मणेहरिदास ॥ त्यासीअसावाअभ्यास ॥ ४ ॥

(भजन चाललें असतां श्रीनिवृत्तिनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई श्रीज्ञानेश्वरमहाराजांस हातीं धरून प्रवेश करतात, सर्व संत श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें पूजन करितात व त्यांस गंधाक्षता व कर्पूर चंदनाचे टिळे लावून त्यांचे कपाळीं केशरीगंध लावितात व त्यांचे गळ्यांत सुगंध पुष्पांचे व तुळशीचे हार घालितात.)

ज्ञानेश्वर–

पूर्वजन्मींसुकृतेंथोरकेलीं ॥ तेंमजआजिफळासिआलीं ॥ १ ॥ परमानंदुआजिमानसीं ॥ भेटीजालीयासंतासी ॥ ध्रु० ॥ मायबापबंधुसखेसोयरे ॥ यांतेंभेटावयामनधरे ॥ २॥ एकएकातीर्थांहूनिआगळें ॥ तयामाजिपरब्रह्मसांवळें ॥ ३ ॥ निर्धनासिधनलाभुजाला ॥ जैसाअचेतनींप्राणप्रगटला ॥ ४ ॥ वत्सविघडलियाधेनुभेटली ॥ जैसीकुरंगिणीपाडसमीनली ॥ ५ ॥ हेंपियुष्यापरतेंगोडवाटत ॥ पंढरिरायाचेभक्तभेटत ॥ ६ ॥ बापरखुमादेविवरविठ्ठलें ॥ संतभेटतांभवदुःखफीटलें ॥ ७ ॥

अहो वैष्णव संतहो, तुम्हीं सर्वांनीं श्रीपांडुरंगाबरोबर येथवर येऊन मला शेवटचें दर्शन दिलें, आणि वद्य अष्टमीपासून आज त्रयोदशीपर्यंत हा समाधिउत्सव पूर्ण केला, तेणेंकरून मी धन्य झालों! (श्रीनिवृत्तिनाथमहाराज, सोपानदेव, मुक्ताबाई व नामदेवादि संत श्रीज्ञानेश्वरमहाराज समाधिस्थ होणार ह्मणून विव्हळ होतात. तेव्हां श्रीज्ञानेश्वरमहाराज मुक्ताबाईस व सोपानदेवास पोटाशीं धरून)

तात व रुक्मिणी मातोश्री तुमचा प्रतिपाळ करतील. बाळांनो, तुह्मी माझ्या पांडुरंगाचें अनन्यभावानें चिंतन करा; ह्मणजे तुह्मांला कशाचेंही भय उरणार नाहीं. अहो त्रिभुवनपालका पंढरीनाथा, माझ्या श्रीसद्गुरुनिवृत्तिनाथांचा, सोपानबाळाचा आणि मुक्ताबाबाईचा सांभाळ करणें तुमच्याकडेच आहे. देवा, यांची काळजी तुह्मांलाच केली पाहिजे. तुह्मावांचून आतां यांना कोणाचाही आधार नाहीं. तर अहो देवाधिदेवा, यांच्यावर आपली सदैव कृपा असूं द्या; आणि आजपर्यंत जसा मजवर लोभ ठेविला, तसाच लोभ यांच्यावर ठेवून यांचा सांभाळ करा. हेंच तुमच्या पायांपाशीं माझें शेवटचें मागणें आहे. ( नामदेवास मिठी मारून ) श्रेष्ठ नामदेवा, तूं आपल्या मनास असे क्लेश होऊं देणें बरोबर नाहीं ! तुम्हीं सर्वांनीं आपले मनास विवेकाचें आळें घालून आणि श्रीपांडुरंगाचें सोज्वळ स्वरूप ध्यानीं आणून आपलें समाधान करून घेतलें पाहिजे ! अहो अलंकापुरवासी सुजनहो, मी आज बहुत दिवस तुमच्या गांवीं होतों. तुम्हीं अपत्यवंतांनीं आह्मां चौघां भावंडांचा प्रेमानें सांभाळ करून आमचा योगक्षेम चालविला ! तुमच्यासारखे आईबाप आह्मांला त्रिभुवनांतही मिळणार नाहींत ! तुमच्या प्रेमाचा मला नित्य आठव होईल ! आतां मी आपल्या गांवीं जातों ! तरी माझें स्मरण असूं द्या ! मजवर कृपालोभ ठेवा ! अहो सकलसुजनहो, येथून जाण्यापूर्वी मी आपल्या जीवींची अनुभवखूण तुह्मांला सांगतों. मी सांगतों हा राजमार्ग सर्वांहून श्रेष्ठ आहे ! ही माझी खूण तुम्ही भक्तिभावानें आपल्या जिवाशीं जतन करा आणि त्याप्रमाणें वागून जन्ममरणाचा फेरा चुकवा ! माझ्या विठोबारायाचे हे दीनवत्सल, आपपरभावरहित भक्त, तुह्मां सकल मुमुक्षु चातकांना अखंड जलधारा देणारे स्वानंदसुखाचे मेघ आहेत ! हे श्रवणामृताचे कुंभ, हे कीर्तनाचे स्वयंभू पर्वत, हीं शांतिभूमीचीं निधानें, हीं चातुर्यार्णवींचीं रत्नें, हे वैराग्यअंबरींचे दिनकर, हे अक्षय्यविज्ञा-

अहो सुजनहो, तुम्हांला हा भवसिंधु पार उतरून नेण्याकारितां श्रीपांडुरंगानें हीं थोर जहाजें निर्माण केलीं आहेत! आणि या जहाजांवर भाक्तिशिडें फडकत आहेत! तरी या जहाजांत बसून, हरिनामाचा गजर करीत, सच्चिदानंद प्रभूच्या अविनाशी पदाप्रत जा! तुह्मांला पैलतीराला नेण्याकारितां श्रीपंढरीनाथ नावाडी होऊन उभा आहे! तरी मनांतील संकल्पविकल्प दूर लोटून, या संतांची सदैव संगत धरा! यांच्यावर विश्वास ठेवा! मनोभावानें यांना शरण जा! ह्मणजे हे तुह्मांला भगवत्पदाची जोड मिळवून देतील! या संतश्रेष्ठांची थोरवी शिवब्रह्मादिकांनाही वर्णन करतां येत नाहीं! तेथें यांच्या दासांचा दास जो मी, त्या म्यां यांची कोठवर स्तुति करावी! कृतयुगांत सकल प्राणिमात्र परमेश्वरध्यानानें मोक्षपदाप्रत गेले! त्रेतायुगीं जनांनीं महामख करून वैकुंठभुवन गांठलें! आणि द्वापारीं सकल जीव भगवंताची राजोपचारांनीं पूजा करून प्रभुपदाप्रत गेले! परंतु या कलियुगांत परमेश्वराचें नामसंकीर्तन हेंच अत्यंत सोपें असें मोक्षप्राप्तीचें श्रेष्ठ साधन तुह्मांकरितां करून ठेविलें आहे! यासाठीं दृढ भाक्तियुक्त अंतःकरणानें तुमचे अंतकाळींचे पाठिराखे, आणि परलोकींचे सखेसोयरे जे हे संतमहाराज, यांना शरण जाऊन अखंड रामकृष्णहरि या षडाक्षरी मंत्राचा पाठ करा! आणि प्रेमानें हरिकीर्तन करा! अहो माझे मायबाप संतहो, मी आतां समाधिस्थ बसतों. मी तुमचें दीन लेंकरूं आहें! माझ्या तोंडून चुकून कधीं अधिकउणें उत्तर गेलें असल्यास त्याची तुम्ही मला क्षमा करा! आणि मजवर अखंड लोभ ठेवा! अहो वैकुंठवासी इंद्रादि देवांनो, चित्रसेनादि प्रमुख गंधर्वांनो, शुकाचार्यादि ब्रह्मऋषींनो, वाल्मिकादि महामुनींनो, श्रेष्ठ व्यासादि महत्प्रभावांनो, मार्कंडेयादि चिरंजीवांनो, श्रीदत्त गोरक्षनाथ गैनीनाथादि गुरु आणि परम गुरूंनो, नारदादि भक्तश्रेष्ठांनो, दक्षादि भक्तराजांनो, लक्ष्मी पार्वती मातोश्रींनो, राधा रुक्मिणी गोपिकांनो, मेनकादि अप्सरांनो, लोपामुद्रादि ऋषिपत्न्यांनो आणि अहो पितृगणहो, तुह्मीं सर्वांनीं, या तुमच्या

वैकुंठ सोडून विमानांत बसून येथवर येऊन मला तुमचें शेवटचें दर्शन दिलें, तेणेंकरून मी धन्य झालों! तुह्मां सर्वांना मी साष्टांग नमस्कार घालीत आहें; तरी तो ग्रहण करून मला तुमचा आशीर्वाद् प्रसाद् द्यावा! (स्वर्गांतून पुष्पवृष्टि होते.) सुजनहो, मी आतां येतों; मजवर कृपा असूं द्या! श्रीपांडुरंगा! माझ्याठिकाणीं तुमचें मन आहे; आणि तुमचे चरण माझे प्राण आहेत! तरी माझा विसर पडूं देऊं नका! तुह्मी माझे मायबाप ह्मणून तुमच्या पादपद्मीं कल्पांतपर्यंत मी वास घेत आहें! श्रीसद्गुरु निवृत्तिनाथमहाराज, हा आपला अज्ञबाल ज्ञानदेव सद्गुरुचरणीं अखेरचा प्रणिपात करीत आहे. (श्रीज्ञानेश्वरमहाराज श्रीनिवृत्तिनाथांचे चरणांवर मस्तक ठेवितात.) तरी या अज्ञ बालकावर आपला वरद्हस्त ठेवून, श्रीपंढरीनाथांनीं माझा ळळा पुरवून मजकरितां तयार करून ठेविलेल्या या समाधिशय्येवर मला नेऊन बसवा! (श्रीनिवृत्तिनाथमहाराज श्रीज्ञानेश्वरमहाराजांस हातीं धरून सिद्धासनाकडे घेऊन जातात. श्रीज्ञानेश्वरमहाराज सिद्धासनापुढें नमस्कार घालून नंतर सिद्धसनाभोंवतीं चार प्रदक्षिणा घालूं लागतात.)

**नामदेव**– अहो भाविक जनहो, या कलियुगांत सकल विश्वाचा उद्धार करण्याकरितां श्रीज्ञानेश्वररूपानें अवतरलेले हे वैकुंठाधिपति श्रीविष्णु, बावीस वर्षांत आपलें अवतार कृत्य आटपून निजधामास जात आहेत! जड, मूढ, स्त्रिया, बालक, शूद्र, अत्यंत शूद्र. इत्यादिकांना हा भव पैलपार होतां यावा ह्मणून, माझ्या ज्ञानरायाची ही समाधि श्रीपांडुरंगांनीं जोंपर्यंत क्षितिमंडल आहे, जोंपर्यंत समुद्रीं जल आहे, जोंपर्यंत अंतरिक्षांत वायु आहे आणि जोंपर्यंत गगनीं चंद्र सूर्य तारे आहेत, तोंपर्यंत स्थिर ठेविली आहे! तरी जनहो, माझा हा वांच्छित फल देणारा आणि दैन्य हरणारा ज्ञानराय हृदयीं नित्य आठवून याचें चिंतन करा! ह्मणजे तुम्ही धर्म, अर्थ, काम लाधून निश्चयानें हा भव तरून जाल! माझ्या श्रीपांडुरंगाचें असें वचन आहे कीं, हा ज्ञानराज त्रैलोक्याची ज्ञानसंजीवनी असून अपमृत्यु हरण करणारा परात्पर

सद्गुरु आहे! माझ्या ज्ञानरायाच्या समाधीकरितां भगवंतांनीं काशीप्रयागादिक्षेत्रांहूनही थोर आणि भूवैकुंठ पंढरीहूनही श्रेष्ठ असें हें अनादि शिवपीठ दिलें असून, या ठिकाणीं इंद्रायणी देवगंगेंत जनपावनार्थ भूवरील सकलतीर्थांना राहण्याविषयीं आज्ञा केली आहे! तरी या मोक्षपुरींत येऊन जे कोणी इंद्रायणींत स्नान करतील, श्रीसिद्धेश्वराचें पूजन करतील, माझ्या ज्ञानरायाचें दर्शन घेतील, माझ्या ज्ञानरायापुढें हरिकीर्तन करतील किंवा त्याचें चरित्र श्रवण करतील, आणि या अजानवृक्षाखालीं श्रीविठ्ठलनामाचें भजन करतील, ते भगवंताचे अंतरंग भक्त होऊन सकल गोत्रजांसह अखंड सच्चिदानंदस्वरूप होतील! अहो वैष्णव संतहो, ही श्रीपांडुरंगाची वचनोक्ति तुह्मी सकल भाविक जनांस सांगून, त्यांना जन्मास आल्यासारखें एकवार तरी या अलंकापुरीला येऊन माझ्या ज्ञानोबारायाचें दर्शन घेण्याविषयीं उपदेश करा! अहो संतहो, माझ्या सद्गुरु ज्ञानरायाची ज्ञानेश्वरी साक्षात् ज्ञानगंगा आहे! या ज्ञानगंगेंत तुम्ही आपलें अंतःकरण नित्य प्रक्षाळून, अंतःकरणावरील विपरीत कल्पनारूपी कलंक धुवून काढा! तुम्ही माझ्या ज्ञानरायाच्या अमृतानुभव-सुधेचा नित्य घोट घ्याल, तर तुमची काया ब्रह्मभूत होईल! वाशिष्टगतेचें मनन कराल तर तुमचे चित्तास अखंड समाधान प्राप्त होईल! आणि माझ्या ज्ञानरायाचे पूर्ण भक्तिपर दिव्य अभंग मुखानें नित्य गाल तर जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होऊन तुम्ही वैकुंठीं श्रीहरिसन्निध आकल्प वास कराल! अहो संतहो, शेवटीं तुमच्यापाशीं हेंच मागणें आहे कीं, देवांनीं तुम्हांला आज्ञापिल्याप्रमाणें शुद्ध एकादशीस पंढरीस श्रीविठ्ठलाचें मुख पाहिल्यावर, कृष्णपक्षीं हरिदिनीं माझ्या ज्ञानोबारायाच्या भेटीस या अलंकापुरीं येत जा. म्हणजे माझ्या ज्ञानरायाच्या नुसत्या दर्शनानेंच तुम्ही ज्ञानी होऊन चतुर्भुजस्वरूपानें वैकुंठीं वास कराल!

(इतक्यांत श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या प्रदक्षिणा आटोपतात. तेव्हां तीन वेळ समाधीपुढें नमस्कार घालून ते खालील अभंग ह्मणत समाधींत प्रवेश करितात.)

ज्ञानेश्वर—
बाळछंदोबाबाबाळछंदो ॥ रामकृष्णानित्यउदो ॥ हृदय-
कळिकेभावीभेदो ॥ वृत्तिसहितशरीरनिंदो ॥ नित्य-
उदोतुझाची ॥ धृ० ॥ करचरणेंसिइंद्रियवृत्ति ॥ तुझ्या-
ठायींतूंचीहोती ॥ मीमाझीउरोनेदिकीर्ति ॥ हेंदानश्रीपती-
मजद्यावें ॥ शांतीदयाक्षमाऋद्धी ॥ हेहिपाहातां मज-
उपाधी ॥ तुझीयानामाचिसमाधी ॥ कृपानिधीमज-
द्यावी ॥१॥ बापरखुमादेविवरुतुष्टला ॥ दानघेघेह्मणोनि-
बोळला ॥ अजानवृक्षपाल्हाईला ॥ मगबोललाविठ्ठल-
हरी ॥ पुंडलिकेंकेलेंरेकोडें ॥ तेंतुवांमागीतलेंरेनिवाडें ॥
मीतुजहृदयींसांपडें ॥ हेंत्वांकेलेंज्ञानदेवा ॥ २ ॥ ज्ञान-
देवेंघेतलेंदान ॥ हृदयींधरुनीयांध्यान ॥ समाधीबैस
लानिर्वाण ॥ कथाकीर्तनकरीतु ॥ बाळछंदोबावीस-
जन्में ॥ तोडिलींभवाब्धीचींकर्मे ॥ चंद्रार्कतारांगणें ॥
रश्मेदानघेतलाहरी ॥ ३ ॥

(नंतर श्रीज्ञानेश्वरमहाराज प्राणापान वायुरोधानें सर्व इंद्रियद्वारें बंद करून त्रिकूट, गोल्हाट, औटपीठ, ब्रह्मरंध्र, भ्रमरगुंफा व सहस्र दल, इत्यादि षड्चक्राच्यावर जाऊन ब्रह्मतेजांत निमग्न होतात. इतक्यांत दशदिशा प्रफुल्लित होऊन विमानांतून देवगंधर्वादि ज्ञानेश्वरमहाराजांवर पुष्पवृष्टि करितात. तेव्हां श्रीनिवृत्तिनाथमहाराज समाधिशिला बंद करितात. त्याबरोबर श्रीज्ञानेश्वरमहाराज जिच्यांत समरस होऊन गेले अशी भगवान् श्रीविष्णूंची मूर्ति काशरथें वैकुंठभुवनीं जाऊं लागते. सर्व संत या श्रीविष्णुमूर्तीस नमस्कार करून, 'ज्ञानदेव विठ्ठल' असा गजर करतात. इतक्यांत 'ज्ञानदेव या चतुराक्षरी मंत्राच्या जपानें व ज्ञानदेवदर्शनानें सर्व जीवांस मुक्ति प्राप्त होईल' अशी आकाशवाणी होते; व 'ज्ञानदेवो जयति' असा नाद सर्वत्र घुमून गेला असतां पडदा पडतो.)

(अंक पांचवा समाप्त.)

# बोपदेवकृत शुद्धिपत्र.

स्वस्ति श्रीमत्सकलभूमंडलमंडनीभूताः अखंडप्रचंडवैतंडिकवेतंडगंडस्थलखंडनैकहरयः गिरयोऽखिलतत्वप्रकाशकसूक्तिरत्नानां तरयोऽशेषशास्त्रजलधेः नानानीवृदलंकरणमणयो निखिलविद्वांसः शृणुध्वमेतां प्रणतिपरंपरोपेतां प्रतिष्ठानमधितिष्ठतां सर्वभूसुपर्वणामस्माकमभ्यर्थनां। यदद्भुततममुद्भूतमिहप्रत्यक्षमपक्षपातमनुभूतं तदेव देववेदसाक्षिकं स्वाक्षिकलितं पुरतः शुभवतां भवतां प्रकाशयामः।

## ॥ श्लोक ॥

आपेग्रामनिवासि याजुषवरो गोविंदपंताभिधो विप्रः कश्चन सत्पुरश्चरणतः श्रीवेदमातुः सुतं। लेभे विट्ठलपंतनामकमसौ जातोपनीतिर्गुरोः संप्राप्तो निगमागमान् समगमत्सत्तीर्थसार्थेच्छया ॥ १ ॥ आलंदीतिप्रथितनिगमे भव्यदिव्यप्रसंगात् सिद्धोपंतद्विजनितनुजां रुक्मिणीं प्राप्य पत्नीं। षड्भिर्वर्षैस्तनयमनया नैव लब्ध्वा प्रसुप्तामेनां हित्वा निशि निशितया प्राप काशीं विरक्त्या ॥ २ ॥

रामानंदाल्लब्धसंन्यासदीक्षं तत्र श्रुत्वा हंत कांतं नितांतं।
शांतस्वांता सेवमाना विमाना स्वर्णाश्वत्थं साथ नाथस्य दैवात्
तत्रैवाप्तं देशिकं संप्रणम्यैतस्मात्पुत्राशीर्वचः प्राप्य खिन्ना।
श्रुत्वा वृत्तं दत्तचित्तेन तेन नीताऽभीता प्रत्तधैर्यापि काशीं ४

स विट्ठलं तत्र जगौ सगौरवं
विहाय चानाप्तसुतां पतिव्रतां।
तयापि नोक्तोस्यृणवान्भवांच्छलात्
बलात् विरक्ताश्रममाश्रितः कुतः ॥ ५ ॥

ममाज्ञयाऽतो घृतकुंभसंभव-स्वजातकर्मादिविधानसंस्कृतः।
इमां पुनः प्रोद्वह तत्र पुत्रकांश्च त्रीन् हरेरंशभवान् भवानियात्
इत्थमसह्यमपि मुहुः प्रसह्य गुरुणारुणाक्षमुक्तः सः।
विधिना पुनरपि विधिना गृही तयाभूत गृहीतया नतया
प्रारब्धलेखनाविधौ विपर्ययादेव वर्णधर्मस्य।
यतिरपि पुनः पतिरभूदित्युक्त्वासौ बहिष्कृतो विप्रैः ॥८॥
वृत्तांतस्याबोधात् श्रुत्वाप्यश्रद्धया पुनरशोधात्।
शिष्टाचारविरोधात् समुज्झितो मत्सरात्परैः क्रोधात् ॥ ९ ॥
अभवन्निवृत्तिमुख्यं ज्ञानेश्वरमध्यमं सुतत्रितयं।
सोपानान्तं तुर्या तुर्यावस्तारता सुता मुक्ता ॥ १० ॥
जातोपनीतिसमयास्तनया इति विप्रमंडलीं समया।
प्रोचे वाचा समया क्षम्यो दोषो ध्रुवं कृतः स मया ॥११॥

स विठ्ठलो विप्रवरैरगादि काणि प्रतिष्ठानपुरेऽत्र तस्मात् ।
शुद्धिं प्रतिष्ठानपुरे लभस्व निवेद्य सर्वं स्वकृतं विगर्वं ॥ १२ ॥
पुत्रैः समं सोथ समं स्वचित्तं कृत्वा प्रतिष्ठानमिदं प्रयातः ।
स्वमातुलस्यालयमध्यवात्सीत् सोप्युज्झितोस्माभिरमुष्यसंगात्
कृष्णाभिधो विठ्ठलमातुलोऽसौ श्राद्धे न लेभे द्विजमुक्तदोषात् ।
लोकांतरात्तस्य पितॄन् स साक्षात् आनीतवान्मध्यमवैठ्ठलिः सः
श्राद्धे यदाभून्न हि विप्रयोगश्चिरात्पितॄणामपि विप्रयोगः ।
ज्ञानेश्वरेणेह निवारितोऽत्र दृष्टं चरित्रं तदिदं विचित्रं ॥ १५ ॥
ज्ञानेश्वरो विठ्ठलनंदनानां स मध्यमोप्युत्तम एव चाद्यः ।
स्थितिप्रियो नित्यविशुद्धसत्वः यथाऽमराणां मुराजित्त्रयाणां ॥
कृत्वा नमो विप्रकुलाय गोदातीरे स्थितस्तातकुलायहेतोः ।
तीराधिवासैः कृतभूरिहासैर्द्विजैरयासैः कथितो विलासैः ॥१७
ज्ञानेश्वरस्त्वं यदि वास्तवोऽसि न वा स्तवोऽयं तव नाममात्रात्
प्रताडितेऽस्मिन्माहिषे प्रतोदैस्तवापि गात्रे भविता तदंकः ॥१८
अथेत्यवादीदथ तैः प्रताडिते तस्मिंल्लुलायेऽरुणमस्य पृष्ठकं ।
व्यलोकि रेखात्रितयं त्विहाखिलैः किलास्य कालत्रयबोधसूचकं
लुलायमेतं स्वकुलायसिद्धये विधेह्य शेषश्रुतिवृंदपाठकं ।
इतीरितस्तस्य निधाय मूर्धनि करं स वेदाकरमेनमातनोत् ॥२०

समक्षं सर्वेषां ध्रुवमभवदेषां द्विजनुषा-
मशेषाणां गोदातटभुवि तु मोदाय विदुषां ।
चरित्रं चित्रं तन्महिष इह संतर्जितबुधोऽ-
खिलानुच्चैर्वेदानुचितपदभेदान् समपठत् ॥ २१ ॥

एवंविधानि विविधानि विलोकितानि
ज्ञानेश्वरस्य चरितानि महाद्भुतानी ।
विप्रास्ततोऽत्रमिलिताः सकला विशुद्धेः
पत्रं पवित्रहृदयेन समर्पयामः ॥ २२ ॥

ज्ञानेश्वरस्मरणतः स्मरणेन मुक्तान्
मुक्ताग्रजोऽयमखिलान् खलु कर्तुमिष्टे ।
निंद्यो न बोधरहितैः स्वहितैकसिध्यै
वंद्यो ध्रुवं सुकृतिभिः कृतिभिः समस्तैः ॥ २३

निध्यंबरयमक्षोणीसंयुते शालिवाहने ।
माघे शुक्ले च पंचम्यां सर्वजिन्नामवत्सरे ॥ २४ ॥
श्रीमद्ज्ञानेशचरणयुगुले सुरसेविते ।
बोपदेवेन ग्रथितं शुद्धिपत्रं समर्पितं ॥ २५ ॥

---

B / 125